नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरु**वार दिनांक 20/02/2020 रोजी सकाळी 11–30 वाजता** श्रीमंत राजे रघोजीराव भोसले नगरभवनात भरलेल्या स्थगित सर्व साधारण सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **१६** | **ड** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** | |
| २. | **२६** | **क** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** | |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ८. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| ९. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |
| १०. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| ११. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| १२. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| १३. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A१२ |
| १४. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| १५. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १६. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| १७. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १८. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| २०. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| २१. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| २२. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २३. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २४. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| २५. | ७ | अ | विरंबा मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| २६. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| २७. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २८. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २९. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| ३०. | ८ | ब | अंसारी सय्यदा बेगम मो. निजामुद्दीन | सदस्या | D२७ |
| ३१. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| ३२. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |
| ३३. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३४. | ९ | ब | संजय श्यामराव बुरेवार | सदस्य | D३५ |
| ३५. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३६. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् | D३६ |
| ३७. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ३८. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |
| ३९. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ४०. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |
| ४१. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |
| ४२. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ४३. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ४४. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| ४५. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ४६. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य | C१६ |
| ४७. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| ४८. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| ४९. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ५०. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ५१. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| ५२. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| ५३. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| ५४. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| ५५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| ५६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ५७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ५८. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ५९. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ६०. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ६१. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ६२. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ६३. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| ६४. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| ६५. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ६६. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| ६७. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ६८. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| ६९. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| ७०. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ७१. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| ७२. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ७३. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य | B१२ |
| ७४. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |
| ७५. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| ७६. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| ७७. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |
| ७८. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ७९. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |
| ८०. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ८१. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |
| ८२. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ८३. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |
| ८४. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |
| ८५. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ८६. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| ८७. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ८८. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ८९. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ९०. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| ९१. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ९२. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ९३. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ९४. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ९५. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| ९६. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ९७. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ९८. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ९९. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| १००. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| १०१. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| १०२. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| १०३. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| १०४. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| १०५. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| १०६. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| १०७. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १०८. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| १०९. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| ११०. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| १११. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C१ |
| ११२. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A३८ |
| ११३. | ३१ | ब | सतीया विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| ११४. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |
| ११५. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| ११६. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| ११७. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| ११८. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| ११९. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| १२०. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |
| १२१. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| १२२. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |
| १२३. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| १२४. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| १२५. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| १२६. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |
| १२७. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| १२८. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १२९. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| १३०. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |
| १३१. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| १३२. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| १३३. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| १३४. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| १३५. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| १३६. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| १३७. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या | A८ |
| १३८. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |
| १३९. | ३८ | अ | उज्जवला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| १४०. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य | C४ |
| १४१. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| १४२. | ना.स. | | सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य | C९ |
| १४३. | ना.स. | | गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |
| १४४. | ना.स. | | किशोर रामकृष्ण वानखेडे | सदस्य | C११ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १४५. | ना.स. | | निशांत गिरीश गांधी | सदस्य | C१२ |
| १४६. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D९ |

अनुपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५ | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या | C२३ |
| २. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| ३. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ४. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |
| ५. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |
| ६. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| ७. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ८. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| ९. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |
| १०. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |

## उपस्थित अधिकारी

श्री. तुकाराम मुंढे — निगम आयुक्त
श्री. राजेश मोहिते — निगम सचिव/उपायुक्त

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

**ठराव क्रमांक 58** :– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दाजंली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभाग्हाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## शोक प्रस्ताव

### विद्या बाळ

स्त्री हक्कांविषयी लढणाऱ्या, स्त्री–पुरूष समानतेचा पाया रूजविणाऱ्या परिवर्तनवादी चळवळीतील खंद्या कार्यकर्त्यां विद्या बाळ यांचे दिनांक 30/01/2020 रोजी निधन झाले.

स्त्रियांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांनी नारी समता मंचची स्थापना केली. महिलांवरील अन्याय व अत्याचाराविरूध्द आवाज उठवत समाजात जनजागृतीसाठी काढलेली 'प्रकाशफेरी', स्त्रीभ्रूणहत्येविरूध्द निदर्शने, मोर्चे, परिसंवाद, ग्रामीण भागातील महिलांना व्यक्त होण्यासाठी 'बोलते व्हा' सारख्या उपक्रमांव्दारे समाजात स्त्रीहक्काची चळवळ त्यांनी सुरू केली.

## आर.के.पचौरी

उर्जा आणि संसाधने संस्थेचे (टेरी) माजी प्रमुख आणि पर्यावरणतज्ञ आर.के. पचौरी यांचे दिनांक 13. 02.2020 रोजी निधन झाले. ते 79 वर्षाचे होते.

के.पचौरी यांना 2001 मध्ये पद्मभूषण आणि 2008 मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त राष्ट्राच्या हवामान बदल या विषयावरील आंतरराष्ट्रीय समितीला 2007 मध्ये शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला होता.

## कुसुमताई घाटे

काँग्रेस पक्षाच्या माजी नगरसेविका श्रीमती कुसुमताई घाटे यांचे दिनांक 30.01.2020 रोजी निधन झाले. त्या 61 वर्षाच्या होत्या.

कुसुमताई घाटे या काँग्रेस पक्षातर्फे खलासी लाईन वार्डातून सन 2002 व सन 2007 मध्ये निवडून आल्या होत्या.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दुःख होत आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

## श्रध्दांजली

वर्धा जिल्हयातील हिंगणघाट येथे माथेफिरू नराधमाने 24 वर्षीय प्राध्यापिका असलेल्या तरूणीच्या अंगावर 3 फेब्रुवारी, 2020 रोजी पेट्रोल ओतून पेटवून दिले. या पीडीतेचा नागपूर येथे उपचारा दरम्यान दिनांक 10 फेब्रुवारी, 2020 रोजी मृत्यू झाला. सडक्या मानसिकतेचा बळी ठरलेल्या या दुर्देवी घटनेचा नागपूर महानगरपालिकेची ही सभा तीव्र शब्दात निषेध करते. यानंतर समाजात अशी मानसिकता निर्माण होवू नये म्हणून आवश्यक प्रक्रीया पूर्ण करून न्यायालयाने आरोपीला कठोरात–कठोर शिक्षा दयावी, अशी या सभागृहाची भावना आहे.

ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

यानंतर मा. महापौरजी यांनी 2 मिनिट उभे राहून मृतात्म्यास श्रद्धांजली अर्पण केली.

वंदे मात्रम नंतर मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**<u>ठराव क्रमांक 59</u> :—** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

### जगतप्रकाश नड्डा

भाजपाचे अकरावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून माजी केंद्रीय मंत्री, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि विद्यमान कार्यकारी अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांची अविरोध निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### चंद्रकांत पाटील

भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी चंद्रकांत पाटील यांची फेरनियुक्ती करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### रश्मी बर्वे/मनोहर कुंभारे

नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी काँग्रेसच्या रश्मी बर्वे तर उपाध्यक्षपदी मनोहर कुंभारे यांची निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### दुष्यंत चतुर्वेदी

यवतमाळ जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार दुष्यंत सतीश चतुर्वेदी निवडून आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### प्रवीण दटके/अरविंद गजभिये

भारतीय जनता पक्षाच्या शहर अध्यक्षपदी माजी महापौर प्रवीण दटके तर जिल्हाध्यक्षपदी अरविंद गजभिये यांची फेरनिवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### अनुराधा पाटील

मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिका अनुराधा पाटील यांची ''विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कारासाठी'' निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## मिलींद तोतरे/बट्टूलाल पांडे

पोलीस दलात राहून गुणवत्तापूर्ण सेवा दिल्याबद्दल शहर पोलीस दलातील उपअधीक्षक मिलींद तोतरे आणि हवालदार बट्टूलाल पांडे यांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## कृष्णा इंगळे

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कृष्णा इंगळे यांची महाराष्ट्राच्या कौशल्य विकास विभागाचे अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## पियुष अंबुलकर/दामिनी रंभाड

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय हॉकीपटु आकाश चिकटे, कुस्तीपटू अभिजित कटके, कबडडीपडू ऋषांक देवडिगा यांच्यासह 48 खेळाडूंना 2018–19 सालचा प्रतिष्ठेचा श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे.

विदर्भातील 8 खेळाडू या पुरस्काराचे मानकरी ठरले असून त्यामध्ये नागपूरचे पीयुष रवी अंबुलकर (सॉफ्टबॉल) व दामिनी मनोहर रंभाड (तलवारबाजी) यांचा समावेश आहे. पीयूष अंबुलकर हे सद्या महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहे याचा आम्हाला विशेष आनंद आहे. त्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्व पुरस्कारप्राप्त खेळाडूंचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## प्रफुल्ल फरकसे

अ.भा. नाटय परिषदेच्या नागपूरच्या अध्यक्षपदी म.न.पा.चे प्रफुल्ल फरकसे यांचेसह संपूर्ण कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचेसह नवनिर्वाचित कार्यकारिणीचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## प्राची पारखी/मृण्मयी वालदे

## आयुषी घोडेस्वार

जिम्नॅस्टिकच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू प्राची पारखी, मृण्मयी वालदे आणि आयुषी घोडेस्वार यांना क्रीडा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा तिघांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## अथर्व लोहार/देवेश भईया

कला व संस्कृती क्षेत्रातील योगदानासाठी अथर्व लोहार तर गणितातील सृजनात्मक कार्यासाठी देवेश भईया या महाराष्ट्रातील दोन बालकांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले.

महापौरः— प्रश्नोत्तराच्या तासाला सुरवात करण्यात येते.

**<u>प्रश्न क्रमांक १८७</u>** :- महाराष्ट्र राज्य शासनाकडुन सेवा हमी कायदा सन २०१५ मध्ये लागु करण्यात आला या सेवा हमी कायद्यांतर्गत मनपा करीता कोण कोणत्या सेवा देण्यात येत आहे या संदर्भात संदर्भात प्रश्न.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मैने प्रश्न पुछा था की महाराष्ट्र राज्य शासनाकडुन सेवा हमी कायदा २०१५ मध्ये लागु करण्यात आला या सेवा हमी कायदयाअंतर्गत कोणकोणत्या सेवा देण्यात येते, या कायदयाअंतर्गत कोणावर कारवाई करण्यात आली आहे ? त्यामध्ये उत्तर विभागाकडुन मिळाले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ नुसार महानगरपालिकेमध्ये एकुण ४९ सेवा देण्यात येत असुन दिनांक ०५.११.२०१९ च्या शासन राजपत्रात अधिसुचना करण्यात आलेली आहे. शासन राजपत्र सोबत जोडले असून त्यामध्ये नमुद एकुण ४९ सेवा व आवश्यक सेवा देणा-या प्रथम व व्दीतीय अपिलीय अधिकारी म्हणुन सुचित करण्यात आले आहे. मनपा तर्फे या कायदयाअंतर्गत कोणत्याही अधिकारी व कर्मचा-यांवर कारवाई करण्यात आलेली नाही. मा.महापौरजी इसमे जो ४९ सेवाये बतायी गयी है इसमे ३ दीन, ७ दिन,१५ दिन, ३० दिन जो नक्शा मंजूर कितने दिन के अंतर्गत करना है, जन्ममृत्यु दाखला कितने दिन मे देना है, महानगरपालिका मे जो नियम बताये है इसके अंतर्गत जनता के काम होते है क्या ? और नही हुये तो अभितक एक भी अधिकारी और कर्मचारी के उपर कारवाई की गयी है क्या ? इस ५ साल मे इस कायदे के अंतर्गत एक भी अधिकारी और कर्मचारी के उपर कारवाई नही की गयी और यह जो कायदा है इस कायदे के अंतर्गत महानगरपालिका के कोनसे कोनसे अधिकारी और कर्मचारी इस कायदे के अंतर्गत आते है इसकी जानकारी प्रशासन ने देना चाहियें।

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, महानगरपालिकेने ४९ सेवा या कायदयाअंतर्गत अधिसूचित केल्या आहेत त्याचे गॅजेट नोटीफिकेशन सुध्दा करण्यात आले आहे. सन्माननिय सदस्यांनी विचारले आहे की, या अंतर्गत कर्मचारी किंवा अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. त्या संदर्भात ज्या सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. त्या सेवा किती मुदतीमध्ये देण्यात याव्यात याच्या संदर्भात गॅजेट नोटीफिकेशन अंतर्गत तरतुद केली आहेत त्या अंतर्गत सेवा प्रदान करण्यासंदर्भात नागरिकांना काही तक्रार असेल किंवा सुविधा उपलब्ध झाल्या नसतील तर त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपिल करणे अपेक्षित आहे. त्यानंतर सुनावणी घेऊन जर तो दोषी असेल तर त्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. अशा अपिल नागरिकांकडुन प्राप्त झालेल्या नाहीत त्यामुळे कोणत्याही अधिकारी व कर्मचा-यांवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाहीत.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, यह जो कायदा है इसके अंतर्गत कोणते अधिकारी पर कारवाई की जा सकती है,

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, या नोटीफिकेशन अंतर्गत या सेवा कोणी प्रदान करायच्या आहे त्या पदनिर्देशित अधिकारी म्हणुन आपण पदनाम आणि अधिकारी नियुक्त केलेले आहे. त्या अधिका-यांनी ती सेवा देणे अपेक्षित आहेत. त्या नागरिकांचे समाधान झाले नसेल तर या पदनिर्देशित अधिका-यांविरुध्द प्रथम अपिलीय अधिका-यांकडे त्यांनी प्रथम अपील अर्ज दाखल करणे अपेक्षित आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, जिस अधिकारी ने काम बराबर नही किया उसपर कारवाई करणे का अधिकार किस अधिकारी को है ?

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, अगर उसने भी कारवाई नही की तो उसके उपर कारवाई करने का अधिकार किसको है ?

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, व्दीतीय अपिलीय अधिकारी यांच्याकडे, मा.महापौरजी, या गॅजेट नोटीफिकेशन मध्ये अंतर्भुत केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी कोण, व्दीतीय अधिकारी कोण,

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, सभागृहात गॅजेट नोटीफिकेशनचे वाचन करण्यात यावे.

महापौर :- सन्माननिय सदस्यगण आपणास गॅजेट नोटीफिकेशनची यादी देण्यात आलेली आहे.

**प्रश्न क्रमांक १८८** :- महानगरपालिकेने मेसर्स आय.टी.क्राप्ट टेक्नॉलॉजीस्ट प्रा.लि. ची नियुक्ती कधी करण्यात आली. संदर्भात प्रश्न

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेतर्फे मे.आय.टी. क्राफ्ट टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमीटेडची नियुक्ती कधी करण्यात आली व ती कोणत्या कामाकरीता करण्यात आली आणि त्यांना आपण किती मानधन नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांना देत आहोत ? आणि या कंपनीकडुन महानगरपालिकेला किती लाभ झाला त्याबाबत प्रश्न मी टाकलेला आहे. मला याचे उत्तरही मिळाले परंतु उत्तर मिळाल्यानंतर माझ्यासमोर आणखी काही प्रश्न निर्माण झाले. जसा की एक प्रश्न या कंपनीच्या माध्यमातून सोशल मिडीयावर तसेच सर्व माध्यमांना महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या सर्व योजनांची माहिती देण्याची काम, महानगरपालिकेमध्ये पदाधिकारी आणि अधिका-यांसोबत ज्या मिटींग होतात त्यांच्या तीनही भाषेमध्ये भाषांतर करुन माध्यमांना देण्याचे काम अशा प्रकारचे काम देण्यात आले आहे. मला हे विचारायचे आहे की, नागपूर महानगरपालिकेमध्ये जनसंपर्क विभाग असल्यानंतरही या आय.टी. क्राफ्ट कंपनीला ३,१९,४००/- रुपये दर महिन्याला आपण देतो आणि वर्षाला जवळपास ४७ लक्ष रुपये आपण या कंपनीवर खर्च करीत आहे. त्यानंतरही या कंपनीला जे आपण काम दिले की ज्या महानगरपालिकेमध्ये मिटींग होतात त्याचे तीनही भाषेमध्ये माध्यमांना देऊन नागरिकांपर्यत पोहचविण्याचे काम आहे. आज येथे अनेक वरिष्ठ पत्रकार महानगरपालिकेचे काम बघत आहे. मी पत्रकारांना या संदर्भात विचारले तेव्हा त्यांच्याकडुन मला माहिती मिळाली की या आय.टी. क्राफ्ट कंपनीकडुन संपुर्ण बातम्या येत नाही. आपल्या जनसंपर्क विभागाकडून त्या बातम्या जातात. दुसरी गोष्ट या आय.टी क्राफ्ट कंपनीचे काम तीनही भाषेमध्ये माध्यमांना दयायला पाहिजे होते. इंग्रजी वर्तमान पत्र असेल तर इंग्रजीमध्ये दयायला पाहिजे, मराठी वर्तमान पत्र असेल तर मराठी मध्ये आणि हिंदी वर्तमान पत्र असेल तर हिंदीमध्ये परंतु सरसकट आतापर्यत मराठीच्या माध्यमातून बातम्या देण्यात येते आणि जनसंपर्क विभाग असल्यानंतरही काय गरज पडली याचे निराकरण करावे, अशी मी आपणासं विनंती करतो आणि त्याबाबत उत्तरही दयावे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामध्ये स्थायी कर्मचारी नाहीत जे पी.आर.ओ. म्हणुन जे आहे ते स्मार्ट सिटीचे आहे त्यांच्याकडे ॲडीशनल जबाबदारी महानगरपालिकेची आहे. आणि जे असीस्टंट पीआरओ सुध्दा नाही. कर्मचारी वर्ग पुरेसा उपलब्ध नाही.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. परंतु कर्मचारी निश्चित आहे. मग आय.टी क्राफ्ट कंपनीला आपण तीनही भाषेमध्ये दयायचा जो ॲग्रीमेंट केलेला आहे तर मग त्यांनी कसे दयायला पाहिजे. मग जनसंपर्क विभागाचा उपयोग काय आहे. एकतर जनसंपर्क विभागाला आपण पोसून राहिलो नाहीतर आय.टी. क्राफ्ट कंपनीला आपण पोसून राहिलो, मी घेतलेल्या माहितीनुसार या जनसंपर्क विभागामध्ये जे काम करीत आहे आणि ज्यांना आपण नियुक्त केले आहे यांच्या पगारावर जवळपास १० लक्ष रुपये महिन्याचा खर्च होत आहे अणि एकीकडे आपण ३ लाख ७९ हजार रुपये आपण त्या कंपनीला देत आहोत म्हणजे महानगरपालिकेच्या पैशाचा अपव्यय होत आहे असे दिसुन राहिले. आय.टी. क्राफ्ट कंपनी येण्याच्या आधी जनसंपर्क विभाग होता त्यांच्या माध्यमातून आपण काम करीत होतो मग आज अडचण काय आहे. माझ्या माहितीप्रमाणे जनसंपर्क विभागामध्ये किती स्थायी कर्मचारी आहे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, जनसंपर्क विभागामध्ये महानरगरपालिकेचे ४ कर्मचारी आहे.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आपल्या महानगरपालिमध्ये अनेक अतिरिक्त शिक्षक आहे आणि मला असे वाटते की त्यांची कॅपिसिटी पण आहे चांगले लिहीण्याची आपण त्या शिक्षकांना जनसंपर्क विभागामध्ये घेऊ शकतो असे मला वाटते.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, जनसंपर्क विभागामध्ये एकुण ४ कर्मचारी आहे. मग त्या कर्मचा-यांच्या माध्यमातून काम करण्यास काही अडचण होते काय ? आय.टी. क्राफ्ट कंपनी लावण्यामागचा जो हेतु होता तो हेतु साध्य होत आहे काय ?

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, सध्या आपल्याकडे सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव पाहता ते हॅन्डल करण्याकरीता आपण या कंपनीची नियुक्ती केली आहे. सध्या आपल्याकडे जो स्टाफ आहे तो अपुरा असल्यामुळे या कंपनीची गरज आहे.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, यांनी जी माहिती दिली की सध्या आपल्याकडे सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव आहे ते सुध्दा याच्याकडे काम होते. सोशल मिडीयाच्या माध्यमातून ज्या महानगरपालिकेच्या योजना आहे स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण, कर आकारणी मोहिम, मातृत्व परिवर्तन योजना, दिनदयाल योजना, अंतोदय योजना, अपंग कल्याण योजना अशा प्रकारच्या विविध योजना आहे. या योजनेच्या संदर्भात जनजागृती करण्याचे काम या कंपनीला देण्यात आले आहे. येथे असलेले संपूर्ण नगरसेवक आणि आपणनही फेसबुकचा उपयोग करीत असाल, माझा अनुभव असा आहे की, माझ्या फेसबुकवर आतापर्यंत या कंपनीच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या एकही योजनेची जनजागृती झालेली नाही. याचाच अर्थ असे की, या कंपनीला आपण पोसुन राहिलो आहे. या कंपनीची ज्या करीता आम्ही नेमणुक केली, प्रिंट मिडीयाला सुध्दा त्या भाषांतर करुन देत नाही. जनसंपर्क विभागाचे कर्मचारी स्वत: रिपोर्ट तयार करतात. आमच्या जनसंपर्क विभागाचे रिपोर्ट तयार करुन मराठीमध्ये आजही ते पाठवितात, जे इंग्रजी वर्तमानपत्र आहे त्यांच्याकरीता मराठीचे ट्रान्सलेशन करण्याकरीता त्यांना वेळ लागतो म्हणुन जनजागृतीच्या ज्या बातम्या आणि मनपाच्या जनसामान्याच्या हिताच्या ज्या बातम्या प्रकाशित होत नाही. आणि आपण त्यांना येथे पोसुन राहिलो तर ते कशासाठी पोसुन राहिलो, सोशल मिडीयावर बातम्या येत नाही. येथे पत्रकार बसले आहे त्यांना सभेमध्ये सहभाग घेता येत नाही हे पण तितकेच खरे आहे. माझी जी मागणी आहे की या आय.टी. क्राफ्ट कंपनीला पोसायचे की नाही पोसायचे यावर आपल्याला निर्णय घ्यायचा आहे आणि ती आय.टी.क्राफ्ट कंपनी जीची आम्हाला काहीच गरज नाही. जर रद्य करण्यात यावी. ज्या आपण बैठकी घेतात तेथे आपल्या जनसंपर्क विभागाचे कर्मचारी राहतात तेच रिपोर्ट तयार करतात सर्व गोष्टी एकत्र केल्यानंतर आपण त्यांना पैसे कशाचे दयायचे हा मुळ मुद्या आहे. मा.महापौरजी, मी आपणास विनंती करतो, यांनी एक काम त्यांना हे पण दिले आहे की शहरामध्ये कुठे खड्डे आहे ते शोधायचे, आम्हाला कधी खड्डे शोधतांना पाहीले नाही. तुमचेच पत्र आहे आणि त्या पत्रामध्ये उल्लेख केला आहे. शहरातील खडडे शोधण्याचे काम व ते सोशल माध्यमांपर्यंत पोहचविण्याचे काम या कंपनीकडे असतील, जे काम या कंपनीला दिले आहे ते काम माझ्या मते १० टक्के केले असतील,

श्री.सुनिल अग्रवाल :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.सदस्यने कहा की जो भी मिटींग होती है वहापर मिनीटस् बनाये जाते है वह महानगरपालिका के कर्मचारी व्दारे बनाये जाते है। कोनसा कर्मचारी बनाता है उसके नाम का स्पष्टीकरण यहापर किजीये।

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, मिनीटस् घेण्याचे काम समिती विभाग घेते आणि दुसरी गोष्ट माझे यावर एक ऑब्जेशन आहे की एकतर जनसंपर्क विभाग बंद करुन टाकावा आणि जे कर्मचारी आहे त्यांना काढुन टाकावे, त्यांना आपण पगार त्या कामाचा देतो मग आय.टी क्राफ्ट कंपनीला मदत करण्याकरीता घेतले आहे. मग आय.टी.क्राफ्ट कंपनी काय करते त्यांच्याकडुन घेते आणि मराठी मध्ये करुन टाकुन देते. सोशल मिडीयावर जनजागृती करण्याकरीता आपण त्यांना पैसे देत आहे. याचाच अर्थ असा आहे की त्या आय.टी. क्राफ्ट कंपनीला पोसण्याची गरज नाही. नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. अशाप्रकारे जर आपण पैशाची उधळण करीत असु, आणि हेच पैसे आपण थोडे वाचविण्याचे प्रयत्न करीत असु तर हे पैसे विकासाच्या कामात येईल, असे मला वाटते. त्यामुळे आपण आजच आय.टी.क्राफ्ट कंपनीला निलंबित करावे अशी माझी मागणी आहे.

महापौर :- अतिरिक्त आयुक्तांनी संपुर्ण विषयाचा आढावा घेवून सभागृहाच्या पटलावर अहवाल ठेवावा. त्यानंतर या विषयावर निर्णय घेण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक १८९** :- नागपूर महानगरपालिकेतील ज्या कर्मचाऱ्यांनी एल.जी.एस. व एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर वेतनवृध्दी संदर्भात प्रश्न

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, ज्या कर्मचा-यांनी एन.जी.एस.आणि एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या आहेत अशा कर्मचा-यांना दोन वेतनवृध्दी देण्याचा प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेने त्या संबंधातील ठराव क्र. ८१ दि. २९/०६/१९९४ मध्ये घेतलेला होता. मला जी माहिती देण्यात आली आणि त्या माहितीमध्ये सांगण्यात आले की, ठराव झाल्यानंतर एकुण ५८ कर्मचा-यांना वेतनवृध्दीचा लाभ देण्यात आला. ज्या कर्मचा-यांनी या परिक्षा उत्तीर्ण केलेल्या आहे परंतु त्यांना वेतनवृध्दी लागू झालेली नाही असे एकुण ५४ कर्मचारी आहेत. माझ्या दुस-या प्रश्नाच्या अनुषंगाने मला प्रशासनाने उत्तर दिले की सहाव्या वेतन आयोगातील शिफारशीतील क्रमांक नुसार काही पदांना सेवा प्रवेशाच्या वेळी देण्यात येणारे उच्च प्रारंभिक वेतन तसेच शैक्षणिक अर्हतेच्या आधारावर मंजूर करण्यात येणा-या वेतनवाढी या पुढे अनुज्ञेय असणार नाही असे यामध्ये नमूद आहे. अशी शिफारस स्वीकृत करण्यात आली आहे आणि ती प्रत सोबत जोडलेली आहे. आणि ही प्रत मला दिली. ज्या महानगरपालिका यांनी जे ठराव आपआपल्या महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी, अधिकारी उत्तीर्ण झालेले आहे त्यांच्या भल्याकरीता ज्यांनी ठराव घेतलेले आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने आपण त्यांना वेतनवृध्दी देत होतो परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या केंद्र शासनाने जे निर्णय घेण्यात आले त्यानुसार महाराष्ट्र शासनाने आपल्याकडे जो जी.आर. पाठविला त्यानुसार जे ५४ कर्मचा-यांना देण्यात आले नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे. हा जो जी.आर. होता तो त्यांनाच लागू होता की ज्या महानगरपालिकेने अशा प्रकारचा ठराव घेतला नव्हता. असाच मानस माझा आहे. जी.आर. निघाला आहे फेब्रुवारी २००९ मध्ये आहे आणि पिंप्री चिंचवड महानगरपालिकेने २३ ऑगस्ट २०११ रोजी एक पत्र महाराष्ट्र शासनाला लिहीले की महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी एन.जी.एस. आणि एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्यांना दयावयाच्या अगाऊ वेतन वाढीबद्यल राज्यातील अन्य महानगरपालिकेने कोणती भुमिका घेतली आहे याची माहिती घेऊन आपल्या महानगरपालिकेतील एन.जी.एस. आणि एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या कर्मचा-यांना अगाऊ वेतनवाढी देण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घेण्यात यावा, हे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासनाचे पत्र आहे. याचाच अर्थ असा आहे की ज्या महानगरपालिकेने त्या प्रकारचा ठराव घेतला आहे त्यांनी ठरावाप्रमाणे निर्णय घ्यायला पाहिजे आणि काटेकोरपणे त्याचे पालनही व्हायला पाहिजे. काही कर्मचा-यांबद्यल न्याय झालेला आहे परंतू काही कर्मचा-याबद्यल आपण अन्याय करीत आहोत. जे नियम आलेला आहे महाराष्ट्र शासनाकडून परंतु तो नियम कशाप्रकारे आलेला आहे की ज्या महानगरपालिकेने ते ठराव घेतला आहे त्यांना ते लागू नाही. पिंप्री चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाशी पत्र व्यवहार केला होता आपण पत्र व्यवहार कधी केला आहे काय, महाराष्ट्र शासनाशी,

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, पत्रव्यवहार केलेला नाही.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, आपण पत्रव्यवहार न करता आपण कुठे तरी राजपत्र दाखवायचे कुठे जी.आर. दाखवून दयायचे आपल्या येथे जे ५४ कर्मचारी आहे त्यांच्यावर अन्याय करायचा हे खरचं योग्य नाही. मी आपणांस निवेदन करते की आपण प्रशासनाला असे निर्देश दयावे की जर त्यांच्या मनात संभ्रम असेल तर त्यांनी राज्य शासनाशी पत्र व्यवहार करावा, जे उत्तर येईल त्याप्रमाणे नियमानुसार त्यांच्यावर कार्यवाही करावी, कारण पत्रव्यवहार न करता कर्मचा-यांवर अन्याय करु तर ते चुकीचे होईल.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सभागृह, सहाव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन वृध्दी मान्य करण्यात आली आहे. त्यामध्ये अगाऊ वेतनवाढ देवु नये असे शासनाचे निर्देश आहे. त्यामुळे शासनाकडे या संदर्भात पत्र व्यवहार करण्याची गरज नाही. सहाव्या वेतन अयोगामध्येच वेतन वृध्दी अंतर्भुत असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-यांनी अतिरिक्त शैक्षणिक पात्रता धारण केली तरी त्या कर्मचा-यांना अतिरिक्त वेतनवृध्दी देता येणार नाही.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, २००९ च्या आदेशानुसार आपण केले त्यानुसार जर काही लोकांना वेतन वृध्दी दिलेली आहे मग ती काही चुकीची झालेली आहे काय ? मा.महापौरजी, आपणांस निवेदन करते या सर्व बाबींची शहनिशा करुन योग्य निर्णय घेण्यात यावा, कारण कुणाबरोबर न्याव व कुणाबरोबर अन्याय व्हायला नको, आपण महापौर आहे आणि आपण महापौर असतांना कुणासोबत न्याय आणि कुणासोबत अन्याय होऊ शकत

नाही.

महापौर :- उपायुक्त, प्रशासन यांनी या संपुर्ण बाबींची शहानिशा करावी, त्यानंतर या विषयावर निर्णय घेण्यात येईल जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही.

**<u>प्रश्न क्रमांक १९०</u>** :- प्रभाग क्र. ३१ येथील सिमेंड रोड ची कामे करतांना काय निकष लावलेत हया संदर्भात प्रश्न

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, माझा एक साधा प्रश्न आहे की सिमेंट रोड बनवितांना आपण काय निकष लावले. त्यामध्ये प्रशासनाने उत्तरामध्ये सांगितले की नगरसेवकांनी रस्ते सुचविले आहे. रिंग रोडच्या आतील रस्ते अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतुद लक्षात घेऊन मा.स्थायी समिती यांनी दिलेली मंजूरी, २०० मिटर रोडला जोडणारे रस्ते, प्रमुख वर्दळीचे रस्ते, आपल्या माध्यमातून एक विचारु इच्छितो की सिमेंट रोड करण्यासाठी हे निकष तांत्रिकदृष्टया बरोबर आहे की याच्यामध्ये अजुन काही आहे ? तांत्रिकदृष्टया ही कारणे पुरेशी आहे काय ?

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, प्रकल्पाअंतर्गत जे सिमेंट रस्ते घेतले आहे त्यामध्ये प्रामुख्याने निकष हेच लावले होते की रिंगरोडच्या आतील जे आय.आर.डी.पी. जे जाळे आहे मुख्य रस्त्याचे त्या रस्त्यांचे सिमेंटीकरण करणे. १९९५ ते २००० च्या दरम्यान जे आपले सिमेंटचे रस्ते झाले होते त्यांना जोडणारे जे रस्ते आहे त्या रस्त्यांना कंटीन्युटी यावी असे रस्ते, व प्रमुख रस्ते डी.पी. चे रस्त्यांना आपण हेच निकष लावले होते.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, मी आपखी परत विचारतो की हे निकष तांत्रिकदृष्टया बरोबर आहे की आणखी काही निकष आहे.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, त्या रस्त्यावरील ट्राफीक काउंट करुनच आपण सिमेंट रस्त्यांचे काम करतो.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, इंडीयन रोड क्रॉग्रेसने तुम्हाला काही निकष दिले आहे काय ? किंवा त्यांच्या स्टॅन्डर्ड मध्ये काही आहे काय, ते जर नसेल तुमच्याकडे तर मी देतो प्रशासनाला, रस्ते मंजूर केल्यानंतर आपण डिझाईन करतो, डिझाईन करतो म्हणजे नेमके काय करतो. सिमेंट रोड करायचा असेल तर इंडीयन रोड कॉग्रेस कलम २७, २००१ नुसार इंडीयन स्टॅन्डर्ड ४५६, २०१५ मध्ये दिलेले आहे की सिमेंट रोड करतांना काय काय चेक केले पाहिजे. माझ्याकडे ३ फाईल आहे त्यातील २ फाईलचे कामे झाले आहे. एका फाईलचे काम व्हायचे आहे. त्यामध्ये एकाही फाईलमध्ये कुठल्याही प्रकारची टेस्ट केलेली नाही. मनात येईल तसे रस्ते तयार करण्यात आले आहे. इंडीयन रोड कॉग्रेसने काय सांगितले की, कुठलाही रोड करतांना पहिले सी.बार.आर. माहिती आहे काय ? सी.बी.आर. काढायचे असेल तर त्यामध्ये ट्राफीक डेनसिटी पाहिजे, आज आपण गल्ल्यांमध्ये सिमेंट रोड मंजूर केलेले आहे. काम झालेले आहे. तेथील ट्राफीक डेनसिटी नगन्य आहे. गल्ली गल्लीमध्ये सिमेंट रोड केलेले आहे आणि ज्या रोडची ट्राफीक डेनसिटी जास्त आहे त्या रोडचा सी.बी.आर. काढलेला नाही तर आपण रोडची जाळी कशी ठरवितो.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, आपण सी.बी.आर.केलेला नाही परंतु आपण के व्हॅल्यु बेस करतो. या दोन्ही पुरक टेस्ट आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, इंडीयन रोड कॉग्रेसने ४ पैकी १ सिस्टीम त्यांनी सांगितली आहे.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, आपले जे रस्ते आहे आय.आर.डी.पी. अंतर्गत डब्लु.बी.एम. चे डांबराचे रस्ते पुर्वीपासून डेव्हलप झालेले होते आणि कॉक्रीटचा थर किती जाडीचा असावा त्यासाठी के व्हॅल्यु टेस्ट केलेली आहे जी डांबराची किती थिकनेस आहे त्याची स्ट्रेंथ पाहुन त्याचा वरचा थर म्हणजे कॉक्रीटचा थिकनेस त्यानुसार डिझाईन केला जातो. व्हीएनआयटी ने दिलेल्या गाईडलाईन्सप्रमाणे काम करीत आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, व्हीएनआयटी च्या गाईडलाईन्स काय आहे. सर्वात महत्वाचा विषय सिमेंट रोडची जाडी कशी ठरवितो हा आहे. ते समजाऊन सांगावे.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, त्याकरीता आपण जीओ टेक्नीकल इनव्हीस्टीगेशन करतो. के व्हॅल्यु टेस्ट म्हणतो, जी थिकनेस अव्हेलेबल आहे त्याची क्षमता किती आहे ती तपासल्या जाते त्या टेस्टव्दारे आणि त्यानंतर ट्राफीक काऊंट केला जातो.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, आपण ट्राफीक डेनसिटी कशी मोजतो.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, ट्राफीक डेनसिटी आपण व्हेईकल काऊंट करुनच केली आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, आपण गल्लीतील सिमेंट रोड केले आहे. त्या प्रत्येक रोडची जाळी जवळपास एक फुट आहे. ती कुठल्या आधारावर केली आहे. येथे महानगरपालिका चुकली आहे. फक्त पदाधिकारी यांनी सांगितले, स्थायी समितीने पैसे दिले म्हणुन रोड केले, ट्राफीक डेनसिटी मोजलीच नाही. फाईलमध्ये कुठे नोंद नाही. इंडीयन रोड क्रॉग्रेसच्या स्टॅन्डर्डमध्ये कोणत्या कोणत्या टेस्ट केल्या पाहिजे, त्या फाईलमध्ये एकही टेस्ट नाही. सी.बी.आर. व्हॅल्यु काढायची होती त्यानंतर त्याची जाळी काढण्यासाठी आपण काहीच केले नाही. फाईलमध्ये कुठेही लिहीले नाही की टेस्ट केली म्हणुन, त्याची कुठेच नोंद नाही आणि या शहरात झालेले सिमेंट रोडच्या एकही फाईलमध्ये टेस्ट केलेले नाही.

महापौर :- सन्माननिय सदस्य तुम्हाला जे म्हणायचे आहे ते इंटरनल रस्त्यांचे म्हणायचे आहे की मोठया रस्तांचे म्हणायचे आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, मी शहरातील संपूर्ण रस्त्यांची गोष्ट करतो. माझ्या प्रभाग क्र ३१ मध्ये मोठे ही रोड आहे आणि छोटेही रोड आहे. मेडीकल चौक ते तुकडोजी चौक हा मोठा रोड आहे. क्रीडा चौक ते तुकडोजी चौक हा मोठा रोड आहे. छोटा ताजबाग ते तुकडोजी चौक हा मोठा रोड आहे. येथे ट्राफीक डेनसिटी जास्त आहे. सक्करदरा चौक ते जुनी शुक्रवारी येथे सुध्दा ट्राफीक डेनसिटी जास्त आहे. हनुमाननगर येथील यशवंत कुंभलकरच्या घराजवळ येथील ट्राफीक डेनसिटी नगन्य आहे. शिवनगर येथील रोड येथील ट्राफिक डेनसिटी नगन्य आहे. त्यापेक्षा जास्त ट्राफीक डेनसिटी असलेले रोड आपण सोडले आहे. सिमेंट रोड करतांना आपण कुठल्याही प्रकारच्या टेस्ट केलेल्या नाही.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, आपल्या प्रभागातील एकुण ८ रस्ते सिमेंट रोड टप्पा १ मध्ये आपण घेतले आहे. त्यामध्ये आवारी चौक ते कोतवाल रोड हा सिमेंट रोड टप्पा १ मध्ये घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये स्ट्रक्चरल डिझाईन तसेच सर्व टेस्ट करण्यात आलेल्या आहेत.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, स्ट्रक्चरल डिझाईन हे सर्व मान्य आहे. आपल्या फाईलमध्ये एकाही टेस्ट केल्याचे दिसुन येत नाही. या टेस्टची गरज नाही काय ? जे सिमेंटचे रोड करण्यात आले त्यामध्ये गडर लाईन दाबल्या, पाण्याच्या पाईपलाईन दाबल्या, पहिल्या सिमेंट रोडमध्ये १०० मिटरला डक्टींग आहे. आताच्या सिमेंट रोडला डक्टींग नावाची गोष्टच नाही. क्रीड चौक ते मेडीकल चौक या भागातील सिमेंट रोडची लेव्हल सुध्दा मिळालेली नाही पुर्ण गडर लाईन दबलेली आहे. महाराष्ट्र शासनानी एक जी.आर. काढला होता की औष्णीक विद्युत केंद्रातील ॲश ही ३०० किलोमिटर पर्यत मोफत देणार, रस्ते बांधणीसाठी व इतर बाबीसाठी तर ती ॲश किती प्रमाणात वापरली याची सुध्दा फाईलमध्ये नोंद नाही.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, आपले जे डिझाईन आहे त्यामध्ये २० टक्यांपर्यत ॲशचा वापर अनुज्ञेय आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, तुमच्या फाईलमध्ये अशी कुठे नोंद आहे काय की आपण या ठिकाणी ऐवढे ऐवढे ॲश वापरतो आहे, शासन ३०० किलोमिटर पर्यत मोफत देणार आहे आणि त्यांनी दिले सुध्दा आणि आपण कुठल्याही सिमेंट रोडवर बोर्ड लावले नाही. की आपण या सिमेंट रोडमध्ये काय वापरतो म्हणुन.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, आपण ॲशचा वापर केलेला आहे आणि मेझरमेंट बुकमध्ये जी क्वाँटीटी घेतो त्यामध्ये नोंद घेतो.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, सिमेंट रोड करत असतांना आपण कुठल्याही प्रकारच्या टेस्ट केलेल्या नाहीत. आपण त्या फाईलमध्ये किती प्रमाणात ॲश वापरतो, कुठे वापरतो, असे नमुद सुध्दा केलेले नाहीत. मी मोठया आणि लहान दोन्ही रोड संदर्भात बोलत आहे.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, इंडीव्हीजीअल रोडची नावे देण्यात यावी त्या अनुषंगाने

त्याचा तपास करुन रोडची पाहणी करण्यात येईल.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, एक गोष्ट प्रामुख्याने सांगतो, नॅशनल हायवे ने लिबर्टी टॉकीज ते पागलखाना त्या रोडवर ट्राफीक किती आहे. त्या रोडची जाळी ६ इंचापेक्षा कमी आहे. आणि महानगरपालिकेने बांधलेला रोड त्याची सी.बी.आर. न काढल्यामुळे त्याची जाळी १ फुटाच्या जवळपास आहे. असे का ? महानगरपालिकेजवळ जास्त पैसे आहे. आपण टेक्नीकली बाकी गोष्टींचा उपयोग न करता सरसकट स्थायी समितीने पत्र दिले की झाले. ज्या रोडची ट्राफीक डेनसिटी जास्त आहे तिथे रोड केलेले नाही. स्थायी समितीने पत्र झाले की सिमेंट रोड झाला आणि रोड करतांना आपण चुकीचे करतो. सन्माननिय महापौरजी, याची नितांत चौकशी झाली पाहिजे, महानगरपालिकेचे सिमेंट रोड तर्क शुध्द शास्त्रीय पध्दतीने झालेले नाही, कारण शहरात कामे करीत असतांना या शहरातील जनतेचा पैसा आपण घेतो, गडकरी रोडकरी म्हणुन सुरुवात त्यांनी केली या शहराच्या विकासासाठी आपण सिमेंट रोड करतो. यामध्ये ठेकेदार कुठल्याही प्रकारे लक्ष देत नाही. ठेकेदारांना सिमेंट रोड संदर्भात सांगितले की तेथे सिमेंट रोडचे कामे अर्धवट पडले आहे ते म्हणतात की ते सेंट्रलाईज काम आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. हे मला माहिती नव्हते त्या विषयाच्या मी खोलात गेलो तेव्हा मला कळले की,सिमेंट रोडमध्ये कुठल्याही प्रकारे टेस्ट झालेल्या नाही. मा.निगम आयुक्त महोदय आपण यांना पाठीशी घालणार नाही अशी मी आपणांस विनंती करतो.

महापौर :- अधिक्षक अभियंता यांनी संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन सभागृहाला अहवाल सादर करावा.

**<u>प्रश्न क्रमांक १९१</u>** :- नागपूर महानगरपालिकेने शहराच्या सिमे अंतर्गत महामार्गाचे व वसाहतीतील रस्त्यांचे सिमेंटीकरण संदर्भात प्रश्न

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी या ठिकाणी मी विचारलेल्या प्रश्नावर या ठिकाणी मला माहिती मिळाली आहे त्यामध्ये सिमेंट रोड टप्पा १,२,३, हे कंत्राटदार कोण याची माहिती मला दयावी.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, शहरात जे सिमेंट रोडची कामे होत आहे त्यामध्ये कोण ठेकेदार कामे करीत आहे याचे सुध्दा बोर्ड लावण्यात यावे. प्रस्तावामध्ये असे लिहीलेले राहते. संबंधीतांना तक्रार करायची झाल्यास कोणाला तक्रार करावी.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, टप्पा १ मध्ये आपण एकच कंत्राट केलेला होता त्यामध्ये युनिटी इंन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला आपण ते कंत्राट दिले होते आणि टप्पा २ मध्ये आपण २२ पॅकेजेस केले होते आणि पॅकेज निहाय आपण कंत्राटदार नेमेले होते आणि टप्पा ३ मध्ये ११ पॅकेजेस केले होते आणि त्याप्रमाणे आपण कंत्राटदार नेमले होते.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, या कंत्राटदारांनी किती वेळेत काम पुर्ण केले आहे. किती काम पुर्ण झाले आहे आणि किती काम अपुर्ण राहिलेले आहे ?

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, टप्पा १ मध्ये ८ कामे पुर्णत: झालेले होते आणि ६ कामे अंशत: झालेले होते असे एकुण १४ कामे पुर्ण झाले आहे. ज्यांचे काम पुर्ण झाले नाही त्यांचा कत्राट रद्द करण्यात आलेला आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, माझी माहिती आशी आहे की, आपल्या येथे पी.एस. इन्फ्रा पोजेक्ट लिमिटेड जे आहे आणि दुसरे आर.एस. ढोबळ कंत्राटदार आहे आणि अभी इंजिनिअरींग आहे या कंत्राटदारांनी वेळेच्या आत काम पुर्ण केलेले नाही आणि दुसरे यांनी काम करीत असतांना रॉयल्टीचे चालान चे बिल घेऊन टाकले आणि रॉयल्टी भरलेली नाही. मधुकॉन आणि बिटकॉन जी कंपनी आहे ६८ कोटी रुपयांचे कॉट्रॅक्टमध्ये पर्यावरणाच्या नियमांचे पालन केलेले नाही. त्यांनी नागपूर शहराच्या बाहेर प्लॉन्ट लावायला पाहिजे त्यांनी नागपूर शहरात लावला त्याला अनुमती नाही. शहरामध्ये पर्यावरणाचे नियम पाळायचे काही अनुमान आहे की नाही.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, कुठलाही बॅचमिक्स प्लॅन्ट किंवा हॉटमिक्स प्लॅन्ट उभारायचा असेल तर त्यांनी पर्यावरणाची परवानगी घेऊनच तो प्लॅन्ट उभारला पाहिजे आणि ती परवानगी घेण्याची जबाबदारी ही संबंधित कंत्राटदाराची आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, संबंधित कंत्राटदारानी परवानगी घेतली नसेल तर, माझी माहिती अशी आहे की, त्यांनी जवळजवळ ६८ कोटी रुपयांचा फायदा त्या कंपनीला झालेला आहे मी माहितीच्या अधिकारामध्ये मी माहिती घेतली आहे. मुख्यमंत्र्यांच्या विशेष निधीमधुन २०१७ ला अभि इंजिनिअरिंगला १ वर्षात काम पुर्ण करायचे होते अजुन पर्यत त्यांनी २० टक्के सुध्दा काम पुर्ण कलेले नाही. त्यावर आपण काय कारवाई केलेली आहे. मुख्यमंत्री विशेष निधीचे जवळ जवळ ५५ टक्के पसै त्यांनी उचलले आहे. आणि त्यांच्याजवळ बोगस अनुभवाचे प्रमाणपत्र आहे त्यांच्याजवळ अनुभव सुध्दा नाही. आपण जर करोडो रुपयांचे काम जर या कंपनीला देतो तर या कंपनीने नियमांचे पालन केले पाहिजे आणि जर नियमांचे पालन होत नसेल तर संबंधित विभागाने याच्यावर कोणती कारवाई केली यास जबाबदार कोण आहे त्याचे उत्तर दयावे.

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, अभि इंजिनिअरींग संदर्भात आपण जे बोललात त्याबाबत त्यांनी जे प्रमाणपत्र आपल्याला दिले होते त्याची शहनिशा पण आपण केलेली होती. आणि ती प्रमाणपत्र योग्य आढळले आहे त्यानंतरच आपण त्यांना कंत्राट दिले आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मी माहितीच्या अधिकाराखाली घेतलेली माहिती आहे त्यांच्याजवळ महाराष्ट्र बांधकाम कल्याण मंडळाचा शेष त्यांच्याकडे जवळ जवळ १०० कोटी रुपये आहे आणि तो शेष त्यांनी भरलेला नाही. मी पुर्ण माहिती घेऊन बोलत आहे त्यांच्यामध्ये संबंधित व्यक्तीवर ताबडतोब करावाई करावी. त्यांचे पेमेंट देणे किती बाकी आहे यास्थितीमध्ये

अधिक्षक अभियंता (श्री.तालेवार) :- मा.महापौरजी, कामनिहाय माहिती मी देतो यामध्ये किती कामे झाले आहे आणि किती पेमेंट झाले आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मी या संदर्भात प्रश्न विचारला आहे तर याबाबत संपुर्ण माहिती सभागृहामध्ये दिली पाहिजे. बांधकाम मंडळाचा शेष त्यांनी भरलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे एकाही रुपयांचे बिल या कंपनीला देणे बाकी नाही. उलट त्यांच्याकडूनच आपल्याला पैसे घेणे आहे. कारण त्यांनी सर्व नियमांचे उल्लंघन केलेले आहे. याची चौकशी आपण नियुक्त करावी आणि चौकशी नियुक्त करुन त्याचा पुढच्या सभेमध्ये अहवाल सादर करावा आणि दोषी व्यक्तीवर कारवाई करावी.

महापौर :- मा.सदस्य श्री.तानाजी वनवे यांनी शहराच्या सिमेअंतर्गत महामार्गाचे व वसाहतीतील रस्त्यांचे सिमेंटीकरण संदर्भात सूचित केल्याप्रमाणे तपासणी करुन घेण्यात यावी. व त्या संदर्भातील अहवाल सादर करावा, यात जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**प्रश्न क्रमांक १९२** :- मनपा परिवहन विभागांतर्गत किती उपविभाग आहेत व आजवर कोणत्या कर्मचाऱ्यांना निलंबित वा सेवेतुन बडतर्फ करण्यात आले ? संदर्भात प्रश्न

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, माझा प्रश्न पुढच्या सभेपर्यत स्थगित ठेवण्यात यावा, अशी मी आपणांस विनंती करतो.

महापौर :- पुढच्या सभेपर्यत स्थगित.

**प्रश्न क्रमांक १९३** :- नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांना अंदाजपत्रकातील पदांतर्गत रु. २५.०० लक्षापेक्षा किती प्रावधानांच्या नस्त्यांना पत्र देण्याचे अधिकार कोणत्या नियमानुसार करण्यात आले आहे व का? संदर्भात प्रश्न

महापौर :- प्रश्न क्र १९३ संदर्भात माझी एक विनंती होती मागच्या सभागृहामध्ये आपण सन्माननिय आयुक्तांना म्हटले आहे की विशेष सभा चालु होण्याच्या आधी त्यांनी निवेदन करावे त्या निवेदनामध्ये हा प्रश्न येणार आहे त्यामध्ये हा प्रश्न आपण घेऊया, त्यावर चर्चा करण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक १९४** :- माझे प्रभागातील मौजा नारी, खसरा क्र. ८७/२, १०९, ११०/२,३, ११३/१, ११३/३ येथे बांधण्यात आलेल्या बीएसयुपीपीपी अंतर्गत घरकुल प्रकल्प व प्रधानमंत्री आवास योजना संदर्भात प्रश्न

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, सदर इमारती माझ्या प्रभागामध्ये बनलेल्या आहे. त्याची कल्पना सुध्दा मला देण्यात आलेली नव्हती. २०११ पासुन नागपूर सुधार प्रन्यासला पत्र व्यवहार चालु होता आणि १९९२ ला या

सर्व जमिनी महाराष्ट्र शासनानी लॅन्ड ॲक्वीझीशन ॲक्ट नुसार अखत्यारित घेतल्या होत्या, ज्या शेतामधुन या रस्त्यांचे बांधकाम होणार आहे १२ मिटर, १६ मिटर, आणि २४ मिटर तर त्या शेतालगत ज्या कास्तकारांच्या जमिनी आहे त्या जमिनी काही बिल्डरांनी घेतलेल्या आहे. त्या लॅन्ड ॲक्वीझीशनच्या जमिनी आहे आणि त्या भुखंड पाडून विक्री करत आहे. पैसा नाही अशी ओरड सुरु आहे. ज्या सिमेंट रोडचे काम चालु आहे तो रस्ता स्क्रॅप मालाने सुध्दा बनु शकते. ते स्वत: भुखंड पाडून विकत आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. ही जागा पुर्वी नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारित होते आता आपल्या अखत्यारीत आहे किंवा ज्या कामाला खर्च लागणार आहे त्याला नावानिशी चालु वर्षाच्या आर्थिक अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करावा अशी आपणांस विनंती आहे. एकतर कारवाई करा, टी.डी.आर. देऊ नका, ते गडर लाईन टाकणार नाही. दिवाबत्तीची सोय करीत नाही. आणि पी.यु. लॅन्ड सुध्दा त्यांनी सोडली नाही. अशा इल्लीगल इमारती तेथे विक्रीसाठी उभ्या आहे. यामध्ये नागरिकांची फसवणुक होता कामा नये, त्याचा प्रभाव महानगरपालिकेवर पडु नये याचा विचार करण्यात यावा आणि हा प्रस्ताव ताबडतोब याच उन्हाळयामध्ये ज्या नागरिकांना त्रास होत आहे त्यांचा त्रास दुर करण्याकरीता सहकार्य करावे अशी मी आपणांस विनंती करतो. एकतर या संदर्भात चौकशी लावा. जे लोक इल्लीगल लेआऊट पाडून विकत आहे त्यांच्यावर रोक लावावी कारण के ते सर्व दुखने मग महानगरपालिकेवर येईल. चालु वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये तो रस्ता नावानिशी ठेवण्यात यावा.

महापौर :- आपणांस उत्तरामध्ये संपुर्ण माहिती दिलेली आहे की जागा अधिग्रहीत केल्यानंतर अंदाजपत्रकात करता येईल.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी ती शासकीय जमिन होती. त्या जमिनीमधुन जो रस्ता चालला त्यामध्ये काही कास्तकार आहे आणि काही बिल्डर आहे. बिल्डर लोक महानगरपालिकेला काहीही पैसे देत नाही. त्यांनी अजुनपर्यत लेआउट मंजूर केलेला नाही आणि त्याची विक्री करीत आहे. किंवा जे स्क्रॅप निघते त्याव्दारे रोड बनविण्यात यावे. माझी आपणांस विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी सूचित केल्याप्रमाणे मौजा नारी येथे प्रधानमंत्री आवाज योजना अंतर्गत घरकुल प्रकल्प तयार करण्यात आले आहे परंतु त्या परिसरात रस्ते नसल्यामुळे रस्त्यांचे निर्माण कार्याकरीता आयुक्तांचे अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**प्रश्न क्रमांक १९५** :- मनपा सफाई कामगारांच्या ४४०७ वाढीव पदांना मान्यता देण्या संदर्भात प्रश्न

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, नागपूर मनपा तर्फे सफाई कामगारांच्या ४४०७ वाढीव पदांना मान्यता देण्याबाबात दिनांक २० सप्टेबर २०१९ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १३ डिसेंबर रोजी स्थायी समिती सभागृहात मा.महापौर यांनी रोजंनदारी कर्मचारी यांना ३१ जानेवारी २०२० रोजी स्थायी करण्यासंबंधी आदेश देण्याचे निर्देश दिले होते. परंतु ५ महिन्याचा अवधी लोटुन सुध्दा मनपा प्रशासनाकडून शासन निर्णयाची अंमलबजावणी का झाली नाही. याबाबतचा प्रश्न माझा आहे. निश्चितरुपाने २० सप्टेबर २०१९ हा शासन निर्णय ०४/१२/२०१९ ला मा.महापौरजी मी आपणांस पत्र दिले होते. या शासन निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. आणि या अनुषंगाने १३ डिसेंबर ला आचारसंहिता संपल्यानंतर वृत्तपत्राच्या माध्यमातून स्थायी समिती सभागृहामध्ये महानगरपालिकेच्या ४७०० कर्मचा-यांना नियमित करण्यात येईल परंतु आजपर्यत पाच महिने लोटून गेले. कुठल्या स्तरावर आणिा किती कर्मचा-यांना स्थायी करण्याचे परिपत्रक काढण्यात आलेले आहे व त्यांना जॉईन करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, मा.सदन दहाही झोन अंतर्गत जेवढे २० वर्ष पुर्ण झालेले कर्मचारी आहे त्यांची माहिती विभागाकडून मागविण्यात आली होती त्या मागितलेल्या माहिती मध्ये काही त्रुटया असल्यामुळे विभागाला पाठविण्यात आले आहे.

श्री.सतिश होले :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, ऐवजदार सफाई कामगारांच्या संदर्भात काही केसेस क्लीअर झाल्या होत्या आणि मा.आयुक्तांकडे ऑर्डरसाठी गेल्या होत्या असे कळले होते परंतु त्याचे पुढे काय झाले या संदर्भातील माहिती देण्यात यावी. ऐवजदाराला आपण २ तारखेला ऑर्डर देणार होतो ते कुठे अडले.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, या संदर्भात प्रशासकीय मान्यतेकरीता फाईल अग्रेषित केलेली आहे. त्याच्यामध्ये काही पॉइंट आहे ते विभागाला क्लीअर करुन दयायचे आहे. त्यामध्ये आस्थापनेचा जो खर्च आहे तो आपल्याला ३५ टक्क्यांपर्यत आणायचा आहे.

श्री.सतीश होले :- मा.महापौरजी, जो शासनाचा जी.आर. आहे त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की ३५ टक्कयांचे उल्लंघन यांना रेगुलराईज करतांना वाढला तरी चालेल. मी मा.आयुक्त साहेबांना सुध्दा विनंती करेल की कमीत कमी या सफाई ऐवजदार कामगार आहे. २० वर्ष झाले काही रिटायर्ड झाले काही वर गेले, त्यामुळे निश्चीतरुपाने आपण सहकार्य करावे. जेणेकरुन एक चांगले काम आपल्या हातून होईल. मा.महापौरजी यांनी यासाठी खुप प्रयत्न केले आहे आणि मा.मुख्यमंत्री यांच्या मागे लागून तो जी.आर. काढून घेतला.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, २० वर्ष नियमित सेवा झालेली आहे त्यांचे दस्तऐवज कार्यालयात सादर करण्याचे सुध्दा निर्देश दिले होते. बैठकी दरम्यान झोन क्र १,८,३,४,६ असे पुर्ण १०२७ नस्ती प्राप्त झालेल्या आहे. नागपूर शहरामध्ये १० झोन आहे. यामध्ये कुठल्या झोनमधुन किती नस्ती प्राप्त झाली याची माहिती दयावी.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, एकुण २३५४ नस्ती उपलब्ध झाले आहे. ११०५ नस्त्या अप्राप्त आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, २० वर्ष पुर्ण होण्याआधी काही कर्मचारी मृत पावल्यास त्यांच्या वारसास नोकरी देण्यात यावी असा ठराव सभागृहात पारीत झाला होता काय ? मग ५ महिने लोटून गेल्यानंतर या ठरावाची अंमलबजावणी केलेली नाही या ५ महिन्याच्या कालावधीमध्ये किती ऐवजदार मृत पावले त्यांचा कालावधी संपूष्टात आला किंवा रिटायर्ड झाले.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, तो आकडा सध्या माझ्याकडे नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, शासन स्तराचा निर्णय लागू केल्यानंतर ५ महिने लोटून गेल्यानंतर जे २० वर्ष काम करणारे कर्मचारी आहे त्यांच्यावर अन्याय केला आहे असे वाटत नाही. म्हणजे ५ महिन्याच्या कालावधीत जर एखादा जरी कर्मचारी सेवानिवृत्त होत असेल किंवा मृत पावत असेल तर त्यांच्या कुटुंबावर अन्याय केलेला नाही.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, ही प्रक्रीया सुरु असतांना आपल्या झोनअंतर्गत लिस्ट तयार करण्यात आली आणि त्यानंतर ती पब्लीश करण्यात आली. त्यानंतर त्यामध्ये त्रुटया आढळल्या परत त्या त्रुटया दुरुस्त करुन मागच्या महिन्यात आलेल्या आहेत.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, यामध्ये ज्या त्रुटया आहेत त्या स्टॅम्पव्दारे क्लीअर करायच्या आहेत त्याबाबी व्यतरिक्त मी प्रश्न विचारत आहे. तुम्ही त्याबाबी यामध्ये समाविष्ट करीत आहे. म्हणजे तुम्हाला ४७०० कर्मचा-यांची २० वर्षाची मर्यादा एकाचवेळेस घ्यायचे आहे काय की या जी.आर.मध्ये जे ९ पॉइंट लिहीले आहे या जी.आर. अंतर्गत ज्या कर्मचा-याला २० वर्ष पुर्ण झालेले आहे. त्यांना तुम्हाला समाविष्ट करायचे आहे, परमानंट करारवयाचे आहे. असा जी.आर.चा आदेश आहे मग त्या गोष्टी क्लीअर करायला पाहिजे की नाही. मग १० ही झोन अंतर्गत तुम्ही हे उत्तर दिलेले आहे की फक्त १,३,४,६ या झोनची माहिती आपल्याकडे उपलब्ध झालेली आहे. त्यातील फक्त १०२७ नस्ती प्राप्त झालेले आहे. बाकीच्या झोनस्तरावरील का आलेले नाही आतापर्यत.

महापौर :- आता त्यांनी सांगितले २३०० लोकांच्या झालेले आहे व बाकी प्रोसेस सुरु आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, त्या कर्मचा-यांना केव्हापर्यत आदेश देण्यात येईल. २३०० लोकांना आदेश केव्हापर्यत देणार आहे.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, या संदर्भात जी आवश्यक पुर्तता करण्यात येईल त्यानंतर ऑर्डर काढण्यात येईल.

महापौर :- १५ दिवसाअगोदर मी जी बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये सन्मानननिय सतीशजी होले होते त्यामध्ये आपण सांगितले होते की १८०० तयार आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, वृत्तपत्रामध्ये, प्रिंटमिडीयामध्ये ४७०० कर्मचा-यांना आश्वस्त केल्यानंतर राज्य शासनानी जी.आर. पाठविला त्या संदर्भात आपण बैठक घेतली त्या बैठकीच्या वृत्तपत्राची कॉपी माझ्याकडे आहे. त्या अनुषंगाने मी आपल्याला दिनांक ०४.१२.२०१९ ला पत्र दिले आपण १३ डिसेंबरला या संदर्भात बैठक घेतली आणि ३१ जानेवारी पर्यत सफाई कर्मचारी कर्मचा-यांना सेवेमध्ये समाविष्ट करुन त्यांना नियमित करण्याचे आदेश दिले.

महापौर :- जी.आर. ची अट वाचुन दाखवित आहेत.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, जी.आर. च्या अट नं. ६ मध्ये पुढील आर्थिक वर्षापर्यंत महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्क्याच्या आत येण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु करावी.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, सफाई कर्मचा-यांमध्ये आस्थापना खर्चाची अट टाकली आहे. आस्थापना खर्चामध्ये जे आपण कॉट्रॅक्चुअल कर्मचारी नियुक्त करतो त्यासुध्दा बाबी यामध्ये घेतले आहे. आताच महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव आपण घेतला आणि झोनमध्ये जवळपास ४,२७,५५,२०० रुपये खर्चाच्या मंजूरीचा प्रस्ताव पास झाला इतकेच नव्हेतर कंत्राटदार पध्दत, एन.डी.एस. माजी सैनिक, उपद्रव पथक आस्थापना खर्चामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मनपा सुरक्षा गार्ड, ओसीडब्लु ला केलेले भुगतान, बी.व्ही.जी. व ए.जी यांना आपण जो खर्च करतो याला सुध्दा आस्थापना खर्चामध्ये घेतो. मात्र ज्याला २० वर्षापासून सफाई कर्मचारी हा महानगरपालिकेची सेवा करीत आहे त्याच्या कुटींबियांना किंवा त्यांच्या भविष्य निर्वाहाच्या दृष्टीकोणातून महानगरपालिकेने अनेकदा ठराव संमत केले. २० वर्ष पुर्ण होण्याआधी एखादा कर्मचारी मृत पावला तर त्याच्या पाल्यास नौकरी देण्यात यावी. असा ठराव सभागृहात पारीत झाला होता परंतू सेक्शन ४ अंतर्गत ज्या अधिसुचना आहे त्याचा मी निषेध ही करतो. कारण की जो ठराव या सभागृहाने पारीत केला त्याची अंमलबजावणी झालेली नाही, म्हणजेच हा ठराव विखंडीत करण्याचे काम केल्या जाते. आस्थापना खर्चाची मर्यादा आर्टीक ४ मध्ये वाचुन दाखविल्या जाते. परंतु इतरत्र आस्थापना खर्च आपण वारंवार वाढवितो ते १६० संगनक कर्मचा-यांची नियुक्त आणि ४ करोड रुपयांचे भुगतान केल्या जाते. २४००० हजार रुपये त्यांना पेमेंट दिल्या जाते परंतु या स्थायी सफाई कर्मचा-यांचा पगार १६,९३२ रुपये ........

महापौर :- सफाई कर्मचा-यांची नियुक्ती केल्यानंतर आर्थिक भुर्दंड वाढणार आहे काय ?

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, ७०० रुपये पर ऐवजदार वाढणार आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, आपण कंम्पुटर ऑपरेटला लोकांना जे आपण कॉट्रॅक्ट बेसीसवर नियुक्त करतो त्यांना २४३०० रुपये पगार देत आहे आणि ज्या कर्मचा-यांनी २० वर्ष सेवा दिली आहे. तुमचे विष्ट, तुमची घाण या शहरातील ३५,००,००० लोकांचे वहन करण्याचे काम केले त्यांच्या ७०० रुपयांचा प्रश्न तुम्हाला मोठा वाटत आहे. त्याला आस्थापनेची मर्यादा लावत आहे.

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, आपने जो मिटींग लिया था उस मिटींग के जो मिनीटस थे मै आपको निवेदन करुंगा की आपके माध्यम से उसकी जानकारी सभा मे दिजीयें।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, नागपूर शहर के ऐवजदारो के उपर अन्याय कर रहे ऐंसा मुझे लग रहा है, यह श्रेय लेने का विषय नही है, यह सफाई ऐवजदार जो नागपूर शहर के लिये अपनी जान की परवाह नही करते, कई सफाई ऐवजदार मरे है गडर मे उतरने के बाद, श्रेय लेने के लिये ऐंसा न हो की अभी ५ महिने हो गये है और ५ से ६ महिने हो जायें, इसके पहले नागपूर सुधार प्रन्यास का विषय था वैसा न हो, यह एक गंभीर विषय है और इसमे ठोस निर्णय लिया जायें.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, या सभागृहामध्ये कुशल कामगारांना व कंत्राटदार लोकांना २४ हजार रुपये पगार देतो आणि कुशल कामगार यांना आपले उच्चांक गाठण्याकरीता निर्णय घेतले आणि कंत्राटदार कोणी ड्रायव्हर झाले अशा ५५ कर्मचा-यांना कुशल कामगारांचे भुगदान दिले नाही. पेट्रोल , डिझेल, देखभाल दुरुस्ती, इत्यादी बाबी आपण आस्थापना खर्चामध्ये घेतो, आणि आस्थापना खर्च वाढवितो आणि या कर्मचा-यांवर अन्याय करतो. या महानगरपालिकेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा कर्मचारी आणि राज्य शासनाकडून नियुक्त झालेला

कर्मचारी या दोघांत योग्यतेमध्ये, शिक्षण पात्रतेमध्ये फरक आहे काय ?

महापौर :- जी बैठक झाली होती त्या मिनीटस मध्ये काय आहे ते सांगावे.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, स्थायी समितीच्या हॉलमध्ये मिटींग झाली होती त्या मिटींगमध्ये आपण २ तारखेपर्यंत आदेश काढण्याचे प्रस्तावित केले होते.

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, १८०० सफाई कर्मचारीयो की फाईल मंजूर होकर मा.आयुक्त के पास भेजी है और मिटींग के अंदर आपने तय किया था की २ तारीख को ४४०० जो कर्मचारी है उसके अंदर मे जिनको २० साल कंप्लीट हो चुके है उनको स्थायी करने के पत्र देने वाले है ऐसा तय हुआ था, यह काम जल्द से जल्द किया जायें क्यौकी यह काफी महत्वपुर्ण विषय है.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, झोन क्र ९ मधुन किती नस्ती आतापर्यंत सादर झाल्या.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, ५५६ नस्त्या आतापर्यंत सादर झाल्यात.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, झोन क्र ९ मध्ये अस्थायी सफाई कर्मचारी किती आहे.

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, २ तारखेला ऐवजदार सफाई कर्मचा-यांना आदेश देण्यास अधिका-यांना काही कार्यालयीन अडचणीत असतील तर आयुक्तांनी या ठिकाणी सांगावेत.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, या ठिकाणी आयुक्तांनी निवेदन केले की ३५ टक्के आहे असे आहे या महानगरपालिकेचा जो आस्थापना खर्च आहे तो सध्यस्थितीत किती आहे आणि ते करीत असतांना तो ३५ टक्यांवर आणण्यासाठी काय उपाययोजना महानगरपालिकेने केल्या आहेत याची पण माहिती आयुक्तांनी दयावी.

महापौर :- हा जो विषय आहे त्यामध्ये आयुक्त या ठिकाणी संपूर्ण स्थिती मांडणार आहेत.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, हे शहर जर स्वच्छ करायचे असेल, तर राज्य सरकारनी तो आदेश काढला असेल तर २ तारखेला २००० लोकांना आदेश दयावेच लागेल, त्यामुळे खर्च काय आहे, कशावर कमी करायचा, काय करायचे यामध्ये अनेक बाबी आहे. पण ज्या ४००० कर्मचारी किंवा ज्यांना २० वर्ष पुर्ण झाले त्यांनी आपले पुर्णआयुष्य शहराच्या स्वच्छतेकरीता दिले आहे. त्या कर्मचा-यांना हे दयावेच लागेल, सर्व पक्षांनी मिळुन हे ठराव वारंवार केले आहे. काही भाजप ने केले, शिवसेनेने केले, कॉग्रेस ने केले किंवा अपक्षांनी केले असा कुठलाही मुद्या नाही. यामध्ये श्रेय घेण्याचे काही कारण नाही. मा.महापौरजींनी त्या बैठकीमध्ये म्हटले आहे की २ तारखेला २००० लोकांना ऑर्डर देऊ जे नियमात असलेल्या ते दिल्याच गेले पाहिजे. त्यामुळे जर प्रशासन हे काम करीत नसेल तर आपण प्रशासनाला योग्य ती समज दयावी. समज दिल्यानंतरही प्रशासन करण्यास तयार नसेल तर या सार्वभौम सभागृहाने निर्णय घ्यावी.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, शासनाने दिलेल्या अटी आणि शतीच्या अधीन राहुन महानगरपालिका त्यांना ऑर्डर देणार आहे काय ? मग आस्थापना खर्चाची मर्यादा आणि राज्य शासनाने दिलेले आदेश त्यांना क्लीअर करावे आणि या ४७०० लोकांपैकी ज्यांना २० वर्ष पुर्ण झाले आहे त्यांना ऑर्डर इशु करावे. या कर्मचा-यांनी तुमचे विष्ट आणि घाण या शहरामध्ये २५ वर्षापासून उचलण्याचे काम केले, ते कर्मचारी जर मृत पावले तर त्यास जबाबदार कोण ? हा निर्णय आताच घ्यावा.

श्रीमती हर्षला साबळे :- मा.महापौरजी, हा अत्यंत गंभीर विषय आहे. हे कर्मचारी ब-याच वर्षापासून आपल्याकडे कामाला आहे. आणि ते मजदुर परमनंट नाही. आता ८ दिवसापुर्वी एक मजदुर आहे तो रिटायर्ड झालेला आहे त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर आहे त्यांच्याकडे एकही व्यक्ति कामाला नाही. त्याला ३४ वर्ष पुर्ण झाले आहे. सकाळ पासून ते मजदुर कामाला येतात आणि घाण साफ करतात त्यामुळे हा गंभीर विषय आहे हा लवकरात लवकर आपण निकालात लावला पाहिजे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, शासन निर्णय येऊन या २० तारखेला ५ महिने पुर्ण झाले. आता या ठिकाणी सन्माननिय नगरसेविका म्हणतात की आताच एक मजदुर ८ दिवसा पहीले एक कर्मचारी रिटायर्ड झाला, असे किती कर्मचारी जे मृत पावले असतील, रिटायर्ड झाले असतील या ५ महिन्यामध्ये मृत पावले असतील तर या संदर्भात आकडा देण्यात यावा.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, अनेक कर्मचारी सेवा निवृत्त होतात आणि सेवानिवृत्तीनंतर सुध्दा त्यांच्या अनुभवाचे काम असल्याकारणाने कामावर घेतो असे कर्मचारी तुम्हाला सुध्दा माहिती आहे. टॅक्स विभागामध्ये आहे. लेखा व वित्त विभागात आहे. आपल्या ज्या शहर बस चालतात तेथे सुध्दा आहे. हे कर्मचारी २० वर्षाच्या आधीपासून शहराकरीता राबत आहे. किती तरी कर्मचारी हे कॅन्सर व टीबीने मेलेले आहे. अशा कर्मचा-यांच्या पाल्यांना आपण सॅनिरीटी वगळून आपण नव्याने काम दिलेले आहे. महाराष्ट्र शासनाने सर्कुलर काढलेले आहे तर अशा सर्व कर्मचा-यांना आपण स्थायी करावे, अशी आपणांस विनंती करतो. हा एक गंभीर विषय आहे यामध्ये आपण सर्व लोक सातत्याने सभागृहात हा विषय मांडत होतो. ज्या योजनेमध्ये आपण जास्तीचे पैसे खर्च करतो त्या योजना कमी करुन आपण या लोकांना स्थायी करण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने सर्व ऐवजदार सफाई कर्मचा-यांच्या बरोबर सतिश होलेजी, संदीप सहारेजी, मी, आपण सर्व त्या ऐवजदार सफाई कर्मचा-यांबरोबर बसलो होते आणि आपल्याबरोबर प्रशासनही बसले होते. आणि तेव्हा प्रशासनानी आपल्याला ३५ टक्यांची मर्यादा सांगितली नव्हती, दुस-यांदा १५ दिवसा अगोदर मिटींग घेतली तेव्हाही ३५ टक्क्यांची मर्यादा सांगितलेली नाही. आता मा.महापौरजी सभागृहात एखादा चांगला निर्णय सफाई ऐवजदाराकरीता घेण्याच्या बाबत सदस्यांनी तो प्रश्न टाकला तर ३५ टक्कयांची अट टाकली, आज सकाळी मी वर्तमानपत्रामध्ये वाचले की भाडयांच्या वाहनांवर कोटयावधींची उधळपट्‌ट्री महानगरपालिका करीत आहे त्याच्यामध्ये ३५ टक्क्यांची मर्यादा नाही काय ? काय सुरु आहे. प्रशासनाला जेथे करायचे नाही तेथे ३५ टक्के.

श्री.धर्मपाल मेश्राम :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, एक माहिती मी सभागृहाला जास्तीचा देऊ इच्छितो की, जो शासनाने आदेश पारीत केलेला आहे त्याच्यामध्ये जर हया पदाची निर्मिती केल्यानंतर पदस्थापनेतील सर्व पदे आपोआप व्यपगत होतील, त्यामुळे ते रिटायर्ड होणार काय आणि ते मृत पावले तर त्यांच्या ऐवजी दुसरा घेऊ शकणार नाही. दुसरा मुद्या असा आहे की, शासनानी जी अट सांगितली आहे की ३५ टक्क्यांपर्यंत मिनीमाईज कशी करायची त्याच्या उपाययोजना तुम्ही आखा परंतू ही अधिसूचना करतांना या पदांसाठी लागू करा असे शासनाचे म्हणणे नाही. त्यामुळे ३५ टक्क्यांचा हा जी.आर. या पदासाठी लागू होवू शकत नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, आस्थापना खर्चाच्या संदर्भात मी यापुर्वी जे वाचन केले त्यामध्ये अनेक बाबी या आस्थापना खर्चामध्ये घेतल्या जातात. मागासवर्गीय कर्मचा-यांना किंवा एस.सी, एस.टी, ओबीसीच्या कर्मचा-यांना ज्या कामाच्या आधारावर ब्राम्हण, क्षेत्र्य आणि वैश्य या तीन्ही वर्गाची

(बेल)

महापौर :- सफाई कामगारांना स्थायी करण्याच्या संदर्भात १५ दिवसांपूर्वी स्थायी समिती सभागृहात जी बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये प्रशासनाने कोणत्याही बाबीं बैठकीमध्ये ठेवलेल्या नव्हत्या. आस्थापना खर्च ३५ टक्यांपेक्षा जास्त असल्यामुळे सफाई कामगारांना स्थायी करण्यात येवू नये असे महाराष्ट्र शासनाचे आदेश नाही. त्यामुळे त्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे प्रशासनाने १८०० सफाई कामगारांची नस्ती तयार केली आहे. ती नियमाप्रमाणे व योग्य आहे. त्यामुळे येणा-या २ मार्च २०२० रोजी महानगरपालिकेच्या स्थापनादिनी १८०० सफाई कामगारांना नियमित करावयाचे आहे. त्या दृष्टीकोनातून प्रशासनाने कार्यवाही करुन २ मार्च रोजी १८०० कर्मचा-यांचे आदेश वाटप करण्यात यावे, असे सभागृहाचे निर्देश आहेत. त्याचप्रमाणे जे उर्वरित सफाई कामगार आहेत त्यांना देखील स्थायी करण्याच्या संदर्भातील प्रक्रिया सुरु ठेवण्यात यावी.

**<u>प्रश्न क्रमांक १९६</u>** :- नागपूर शहरातील झोननिहाय अधिकृत बाजारांची यादी संदर्भात

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, एकुण ७ प्रश्न मी विचारले होते नागपूर शहरातील अधिकृत बाजाराच्या संदर्भात त्यापैकी मला जे उत्तर प्रशासनाने दिले त्याची माहिती मी सभागृहाला देऊ इच्छितो. प्रशासनाने या शहरातील बाजारांची सध्यस्थिती मला कळविली त्या अनुषंगाने या शहरामध्ये एकंदर ८ आठवडी बाजार आहे. ४ दैनंदिन बाजार आहे. या शहराची लोकसंख्या ३० लक्ष आहे. त्यामध्ये झोन क्र ८,१,५, या तीन झोनमध्ये एकही

आठवडी बाजार किंवा दैनंदिन बाजार नाही. ज्या झोनमध्ये आठवडी बाजार आणि दैनंदिन बाजार आहे हे त्या लोकसंख्येच्या अनुरुप आहे काय हा माझा उपप्रश्न आहे.

उपायुक्त (श्री.मोरोणे ) :- मा.महापौरजी, ही माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. मी ही माहिती लेखी स्वरुपात ७ दिवसात देईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दुसरी माहिती दिली त्यामध्ये लक्ष्मीनगर झोनमध्ये एकही बाजार नाही. या शहरामध्ये मटन मार्केट झोन क्र १,३,४,५, आणि ८ येथे एकही मटन मार्केट नाही. या शहरामध्ये एकुण ११ मटन मार्केट आहे. त्यापैकी २०८ परवाना धारक विक्रेते आहे. सोबत ही माहिती मागितली होती की आरक्षणाची स्थिती काय आहे. शहर विकास आराखडयामध्ये बाजारांची किती आरक्षणे आहेत. शहरा विकास आराखडयामध्ये एकंदर ३१ आरक्षणे आहेत. आणि त्याचे क्षेत्रफळ आहे ७८.८७ हेक्टर आर. जमिन ही विविध बाजारांच्या आरक्षणाखाली एकंदर ३१ आरक्षण शहरातील रिझर्व आहे. शहर विकास आराखडा येऊन २० वर्ष झाली त्यातील फक्त १ आरक्षण आपण विकसीत करु शकलो ही वस्तुस्थिती आहे. दुसरे मौजा बोरगाव येथील एक आरक्षण ते कुठल्या अथॉरिटीने केले ते एन.एम.सी. ने केले आहे असे या पत्रामध्ये नमुद आहे. हनुमाननगर झोनमध्ये मौजा नागपूर आरक्षण क्र एम.एस.१ या आरक्षित जागेवर बाजार कचरा डंम्पींग मशीन लावलेली आहे व बाकी जागा मोकळी आहे ही स्थिती आहे.

श्री.सतीश होले :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, कमर्शीअल बाजाराची जागा आहे तेथे कचरा संकलन केंद्र महानगरपालिकेने लावलेले आहे आणि ते बंद आहे. आपण म्हणतो की बाजार वाल्यांनी बाजारामध्ये बसले पाहिजे परंतु तेथे आपण कचरा केंद्र केले होते आणि झोन समितीने प्रशासनाच्या वतीने तेथे कचरा संकलणाच्या ठिकाणी फ्लोरींग करण्याचे मंजूर केले होते. म्हणजे आपण काय काय करतो की कमर्शीअल जागेवर कचरा टाकणार आणि रस्त्यावर बाजार भरणारे लोक आहे त्यांना हाकलणार ही बाब चुकीची आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पहिल्यांदा वस्तुस्थिती मी सभागृहाला सांगू इच्छितो, आरक्षण क्र १२२ मौजा नागपूर सतरंजीपुरा झोन येथे एन.आय.टी. ने ग्रुप हाऊसिंग स्कीम बांधुन टाकली आहे. तेथे आरक्षणामध्ये मार्केट आहे. सगळयात शेवटचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे आणि तो प्रश्न मी असा दिला होता मनपा झोन क्षेत्रात अधिकृत बाजार नसल्यास तेथील नागरिकांनी कोणत्या बाजाराचा वापर करावा. या प्रश्नाचे उत्तराशी माझी असहमती आहे. प्रशासनानी उत्तर दिले एखादया मनपा झोन क्षेत्रात अधिकृत बाजार नसल्यास तेथील स्थानिक नागरिकांना लगतच्या अधिकृत बाजाराचा वापर करणे अपेक्षित आहे. या उत्तराशी मी असहमत आहे ते ऐवढयासाठी असहमत आहे कारण शहरामध्ये बाजाराची आवश्यकता आहे. नविन नविन वस्त्या निर्माण होत असतात त्या नविन वस्त्यामध्ये लोकांना भाजी मार्केट असेल, मटन मार्केट असेल लोकांना दैनंदिन गरजा पुरविणा-या ज्या वस्तु आहे त्यांना उपलब्ध झाल्या पाहिजे अशी नागरिकांची मागणी असते. आणि महानगरपालिकेचे ते कर्तव्य आहे की त्यांना सहज उपलब्ध अशी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली पाहिजे. दोन महिन्याआधी महानगरपालिकेच्या सभेमध्ये शहरामध्ये अधिकृत बाजारांची संख्या नाही. नैसर्गिक बाजार जर मोठया प्रमाणात विकसीत झाले आणि त्या नैसर्गिक बाजारांना संरक्षण देण्याची जबाबदारी मा.महापौरजी आपली आहे. ती यासाठी आपली आहे कायदयाने ती जबाबदारी या पथ विक्रेत्या उपजिवीका पथविक्रेते अधिनियम २०१४ मध्ये ही निश्चित केली आहे की ही शहर फेरीवाला समितीकडे दिलेली आहे. मी या उत्तराशी समाधानी यासाठी नाही की हे मार्केट तयार करीत असतांना मग मी जयताळा प्रभागाचे उदाहरण देतो कारण मी त्या प्रभागाला रिप्रेझेंट करतो. माझा सिमावर्ती प्रभाग आहे. त्याच्या मागे शिवनगाव आणि सी.आर.पी.एफ. गेटपर्यंत लोकवस्ती आहे. आता त्या सीमावर्ती भागातील लोकांना जर भाजी खरेदी करण्यासाठी जर अधिकृत बाजारामध्ये जायचे असेल तर त्याच्या लगतच्या झोनमध्ये जो बाजार आहे तो गोकुळपेठ मार्केट आहे. त्याचे अंतर १० किलोमिटर आहे. आणि ते कॉस्ट इफेक्टीव्ह राहु शकत नाही. हे बाजार निश्चित करीत असतांना त्यामध्ये प्लॅन फॉर स्ट्रीट व्हेंडींग याच्यामध्ये लिहीलेले आहे की ते कॉस्ट इफेक्टीव्ह असले पाहिजे. आता १ किलो भाजी घेण्यासाठी तो गोकुळपेठ मार्केटमध्ये जात असेल तर मला असे वाटते की, ते कॉस्ट इफेक्टीव्ह होणार नाही. आता मटन घ्यायला जर जायचे असेल तर

कुठे जायचे तर गड्डीगोदामचा मार्केट आहे किंवा गोकुळपेठचे मार्केट आहे. ती रिॲलिटी आहे. या वास्तविक ज्या नागरिकांच्या गरजा आहे त्यामध्ये बाजारपेठ ही एक नैसर्गिक गरज आहे. जिवनावश्यक गरज आहे. रोज त्याला त्याची आवश्यकता भासते अशा स्थितीत मा.महापौरजी, या पथविक्रेता कायदा जो आहे त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने जे नैसर्गिक बाजार या ठिकाणी तयार झालेले आहे त्याला संरक्षण देणे आवश्यक आहे. आता हे संरक्षण कोणते आहे. मागच्या दोन महिन्याच्या आधीच्या सभेमध्ये मी हाच विषय ठेवला होता की, त्यावेळी दुर्देवाने चर्चा होवु शकली नाही. मी आपल्याला कनव्हेंस करु शकलो नाही. मात्र मी पुन्हा एकदा प्रयत्न करतो की आपण शहराच्या व्यापक दृष्टीकोणातून हा निर्णय घ्यावा की, आपली टाऊन व्हेंडींग कमेटी आहे ती अजूनपर्यंत गठीत झाली नाही. ती गठीत झाल्यानंतर व सर्वेक्षण केल्यानंतर बाजार निहाय त्या विक्रेत्यानिहाय कुठल्या गोष्टीचे वर्गीकरण करुन निश्चित करुन घ्यायचे आहे. आणि निश्चित करुन दिल्यानंतर आपल्याला त्यांना ओटे निश्चित करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे २ ते ३ गोष्टी मी आपल्याला निर्देशनास आणुन देऊ इच्छितो त्यानंतर या सभागृहाचे काय मत आहे. या संपुर्ण रहिवासी क्षेत्राला निश्चित करायचे की कोणतेही अस्तित्वात असलेली बाजार पेठ किंवा जी नैसर्गिक बाजारपेठ जी सर्वेक्षणात निश्चित केली आहे. त्यास विक्री निर्बध क्षेत्र असे निश्चित करु नये. या शहराचे सर्वेक्षण झाले आहे काय ? या सर्वेक्षणामध्ये अशा किती नैसर्गिक् बाजारपेठांना आपण सर्वेक्षण प्रदान करीत आहेत. हा माझा मुळ प्रश्न आहे. आणि एखादया क्षेत्रात बिना विक्रेची क्षेत्र असे घोषित करायचे असेल तर अशा जागेवर प्रचंड गर्दी होते म्हणुन त्या आधारावर घोषित करु नये, असा कायदा म्हणतो परंतु सर्वेक्षणमध्ये जे विक्रेता नाही असे निश्चित केल्यानंतर त्यांना विक्रीचे प्रमाणपत्र देण्यापासून रोखावे. मा.महापौरजी, आपले एक स्टेटमेंट आले होते की शहरामध्ये जे रस्त्यावर दुकान लावून राहिलेले आहे ते शहराचे नागरिक नही. ते कामठीचे नागरिक आहे असे वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट छापून आले होते. माल विक्रीस शहराच्या बाहेरचे लोक आणतात आणि या शहराचे जरी ते नागरिक नसतील तरी ते या देशाचे नागरिक आहे. आणि त्यांना कुठे पण जाण्याचा अधिकार आहे आणि त्याला परवाना आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, कुठे पण म्हणजे काय ? मी गुडधे साहेबांच्या भावनेशी सहमत आहे. पण पुलावर भाजी विकावी, चार पदरी रस्त्यावर बसून भाजी विकावी,

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, भाजी विक्री कुठे कुठे करावी, आता रस्त्यावरील विक्रीच्या योजनेसाठी त्यांनी कुठे करावे, दटके साहेबांच्या प्रश्नांचे उत्तर यामध्ये आहे. सर्वेक्षण केल्यानंतर अशा सर्व अतिक्रमण रस्त्यावरील म्हणजे रस्त्यावर करता येते. रस्त्यावरील विक्रेत्यांना प्रत्येक क्रमानुसार वार्डाच्या क्षेत्राच्या विभागाच्या शहरातील लोकसंख्येच्या अडीच टक्के असलेल्या योजनेप्रमाणे जागा देण्याची खात्री करावी.

श्री.प्रविण दटके :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, हे सर्व सर्वेक्षण केल्यानंतरच करायचे आहे ना ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, सर्वेक्षण करायच्या आधीच्या स्थितीच्या संदर्भात कायदा आपले मत मांडते. जर समजा सर्वेक्षण व्हायचे आहे तो पर्यत त्यांना जसे आहे त्या स्थितीमध्ये सर्वेक्षण करायचे आहे. हा काही वादाचा विषय नाही. आपण जो निर्णय घ्याल, तो बहुमताच्या आधारावर निश्चितपणाने घेणार आहे आणि आपण जर म्हटले की या कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी हा कायदाच मान्य नाही. यातले कंटेन्ट आम्ही स्वीकारत नाही. असे जर आपले म्हणणे असेल तर माझा आक्षेप असण्याचे काही कारण नाही. जो पर्यत सर्वेक्षण घेतले जात नाही. आणि विक्रीची योजना तयार होत नाही तोपर्यत कोणत्याही क्षेत्रास विना निर्बधीत क्षेत्र म्हणुन घोषित केले जाऊ नये. मा.महापौरजी यामध्ये कलम २१, (३ ई) मध्ये स्पष्ट नमुद आहे जोपर्यत सर्वेक्षण घेतले जात नाही. आणि विक्रीची योजना तयार होत नाही तोपर्यत कोणत्याही क्षेत्रास विना निर्बध क्षेत्र म्हणुन घोषित केले जाऊ नये.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी,पॉइंट ऑफ ऑर्डर घोषित करु नये, घोषित करा, पण जे बसले आहे त्यांच्यावर कारवाईच करु शकत नाही हा कुठे लिहीले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, राज्य शासनाच्या यंत्राने अंगजोरावर विक्रेत्यांना हटविले असेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी. अंगजोरावर म्हणजे या बेसिक

पार्लमेंटच्या ॲक्टवर पोलीसांपासून सर्वेक्षण म्हटलेले आहे.

श्रीमती नंदा जिचकार :- नैसर्गिक बाजार म्हणजे काय, वाटेल तेथे बाजार लावायचे काय ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, माजी महापौर यांनी प्रश्न उपस्थित केला त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये जर या ॲक्टचे इंम्प्लीमेंटेशन केले असते तर हा विषय आलाच नसता.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, कोणी कोणाच्या कार्यकाळात काय केले पाहिजे याच्यावर जर चर्चा करायची असेल तर अनेक कार्यकाळ सांगता येतील.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, पॉईंट ऑफ ऑर्डर, त्या दिवशी सुध्दा याच विषयावर चर्चा होत होती आणि प्रफुल्लजींनी त्याच विषयावर प्राब्लेम क्रीयेट केले होते. जे काही वादंग झाले होते त्यानंतर मी आपल्याला एक सूचना दिली होती की जेथे नियमित बाजार नाही या नागपूर शहरात अनेक ग्राउंड उपलब्ध आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन, माजी महापौर, नंदाताईनीं जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी एक शब्द ही माझ्या मनाचा बोलत नाही या कायदयामध्ये दिले आहे.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन, मी त्यावेळेस नागपूर शहरामध्ये जितके ग्राउंड आहे. आपण मदर्स डेरीच्या बाजुला जर ५०-५० स्केअर फुटचे आपण भाजीवाल्यांना जर जागा दिली त्यांच्याकडून बांधुन घेतली तर महानगरपालिकेचे उत्पन्नही वाढेल.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, पॉईंट ऑफ ऑर्डर, ५०-५० स्केअर फुट बांधायचा अधिकार आहे काय महानगरपालिकेला ?

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, सन्माननिय सदस्यांनी सांगितले की उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात सन्माननिय सदस्य फार गंभीर दिसतात. उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात या सभागृहात ३ वर्ष बजेट भाषणापासून भाजी बाजाराच्या संदर्भामध्ये मी सांगितले मा.महापौर यांनी सविस्तर मिटींग घेऊन आपण गाईड सुध्दा केले, माझी आयुक्तांसोबत देखील चर्चा झाली परंतु कुठेही उत्पन्न वाढीचा प्रस्ताव आजपर्यंत या सभागृहामध्ये आपण आणलेला नाही. कारण की ४०० ते ५०० कोटी रुपये भाजी बाजारांपासून आपल्याला उत्पन्न होऊ शकते परंतु महानगरपालिकेचे हे सभागृह उत्पन्नावर गंभीर नाही त्यामुळे उत्पनाच्या गोष्टी भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी मुळीच करु नये.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, यामध्ये बाजाराची डेफीनेशन निश्चित केली आहे. त्यामध्ये फीरते विक्रेते ज्यांच्या मालाची विक्री किंवा सेवा देण्याची कृती विशीष्ट क्षेत्रामध्ये एका जागेवर किंवा दुस-या जागेवर जाऊन विक्री करतात मा.नंदाताईनी नैसर्गिक बाजाराची डेफीनेशन विचारली त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो आणि हा कायदा सुध्दा म्हणते की असे विक्रेते आणि ग्राहक हे परंपरागतपणे एकत्र विक्रीसाठी किंवा सेवेसाठी किंवा वस्तु खरेदीसाठी

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, परंपरागत म्हणजे काय ? आजे जे रस्त्यावर बाजार आहे ते सर्व परंपरागत आहे काय ? आपण सिनीअर आहात, आपण अनेक दिवसांपासून नगरसेवक म्हणुन या सभागृहात मान राखतात आज प्रभागामध्ये जी परिस्थिती आहे त्या संदर्भात आपण शासनाला पत्र लिहीले काय ? याबाबत काही बैठक लावली काय, आपण या विषयावर किती दिवसांपासून जागरुक आहात.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन माझा पत्रव्यवहार मी सोबत आणला, मी मा.आयुक्तांना सर्वात पहिले पोलीस आयुक्तांनी निगम आयुक्त यांना २९.११.२०१६ ला एक पत्र दिले स्ट्रीट व्हेंडींग ॲक्ट २०१४ ला अनुसरुन टाऊन व्हेंडींग समितीची स्थापना करण्यात आलेली नाही म्हणुन आणि सर्व शहराचे सर्वेक्षण अद्याप झालेले नाही. पुर्ण शहराचे सर्वेक्षण झाल्याशिवाय आणि त्याचे कायदेशीर पुर्नवसन केल्याशिवाय फुटपाथवर दुकानदार, भाजी विक्रेते बेकायदेशीर व अन्यायकारक कारवाई थांबविण्यात यावी ही नम्र विनंती. त्यामुळे मी मा.महापौरांना व सन्माननिय सदस्यांना मी सांगू इच्छितो की सन २०१४ ला हा कायदा आला आणि २०१६ पासून या कायदयाच्या संदर्भात ऐवढी जनजागृती नव्हती अनेक कायदे देशामध्ये तयार होतात परंतु लोकांपर्यंत पोहचवितांना बराच विलंब लागतो. जेव्हा हा कायदा शहरातील नागरिकांना कळला किंवा आमच्या

सारख्या लोकांनी वाचला तेव्हा असे लक्षात आले की या कायदयामुळे किती बाजारपेठा आपण तयार केल्या पाहिजे. या संबंधीचा पत्रव्यवहार मी तेव्हापासून केलेला आहे. हा काही वादाचा मुद्या नाही. मी जर विचारले तुम्ही किती बैठका घेतल्या तर बरे होणार नाही.

श्रीमती नंदा जिचकार :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, आपण वयक्तीक निवेदन दिले महानगरपालिकेला दिले काय ? मग त्यावर काय पुढे कारवाई झाली. आमचे म्हणणे ऐवढेच आहे की रस्त्या रस्त्यावर बाजार लाऊन अपघात होतात त्याला जबाबदार कोण राहील, जर कोणी कस्टमर वाटेल तेथे गाडी पार्क करतात.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी स्थिती सभागृहापुढे ठेवली त्यावर निर्णय आपल्याला घ्यायचा आहे की आपल्याला कायदयाची अंमलबजावणी करायची आहे की नाही. जर आपण म्हणत असाल की आम्हाला हा कायदा मान्य नाही. या कायदयाची आम्ही अंमलबजावणी करणार नाही. आणि सरसकट नैसर्गिक बाजार आम्ही उचलुन टाकु, आपले स्टेटमेंट ज्यावेळी आले त्यावेळी मला असे वाटले की या शहरातील लोकांवर एन.आर.सी. नव्याने लागू केली आहे. कारण बाहेरच्या लोकांना या शहरात येऊ दयायचे नाही.

महापौर :- कोणते स्टेटमेंट

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी कात्रण आणलेले नाही. मात्र दोन ते तीन वर्तमानपत्रामध्ये आपण वेळ दिली तर ते मी आणु शकेल,

महापौर :- मी असे कोणतेही स्टेटमेंट दिलेले नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, नाही म्हटले असेल तर गोष्टच नाही. मात्र माझ्या वाचनामध्ये आले हे मी येथे नमुद करु इच्छितो. मात्र या स्थितीमध्ये आम्ही बाजार पेठाचा कुठला वापर करावा, आमच्या भागातील नागरिकांनी कुठल्या दैनदिंन गरजा भागविण्यासाठी कॉस्ट इफेक्टीव्ह मार्केट, आता प्रशासनानी उत्तर दिले की नजीकच्या अधिकृत बाजारामध्ये जा वे, आता हे लोकसंख्येच्या अनुरुप नसेल आणि आपण २०-२० वर्षापर्यत नविन बाजारपेठा निर्माण करीत नसेल, तर मला असे वाटते की या शहरातील नागरिकांवर अन्यायकारक आहे. त्यामुळे आपण नविन बाजारपेठा निर्मितीचे धोरण निश्चितपणाने स्वीकारावे, आपण नियोजन प्राधीकरणाच्या संदर्भामध्ये मागच्या सभेमध्ये वादंग केला की, एन.आय.टी. नियोजन प्राधीकरण असावे की महानगरपालिका नियोजन प्राधीकरण असावे. मात्र आपण नियोजन प्राधीकरणामध्ये आल्यानंतर देखील आपण आरक्षण अधिग्रहीत करणार नसु, त्यासाठी आवश्यक निधी जर देणार नसु तर मला असे वाटते की आरक्षणाच्या खालच्या सर्व भुखंड जसेच्या तसे राहतील, आणि १२ वर्षाचा कालखंड लोटल्यानंतर त्यांना नोटीस देऊन आरक्षण व्यपगत करण्याची कार्यवाही होईल, नागपूर शहरामध्ये आपण बाजारपेठा उपलब्ध करुन देणार किंवा कसे, यासंदर्भात आपले धोरण काय या संदर्भातील माहिती जाणुन घेण्यासाठी मी प्रश्न केला आहे.

श्रीमती प्रणिता शहाणे :- मा.महापौरजी, आमच्या आशीनगर झोन मध्ये एकही अधिकृत बाजार नाही.

महापौर :- प्रशासनाने आपले मत दयावे.

उपायुक्त (श्री.मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे साहेबांनी येथे जे मत व्यक्त केले की लोकसंख्येच्या प्रमाणात बाजारांची संख्या त्याबाबत शहराचे डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये ज्या जागा बाजारासाठी राखीव असतील त्या जागांच्या संदर्भात मा.आयुक्तांनी सुध्दा सहा.संचालक नगररचना यांना सूचना दिलेल्या आहेत. त्या जागा ॲक्वायर करण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, तो पर्यंत हा कायदा लागू आहे किंवा नाही.

उपायुक्त (श्री.मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, तो पर्यंत हा कायदा लागू आहे व त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, त्यामध्ये सर्व स्ट्रीट व्हेंडरला सर्वेक्षण आहे किंवा नाही.

उपायुक्त श्री.मोरोणे :- सन्माननिय महापौरजी, मी याबाबत सर्व सहा.आयुक्तांची पर्वाच मिटींग घेतली होती आणि त्यामध्ये असे ठरले आहे. याबाबत विधी अधिकारी, आपले वकील, सर्व सहा.आयुक्त, डिसी.पी. ट्राफीक

यांची संयुक्त मिटींग घेण्यात येईल व त्यामध्ये निर्णय घेण्यात येईल.

महापौर :- मिटींग केव्हा घेण्यात येईल्

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, शहर मे यह प्रकरण गॅगवार के जैसे शुरु है एक आदमी २५ ट्रक लेकर के आता है। ४० लेबर लेकर के आता है। उसके १० ट्रक मे टेबल होते है, बाकी ट्रक मे माल होता है, वह नोकरों जैसे नियमित पगार पर टेबल लगा देता है और शाम को वसुली करके चला जाता है, जो तथाकथित शनिचरा बजार कभी संत्रा मार्केट मे लगता था, वह शनिचरा बाजार धीरे धीरे एंम्प्रेस मॉल के सामने आ गया। मा.महापौरजी, एंम्प्रेस मॉल के पास मे मिल की वॉल है इसलिये वहा तक बाजार आ गया नागरिकों को किसी प्रकार की कोई तकलिफ नही थी नागरिकोने वहा तक लगने दिया। मा.पुर्व महापौर श्रीमती नंदा जिचकारजी को मै टाटा पारसी स्कुल मे लेकर के गया था टाटा पारसी स्कुल नातीक चौक तक वह बाजार आकर लग गया, जो बाजार संत्रा मार्केटमे लगता था, संत्रा मार्केट मे लगने वाला बाजार अगर बढके नातीक चौक तक लग गया और वहा महिलाओं का आने जाने मे तकलीफ होती है और वहा महिला विद्यालय है। जो जमशेदजी टाटा ने १८८९ मे स्थापित किया वह विद्यालय के विद्यार्थीनीयोंको अगर अडचन हो रही है तो ऐंसी अवस्था मे उनको संरक्षण दिया जाना चाहियें. मा.महापौरजी, रविवार के दिन पुरे ईतवारी मे, पुरे गांधीबाग मे इसप्रकार से रास्तोंपर बाजार लगने लगे, पोलीस क्वॉर्टर है गांधीबाग मे .आजतक वहापर दुकान फोडी नही हुयी लेकीन जबसे यह बाजार लगने लगे ३ दुकाने ऐंसी है जो रवीवार के रात मे फोडी गयी। बाहर से आनेवाले लोग वहापर रेकी करके दुकाने फोडने का काम करते है, मेरा स्पष्ट रुपसे सभागृह मे आरोप है। मा.महापौरजी, हम किसको नियमित करे, किसको अनियमित करे, किसको जिस स्थिती मे है उसको बरदाशत करे, इसके उपर सखोल चर्चा होने की आवश्यकता है। इसलिये प्रशासन ने भलेही लिगल ओपीनियन लिया हो, लीगल ओपीनियन के साथ साथ वास्तविक स्थिती क्या है उसपर चर्चा होना नितांत आवश्यक है। अन्यथा ४ दिन, ६ महिने, ८ दिन, महिना, दो महिने, तीन महिने, चार महिने मे बैठने वाले लोग हमपर अन्याय हो रहा है ऐसा कहते हुऐ इस प्रकारे से दंडा लेकर के आगे बढ जायेंगे, यहा हमारे झोन के आयुक्त है, वही अतिक्रमण के अधिकारी है। मा.महापौरजी, व्यक्तीगत तौर पर आप मा.आयुक्त महोदय, को बुलाकर के पुछे कि इस भयावह स्थिती से निपटने के लिये उनको कितने कर्मचारी लगते है, मै दावे के साथ कह सकता हु की इतवार के दिन मे पुरी महानगरपालिका कारवाई के लिये लगेगी इतने अवैध रुप से बाजार क्षेत्र को अतिक्रमीत करके बाजार लगाने की परंपरा शुरु हो गयी है। इतवारी बाजार है, आभाताई के घर के पास मे ईतवारी बाजार लगता है क्षेत्र को अतिक्रमीत करके बाजार लगता है। लेकीन वह ईतवारी बाजार गांधीबाग मे भरने लगेगा, ईतवारी बाजार है वह महल के रस्तोंपर भरने लगेगा, महल मे है बुधवार बाजार, वह बुधवार को भरे क्यौ इतवार को लगता है, अगर अधिकृत बाजार उपलब्ध है उसके बाद मे अगर अनधिकृत बाजार प्रारंभ हो रहा है तो उसपर प्रतिबंध लगाने के जिम्मेदारी किसकी है ? महानगरपालिका की जिम्मेदारी कोई भी आकर के कहीपर भी किसी भी प्रकार से खडा हो जाये और उसको शेल्टर करने के लिये कानुन मदत करे।

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मा.महापौरजी, आदरणिय दयाभैय्यानी जे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले त्या सर्व मुद्यांशी मी सहमत आहे. माझा आक्षेप हा आहे की या सर्व लोकांना सरसकट नियमित करा असे माझे म्हणणे नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांचे म्हणणे आहे की जो पर्यत तुम्ही पॉलिसी तयार करीत नाही. डी.पी. तयार करीत नाही. तो पर्यत असलेल्या लोकांना संरक्षण दया असा कायदा म्हणत आहे असे म्हणणे आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हे माझे म्हणणे नाही. या कायदयाचे म्हणणे आहे. या ठिकाणी दयाभैय्यांनी उदाहरण सांगितले ईतवारा बाजारांचे

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, मी पुन्हा नमुद करीत आहे जर कायदयामध्ये चुकीच्या लोकांना चुकीच्या दृष्टीने नागरिकांना त्रास देण्यासाठी वातावरण तयार होत असेल आणि तो प्रश्न शहराच्या लॉ अॅन्ड ऑर्डरचा विषय असेल, तर याबाबतीत आपण कोर्टात जाऊन दखल घेतली पाहिजे आणि हे

बाजार उचलले पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या ठिकाणी प्रत्येक जन कोर्टामध्ये जाण्यासाठी स्वतंत्र आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मी माणुस म्हणुन नाही संस्था म्हणुन विचार आहे. कारण शहराचे भवितव्य बनविणे याच्यासाठी नागपूर महानगरपालिका काम करीत आहे. जर मी जे इलाके सांगितले ते माझ्या परिसरातील आहे म्हणुन सांगितले, असे अनेक लोक असतील त्यांच्या परिसरामध्ये या प्रकारची भानगड असेल, मा.महापौरजी, माझे सरळ म्हणणे आहे की डी.पी. प्लॅन जेव्हा होईल तेव्हा होईल परंतु माझे तर म्हणणे आहे की, या शनिवारपासुनच मा.आयुक्त महोदयांनी तो कदम उचलला त्यांचे अभिनंदन करतो आम्ही, ज्या ज्या नागरिक वस्तीमध्ये अनावश्यक रुपाने बाजार लावले आहे, बाजार काय महापौरजी, गॅंगवार आहे. २५ ट्रक ऐवढे भरुन माणसे येत आहे. त्याला साप्ताहिक बाजार म्हणणार आपण, हे काय आहे. एक ट्रक भरुन २५ माणसे येत आहे. साप्ताहीक बाजारांची परिभाषा निश्चित झाली पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, साप्ताहिक बाजारांची परिभाषा या कायदयामध्ये निश्चित झाली आहे. त्यापेक्षा जर आपल्याला वेगळी परिभाषा निश्चित करायची असेल तर महानगरपालिकेचे सभागृह ते करु शकते.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, साप्ताहिक बाजारांच्या परिभाषेमध्ये कोणकोणती वस्तु विक्री करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी महानगरपालिकेला बांधिलकी आहे ते नमुद करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी फक्त् पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन देत आहे. कायदयामध्ये ज्या ज्या गोष्टी नमुद आहे त्या त्या गोष्टीची माहिती मी सभागृहाला देत आहे. याच अनुसरुन या सभागृहाला निर्णय घ्यायचा आहे. यामध्ये साप्ताहिक बाजाराला कसे डिफाईन करायचे आहे. आठवडी बाजाराला कसे करायचे आहे, दैनंदिन बाजाराला कसे डिफाईन करायचे आहे. कुठल्या कुठल्या वस्तुची विक्री त्या आठवडी बाजारामध्ये झाली पाहिजे. आठवडी बाजारांमध्ये कपडयांची सुध्दा विक्री होते, आठवडी बाजारामध्ये चप्पलांची सुध्दा विक्री होते. याच्यावर निर्बध या कमेटीच्या मार्फत लावता येते.

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मी ज्या प्रभागात राहतो सुभाष नगर पासुन ते व्ही.आर.सी. कॉलेजपर्यत

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ आर्डर कशावर आहे ते आधी नमुद करावे.

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, मला हे म्हणायचे आहे की जे विक्रेते रस्त्यावर बसतात त्यांना उचलायचे नाही या संदर्भात जे बोलत आहे त्या संदर्भात मी बोलत आहे. सुभाष नगर पासून ते व्ही.आर.सी. कॉलेजपर्यत जे ठेले असतात तेथे संध्याकाळी माल तयार केला जातो. तेव्हा जे तेलाचे पदार्थ उडतात तेव्हा गाडीने जे लोक जातात त्यांच्या डोळयात जाते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हे आपल्याला करता येत नाही याची जर खात्री पटली तर त्याचे निर्बध या टाऊन व्हेंडींग समितीव्दारे लावता येतात.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, प्रफुल्लजी आता जे बोलले त्याच्याशी मी सहमत आहे. जे पुर्वी बालले जो पर्यत होत नाही जो पर्यत जेवढे आहे त्यांना तुम्ही सरसकट संरक्षण दया ही चुकीची बाब आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी या ठिकाणी स्पष्ट करु इच्छितो की हे सर्व करता येते आणि हे सर्व करावे हा माझा आग्रह आहे. आपण १० वर्ष जर आपण करणार नसु तर मा.महापौरजी आपण नियमच करायचे नाही आणि कारवाई करायची. माझा जो आग्रह आहे तो नियम करण्यासंदर्भातील आहे. एकदा नियम झाले तर त्या संदर्भात कोणतेही कंन्फुजन राहणार नाही. कुठला कुठला व्यवसाय केला पाहिजे याची निश्चीती आपल्याला येईल, की कुठल्या प्रभागामध्ये स्ट्रीट व्हेंडर असले पाहिजे त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अडीच टक्के गॅप टाकली आहे. या ठिकाणी दयाभैय्याचा जो प्रश्न आहे की एका ठिकाणी किती ते पण यामध्ये नमुद केली आहे. पॉपुलेशनच्या अडीच टक्यांपर्यत मर्यादा निश्चीत केली आहे. उद्या जर २ लाख लोकांनी अर्ज केले तर २ लाख लोकांना परवाना दयायचा नाही. या लोकसंख्येच्या अनुरुप अडीच टक्यापर्यत मर्यादा निश्चीत केली आहे. त्याची

गटवारी निश्चीत करा. हे नियम आपण लवकरात लवकर करा जेणेकरुन लोकांमध्ये सुध्दा संभ्रम निर्माण होणार नाही. अडथळे निर्माण होणार नाही. आणि आम्हाला माफक दरामध्ये घराच्या शेजारी बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते मात्र या धोरणाची अंमलबजावणी करायचीच नाही. २०१४ च्या कायदयाचे रुल्स फ्रेम झाले, त्यानंतर कशीतरी निवडणूक पार पाडली, अजुनपर्यत ती समिती गठीत झाली नाही. त्या समितीची कार्यवाही करुन त्या समितीची नियमावली तयार करावी, जेणेकरुन पथविक्रेत्यामध्ये स्पष्टता राहील, लोकांमध्ये सुध्दा स्पष्टता राहील, आपल्या अतिक्रमण विभागामध्ये सुध्दा स्पष्टता राहील. आपण जर ही स्पष्टता आणली नाही. मला असे वाटते की कुणावर तरी एकावर अन्याय होत आहे. या संदर्भामध्ये कालमर्यादा निश्चित व्हायला पाहिजे. याची जर आपण अंमलबजावणी केली तर पुढच्या गोष्टी सोयीचे होईल.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर मा.प्रफुल्लजींनी हवाला दिला प्रशासन आतापर्यत अतिक्रमण विभागाच्या मार्फत जे शहरात सुरु आहे या कायदयाच्या अनुषंगाने कार्यवाही होत आहे की ज्या पध्दतीने अनधिकृत बाजार बसले आहे.

(बेल)

महापौर :- २ तास झाले आहे प्रश्नोत्तरावर चर्चा करीत आहे . यामध्ये प्रशासनानी मत दयावे, मत देत असतांना अजुन पर्यत टाऊन व्हेंडींग कमेटी का बर लागू झाली नाही.

निगम सचिव :- मा.महापौरजी, पथविक्रेता प्रतिनिधीची नोंदणी करुन त्यांची निवडणूक घेवून प्रस्ताव टाऊन व्हेंडींग कमेटीची मान्यता मिळविण्यासाठी दि. ०६.०१.२०२० रोजी शासनाच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर शासनानी सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे. या दृष्टीकोणातून शासनाशी पाठपुरावा करण्यात येईल. सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल गुडधे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने लिगल ओपिनियन घेण्यात येईल त्यानंतर सर्व सहा.आयुक्तांची सभा घेऊन वाहतुकीस अडथळा न होता आपल्याला कशाप्रकारे जास्तीत जास्त लोकांना मार्केट उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्न करण्यात येईल, यामध्ये शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर यथाशिघ्र कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, बाजार पेठेतील व्यवस्था काय असली पाहिजे या शहरातील हे कायदयामध्ये नमुद आहे ते मानत की नाही मानत. मी वस्तुस्थिती मांडलेली आहे आणि त्यावर निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. आमच्या जयताळामध्ये भाजीपाला नाही त्यामुळे एक महिना झाला फोळणीचे वरणाशिवाय दुसरे खात नाही. मटन ४५० किलो झाले आणि वरुन गड्डीगोदाम मधुन मटन आणणे परवडत नाही. आणि दटके साहेब बोलवत नाही आणि मी अधिकृत बाजारातूनच घेतो.

श्री.मनोज सांगोळे :- माझ्या प्रभागामध्ये बाजाराची जागा आरक्षित आहे. तेथे चारही बाजुला कंपाऊंडवॉल बांधलेली आहे. आणि ती जागा एन.आय.टी. ची आहे. त्या संदर्भात मी आयुक्त साहेबांना पत्र दिले होते आणि तुम्हाला सुध्दा पत्र देत आहे. माझ्याकडे ४ अनधिकृत बाजार भरतात ते एकाच ठिकाणी भरु शकतात नियमित माझी विनंती आहे त्या बाजाराला आपल्या अखत्यारीत घ्यायची गरज आहे.

महापौर :- बाजार या विषयाच्या संदर्भात टाऊन व्हेंडिंग समितीची निर्मिती झाली आहे. त्याकरिता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे. या दृष्टीकोनातून प्रशासनाने ताबडतोब प्रस्ताव सादर करावा. या अनुषंगाने विविध प्रकारचे शासनाचे निर्णय, कोर्टाचे निर्णय आलेले आहे. बाजारात बसणा-या गोरगरीबांच्या विरोधात महानगरपालिकेचे हे सभागृह नाही. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फुटपाथ व रस्ते अतिक्रमण मुक्त करणे देखील गरजेचे असल्यामुळे ते करण्यात यावे तसेच या विषयाच्या संदर्भात तीन असोसिएशन माझ्याकडे निवेदन घेऊन आलेल्या होत्या. त्या तिन्ही असोसिएशनच्या पदाधिका-यांना ८ दिवसांच्या आत प्रशासनाने बोलावून त्यांच्या सोबत चर्चा करुन एक अंतिम निर्णय घेण्याकरिता सभागृहापुढे हा विषय ठेवण्यात यावा. या अनुषंगाने ८ दिवसांच्या आंत बैठक घेण्यात यावी.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, मागच्या सभागृहाने प्रश्न क्र १७४ मध्ये प्रशासनाने दिलेले उत्तर आणि माझ्याकडे असलेले उत्तर यामध्ये फरक होते आणि आपण मग आदेश दिला होता की या सभागृहामध्ये माहिती

होईल आणि चर्चा होईल, सांस्कृतिक कार्यक्रम, मुख्यालयामध्ये झालेले कार्यक्रम, शिबीरे, प्रर्दशने,याच्यावर मी प्रश्न टाकला होता.

महापौर :- यामध्ये मी चौकशी ठेवली होती.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, आपण त्यामध्ये हे पण म्हटले होते की आपण या सभेमध्ये चर्चा करु.

महापौर :- अति.आयुक्तांनी अद्यापतरी तो अहवाल दिलेला नाही कुठल्याही स्थितीत पुढच्या वेळी हा अहवाल सभागृहासमोर सादर करावा.

महापौर :- स्थगनप्रस्ताव

निगम सचिव :- मा.महापौरजी, सचिवालयात एकुण ४ स्थगन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सर्वप्रथम पहिला स्थगन प्रस्ताव जो आहे तो श्री.दयाशंकर तिवारी यांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत नागपूर शहरातील खुल्या भुखंडावरील अस्वच्छतेबाबत कार्यवाही करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने ठराव क्र. ९२३ दि. २७/०१/२०२० नुसार मंजूर करण्यात आला. परंतु हा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने मनपा सभागृहात चर्चा करण्यासाठी स्थगन प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मा.महापौरजी दुसरा स्थगन प्रस्ताव श्री.तानाजी वनवे यांचा मला उपरोक्त नियमाव्दारे खालील प्रश्न विचारायचे आहे. नागपूर महानगरपालिकेने मनपाच्या माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांना अतिरिक्त ठरविले असून ही बाब कोणत्या तत्वावरुन घेण्यात आली आहे. याचा खुलासा करुन मनपात अतिरिक्त शिक्षक वर्ग घोषित करतांना माध्यमिक व प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक वर्ग, शाळा निरीक्षक, सहाय्यक शिक्षणाधिकारी, क्रिडा निरीक्षक व क्रिडा अधिकारी इत्यादी अनेक पदे रिक्त असतांना शिक्षकांना अतिरिक्त घोषित करणे यात विसंगती आढळून येत आहे. याबाबत दिनांक २०/०२/२०२० च्या सर्वसाधारण सभेत चर्चा करण्याकरीता स्थगन प्रस्ताव देण्यात येत आहे.

तिसरा स्थगन प्रस्ताव श्री.प्र फुल्ल गुडधे यांच्याकडून प्राप्त आहे. नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आल्यामुळे मनपाच्या अनेक शाळांमध्ये तुकडीनिहाय शिक्षक उपलब्ध होणार नाही त्यामुळे होणारे शैक्षणिक नुकसानीवर व त्यावर उपाययोजना करण्यासाठी चर्चा उपस्थित करण्यास स्थगण प्रस्ताव मान्य करुन चर्चेची अनुमती दयावी ही विनंती.

चौथा स्थगन प्रस्ताव श्री.धर्मपाल मेश्राम यांचा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४७ (२) अन्वये नगरपालिका व मुख्य लेखा परीक्षक हा आपले पद धारण करण्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी पद धारण करण्यास पात्र असणार नाही असे नमूद व स्पष्ट आदेशित असतांना लेखा व वित्त अधिकारी श्रीमती मोना ठाकूर हयांना पदस्थापित करणेबाबत स्थगन प्रस्ताव.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, स्थगन प्रस्तावाच्या संदर्भात विरोधी पक्षनेते श्री.तानाजी वनवे यांचा स्थगन प्रस्ताव आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पहिला स्थगन प्रस्ताव श्री.दयाशंकर तिवारी यांचा आहे. मला माहिती हवी आहे की एका सभेत किती स्थगन प्रस्ताव घेता येते.

निगम सचिव तथा उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, एका सभेत एक स्थगन प्रस्ताव घेतला जातो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, स्थगन प्रस्तावाचे गांभीर्य आपण निश्चित करावे आणि गांभीर्याच्या अनुरुप आपण मंजूर करावे आणि एकापेक्षा अधिक आपल्याला मंजूर करायचे असेल तर मला असे वाटते की या सभेचे अधिकार हे सभागृह महापौरांना देतो. त्याला सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांची सुध्दा अनुमती असेल, आपण एकापेक्षा अधिकही घ्यायला हरकत नाही.

महापौर :- माझ्या माहितीप्रमाणे स्थगन प्रस्ताव २ आणि ३ जवळपास सारखेच आहे. त्याच्यामुळे आपला सोडुन सन्माननिय वनवे साहेबांचा यामध्ये स्वीकारता येते. चौथा प्रस्ताव जो आहे धर्मपाल मेश्राम यांचा तो आर्थिक स्थितीशी संबंधित आहे. त्यामुळे आर्थिक स्थितीबद्यल पुढे चर्चा आयुक्त ठेवणार आहे. दोन प्रस्ताव आपण यावेळी स्वीकारु, त्यामध्ये पहिला प्रस्ताव सन्माननिय दयाशंकर तिवारी यांचा दुसरा प्रस्ताव वनवे साहेबांचा

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी माझी आपणांस एकच विनंती आहे की ही प्रथा पडु नये, उदया ४ ते ५ स्थगन प्रस्ताव येईल. ते आले तर अडचण निर्माण होईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, म्हणुन मी म्हटले की या सभेपुरते अधिकार मा.महापौरजी यांना देण्यात येते.

महापौर :- या सभेपुरते दिलेल्या अधिकारांचा वापर करुन दोन प्रस्ताव आपण या ठिकाणी चर्चेला घेऊया, त्यातील पहिला प्रस्ताव श्री.दयाशंकर तिवारी यांचा त्यानंतर तानाजी वनवे यांचा.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, नागपूर शहर का जिस तरीके से विस्तार हो रहा है, उस विस्तार के अंतर्गत आउटर एरीआ मे जो खुले प्लॉट है, आउटर एरीआ ही नही जिन इलाको को कंजेस्टेड एरीआ कहा जाता है, ऐसे कंजेस्टेड एरीआ मे जो खुले प्लॉट है वहां थोडा बहोत नही बल्कि ट्रको से  कचरा जमा हो रहा है और वह जगह कचरा घर के रुप मे तबदील हो गयी है. मा.महापौरजी, महानगरपालिका की नियमावली के अंतर्गत उसपर दंड करने के अधिकार महानगरपालिका को नही है, इसलिये सभागृह मे यह विषय चर्चा के लिये आया, और सभागृह मे यह विषय चर्चा के लिये आने के पश्चात महानगरपालिका के सभागृह के माध्यम से इसपर कार्य करने के निर्देश प्रशासन को दिये गये. और प्रशासन के निर्देश के अनुरुप स्थायी समितीने उस प्रस्ताव को मंजूरी प्रदान करी, मा.महापौरजी, शहर स्वच्छता के अंतर्गत हमने एक एजंसी को खत्म करके दुसरी एजंसी लायी, काम अच्छे से होना चाहिये इसलिये दो दो एजंसी काम कर रही है, पुरे शहर की खाली दिवारो को आपने स्वच्छता के नाम पर रंगने का काम कर लिया, मा.महापौरजी, करोना वायरस के नाम पर महानगरपालिका ने जगह जगह होड्रिंग लगा दिये है. मा.महापौरजी, जो महानगरपालिका स्वच्छता के प्रति जागृता उत्पन्न करने के लिये इतने पैसे खर्च कर रही है जिस महानगरपालिका मे आर्थिक आचार संहिता लागु करने की बात हो रही है, उसी महानगरपालिका ने महानगरपालिका का आर्थिक उत्पन्न बढाकर के स्वास्थ की सुविधा को सृढड करने के दृष्टीसे शहर से गंदगी के साम्राज्य को हटाने के लिये स्थायी समिती के निर्णयो को इस सभागृह के पटल पर क्यों नही रखा, कृपया इसके बारे मे प्रशासन के माध्यम से जानकारी उपलब्ध करवा कर दे.

महापौर :- मा.सदस्य, आपला प्रश्न पुन्हा एकदा सांगावे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझी वृत्ती अशी आहे कि जेव्हा एखाद्या नगरसेवक बोलत असेल तो नवीन असेल किंवा जुना प्रशासनानी नगरसेवकांच्या वक्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे. आकाशवाणी सारखे असते कि एकदा वाजले कि दुस-यांदा वाजत नाही. हा टेपरेकार्ड नाही कि, रिव्हर्स करता येते. आणि माझे आक्षेप याच्यात नोंदविण्यांत यावे, जर अधिकारी सभागृहात नसेल व दुस-यांदा बोलावे लागत असेल तर मी समजु शकतो, आणि ॲक्टमध्ये नमुद आहे कि आमच्या प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दिले पाहिजे, याठिकाणी आयुक्त बसले आहे, आयुक्त देतील उत्तर. मा.महापौरजी, माझे सरळ सरळ म्हणणे आहे कि, आपण पेंटींग करुन खर्च करतो कि स्वच्छता झाली पाहिजे, होर्डिंग लावुन खर्च करतो कि स्वच्छता झाली पाहिजे, अर्व्हनेंसवर खर्च करतो कि स्वच्छता झाली पाहिजे, आता सध्या करोनाचा वायरस सुरु आहे. मा.महापौरजी, लोकांच्या घराच्या मधात ओपन असलेला प्लॉट व उघडया जागेवर लोक कचरा टाकतात. आणि त्या कचरा उचलण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा नाही आहे. त्या प्लॉटधारकांवर काय कार्यवाही करु शकतो आणि त्याच्यातुन आपल्याला काय उत्पन्न प्राप्त होवु शकते आणि स्वच्छता चांगली कशी होवु शकते. याबाबत महानगरपालिकेच्या या सभागृहात सखोल चर्चा झाली मला वाटते कि या विषयावर प्रथमत: चर्चा प्रश्न आणुन श्रीमती आभाताई पांडे यांनी सुरु केली होती. नंतर सभागृह त्याच्यात समाविष्ट झाले सभागृहाने निर्णय घेवून एक कानुन बनविण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही परिपुर्ण केली काय ? स्थायी समितीने त्या ठरावाला पारीत केला, आयुक्तांचे त्या विषयावर काही म्हणणे होते, आयुक्तांनी म्हटल्यानंतर त्या विषयावर पुन्हा चर्चा झाली, आणि पुन्हा स्थायी समितीकडे तो विषय गेला आणि स्थायी समितीने तो विषय मंजूर केला. आणि जेव्हा संपुर्ण विश्वामध्ये करोना या विषयावर चर्चा होत आहे, मग महानगरपालिकेच्या प्रशासनामध्ये करो ना करो ना असे काय होत आहे. त्या विषयाला जेव्हा स्थायी समितीने मंजूरी प्रदान केली त्यानंतर ती फाईल सभागृहात का आली नाही. येवढे प्रचंड आपण ॲडव्हरटायजमेंट करीत आहे, प्रचंड

होर्डिंग लावत आहे, जागो जागी करोना वायरसचे बॅनर्स लागले आहे, परंतु घराच्या बाजुला जमा होणा-या कच-याच्या संदर्भातील पॉलिसी सभागृहामध्ये का येत नाही.फक्त कचरा साफ होणार नाही, म.न.पा.ला पैसे सुध्दा भेटणार आहे, महानगरपालिकेत आर्थिक आचार संहितेवर चर्चा सुरु आहे. ज्यातुन पैसे भेटणार आहे, रोगराई संपणार आहे, असा अत्यावश्यक प्रस्ताव आज महानगरपालिकेच्या पटलावर का आला नाही. याबाबत प्रशासनाने उत्तर द्यावे.

आरोग्याधिकारी, स्वच्छता (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, १२ तारखेला ती फाईल मंजूर झाली त्यावेळेस सभागृहाचा अजेंडा पुर्ण झाला होता.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, १२ तारखेला साईन झाली हे खरे आहे. पण ज्या अधिका-यांनी १२ तारखेला फाईलवर साईन केली त्या अधिका-यांकडे ती फाईल कोणत्या तारखेला गेली होती.

आरोग्याधिकारी, स्वच्छता (श्री.दासरवार):- मा.महापौरजी, त्या फाईलमध्ये तसे नमुद नाही, पण १२ तारखेला ती फाईल सही करिता गेलेली होती.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, ही जी नस्ती राहते एका अधिका-यांनी सही केल्यानंतर लगेच ती नस्ती वरच्या अधिका-यांकडे पाठविण्याची महानगरपालिकेत पध्दत आहे किंवा नाही, हे सांगण्यात यावे.

आरोग्याधिकारी, स्वच्छता (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, नस्ती पाठविण्याची अशीच पध्दत आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, त्या नस्तीवर शेवटी ज्या अधिका-यांची सही झालेली आहे त्याच्या खालच्या अधिका-यांनी ३ फेब्रुवारीला त्या फाईलवर हस्ताक्षर केले याचा अर्थ आहे कि, तीन तारखेला ती फाईल संबंधित अधिका-यांकडे गेली होती. ३ तारखेपासून १२ तारखेपर्यंत येवढी महत्वाची फाईल का प्रलंबित ठेवण्यांत आली. याबाबत माहिती देण्यांत यावी.

आरोग्याधिकारी, स्वच्छता (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, ३ तारखेनंतर १२ तारखेला त्या फाईलवर मा.आयुक्तांची सही झालेली आहे. आणि १२ तारखेला ती फाईल मा.आयुक्तांकडे पोहचती केली होती.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, ३ तारखेला आयुक्तालयाकडे फाईल गेली आणि १२ तारखेपर्यंत थांबली, याचे उत्तर हे अधिकारी देवु शकतात काय ? किंवा ज्यांच्याकडे ती फाईल होती त्यांनी दिले पाहिजे, असे माझे ठाम मत आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मी ज्वाईंट झाल्यानंतर वेगवेगळया विभागाचा आढावा घेत होतो. माझ्यासाठी ती फाईल नवीन होती म्हणुन ती समजुन घेणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने मी त्या फाईलचा सविस्तर आढावा घेतला.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझे सरळ म्हणणे आहे कि, हा शहर स्वच्छतेचा विषय आहे, रोगराईचा विषय आहे, हा आर्थिक उत्पन्नाचा विषय आहे ज्याच्यात शहराचा स्वास्थ जुळलेला आहे. आणि ज्याच्यात आर्थिक उत्पन्न ही जुळलेली आहे, दोन्ही बाबी महत्वपुर्ण आहेत. माझ्याकडे त्या फाईलच्या संदर्भात माहिती उपलब्ध आहे, ते मी सांगु इच्छितो, संबंधित अधिकारी वरिष्ठ अधिका-यांकडे फाईल घेवुन गेले, ती फाईल आयुक्त साहेबांच्या पी.ऐ.नी परत पाठविली. हे योग्य आहे काय ? प्रशासनाची पध्दत आहे, एका अधिका-यांनी फाईल साईन केली तर डाकनी फाईल जाते व ती फाईल इनवर्डमध्ये नोटींग करावी लागते परत पाठवावी लागत नाही. आणि मा.देवेंद्रजीने एक कानुन पारीत केला आहे कि कोणती फाईल कोणत्या अधिका-यांकडे किती दिवस राहिली पाहिजे. त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही झाली पाहिजे. मा.महापौरजी, यावरुन असे लक्षात येते कि ही फाईल मुद्याम थांबविली असे नाही, ही फाईल यासाठी थांबविण्यांत आली कि हया फाईलची आवश्यकता आहे किंवा नाही. याकरिता ती फाईल परत गेली नसेल, मा.महापौरजी, माझे सरळ म्हणणे आहे कि हे जनतेच्या स्वास्थाशी निगडित प्रश्न आहे या शहराच्या आर्थिक उत्पन्नाशी निगडित प्रश्न आहेआणि एखाद्या प्रश्न असा असेल कि ज्याच्यात दोन्ही बाब परिपुर्ण होत आहे, अशी फाईल प्रायरीटीने मा.आयुक्तांना सांगुन करुन घ्यावयास पाहिजे. ही संबंधित अधिका-यांची डयुटी असली पाहिजे असे मला वाटते. आणि मी आपल्या माध्यमातुन निवेदन करतो कि, ही फाईल सभागृहात आली आहे असे समजुन त्याला आपण मंजूरी प्रदान केली तर जास्त चांगले होईल, कारण

पुढची सभा केव्हा होईल, त्याला वेळ लागेल व पुन्हा एका महिन्यापर्यंत ही बाब थांबुन राहिल. सध्या सर्व्हे सुरु आहे, शहराला कोणता नंबर भेटणार आहे यावर सभागृहात चर्चा होणार आहे. लोक आपल्यावर टिप्पणी करणार आहे, हे सर्व सुरु असतांना आपण त्या नस्तीला मंजूरी प्रदान करण्यासाठी प्रशासनीक कार्यवाही करण्याचे आदेश द्यावे. असे मी आपणांस निवेदन करतो.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात मी आपणांस निवेदन करु इच्छिते कि मोकाट भुखंड ज्यांच्या असतो त्यांच्यावर आपण फाईन लावु, परंतु आजुबाजुचे लोक त्या मोकाट भुखंडावर कचरा टाकतात, त्यांच्याबद्यल ही काही निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, दयाभैयांनी जो प्रस्ताव याठिकाणी मांडला, नागपूर शहरामध्ये साफ-सफाईच्या संबंधामध्ये आरोग्याची काळजी घेणे आणि उत्पन्नाचे स्त्रोत मजबुत करणे ही महानगरपालिकेची नैतिक जबाबदारी आहे. आणि यापासून महानगरपालिका वंचित राहु शकत नाही. जी दिरंगाई फाईल मंजूर करण्यामध्ये झाली आहे, असे पुढे होवु नये आणि ताबडतोब यावर निर्णय झाला पाहिजे. त्या नस्तीवर त्वरीत सही झाली पाहिजे, हेच माझे म्हणणे आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी खुल्या भुखंडावर जमा होणा-या कच-याच्या संदर्भात जो प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याबाबत सभागृहामध्ये निर्देश देण्यात आले होते. खुल्या भुखंडाची स्वच्छता त्या भुखंडधारकांनी करणे आवश्यक आहे. भुखंडाची स्वच्छता न राखल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता भुखंड धारकाला नोटीस देवून त्यांनी हे भुखंड २ दिवसांच्या आंत साफ करावे अन्यथा त्याच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. भुखंडधारकाने त्यांच्या भुखंडावर जमा होणा-या कच-याची साफसफाई २ दिवसांत न केल्यास मनपा आपल्या कर्मचा-यांच्या मार्फत हे भुखंड साफ करुन घेईल व याकरिता ५० रुपये चौ.मी. प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. जर दुस-यांदा भुखंडधारकाच्या भुखंडावर अस्वच्छता आढळल्यास १०० रुपये चौ.मी.प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. तदनंतर देखील भुखंडधारकाने आपल्या भुखंडाची स्वच्छता राखली नाही तर दैनिक वर्तमानपत्रात त्या भुखंडयाच्या संदर्भात जाहिरात देवून सदर भुखंड मनपाने आपल्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. हया धोरणात्मक निर्णयाला हे सभागृह एकमताने मंजूरी देत आहे.

महापौर :- दुसरा स्थगन प्रस्ताव श्री.तानाजी वनवे यांचा

श्री.तानाजी वनवे :-मा.महापौरजी, स्थगण प्रस्ताव जो मी या ठिकाणी सादर केलेला आहे. नागपूर महानगरपालिकेची शिक्षण ही अत्यंत आवश्यक महानगरपालिकेची प्रायमरी शिक्षण ही जबाबदारी आहे. त्याच्यामध्ये वर्तमानपत्रामध्ये मी वाचले की शिक्षकांचे शिष्टमंडळ आपल्याला आणि मला जे भेटले त्याच्यामध्ये मी संपुर्ण माहिती घेतली. माझ्या माहितीप्रमाणे जवळजवळ ३१५ शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. अशा प्रकारची माहिती वर्तमानपत्रातून आणि अधिका-याच्या माध्यतातून मिळाली होती. माझ्या कडे जी काही माहिती आहे. त्याच्यामध्ये मराठी माध्यमाच्या जवळजवळ एकुण ३०४ तुकडया आहेत. त्याचप्रमाणे हिंदी माध्यमाच्या ४४८ तुकडया आहेत आणि उर्दु माध्यमाच्या १७१ तुकडया आहेत. इंग्रजी माध्यमाच्या ५३ तुकडया आहेत. अशा एकुण ९७६ तुकडया या ठिकाणी असल्यामुळे शिक्षकांना अतिरिक्त होण्याचा काहीही संबंध माझ्या माहितीप्रमाणे दिसत नाही. त्यानुसार आपण ३१५ शिक्षक अतिरिक्त झाल्याचे आलेले आहे. या नागपूर शहरामध्ये महानगरपालिकेच्या शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून या शहरातील गोरगरीबांच्या मुलांना चांगले शिक्षण देण्याचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून सातत्याने अनेक वर्षापासून करीत आहे. या ठिकाणी शिक्षकांची आपल्याला उलट आवश्यकता आहे. परंतु या ठिकाणी बरोबर संकलन न केल्या गेल्यामुळे आणि मा.आयुक्तांना बरोबर माहिती न दिल्यामुळे कदाचित हा घोळ निर्माण झाला आहे. म्हणून मी आपल्याला माध्यमातून सभागृहाला विनंती करतो. या ठिकाणी कुठल्याही शिक्षकांना अतिरिक्त न करता त्या शिक्षकांना सामावून घेण्यात यावे त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होवू नये असे मी या प्रस्तावाद्वारे मागणी करतो.

महापौर:- प्रशासनाने माहिती दयावी.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, मा.सदस्यगण, शिक्षकांना अतिरिक्त ठरवित असतांना दरवर्षी प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक अशी शिक्षकांची ऑनलाईन संच मान्यता होते. ही संच मान्यता शासनामार्फत होते. ही संच मान्यता होत असतांना आपल्या शाळेचे मुख्याध्यापक संपुर्ण माहिती त्यांच्या शाळेत किती विद्यार्थी आहेत याची माहिती ऑनलाईन भरतात. त्यानंतर ही संचमान्यता प्रशासनाला प्राप्त होत असते. या वर्षीची संचमान्यता अजुन अप्राप्त आहे. परंतु मागच्या वर्षीची संचमान्यता होती. त्या संच मान्यतेनुसार मी आकडेवारी सभागृहाला देवू इच्छिते. ती संच मान्यता अशी आहे. मराठी माध्यमाच्या ४१० शिक्षक कार्यरत आहेत, मान्य १५५ झालेले आहे. आणि २५५ अतिरिक्त आहेत. हिंदी माध्यमामध्ये २८० शिक्षक कार्यरत आहेत, २४७ मान्य झाले आहेत आणि ३३ अतिरिक्त आहेत. उर्दु माध्यमाचे ११४ शिक्षक मान्य आहेत आणि १२२ कार्यरत आहेत ८ अतिरिक्त झालेले आहेत. ही संच मान्यता करीत असतांना शासन निर्णयाप्रमाणे इयत्ता १ ते ५ करिता १ ते ६० विद्यार्थ्यांकरिता २ शिक्षक मान्य होतात आणि प्रत्येकी ३० विद्यार्थ्याकरिता १ शिक्षक मान्य अशा प्रकारे शासनातर्फे ही संच मान्यता होते. जेवढे शिक्षक आपल्याला मान्य होतात त्यात प्रायमरी सेक्शन १ ते ८ साठी होतात. त्या मान्य शिक्षकांचे वेतनाचा ५० टक्के खर्च राज्य सरकार उचलते आणि उर्वरित सर्व शिक्षकांच्या पगाराचा वेतनाचा खर्च तो महानगरपालिकेला वहन करावा लागतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, प्रशासनाने जी माहिती दिली. संच मान्यता पटसंख्येच्या आधारावर राज्य शासन करते. प्रत्येक संस्थेला ज्या ज्या संस्थेला शासन मान्यता असते. शासनाद्वारे पगार दिल्या जातो. संच मान्यता करुन घेणे गरजेचे आहे. संच मान्यता शासनाच्या नियामाच्या अनुरुप झालेली आहे. ६० विद्यार्थ्यांसाठी २ शिक्षक परंतु नागपूर महानगरपालिकेच्या शाळेची वास्तविकता समजून घेणे गरजेचे आहे. नागपूर महानगरपालिकेच्या शाळेच्या खोल्या आणि खोल्याच्या अनुषंगाने शाळेची पटसंख्या कारण छोटया छोटया खोल्या असल्यामुळे संच मान्यता ६० विद्यार्थ्यांच्या मागे करुन जरी घेतली आहे तरी त्या वर्गामध्ये जागा नसल्यामुळे २ वर्ग करुन घेतले आहे आणि दोन तुकडया करुन घेतल्या आहेत. वर्ग १ ते ४ मध्ये एका तुकडीसाठी एक शिक्षक मान्य केला आहे. त्यानंतर ५ ते ८ माध्यमिक शाळांसाठी १.३ शिक्षक मान्य करतो. त्यानंतर ९ ते १० साठी आपण २ शिक्षक मान्य करतो. मी आता तुकडयांची अनुषंगाने विद्यार्थ्यांची संख्या पाहिली. त्यामध्ये चिंचभवनच्या शाळेमध्ये ४ विद्यार्थी आहेत. आता ४ विद्यार्थ्यांसाठी शिक्षक देणे आपल्याला आर्थिकदृष्टया परवडत नाही म्हणून बंद करावयाचे की या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात महानगरपालिकेचे काम आहे. एक वर्गात ६० विद्यार्थी आहेत, त्या वर्गामध्ये ६२ विद्यार्थी दाखल झाले म्हणजे दोन अतिरिक्त विद्यार्थी आहेत. दोन विद्यार्थ्यांसाठी शिक्षक नेमायचा किंवा नाही. प्रशासनाने त्यांची जी भुमिका शासन निर्णयाच्या अनुषंगाने संचमान्यतेचे निकष आणि नियम जे शासनाने निर्धारित करुन दिले आहेत त्यानुसार घेतले असेल. या सभागृहाला निर्णय करावा लागेल जे दोन अतिरिक्त विद्यार्थी दाखल झालेले आहेत त्या विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा वर्ग आणि शिक्षक लागत असेल तो द्यायचा काय? कारण लोक कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये मी तुम्हाला उदाहरण सांगतो मा.महापौरजी, शाळेच्या आणि शिक्षकाच्या बाबतीत आपली काही समाधानकारण स्थिती नाही हे निश्चितच आहे. ज्या दिवशी शिष्टमंडळ आपल्याला भेटायला आले, त्यावेळी मी सुध्दा उपस्थित होतो. त्यावेळी आपण नाराजी स्पष्टपणे व्यक्त केली. शाळेचा कारभार सध्यस्थितीमध्ये जो चालु आहे तो समाधानकारक नाही. २००२ मध्ये या नागपूर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये ८४ हजार विद्यार्थी होते आणि आता १९ हजार विद्यार्थी आहेत, ही स्थिती जी झाली त्या स्थितीचे अनेक कारणे आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्धता नाहीत, शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. जुन्या परंपरागत आपण मराठी माध्यमाच्या शाळा चालवून राहिलो आहे. समाजाचा कल हा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे आहे आणि किंबहुना त्याही पलीकडे जाऊन सी.बी.एस.सी. शाळेकडे पालकांचा कल चालला आहे. वेळेनुसार शाळेमध्ये बदल केले नाही या अनेक कारणामुळे आज शाळेची स्थिती दयनीय झाली आहे. अशा स्थितीमध्ये जे कुठले लोक शिल्लक आहेत त्यांचा या व्यवस्थेवर अजूनही विश्वास आहे. विश्वासापेक्षा त्यांची स्थिती नाही खाजगी शाळेमध्ये जाण्याची म्हणुन महानगरपालिकेच्या शाळेमध्ये ते पालक आपल्या पाल्यांना तेथे सुमार दर्जाचे शिक्षण आहे हे माहिती असुन सुध्दा दाखल करतात. एखादया प्रायमरी शाळेमध्ये ४ वर्ग आहे आणि तेथील जर

पटसंख्या ६० आहे आणि तेथे जर २ शिक्षक मान्य होत असेल शासनाच्या निकषाप्रमाणे तर उर्वरीत दोन वर्गासाठी आपण शिक्षक नेमायचे की नाही. हा प्रश्न मा.महापौरजी महत्वाचा वाटतो एकंदर १ ते ४ च्या तुकडयांची संख्या ही ६६२ तुकडया आहेत. मी विद्यार्थ्यांच्या संख्येकडे लक्ष देत नाही ते याकरीता देत नाही की कारण एस.टी. महामंडळाची बस आहे. गणेशपेठ बस स्थानकामधुन आपल्या सरकारी बसेसही सुटतात आणि प्रायव्हेट बस सुध्दा सुटतात. सरकारी बसमध्ये कमी पॅसेंजर आहे म्हणुन महामंडळाची बस सोडणे आपण थांबवित नाही. तेथे त्याचे प्रॉफीट होत आहे की नाही होत आहे हा विषय दुय्यम असतो. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये ते ५ जरी असेल तरी त्यांना सुविधा प्राप्त झाल्या पाहिजे, ते करायची आवश्यकता आहे म्हणुन मला असे वाटते की, या विद्यार्थ्यांना ५०१ आणि ३१४ त्याप्रमाणे एकंदर आवश्यक शिक्षकांची संख्या १०७० आहे. १००० शिक्षक आपल्याला आवश्यक आहे, तुकडया निहाय जर विचार केला तर त्यामध्ये बालवाडी नव्याने जर सुरु केले तर, आता बालवाडी, केजी १, केजी २, येथे जर निकषाप्रमाणे जर शिक्षक देणार असु तर त्याला आपण टिफीन खाण्यासाठी नाही बोलावे लागणार आहे त्याला शिक्षणही दयावे लागणार आहे. महानगरपालिकेच्या शिक्षकांची संख्या आहे ८१२ म्हणजे २५८ शिक्षकांची आवश्यकता ते कुठेतरी उपलब्ध शिक्षकांमध्ये मॅनेज करीत आहे. हा जो निकषाच्या आधारावर जो प्रशासनाने जो निर्णय घेतला आहे तो निश्चितपणाने त्यांच्या स्तरावर घेतला असेल मात्र या सभागृहाने निर्णय घेणे आवश्यकता आहे. त्याला शिक्षक दयावा अथवा नाही आणि त्या शिक्षकांवर येणारा अतिरिक्त भुर्दंड वेतनाचा प्राथमिक शाळांची जबाबदारी आपल्यावर असल्यामुळे आपल्याला पैसे दयावे लागते.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, प्राथमिक शिक्षकांचे ५० टक्के वेतन मिळते आणि माध्यमिकचे जेवढे शालार्थमध्ये आहे त्यावर जेवढे मान्य आहे त्याचे १०० टक्के वेतनाचा खर्च मिळतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, त्यामध्ये १०० टक्के वेतन राज्यशासनाकडुन मिळते ते अतिरिक्त झाले असतील तर या निकषाच्या अनुषंगाने हा आर्थिक बोझा महानगरपालिकेने सहन करावा ही माझी मागणी आहे. यामध्ये पुन्हा अतिरिक्त शिक्षक आणि याचा दर्जा आणि यामध्ये महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा वाढेल आणि अधिकाधिक लोक महानगरपालिकेच्या शाळेमध्ये पाल्य दाखल करतील, त्या अनुषंगाने एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कारण आपण इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटच्या नावावर अनेक विकासाच्या संकल्पना राबवितो शिक्षण या संकल्पनेविरुध्द सातत्याने दुर्लक्ष झालेले आहे. म्हणुन मा.महापौरजी हा गंभीर विषय आहे. या गंभीर विषयाकडे निश्चितपणाने आर्थिक बोझा महानगरपालिकेवर जरी येत असेल तरी महानगरपालिकेने सहन करावा, २ विद्यार्थी जरी शाळा असतील तरी ते शहराचे नागरिक आहे. त्यांना प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. म्हणुन त्या विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक दयायची जरी आवश्यकता जरी असेल तर मला असे वाटते की ते उपलब्ध करुन देण्याचे धोरण या सभागृहाने निश्चित करावे त्या अनुषंगाने आपण निर्णय घ्यावा असे मी आपणास सूचित करतो.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, शिक्षक अतिरिक्त ठरवितांना निकष कोणते लागते

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, माध्यमवाईज शिक्षकांची यादी होती. त्याच्यामध्ये जे ज्युनिअरमोस्ट होते त्यांना आपण अतिरिक्त केले. इयत्ता ६,७,८, साठी असे की पदवीधर शिक्षक मान्य होतात. पदविधर शिक्षक मान्य होत असतांना पहिला शिक्षक गणिताचा मान्य होतो, दुसरा मराठी किंवा जी प्रथम भाषा असते त्याचा, आणि तिसरा सोशल सायन्स, त्या जी.आर.मध्ये असे लिहीले आहे की, गणित शिकविण्यासाठी बी.एस.स्सी. डी.ए.डी शिक्षक असावा, परंतू प्रायमरी शिक्षकांमध्ये असे शिक्षक मिळत नसल्यामुळे जर शिक्षक १२ वी सायन्स घेऊन उत्तीर्ण असेल आणि तो डी.ए.डी. असेल आणि तो जर शिकवायला तयार असेल ६,७,८ ला तर त्याला आपण विज्ञान पदवीधर सध्यास्थितीत समजु शकतो.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, या पध्दतीने आपण अतिरिक्त ठरवितो. आपल्याला महाराष्ट्र शासन १९५३ चा नियम माहिती असेल, बिंदु नामावली प्रमाणे एखादया शाळेमध्ये किंवा संस्थेमध्ये असते तर या बिंदु नामावली असेल किंवा लागेपर्यत आपण मागास वर्गीय शिक्षकांना आपण अतिरिक्त ठरवु शकत नाही. हा नियम माहिती आहे काय ? आपण नियमासंदर्भात संपुर्ण माहिती दिली, आपल्याही संच मान्यतेनुसार अनेक शिक्षक

नाही. मी राममनोहर लोहिया शाळेचे उदाहरण देतो. तेथे गणीताचे ४ शिक्षक आहे आणि १.३ च्या हिशोबाने तेथे १ शिक्षक असावा तेथे ४ शिक्षक आहे. कोणती संच मान्यता आहे. संच मान्यतेनुसार जर अतिरिक्त शिक्षक केले असेल, तर हे चुकीचे आहे. संच मान्यतेच्या संदर्भात मी १० शाळेचे उदाहरण देऊ शकतो. की संच मान्यतेनुसार त्यांच्या नियुक्त्या नाही. मग असे कसे अतिरिक्त शिक्षक प्रशासन सांगु शकते. आणि मागासवर्गीय शिक्षकांना तुम्हाला महाराष्ट्र शासनाच्या १९५३ च्या नियमानुसार तुम्हाला तो अधिकारच नाही. तुम्ही आपली बिंदु नामावली तयार करा, नियमानुसार सर्व गोष्टी तयार करा त्यानंतर तुम्ही करा, तुम्ही २५५ शिक्षक हे मराठी माध्यमांचे अतिरिक्त ठरविले. नजीकच्या भविष्यकाळात किती लोक रिटायर्ड होणार आहे त्याची माहिती आहे काय ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, एप्रिल महिन्यामध्ये १२ शिक्षक रिटायर्ड होत आहे.

श्री.प्रकाश भोयर :- नजीकच्या ६ महिन्याच्या काळात किती शिक्षक रिटायर्ड होणार आहे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, सध्या ती माहिती माझ्याजवळ नाही. परंतु जी आपण संच मान्यता केली आहे ती मागच्या वर्षीच्या पटसंख्येच्या आधारावर केली आहे. आणि ती पटसंख्या या वर्षी कमी झाली आहे त्यामध्ये आता सुधारित संचमान्यता येईल त्यामध्ये शिक्षकांची संख्या अधिक कमी झालेली दिसेल.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण सेवा जेष्ठता यादी डिक्लीअर केली आहे काय ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, होय,

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, कोणत्या नियमाअंतर्गत केलेली आहे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, महाराष्ट्र नागरी सेवा

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेच्या शिक्षकांना १९७७-१९७८ नुसार रुल ९८८१ आणि शेडुल ईयर नुसार ही सेवा जेष्ठता यादी शेडुल एफ नुसार व्हायला पाहिजे. याकरीता व्हायला पाहिजे की नागपूर शहरामध्ये किंवा संस्था असते आ णि त्या संस्थेच्या आधारावर शिक्षण चालत असते आणि त्या आधारावर नागपूर शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी करीत असताना मनपाच्या व्यवस्थापकीय मंडळ असते आणि त्या मंडळाच्या माध्यमातून माध्यमिक शिक्षकांचे १०० टक्के वेतन देतो आणि त्याच आधारावर एम.ई.पी.एस. ॲक्ट नुसार १९८१ नुसार शेडुल एफ प्रमाणे यादी तयार करायला पाहिजे परंतु नियमाला डावलून आपण ही यादी नागरी सेवा शर्तीच्या आधारावर केली. त्या अटी आणि नियम कर्मचा-यांना लागू होतात. कर्मचा-यांना लागू होत असलेले शिक्षकांना लागू होत नाही. आपण नागरी सेवांचे नियम शिक्षकांना लागू करीत नाही. आपण करतो कर्मचा-यांना, आपली सेवा जेष्ठता यादी चुकीची आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, याच्यामध्ये कोण सुपात आहे आणि कोण जात्यात आहे हा प्रश्न महत्वाचा नाही. शासनाचे जे निकष आहे त्यामध्ये निश्चितपणाने ए.बी.सी.डी. अतिरिक्त होणारच आहे. अतिरिक्त शिक्षक झाल्यामुळे ज्या तुकडयांना शिक्षक नाही त्या मुलांच्या संदर्भात आपल्याला शैक्षणिक निर्णय काय घ्यायचा आहे तो प्रश्न आहे. यामध्ये कोण अतिरिक्त होते कोणाचे वेतन काय होते ते गरजेचे नाही. त्या विद्यार्थ्यांना शिक्षण दयायचे की नाही दयायचे. आमच्याकडे समजा ४ विद्यार्थ्यांनी दाखला घेतला आणि समजा ती शाळा बंद करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला पाहिजे की नाही घेतला हे गरजेचे आहे. ४ जरी विद्यार्थी असेल तर त्या ४ विद्यार्थ्यांसाठी शाळा चालवायची की नाही चालवायची हा निर्णय घेणे आवश्यक आहे. कोण अतिरिक्त होत आहे त्यापेक्षा मला असे वाटते की या संदर्भामध्ये आपण निर्णय घ्यावा की महानगरपालिकेच्या शाळेमध्ये दाखल होणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी जी काही तुकडी आपण निर्धारीत केली असेल त्या विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक, समाजा आपण ३०-३० तुकडया केल्या असेल त्या दृष्टीकोणातून महानगरपालिकेने खोली बांधून दयावी. तेथे ३० विद्यार्थी राहतील आणि एकच शिक्षक राहील, मात्र त्या ६० विद्यार्थ्यांचा जो निकषा आहे त्या निकषाप्रमाणे सोयी सवलती आपल्याला शाळेमध्ये देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोणातून आपल्याला बजेटरी प्रोव्हीजन करावी लागेल,

आपण तो निर्णय घेण्याच्या आधी आपण शिक्षणाच्या संदर्भात एक वेगळी श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता आहे. या सभागृहात जाणुन घेणे गरजेचे आहे आणि या शहरातील नागरिकांनाही जाणून घेणे गरजेचे आहे. ते ४ विद्यार्थ्या आहे ते गरीबांचे मुले आहे. म्हणुन आर्थिक भुर्देंड सहन करु शकत नाही म्हणुन शाळा बंद करतो हे धोरण बरोबर होणार नाही. ते सामान्य गरीब लोकांवर अन्यायकारक होईल, म्हणुन या दृष्टीकोणातून आपण निर्णय घ्यावा.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, शिक्षकांना येथेच ठेवायचे असेल आणि त्या माध्यमातून जर निर्णय येणार असेल तर मी प्रफुल्लजींच्या मताशी मी सहमत आहे. आपण निर्णय घ्यावा.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी अतिरिक्त शिक्षकांचा जो विषय येथे आलेला आहे. मी अतिरिक्त शिक्षकांना जे नियमात असेल तो कायदा लागू करावा आणि माझा विरोधात आहे की अतिरिक्त असतांनाही नोकरीमध्ये ठेवले त्याच्यासाठी महानगरपालिकेमध्ये अनेक लोक रिटायर्ड होत आहे. अनेक लोकांचे पेंशन दयायचे आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेचा विषय आहे. इनकमचा विषय आहे. अशा शिक्षकांना जर आपण महानगरपालिकेच्या सेवेमध्ये जर शिक्षकांचे काम बदलुन दिले आणि प्रशासनाने जर हा विषय लावून धरला तर अनेक शिक्षकांनी महानगरपालिकेमध्ये काम करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मा. नंदाताईनी येथे जो विषय मांडला त्या अनुषंगाने प्रशासनाने ती माहिती दिली पाहिजे. या शिक्षकांना अन्य विभागामध्ये आपण काम देऊ शकतो काय ?

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मा.प्रफुल्लजींनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे. आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. आपल्या महानगरपालिकेमध्ये शिक्षण समिती आहे त्यांच्या माध्यमातून पटसंख्येनुसार किती शाळेमध्ये पटसंख्येनुसार किती विद्यार्थ्यी, किती शिक्षक आहे त्याचा अहवाल तयार केला तर यामध्ये सभागृहाला निर्णय घेणे सोपे जाईल. शिक्षकांना दुस-या कामावर सोपवणे हा वेगळा विषय आहे. विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहु नये, त्यामुळे हा अहवाल आल्याशिवाय सर्व गोष्टींची माहिती सभागृहाला मिळाल्या शिवाय निर्णय घेणे योग्य नाही म्हणुन आपण शिक्षण समितीच्या माध्यमातून हा अहवाल पहिले आपण सभागृहापुढे ठेवावा, मगच आपण या संदर्भात निर्णय घ्यावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, प्रशासनाने या संदर्भात काही कार्यवाही केलेली आहे काय.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये कर्मचारी कमी अशी सारखी ओरड असते त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना आपण सेवेत करु शकतो काय

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, शिक्षक संवर्ग वेगळा आहे त्यांनी जर आपल्याला दुसरा विभागामध्ये दयायचे झाले तर त्याचे संवर्ग बदलणार आहे. शिक्षक संवर्गामधून जर क्लरीकल संवर्गामध्ये जाणे शक्य होणार नाही.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये कोल्हटकर म्हणुन शिक्षक होते ते जनसंपर्क अधिकारी म्हणुन बरेच दिवस होते ते कसे काय आले होते.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सभागृह, यामध्ये क्लीअरीटी सभेमध्ये येणे अपेक्षित आहे. टेक्नीकल ज्या गोष्टी आहे की अतिरिक्त शिक्षक कसा केला जातो, पटसंख्या कशी केली जाते शिक्षणाचे शेडुल काय आहे. यामध्ये दोन बाबी आहे. यातील पहिला मुद्या आहे की आपल्याकडे आर्थिक बर्डन वाढल्यामुळे आपण शिक्षण दयायचे नाही काय ? मुळामध्ये अतिरिक्त शिक्षक आणि आर्थिक बर्डन याचे कोरोलेशन असे आहे की एक्स विद्यार्थ्यांसाठी किती शिक्षक पाहिजे याचे मानांकन ठरले आहे. हे जेव्हा महाराष्ट्र शासनाने ठरले आहे याचा अभ्यास करुन ठरविले आहे. ३० विद्यार्थी असेल तर १, ६० विद्यार्थी असेल तर २ त्या संदर्भात शासनाने अभ्यास करुन इतके विद्यार्थी असले तर ऐवढे शिक्षक असेल जेणेकरुन शिक्षण चांगल्या पध्दतीने देता येईल, त्याच्या आधारे शिक्षक किती आणि पटसंख्या किती हे ठरविले जाते. एका शाळेमध्ये विद्यार्थी किती काऊंट होतात त्या अनुषंगाने आवश्यक असलेले आणि त्यापेक्षा जास्त जे राहतात त्याला आपण अतिरिक्त ठरवितो. तुकडी हा विषय त्यामध्ये येत नाही. ३० विद्यार्थ्यांसाठी जागा नाही म्हणुन दुसरा वर्ग केला ही गोष्ट इन्फ्रास्ट्रक्चरची बाब झाली म्हणजे

एखादया शाळेमध्ये ३० विद्यार्थी आहे एका वर्गात बसत नाही तर त्याला दोन वर्गामध्ये बसवितो तर त्याच्या करीता खोली बांधणे हा भाग इन्फ्रास्ट्रक्चरचा येतो. त्याचा शिक्षक संख्येशी संबंध लावता येणार नाही. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक झाले म्हणुन १०० टक्के दयावे लागते, सायंटीफीकली आवश्यक असलेले शिक्षक आपल्याकडे अव्हेलेबल असलेली पटसंख्या याच्या आधारे आहे त्याच्या पेक्षा अतिरिक्त आहे ते नको, कारण आवश्यकता नाही. हा पहिला भाग झाला आणि दुसरा जो भाग आहे. कुठल्याही संवर्गामध्ये करता येईल काय तर त्याचे उत्तर नाही असे आहे. त्यांचे काम वेगळे आहे त्यामुळे एका संवर्गामधून दुस-या संवर्गामध्ये मध्ये घेता येत नाही. काही संवर्गामधील अधिकारी व कर्मचारी आपण दुस-या संवर्गामध्ये घेतो ते डेप्युटेशन,ॲडमिनीस्ट्रेशन या माध्यमातून घेत असतो. तिसरा भाग असा आहे की एकच विद्यार्थी असेल तरी आपल्याला शिक्षण दयावे लागेल, त्यामध्ये क्रायटेरिया ठरला आहे. पर्टीकुलर ऐरिया ३ किलोमिटर ऐरियामध्ये असेल तर त्याकरीता स्कुल देणे अपेक्षित आहे. स्कुल अव्हेलेबल असेल आणि तेथे जर दोन शाळा असेल तर दोन्ही शाळेतील विद्यार्थी एकाच शाळेत यायला पाहिजे या दृष्टीकोणातून अपेक्षित आहे. तसाही मी आढावा घेतला, त्यामध्ये माझ्या असे निर्देशनास आले की आपल्या काही शाळेमध्ये त्याच्यामध्ये एक आपला प्रिमायसेस आहे एक बिल्डींग आहे पहिला फलोअर आहे त्यामध्ये शाळा क्र १ आणि शाळा क्र २ झालेल्या आहे. पण एका प्रिमायसेसमध्ये आहे आणि एकापेक्षा जास्त बिल्डींग आहे त्यामध्ये ती शाळा वेगळी हे सुध्दा चुकीचे आहे. मग एका बिल्डींगमध्ये जर फ्लोअर वेगळे असतील तर वेगळी शाळा करण्याची गरज नाही. त्यामध्ये क्लास वेगळा, त्यानंतर शिक्षक वेगळा, याला कॅटेगराईज करण्याचे गरज आहे असे निर्देश मी दिलेले आहे. म्हणुन आता जो प्रस्ताव डेप्युटी डायरेक्टरकडे गेलेला आहे शासन निर्णयानुसार तो, जेवढी पटसंख्या अव्हेलेबल आहे. आपल्याकडे आवश्यक संख्येपेक्षा जास्त शिक्षक आहे म्हणुन तो गेलेला आहे मला असे वाटते की ब-यापैकी क्लॅरीफिकेशन झाले असेल.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, सर्व शिक्षणाच्या अभियानाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत १५१ शाळा नागपूर शहरामध्ये चालत होत्या, त्याची पटसंख्या कमी कमी होत ती शाळा आज जवळपास ९० ते ९५ पर्यत शाळा चालत आहे. महानगरपालिकेने किंवा राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागापने एखादी शाळा कुठल्या क्रायटेरिया अंतर्गत नागपूर शहरामध्ये उभी केली त्याच्या क्रायटेरियाचे निकष काय आहे. पहिल्यांदा निकष स्पष्ट करावे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, सर्वसाधारणपणे १ किलोमिटरच्या आत इयत्ता १ ते ५ वी पर्यतचे शिक्षण मिळाले पाहिजे आणि ३ किलोमिटरच्या आत ६ ते ८ वी पर्यतचे शिक्षण मिळाले पाहिजे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, शाळा ओपन करण्यासंदर्भात शाळेच्या आजुबाजुच्या परिसरात काय काय नसायला हवे,

महापौर :- हा याच्याशी संबंधीत विषय नाही. (बेल)

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, पटसंख्येच्या संदर्भात प्रश्न आला म्हणुन हा प्रश्न मी विचारत आहे. म्हणजे दारुचे दुकान, वाईन शॉप, पंचशील नगरची शाळा, राणी दुर्गावती नगरची शाळा तेथे ७ विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे याला कारणीभुत काय आहे. पहिल्यांदा अबकारी विभागाने दारुचे दुकान दिली होती मग शासन निर्णय देत असतांना सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेच्या इमारत बांधलेली त्याचे महानगरपालिकेच्या अधिका-यांनी त्याचे संरक्षण केले असेल, त्या शाळेच्या गेटसमोर दारुचे दुकान आहे मग त्या शाळेची पटसंख्या किती असायला पाहिजे. तेथे दारु पिणारे लोक त्या शाळेच्या परिसरात फिरतात, त्या शाळेचे शिक्षक लोक शाळेचे दारे बंद करुन आतमध्ये असतात, त्या शाळेमध्ये कुठला विद्यार्थ्या त्या ३ किलोमिटरच्या परिसरातील पाल्य त्या शाळेमध्ये टाकेल आणि त्या शाळेचा दर्जा वाढेल यावर उत्तर प्रशासनाने दयावे.

महापौर :- (बेल) विषय हा अतिरिक्त शिक्षकांचा प्रस्ताव सन्माननिय तानाजी वनवे यांचा आहे त्यामुळे बाकी विषयांवर चर्चा करण्यापेक्षा जे अतिरिक्त शिक्षकांचा विषय चालु आहे तो चालु दयावे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी येथे निवेदन केले त्या निवेदनाशी मी सहमत आहे. परंतु या संदर्भात महानगरपालिकेने धोरण पुढच्या काळासाठी निश्चित करणे आवश्यक आहे कारण आज ते अतिरिक्त शिक्षक आहे परंतु उद्या महानगरपालिकेची स्थिती चांगली झाली तर त्याला आपल्याला परत रिव्होक सुध्दा करावे लागणार आहे. अशी परिस्थिती सुध्दा या शहरामध्ये येऊ शकते, त्यामुळे माझे सबमीशन असे होते की शिक्षण ही बाब आर्थिक बाबीशी निगडीत नाही. परंतु महानगरपालिकेचा जो इन्फ्रास्ट्रक्चरल जो खर्च आहे त्यामध्ये आपण व्यवस्था केली तर आपण इन्फ्रास्ट्रक्चरल खर्च आपण वाचवु शकतो आणि शिक्षणाचा दर्जा चांगला होऊ शकते म्हणुन मी आपल्याला निवेदन केले होते की आपल्याकडे शिक्षण समिती आहे त्या समितीच्या माध्यमातून अहवाल सभागृहापुढे यावा मग त्यावर सर्वकश धोरण तयार करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.अविनाश ठाकरे यांचे जे म्हणणे आहे की शिक्षण समितीला पहिल्यांदा प्रस्ताव हा प्रशासनाने दिला पाहिजे. आपल्या ऐवढया किलोमिटर मध्ये आपल्या प्राथमिक शाळा किती आहे. लोकसंख्येच्या अनुरुप प्राथमिक शाळा आहे काय, ३ किलोमिटर मध्ये माध्यमिक शाळा करायच्या आहे. त्याची पटसंख्या किती आहे, कोणत्या शाळेचे समायोजनामध्ये दोन शाळा भरतात आहे. किंवा एखादया शाळेमध्ये ३०-३० विद्यार्थी विभागून आहे तेथे जागेची उपलब्धता आहे काय ? त्या अनुषंगाने आपण बजेटरी प्रोव्हीजन मध्ये किती खोल्यांची आवश्यकता आहे याबाबत सविस्तर अहवाल या समितीच्या माध्यमातून सभागृहात सादर करावा जेणेकरुन शिक्षणाचे धोरण आपल्याला निश्चित करावे लागेल, शिक्षक ऐक्सेस होते काय, नाही होते काय, हा अधिक महत्वाचा प्रश्न वाटत नाही. शिक्षणाचे धोरण आपल्याला निर्धारीत करावे लागेल, त्या दृष्टीकोणातून प्रशासनाचा सविस्तर अहवाल शिक्षण समितीच्या माध्यमातून सभागृहात आला पाहिजे त्यावर चर्चा करुन त्या अनुषंगाने निर्णय घेणे सोयीचे होईल, तो पर्यत या शहरामध्ये एकही शिक्षक अतिरिक्त करण्याची कारवाई करण्यात येऊ नये.

महापौर :- अतिरिक्त शिक्षकांच्या संदर्भात कारवाई झाली आहे काय ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, अतिरिक्त शिक्षकांची यादी शिक्षक उपसंचालकाकडे सादर केली आहे परंतु त्यामध्ये अनेक निकष आहे. अजुन सर्व जिल्हा परिषदांचे किंवा सर्व शाळांचे संच मान्यता व्हायची आहे, समायोजन व्हायचे आहे. त्यांच्याकडे जो पर्यत रिक्त पदे असणार नाही तोपर्यत महानगरपालिकेच्या शिक्षकांची मागणी करणार नाही. मागणी सुध्दा मिडीयम वाईज होते, त्याचा अर्थ शिक्षक दुस-या आस्थापनेवर गेला असा होत नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, महानगरपालिका मे जो अतिरिक्त शिक्षक हुये है उसकी अपॉइंटींग अथॉरिटी कोण है ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, मा.आयुक्त

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, जहा हम भेज रहे है उन्होने अपॉइंटही नही किया तो इन्हे ग्राहय करना उनकी जिम्मेदारी है क्या ?

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सभागृह, अपॉइंटींग अथॉरिटी असणे आणि समायोजन करणे या दोन वेगळया गोष्टी आहे. डिसीप्लीनरी ॲक्शन घेणे आणि टरमिनेट करणे हे करीत असतांना शासन निर्देशानुसार या गोष्टी

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, डिसप्लीनरी ॲक्शन घेणे, टरमिनेशन करणे ही प्रशासकीय बाब असते. पण एका विभागामधून दुस-या विभागात पाठविणे ती महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना पाठविणे, महानगरपालिकेमध्ये नौकरी पत्करत असतांना याच्यासाठी महानगरपालिकेमध्ये येते त्याला आयुष्यभरामध्ये नागपूर शहराच्या ऑक्ट्रॉयच्या सिमेच्या बाहेर जावे लागणार नाही. मा.आयुक्त महोदय अतिरिक्त शिक्षक महोदयांना शिक्षणाच्या कामा व्यतिरिक्त दुसरे काम करायला सांगितले ही दुसरी बाब आहे. पण ज्यांच्याशी त्याच्यामध्ये काहीही संबंध नाही तिथे पाठविणे हे योग्य होणार नाही. अतिरिक्त ठरवितांना जो निकष आहे तो निकष असा आहे की, जर पटसंख्या कमी झाल्यामुळे जर शिक्षक कमी झाले आणि त्यांना दुस-या शाळेत कंम्पनशेट

करता आले नाही. जो पर्यत तो कंम्पनशेट नाही झाला तर त्याचा पगार अपॉइंटींग अर्थारिटीला त्याचा पगार दयावाच लागते. जर आपला कर्मचारी, दुसरा विभाग जो अपॉइंटींग अथॉरिटीच नाही तो घ्यायला तयार १०० टक्के राहणार नाही. कारण त्याच्याकडेच अतिरिक्त शिक्षक आहे. एक तो वह खुद परेशान है औरो की परेशानी क्यौं लेगे, अगर हम उन्हे दुसरी जगह नियुक्ती नही दे सके तो उनकी पगार चालु नही हो सकती, तो उनकी पगार चालु रखने की जिम्मेदारी हमारी रहेंगी, ऐंसी अवस्था में निवेदन करना चॉहता हु की, प्रफुल्लजीने जो कहा अगर यह सारे शिक्षक शिक्षण के काम मे आ सकते है शिक्षण व्यवस्था मे आ सकते है तो उसमे किसी प्रकार की कोई दोहराय नही है, अगर नही आ सकते है और वह अतिरिक्त है, तो उन्हे महानगरपालिका के अन्य विभाग मे हम जिस प्रकार से लोगों को अतिरिक्त काम देते है उसीप्रकार से अतिरिक्त काम देकर के इतने शिक्षकों को सेवानिवृत्ती तक की व्यवस्था करें ऐंसा मे निवेदन करता हु, मा.महापौरजी मैने पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन लेकर यह सारी बाते कही है म्हणुन त्याचे नियम काय आहे निकष काय आहे याचे उत्तर देणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, शालेय शिक्षण विभागाचा दिनांक २३ जुन २००३ चा शासन निर्णय आहे. हा शासन निर्णय नगरपालिका आणि महानगरपालिका अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना समायोजन करण्याबाबत. या शासन निर्णयामध्ये नगरपालिका आणि महानगरपालिकेतील शिक्षक विहीत निकषाप्रमाणे अतिरिक्त ठरतील अशा शिक्षकांचे त्याच जिल्हयामधील नगरपालिका, महानगरपालिका जागेच्या उपलब्धतेप्रमाणे समायोजन करण्यात यावे. जर अशा नगरपालिकांमध्ये, महानगरपालिकेमध्ये जागा उपलब्ध नसल्यास जिल्हापरिषदामध्ये शिक्षकांचे समायोजन करावे. जिल्हापरिषदेमध्ये जागा उपलब्ध नसतील त्यांची माहिती देऊन त्यांची लगतच्या जिल्हातील नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये अथवा जिल्हापरिषदेमध्ये समायोजन करावे, असा २००३ चा शासन निर्णय आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, ज्या स्वशासित संस्था आहे तेथे आपण पाठवु शकतो. मा.महापौरजी, संपुर्ण महाराष्ट्राचा अहवाल घ्या नगरपालिकेत ॲक्सेस शिक्षक आहे, जिल्हापरिषदेत ॲक्सेस शिक्षक आहे, पंचायत समितीत ॲक्सेस शिक्षक आहे. जेव्हा प्रत्येकीकडे अतिरिक्त शिक्षक आहे तो घेणार कसे काय, आणि याच्या शिवाय पाठवु शकत नाही. असा शासनाचा जी.आर म्हणतो. याच्या व्यतिरिक्त पाठऊ शकत नाही हा शासनाचा जी.आर. म्हणतो. आता जर नाही गेले आणि दुस-या ठिकाणी कंम्पनशेट नाही झाले तर यांचा पगार कोण देणार ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, पगार देण्याचा प्रश्नच येणार नाही. जो पर्यत कुठे जरी जागा रिक्त आहे आणि त्या पदावर समायोजन होत नाही तो पर्यत तो शिक्षक महानगरपालिकेमधून जाणारच नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, विषय अगदी स्पष्ट आहे. ते घेणार नाही आणि हे जाणार नाही. हे जाणारच नाही तर हा विषय संपूण टाका.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी मी तेच म्हणणार होतो, कोणी घेणारही नाही आणि आपण पाठवणार नाही आपण शिक्षकांवर चर्चा करीत आहोत. मात्र शिक्षणावर चर्चा अजुनपर्यत झाली नाही. शिक्षणावर सुध्दा चर्चा झाली पाहिजे. त्या दृष्टीकोणातून अहवाल सभागृहामध्ये सादर केला पाहिजे. शैक्षणिक सुधारणेच्या संदर्भात आपण कुठले कुठले पावले उचलणार आहोत.

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, अतिरिक्त शिक्षकांच्या संदर्भात निवेदन झाले आहे. पण आता प्रफुल्ल्जीने म्हटले की, २००२ मध्ये ८४ हजार विद्यार्थी होते आणि आज १९ हजार विद्यार्थी आहे. याच सभागृहाने मागच्या वेळेला ६ इंग्रजी माध्यमांच्या शाळा स्टेट बोर्डाच्या आपण सर्वांनी मिळुन मंजूर केल्या होत्या परंतू त्याचे टेन्डर आतापर्यत वर्तमान पत्रामध्ये आलेले नाही. त्याबद्यल शिक्षणाधिकारी मॅडमनी स्पष्टीकरण दयावे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, ६ शाळा स्टेट बोर्डाच्या इंग्रजी माध्यमांच्या करण्याचे प्रस्तावित होते परंतु आता ३ शाळा सी.बी.एस.ई. बोर्डाचे करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, सी.बी.एस.ई. शाळेला जे इन्फ्रास्ट्रक्चर लागते ते आपल्या महानगरपालिकेजवळ आहे काय ? ते जर आपल्याजवळ नसेल तर आपण सी.बी.एस.ई. शाळा उघडण्याचे थांबेल, ज्या ६ शाळा सभागृहाने मान्य केलेल्या आहे त्या आपण बंद करणार काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, समजा प्रशासनाची इच्छा ६ सी.बी.एस.ई. शाळा करण्याची असेल तर ६ सी.बी.एस.ई. शाळा कराव्यात आणि ६ महाराष्ट्र शासनाच्या इंग्रजी माध्यमाच्या कराव्यात त्यांचे असे म्हणणे आहे. जी परमीशन लागते ती परमीशन घ्यावी, माझी एकच मा.उपायुक्तांना विनंती आहे की जी यादी आपण तयार केली आहे अतिरिक्त शिक्षकांची ती संपुर्ण बरोबर आहे काय ?

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, यात त्रुटी होती. त्रुटी दुरुस्त करुन तसा अहवाल पाठविण्यात आलेला आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.शिक्षण सभापतीने अपना वक्तव्य करते समय एक बात कही की सी.बी.एस.ई. स्कुल प्रारंभ करने के लिये जो नियम निकष है उसके अंतर्गत महानगरपालिका के पास जगह उपलब्ध है क्या ? जगह उपलब्ध है तो उसका स्पष्टीकरण दिया जायें

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, आताच काही शाळांना भेटी देऊन पाहाणी करण्यात आली. सध्यस्थितीत आपण ३ ते ४ शाळा आपण सी.बी.एस.ई. माध्यमांच्या चालु करु शकतो.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, सी.बी.एस.ई. शाळा चालु करीत असतांना जवळपास अडीच एकर जागा आवश्यक असते ही अट असते. महानगरपालिकेच्या किती शाळा अशा आहेत की तेथे ऐवढी जागा उपलब्ध आहे.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, माझ्या प्रभागात ४ शाळा आहे व तेथे जागा उपलब्ध आहे. एक ऊर्दु शाळा आहे तेथे साडेचार एकर जागा आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझे सरळ सरळ म्हणणे आहे की, सी.बी.एस.ई. शाळेची परमीशन घ्यायची आहे. या नावाखाली या ज्या ६ शाळांचा निर्णय सभागृहाने घेतला आहे हे थांबविण्यापेक्षा या ६ शाळा आपण स्टेट बोर्डच्या आपण सुरु करावे आणि सी.बी.एस.ई. च्या ६ शाळा सुरु केल्या तर आपल्या १२ शाळा सुरु होईल. म्हणुन या ६ शाळांचा निर्णय घेतलेला आहे त्या ६ शाळांचा निर्णय कायम करुन जसा मा.आयुक्त साहेबांचा मानस आहे त्याप्रमाणे आपण सी.बी.एस.ई. शाळा सुरु केल्या पाहिजे आणि हे सभागृह सर्व संमत्तीने होच म्हणणार आहे. नाही म्हणण्याचे कोणतेही कारण नाही. जे अतिरिक्त शिक्षक आहे त्यांचे अपग्रेडेशन आपण केले तर होऊ शकते यातील काही ॲडमीशन घेतील शिकण्यासाठी आणि काही शिकवतील.

श्री.जुल्फेकार भुट्टो :- मा.महापौरजी, पिछले २ साल से नागपूर महानगरपालिका मे पिछले हाऊस मे भी मै बोला था की हर विधानसभा क्षेत्र में जरुरत मंदो के लिये एक इंग्लीश मिडीयम का स्कुल बनना चाहिये और उसमे एक हमारे प्रभाग मे भी स्कुल चालु होना चाहियें। आज समय की यही जरुरत है उसके हिसाब से हमने यह काम पुरा नही किया है, इसलिये २५० शिक्षक हमारे यहा ॲक्सेस हो गये, १५१ स्कुल मे से आज ९० स्कुल महानगरपालिका चला रही है, जो समय की जरुरत है, उसको हमने पुरा करना चाहियें । और जरुरत मंदो के लिये जो जादा पैसे खर्च नही कर सकते, जो स्लम ऐरिया के है उस एरिये के बच्चो को भी शिक्षा का अवसर मिलना चाहियें । इसलिये ६ स्कुल मे से १ हमारे प्रभाग मे इंग्लीश मिडीयम का स्कुल शुरु होना चाहियें ।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी जो ६ स्कुल बना रहे है वह कोनसे ऐरिया मे है ।

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, या संदर्भात माहिती आता उपलब्ध नाही मी नंतर माहिती देते.

श्री.सुनिल हिरणवार :- मा. महापौरजी, इंग्लीश मिडीयम के ६ स्कुल का प्रस्ताव सदन मे पास किया गया उस प्रस्ताव को मंजूरी दि जाये उसके लिये हमारा समर्थन है ।

श्री.मो.जमाल :- मा.महापौरजी, सभागृह का मानस दिख रहा है वह शिक्षण के बारे मे सभागृह काफी चिंतीत है, शिक्षण का विषय सभागृह मे आना चाहियें, जिस तरीके से साफसफाई का विषय विशेष सभा मे आया गया था,

पानी के विषय को लेकर विशेष सभा का आयोजन किया जाता है मै चॉहता हु की शिक्षण को लेकर भी एक विशेष सभा का आयोजन किया जाना चाहिये आर नागपूर महानरगपालिका के शिक्षण का स्तर अच्छा हो, नागपूर शहर के लोगों के लिये कितनी अच्छी शिक्षण प्रणाली स्थापित कर सकते है इसके लिये विशेष सभा का आयोजन किया जाना चाहियें।

श्री.राजेंद्र सोनकुसरे :- मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये, ६ विधानसभा क्षेत्र निहाय शाळा सदनाने पास केलेल्या आहेत व त्या चालु होणार आहे व असा सर्व सन्माननिय सदस्यांचा मानस आहे आणि ते आपण करावे.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, या विषयावर ब-याच जेष्ठ नगरसेवकांनी आपले मत या ठिकाणी मांडले आहे. विषय असा आहे की अतिरिक्त शिक्षकांचा ब-याच सदस्यांनी या ठिकाणी सांगितले आहे की अतिरिक्त शिक्षक असतील तर त्यांनी महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागामध्ये पाठवावे. जो २००३ चा जो शासनाचा जी.आर. आहे त्या संदर्भात या ठिकाणी माहिती देण्यात आली ३१५ शिक्षक जवळपास २५ वर्षापासून नागपूर महानगरपालिकेमध्ये सेवा देत आहे. ते अतिरिक्त शिक्षक कशामुळे झाले, नागपूर महानगरपालिकेच्या ज्या शाळा होत्या त्या शाळेमध्ये विद्यार्थी कमी आहे. ज्या प्रकारे जेष्ठ नगरसेवक श्री.प्रफुल्ल गुडधे व मा.दयाशंकर तिवारी मा.विरोधी पक्ष नेता यांनी या ठिकाणी सांगितले, जे अतिरिक्त शिक्षक आहे त्यांची जबाबदारी सुध्दा आपली आहे. ज्याने २५ वर्ष, ३० वर्ष नागपूर महानगरपालिकेमध्ये काम केले आहे. कोणी २ ते ३ वर्षामध्ये सेवानिवृत्त होणार आहे म्हणुन माझी आपणांस विनंती आहे ऐवढया मोठया महानगरपालिकेमध्ये ३१५ शिक्षक अतिरिक्त आहे त्यांना कुठेतरी नागपूर महानगरपालिकेमध्येच समाविष्ट करावे ही माझी आपल्याला विनंती आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सभागृह, हा जो विषय एकंदर अतिरिक्त शिक्षकांच्या संदर्भात झालेला आहे त्या संदर्भात मी सांगितलेले आहे. दुसरा जो विषय इंग्लीश मिडीयम आणि सी.बी.एस.ई. संदर्भात चालु आहे त्या संदर्भात मी बोलु इच्छितो, या सभागृहाने जो निर्णय घेतला की ६ स्टेट बोर्डच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालु करायचा हा चांगला निर्णय आहे. परंतु आपण इंग्रजी माध्यमांच्या शाळा का सुरु करु इच्छितो हा मुळ मुद्दा आहे. मुळात शिक्षणाची क्वॉलिटी वाढावी, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, त्याच्या भविष्यामध्ये एक चांगले काही तरी बनावे हे त्याच्या पाठीमागचा उद्येश आहे. आपला जो एस.एस.सी. चा जो सिलॅबस आहे तो मराठी माध्यमामध्ये आहे. जो एस.एस.सी. च्या ज्या शाळा आहे त्यामध्ये इंग्रजी माध्यमांच्या ज्या शाळा आहे त्याचा परीपात काय आहे. ज्या वेळी सी.बी.एस.ई. आणि एस.एस.सी. च्या पाठीमागे जो अभ्यास आहे. ती अशी आहे की सी.बी.एस.ई. सिलॅबसचा जो सिलॅबस आहे त्याचे करीकुलम असे आहे की त्या शिक्षकांची क्वालीटी वरच्या दर्जाचा आहे. त्याचा परिणाम असा होतो की कुठले विद्यार्थी जे तयार होतात त्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण भेटुन ते आपल्या जीवनामध्ये चांगल्या गोष्टी करु शकतात. ब-याच ठिकाणी आय.आय.टी. सारख्या व मेडीकल सारख्या ऐटरन्स स्वरुपातील स्पर्धा परिक्षा असतील त्याचे प्रमाण मोठया प्रमाणात दिसुन येते, म्हणुन फक्त एस.एस.सी. चे माध्यम जर बदलले तर त्याचा परिणाम पॉझीटीव्ह होणार आहे काय याचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. तो विचार केल्यानंतर ज्यावेळी माझ्याकडे हा ठराव आला त्यावेळी मी या ठरावावर चर्चा केली. एस.एस.सी. इंग्लीश मिडीयम करण्यापेक्षा सी.बी.एस.ई. करणे हे शहराच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आणि महानगरपालिकेच्या दृष्टीने चांगले आहे. ते यासाठी चांगले आहे की अनेक विद्यार्थ्या गरीब असल्यामुळे सी.बी.एस.ई. शाळेमध्ये ॲडमीशन घेऊ शकत नाही. कारण फी चे प्रश्न असतात. इंग्रजी माध्यम चालु करण्याऐवजी जर सी.बी.एस.ई. माध्यम चालु केले तर गरीबांच्या लोकांना महानगरपालिकेतर्फे चांगले शिक्षण देऊ शकु. म्हणुन ते जर करायचे असेल तर फक्त एस.एस.सी. इंग्लीश मिडीयम करुन आपल्याला फायदा होणार नाही त्यापेक्षा सी.बी.एस.ई. च्या शाळा चालु केल्या तर त्याचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांना चांगला होऊ शकतो त्यामध्ये त्याची फी आपण कशी लावायची त्यावर आपण विचार करु शकतो, पीपीपी मॉडेल वर करायची की स्वत: चालवायची या सर्व गोष्टींचा आपण विचार करु शकतो. या अगोदर मी नवी मुंबईला असतांना सी.बी.एस.ई. च्या २ शाळा मी चालु करण्याचा प्रयत्न केला आणि आज त्या चालु आहे. पी.पी.पी. मॉडेलवर आणि त्याला चांगला रिसपॉन्स सुध्दा आहे. त्याच धर्तीवर आपण इंग्लीश मिडीयमच्या ऐवजी सी.बी.एस.ई. शाळा चालु केल्या तर त्याचा फायदा येथील नागरिकांना

आणि येथील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण भेटण्यासाठी होणार आहे. हे विद्यार्थ्या पुढे भविष्यामध्ये चांगल्या पदापर्यंत इलीजीबल होईल, ही त्याच्या मागची कारणमीमांसा आहे. सी.बी.एस.ई. चा जर विचार केला तर सॅलॅबस करतांना तो एस.सी.आर.टी. चा असतो आणि ते पुस्तक लिहीतांना एक पॅनलनी पुस्तक लिहीलेले असते आणि त्याच्यामध्ये सायंटीफीक विचार करुन वेळोवेळी बदल केले असतात याचा अर्थ एस.एस.सी. चुकीचे आहे काय ? असे बोलण्याचे बिलकुल उद्येश नाही. परंतु फक्त मिडीयम चेंज केले तर शिक्षणाची क्वॉलिटी बदलेल असे नाही त्याच्या निगीटीव्ह चुक झाली चांगल्या दर्जाचे जर शिक्षण दयायचे आहे तर मिडीयम हा विषय न करता करीकुलमचा विषय केला पाहिजे, त्या सर्व बाबींचा विषय केल्यानंतर एस.एस.सी. इंग्लीश मिडीयमच्या ऐवजी सी.बी.एस.ई. शाळा सुरु करणे हे शहराच्या दृष्टीने आणि महानगरपालिकेच्या दृष्टीने करणे योग्य आहे ते माझे मत आहे. त्यामागे माझा अभ्यास आहे आणि ते सांगण्यासाठी त्यामध्ये अभ्यास आहे. त्यामध्ये एक्स नंबर ऑफ ऐरिया पाहिजे, बिल्डींग अशाप्रकारची पाहिजे, शिक्षक त्या क्वॉलिफीकेशनचे पाहिजे ते निकष पाळुनच आपल्याला करायचे आहे. ती सर्व प्रोसेस फॉलो करायची आहे. त्या अनुषंगाने आम्ही हा प्रश्न घेऊन जी.बी. समोर येणारच आहोत ६ एस.एस.सी. ऐवजी २ ते ३ शाळा आपण सी.बी.एस.ई. च्या सुरु करु विद्यार्थ्यांची संख्यामध्ये पण वाढ होईल त्यांच्यावर आर्थिक भुर्दंड पडणार नाही, आणि दर्जेदार शिक्षण आपण महानगरपालिकेतर्फे गरीबांच्या मुलांपर्यंत आपण चांगल्या पध्दतीने देऊ शकु ही माझी कारणमीमांसा आहे. माझी विनंती आहे की एस.एस.सी. च्या ६ शाळा सुरु करण्यापेक्षा तेथे सी.बी.एस.ई. च्या शाळा सुरु करु आणि ती संख्या वाढवू जेणेकरुन दर्जेदार शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळु शकेल, धन्यवाद.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, निगम आयुक्तांनी आताच सांगितले की पीपीपी मॉडेलमध्ये या ६ शाळांची या ठिकाणी माहिती दिली त्याबाबत पीपीपी मध्ये काय निकष आहे. काय अटी आणि शर्ती आहे.

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, आयुक्त साहेबांनी येथे सांगितले यासाठी आम्ही शिक्षणाधिकारी मॅडम मी स्वत: उपसभापती आम्ही चार लोकांची टिम मुंबई, पुणे, नवी मुंबई, पिंप्री चिंचवड या चार महानगरपालिकेच्या शाळा आम्ही पाहिले आहे. सी.बी.एस.सी. च्या शाळांचे स्टॅन्डर्ड आपल्या येथे गरीब विद्यार्थ्यामध्ये नाही. आपण आपल्या येथे जे बनातवाला इंग्लीश मिडीयमची जी शाळा आहे त्या शाळेमध्ये आपल्या येथे ९०० विद्यार्थी आहे. २०० विद्यार्थ्यी प्रायव्हेट शाळेतुन टि.सी. काढुन बनातवाला शाळेमध्ये आलेले आहे. आपण आपल्या शहराच्या दृष्टीकोणातून ६ शाळा म्हटल्या होत्या आणि या ६ शाळेमध्ये विद्यार्थ्याकडून एकही रुपया फी घेणार नाही या आधारावर आपण शाळा दिल्या होत्या आता आयुक्त साहेब सी.बी.एस.सी. मधुन आपण फी घेऊ तर मग गरीब विद्यार्थ्या जो आपल्याकडे आहे तो फी कशी देणार, त्यामुळे इंग्लीश मिडीयम मध्ये शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्र गर्व्हनमेंटमध्ये सी.बी.एस.सी. च्या शाळा कमी आहे आणि स्टेट बोर्डाच्या शाळा जास्त आहे. त्यामुळे मला असे वाटते की या ६ शाळा काढल्या पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी या ठिकाणी जे निवेदन केले ते स्वयंस्पष्ट आहे. त्यांनी सी.बी.एस.सी. शाळेची पार्श्वभुमी मांडली, आवश्यकता विषद केली आहे त्याबाबत त्यांनी या संदर्भातील प्रस्ताव या ठिकाणी पाठविण्यात येईल आणि सभापतींचे म्हणणे आहे की त्यांनी काही दौरे केले आणि त्यांचे काही फायडींग्स असतील त्यांचे काही ऑब्झरवेशन आहे तो प्रस्ताव आल्यानंतर त्यावर सर्वकक्ष चर्चा करुन स्टेट बोर्ड पॅर्टनचा प्रस्ताव मंजूर केला मा.आयुक्तांचे म्हणणे आहे की सी.बी.एस.सी. करायचे आहे. साधारणत: त्यावर पुन्हा चर्चा करु आणि सभागृहाचे जे धोरण निश्चीत झाले असेल तर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु कराव्यात आणि त्या सोबत मा.आयुक्तांचा जर प्रस्ताव असेल तर तो सुध्दा सभागृहाने सकारात्मक घेऊन तो पण मान्य करावा.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, या ठिकाणी मा.आयुक्तांनी जी भुमिका या ठिकाणी मांडली निश्चितपणाने मी व्यक्ती म्हणुन त्या भुमिकेचे स्वागत करतो. नवी मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये ज्या २ शाळा आहे त्याची स्थिती काय आहे त्याच्या खोलात मी शिरणार नाही. पण एक तांत्रिक बाब मी या ठिकाणी मांडु इच्छीतो, सभागृहामध्ये ज्या ६ स्टेट बोर्डाच्या शाळांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला तो प्रस्ताव मा.आयुक्त या सभागृहामध्ये पुर्नविलोकनासाठी पाठवतील काय? पुर्नविलोकन करण्याचा तो आपला अधिकार आहे काय ?

किंवा त्याला पुर्नविलोकन करण्याची गरज आहे काय ? या संदर्भाने चर्चा आली पाहिजे. आणि जर तो त्या पध्दतीचा प्रस्ताव आणणार असतील तर त्या संदर्भात देखील आयुक्तांनी मत स्पष्ट करावे.

महापौर :- मागील सभागृहामध्ये ६ इंग्रजी शाळांना मंजूरी देण्यात आली असून ती मंजूरी कायम ठेवीत याबाबत पुढील कार्यवाही तातडीने प्रशासनाने सुरु करावी आणि नविन ६ C.B.S.E. शाळा उभारण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे पाठविण्यात यावा तसेच या पुर्वी शिक्षण उपसंचालकाकडे अंदाजे ५०० शिक्षक अतिरिक्त असून म.न.पा. चे ३१५ शिक्षक अतिरिक्त झाल्यावर देखील त्यांचे दुस-या शाळेत समायोजन होतपर्यंत या शिक्षकांचा पगार म.न.पा. ला करावयाचा आहे. त्यामुळे या सर्व शिक्षकांना म.न.पा. च्या इतर विभागात समायोजन करुन योग्य प्रस्ताव सभागृहाकडे सादर करावा.

महापौर :- आर्थिक विषयाबद्दल मागील विशेष सभा दि. १३/०२/२०२० मध्ये सभागृहाच्या निर्देशाप्रमाणे आयुक्तांनी या ठिकाणी त्यांचे निवेदन करावे. मग त्यावर आपण चर्चा करु.

निगम आयुक्त :- सन्माननिय आयुक्त, सन्माननिय सभागृह, गेल्या वेळेस चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने निर्देश दिले होते. महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत सर्वसाधरणपणे काय माहिती आहे त्या दृष्टीने अद्यावत माहिती देत आहे. यामध्ये गेल्या काही वर्षाचे बजेट तपासुन सर्व बाबी येथे नमुद करु इच्छीतो. महानगरपालिकेची आजच्या परिस्थितीमध्ये अनपेड बिल्स या कॅटॅगिरीमध्ये रोड, इलेक्ट्रीकल्स, वॉटर, यामध्ये ३६.०२ कोटी रुपयांचे अनपेड बिल आहे. पी.डब्लु.डी. चे ५९.४७ कोटीचे अनपेड बिल आहे. कॉट्रॅक्ट वर्क्स रिलेटेड १६.७५ कोटी रुपयांचे आहे. वॉटर टॅंकर २.९९ कोटी रुपयांचे आहे. वॉटर वर्क्स डिपार्टमेंटचे ३.६५ कोटी रुपयांचे, बिल्स सबमिट अकाऊंट सेक्शनमध्ये नॉट पास २४.६३ कोटी असे सर्वसाधारणपणे १४३.५१ कोटी रुपये आहे हा एक भाग आहे. ऐस्टॅब्लीशमेंटची जी आपली लायबिलीटी आहे ती जी.पी.एफ. डिडक्टेड फ्रॉम सॅलरी अलॉंग विथ इंटरेस्ट १०१.८२१ कोटी, डिफाईन कॉट्रीब्युशनची स्कीम नविन कर्मचा-यांना शासनाने लागू केलेली आहे ४९ कोटी, ज्या वेळेस कर्मचारी रिटायर्ड होतात त्यावेळेस त्यामध्ये ५.१९ कोटी, एन.एम.एल. बॅंक लोन डिडक्शन फॉर सॅलरी ३.५ कोटी.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी ही आकडेवारी देत आहे ते केव्हापर्यंतची देत आहे त्याचे सुध्दा निवेदन करावे.

निगम आयुक्त :- जानेवारीच्या शेवटपर्यंत, जी एस्टॅब्लीशमेंट मध्ये जी लायबिलीटी आहे ती १५८.९ कोटी, स्टॅटयुटरी लायबिलीटी जी आहे यामध्ये नोटीस फ्रॉम इनकम टॅक्स पेंडींग रिगार्डींग डयुज, एज्युकेशन सेल पेंडींग सिन्स २०१६-२०१७ ५५.०७ करोड, ई.जी.एस. सेल २०१६-२०१७ पर्यत शासनाने दिला आहे तो ०६.८६ करोड, ईपीएफ डयुज अलॉंग विथ इंटरेस्ट १०.९३ करोड, एम.पी.सी.बी. बिल, मेट्रो शेअर, ऐरीगेशन डिपार्टमेंट, अदर डयुज १०७.७९ कोटी असे ४९६ .५१ कोटी रुपयांचे डयुज आजच्या तारेखपर्यत पेंडींग आहे. त्याचबरोबर आपले जे महानगरपालिकेमार्फेत विविध कामे घेतले आहे शासनाची जी योजना आहे त्यामध्ये नंतर बोलतो. त्यामध्ये या वर्षीचे जे कामे आहे त्यामध्ये ४२३.०३ डयुज देणे आवश्यक लागणार आहे. रिपेमेंट ऑफ लोन ५ कोटी रुपये पर मंथ देणे आवश्यक आहे. एका बाजुला आपली लायबिलीटी क्रयेट झालेली आहे त्याचबरोबर दुस-या बाजुला पिरेड ऑफ टाईममध्ये आपण कामे घेत असतो. ते कामे घेत असतांना त्याची जी लायबिलीटी क्रीयेट झाली त्यामध्ये शासनाचे जे काही योजना आहे. त्यामध्ये आपले काही शेअर आहे, केंद्र शासनाचे आहे, काही पी.पी.पी. मॉडेलवर प्राजेक्ट घेतलेले आहे ते काऊंट केले तर त्यामध्ये मोठया प्रमाणावर आहे. ती माहिती पाईंटवाईज करेक्ट नाही आहे. त्याचे डिटेल्स आम्ही काढत आहोत. यामध्ये सर्वसाधारणपणे जे २४ बाय ७ योजनेचे काम चालु आहे सन २०११-२०१२ पासुन त्याचे जे उर्वरीत काम त्या अनुषंगाने करणे अपेक्षित होते ते फक्त ३० टक्के भागामध्ये घेतले होते उर्वरीत ७० टक्के भागामध्ये ते करायचे होते तरच ती २४ बाय ७ जी योजना आहे ती आपण कार्यान्वीत करु शकत होतो त्याच्यासाठी लागणारा निधी सर्वसाधारणपणे ८७५ कोटी रुपये लागणार आहे. नाग रिव्हरचा जो शासनाने जायकाच्या माध्यमातून प्रोजेक्ट सॅंगशन केला आहे व महाराष्ट्र शासनाने त्याला मान्यता दिली आहे तो २४१२ कोटी रुपयांचा प्रोजेक्ट आहे त्याच्यामधून २६१ कोटी रुपयांचे कॉट्रीब्युशन महानगरपालिकेला दयायचे आहे

त्याधुन २० कोटी रुपये, सिव्हरेज मध्ये जे नागनदीमध्ये मुख्य जे सेंट्रल झोन आणि साऊथ झोन येतात ते कव्हर होत नाही. सर्वसाधारणपणे नागपूर शहरासाठी ३५०० कि.मी. सिव्हरेज लाईन लागणार आहे. त्यासाठी सर्वसाधारणपणे १४०० कि.मी आसपास आपल्याकडे पाईपलाईन अव्हेलेबल आहे. उर्वरीत ठिकाणी जो भाग नाग नदी मध्ये कव्हर होत आहे तो सोडून साऊथ झोनमध्ये खर्च करावा लागणार आहे त्यासाठी सर्वसाधारणपणे आपल्याला १३३० कोटी रुपये लागणार आहे. २०२०-२०२१ साठी १५५ कोटी रुपये लागतील. सॉलिड वेस्टसाठी जी टोटल कॉस्ट आहे ती ३३२ कोटी रुपयांची आहे. त्याच्यामध्ये शासनाची मंजूरी आलेली आहे. आपल्याला जी लायबिलीटी येणार आहे ती १३६ कोटी टोटल, जी लायबिलीटी गॅप फंडीग येणार आहे त्यामध्ये लागणार आहे. जी.पी.एस. करीता २.३५ कोटी रुपये आपल्याला दरवर्षी लागतात. जे आपले सॉलिड वेस्टमध्ये जे आपले कलेक्शन आणि ट्रान्सपोर्टेशन आहे. त्याकरीता दरवर्षी ९ ० कोटी रुपये पर ईअर लागते. पब्लीक वर्क्समध्ये जे मेजर वर्क्स आहे त्यामध्ये सर्वसाधारणपणे ७६ च्या आसपास कामे चालु आहे. त्याची आपल्याला टोटल कामे करायचे आहे त्यामध्ये १२५३ आहे त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा आहे. त्यामध्ये शासनाचे २०० कोटी, एन.आय.टी. चे २०० कोटी, एन.एम.सी. चे ४०१ कोटी मधुन काही पार्ट आपल्याला दयावा लागणार आहे. गर्व्हनमेंट ग्रॅन्ट मध्ये मायनर डिपार्टमेंटचे जे १३ कामे आहे. त्याची कॉस्ट ५८ कोटी ९१ लक्ष रुपये आहे पैकी ४.५२ कोटी रुपयांचे एक्सपेंडीचर झालेले आहे. त्यामध्ये गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्राचा काही शेअर आहे. यामध्ये १०० टक्के गव्हर्नमेंट ग्रँट आहे त्याकरीता लायबिलीटी येत नाही. आपण स्वत: चालु केलेले जे कामे आहे वेळोवेळी त्याची संख्या सर्वसाधारणपणे ६०४८ ऐवढी आहे. त्याची टोटल प्रोजेक्ट कॉस्ट आहे ५२८ कोटी, एक्सपेंडीचर झाले आहे १०१ कोटी, लायबिलीटी राहतात ४२३ करोड रुपये, स्मार्टसिटीमध्ये आपण पैसे देत नाही एन.आय.टी. मार्फेत आपण देत आहोत. इलेक्ट्रीकल डिपार्टमेंट मधुन जे आपण एल.ए.डी बल्ब घेतले आहे त्यामध्ये २१२२ कोटी रुपये सर्वसाधारणपणे खर्च येतो. मेट्रो रल्वेचे महानगरपालिकेमध्ये जे शेअर राहणार आहे ४२३ करोड रुपये आहे. या वर्षीचे ऑलरेडी ७३ करोडच्या आसपास आहे. लॅन्ड अॅक्वीझीशनमध्ये जे नगरोत्थान मध्ये ६४२ करोड रुपये येत आहे त्यामध्ये शासनाचा ७० टक्के हिस्सा आणि आपला ३० टक्के हिस्सा आहे तो जर शासनाने दिला नाही तर जी प्रोसीजर आहे त्यामध्ये ११४ कोटी रुपये असा आपल्याला सर्वसाधारणपणे खर्च लागणार आहे. त्यामधले २०२० -२०२१ या वर्षासाठी २३८८ कोटी लागणार आहे त्यामध्ये वॉटर वर्क्स २४ बाय ७ योजनेमध्ये जे काम केले नाही त्यासाठी लागणार आहे. सिव्हरेज यामध्ये प्रपोज केले आहे त्यामध्ये ज्या मोस्टली लायबिलीटी क्रीयेट केलेल्या आहेत २३८८ कोटी रुपयांचे आहे असा सर्वसाधारणपणे आपल्याला आकडा दिसुन येतो. हे सर्व करीत असतांना त्या दिवशी मी जे स्टेटमेंट केले होते किती स्टॅच्युटरी लायबिलीटी देऊ शकलो नाही ते १५८.०९ कोटी त्यामध्ये गव्हर्नमेंट ग्रँट १९४.०१ कोटी, जे ऑलरेडी येऊन पडले आहे ते १४३ कोटी असे एकुण ४२३ कोटी येऊन पडले आहे आणि ते आपल्याला त्वरीत देणे आवश्यक आहे आणि ते आपण देऊ शकलेलो नाही. हा एक भाग दुस-या बाजुला रिसीप्ट किती आहे. वर्षानुवर्ष आपण बजेट केले आहे बजेट मध्ये जर बघितले तर २०१६-२०१७, १५३४ कोटी, २०१७- २०१८, १७६० कोटी २०१८-२०१९, २०४८ कोटी , २०१९ -२०२०, २९४६ कोटी रुपये बजेट सादर केले होते. त्यामध्ये आयुक्तांनी रिव्हाईज बजेट सादर केले होते २०१६-२०१७ चे १६३६ कोटी, २०१७-२०१८ चे १९९७ कोटी, .२०१८ -२०१९ चे २२१७ कोटी अशा प्रकारचे आहे. स्थायी समितीने जे बजेट मंजूर केलेले होते ते २०१६-२०१७ चे १५३४ च्या अगेंस्ट २०४८ कोटी, २०१७-२०१८ चे १७६० च्या अगेंस्ट २२७१ कोटी, २०१८-२०१९ च्या २०४८ अगेस्ट २९४६ कोटी, २०१९-२०२०, २९४६ च्या अगेस्ट ३१९७ कोटी रुपये जी.बी. ने अप्रव्ह केले होते. याच्यातील आकडेवारी जर बघितली तर ५६१ कारेटी ५९१ कोटी आणि ८५७ कोटी अशाप्रकारचे डिफरन्स २५ टक्क्यापासून ३५ टक्क्यापर्यत या वर्षीचा जो बजेट जी.बी. ने मान्य केला आहे. याचे जर मंथली आकडे घेतले तर सर्वसाधारणपणे ७९ कोटीचा डिफरन्स दिसत आहे. हे सर्व होत असतांना रिसीप्ट आपली वाढलेली नाही. या वर्षाचे जे जानेवारी एन्ड पर्यत जे कामे आहे ते सर्वसाधारणपणे मार्च एन्ड पर्यत २३०० कोटी रुपयांच्या पुढे जाईल असे मला दिसत नाही. प्रॉपर्टी टॅक्स वॉटर टॅक्स पकडले तर ते होतांना दिसत नाही. या सर्व गोष्टींचा जर विचार केला तर पुढची लायबिलीटी क्रीयेट करणे शक्य नाही. जे लायबिलीटी होती त्याचे पेमेंट

करु शकलेलो नाही त्या अनुषंगाने मी स्टेटमेंट केले होते त्यानुसार ही माहिती मी सभागृहाला सादर करीत आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, आयुक्त महोदय ने सभागृह के सामने अहवाल रखा, इसमे साऊथ झोन के लिये १३३० करोड रुपयों का जो अहवाल रखा, यह क्या है इसके बारे मे स्पष्ट करे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, आपल्याला सिव्हरेजचा मेजर इशु आहे ते माझ्यापेक्षा आपल्याला जास्त माहिती आहे. आपल्याकडे पी.आय.एल. झालेल्या आहे. गोसेखुर्द मध्ये पाणी जाते. एम.जी.पी. चे आणि मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहे. नाग नदीचा जो सोलुशन अमेडमेंट प्रोजेक्ट घेतला त्यामध्ये २४०० करोड रुपयांचे केंद्र शासनाने मान्य केलेला प्रोजेक्ट आहे ते आपल्याला काही देणार, राज्य शासन आपल्याला काही देणार आणि स्वत:चा काही निधी हा जो शेअर आहे तो आपल्याला दयायचा आहे. तो २४०० करोड रुपयांचा प्रोजेक्ट आहे त्यामध्ये नॉर्थ आणि सेंट्रल

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, माझा प्रश्न अगदी स्पेसीफीक आहे. साऊथ ऐरिया सिव्हरेज हा जो विषय आहे तो समजावून सांगावे कारण सभागृहात कधी आला नाही.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, नागनदीमध्ये दोन झोन क्लीअर होत आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी मी पुन्हा सांगत आहे आपण आर्थिक परिस्थती वर्तमानची विचारली आपण काय देत आहे त्यामध्ये काय खर्च होत आहे हे नाही विचारले. कृपया स्पष्ट करावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, यामध्ये सुरुवातीला मी स्टेटमेंट केले की सध्याची जी लायबिलीटी आहे की आज आपल्याकडे पैसे नाही आहे त्यामुळे देऊ शकलेलो नाही. ४९६ कोटी ५१ लक्ष त्यामध्ये साऊथ झोनचा समावेश नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जे लायबिलीटीचे बिल आहे. इनकम टॅक्स आहे गेल्या १० वर्षाची म्हणजे ३१ मार्च ची किती लायबिलीटी असायची, ती किती कॅरी फॉरवर्ड व्हायची ती माहिती सभागृहात देण्यात यावी.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, याला लागूनच विषय आहे मागच्या सभागृहात मी विषय मांडला होता त्याचे मिनीटस् माझ्याजवळ आहे. त्यामध्ये म्हटले होते की मागच्या १२ वर्षाच्या काळातील प्रत्येक वर्षी किती जुणे देणे प्रशासनाला दयायचे आहे त्याची समग्र आकडेवारी येणा-या दिनांक २०/०२/२०२० च्या सभेत मा.आयुक्तांनी ठेवावे. हमे इतने रुपयों के बिल देने बाकी थे । वह आकडा एक भी नही आया, प्रतिवर्ष हमे कितने रुपयों के बिल देने बाकी थे उसका एक भी आकडा नही आया जिसके लिये यह विषय सभागृह के पटल पर आया है । मा.महापौरजी कृपया स्पष्ट करे । मा.महापौरजी जेव्हा की याच विषयावर चर्चा करायची होती. आणि ते आकडे नाही आहे म्हणजे त्यांना आकडे कोण पुरवित आहे. आपला पुर्ण अकाऊटींग कंम्पुटरवर आहे. डबल एन्ट्री करणारी देशातील पहिली महानगरपालिका म्हणुन आपल्याला पुरस्कार मिळालेला आहे. जी महानगरपालिका देशातील पहिली डबल एन्ट्री करणारी महानगरपालिका आहे त्याचा आयुक्त सभागृहात अशाप्रकारे वक्तव्य करेल, हे होऊ शकते की आयुक्तांना आकडे देणारी मंडळी व्यवस्थित नसेल, मा.महापौरजी, माझे म्हणणे हे आहे की आपण ज्या विषय सभागृहाच्या पटलावर ठेवला तोच जर येत नसेल तर बाकी चर्चा कशाला, आपण एका पेशंटला भेटायला गेलो आणि त्याची तब्येत कशी आहे ते माहिती नाही आणि तु हे घेऊन घे यानी बरे होते, ते ते घे त्यानी बरा होते, २५ ते ३० औषध सांगून गेलो तशातला विषय झाला, आमची तब्येत जर खराब आहे तर त्याचे सिमटन्स केव्हापासून खराब झाले, आम्ही केव्हापासून लक्ष नाही दिले, आणि तेव्हा आपले स्वास्थ सांभाळण्यासाठी काय काय प्रयत्न केले या सर्वासोबत हा विषय आला पाहिजे. म्हणुन मी मुद्याम सांगितले की प्रविणजींचा प्रश्न होता, मी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घेऊन बोललो आणि उठलो मला ऐवढया वर्षाची आकडेवारी पाहिजे, प्रत्येक वर्षी किती शिल्लक होते आणि महानगरपालिका चालविण्याची पध्दती कशी आहे. जर आकडेच नाही तर हा विषय कशासाठी घेतला, आपण एक काम करावे, ही सभा स्थगित करावे, उद्या सभा घ्यावी आणि मा.आयुक्तांना पुर्ण आकडे घेऊन बोलवा.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, याच्या आधी आलेले आयुक्त नियमबाहय काम करीत होते, आलेले कॅफो नियमबाहय काम करीत होते की त्यांना लायबिलीटीची माहिती नव्हती, मी गेल्या १५ ते २० वर्षापासूनचे

विचारत आहे मी आजचे विचारत नाही आणि त्यांना दोष दयायचा नाही. महानगरपालिकेला हा मुद्या का आला, कारण महानगरपालिकेने भविष्यामध्ये येणा-या पावसाळयाकरीता आता नगरसेवकांनी जे कामे सुचविले असतील त्याचे वर्कऑर्डर झाले असतील, काही वर्कऑर्डर झाले नसेल, काही स्थायी समितीने मंजूर केले असेल, कार्यान्वीत नसतील झाले तर ते का थांबविल्या गेले, तर त्याचे एकमेव उत्तर असे आले महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती त्याच्यावर हे हे डयु बाकी असल्यामुळे ही ही लायबिलीटी बाकी असल्यामुळे ते करु शकत नाही. मग ही प्रोसेस आहे ती याच वर्षाकरीता आहे काय ? गेली अनेक वर्ष ही महानगरपालिका ज्या कायदयाअंतर्गत चालते जे प्रशासनीक अधिकारी शासनातर्फे महानगरपालिकेमध्ये येतात. अकाऊंट सेक्शनला कॅफो आपण बाहेरुन मागवितो. मा.महापौरजी, एकमेव अशी महानगरपालिका होती ज्या महानगरपालिकेने कॅफो बाहेरुन मागितला, गरज नसतांना आपल्या १२/०४/१९७६ च्या नियमात महानगरपालिकेचाच कॅफो होता पण बाहेरच्या लोकांना खूप चांगले समजते, त्यांना अकाऊंटचा फार अनुभव असतो त्यामुळे आपण कॅफो बाहेरुन मागवित गेलो. ही जी लायबिलीटी आहे ती किती वर्षापासून आहे. गव्हर्नमेंट कडुन काय घेणे आहे, काय देणे आहे हा प्रशासनिक विषय आहे. एक विषय मी तुम्हाला सांगतो आय.आर.डी.पी. रस्त्यांचा सेस आपली महानगरपालिका ४ ठिकाणी वसुल करीत होती. ६३ कोटी रुपये होते ते आजपर्यत शासनाने आपल्याला दिले नाही. त्याच्या फाईली तयार आहे. माझेअसे म्हणणे आहे जे शासनाकडून घ्यायचे आहे आणि दयायचे आहे हा आपला अंतर्गत विषय आहे. ३ फेजचे सिमेंट रोड, सिमेंट रोड १ , सिमेंट रोड २, सिमेंट रोड ३, १०० कोटी शासन देणार, १०० कोटी एन.आय.टी देणार, १०० कोटी महानगरपालिका देणार, साऊथ झोनचा तर विषयच नाही. ८०० कोटी रुपये ओसीडब्लु ला दयायचे आहे असे या ठिकाणी सांगितले ते बिल किती वर्षात् लागणार आहे. हा जी.पी.एफ. आहे ई.पी.एफ आहे, हा इनकम टॅक्स आहे हा आपण टप्याटप्याने का नाही दिला याचा भुर्दंड नागपूर महानगरपालिकेमध्ये राहणारे नागरिक भोगणार आहे काय ? हा सर्व विषय तेथुन आहे. त्यामुळे माझी विनंती अशी आहे की यांनी १२ वर्षाचे आकडे दयावे. की दर वर्षी किती कॅरीफॉरवर्ड झाले ते जर हे देऊ शकत नसतील तर या विषयावर चर्चा करणे म्हणजे सभागृहाचा वेळ घालवणे होईल, त्यामुळे जर ते देऊ शकत असतील, तर येथुन चर्चा समोर न्यावी आणि त्यांना विचारावे त्यांना किती दिवस लागणार आहे. कारण की मुंढे साहेबांना या महानगरपालिकेच्या आधी इतर महानगरपालिकेचा अनुभव आहे. ते फार कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रीय अधिकारी आहे. आणि त्यांच्या शिस्तीचे मी स्वागत करतो. पण ते येऊन १० ते १५ दिवस झालेआहे. ही सर्व माहिती तर त्यांनी त्यांच्या शिस्तीत मागवावी आणि मगच आपण त्या विषयावर चर्चा करावी.

श्री.संजय बंगाले :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा अहवाल मा. आयुक्तांनी ठेवला. मा.आयुक्त २८ तारखेला ते जॉईन झाले, या शहरात येवून त्यांना २५ दिवस झाले. आल्या बरोबर मा.आयुक्तांनी महानगरपालिकेचा एकंदरीत स्टॅबलीश, महानगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा घेण्यास सुरवात केली. या महानगरपालिकेमध्ये जेष्ठ सदस्य दयाशंकर तिवारी आणि प्रवीण दटके यांनी म्हटल्याप्रमाणे महानगरपालिकेत आता पर्यंत आलेले आयुक्त हे यांच्या पेक्षा जास्त प्रशासकीय अनुभव असलेले होते. यांना प्रशासकीय सेवेमध्ये २००५ चे आयएएस अधिकारी म्हणून १५ वर्षाची सेवा झाली. गंभीर, शिस्तबध्द अधिकारी म्हणून ओळख असलेले, महानगरपालिकेला आर्थिक शिस्त लागली पाहिजे काय? हो लागली पाहिजे. महानगरपालिकेचे कर्मचारी हे महानगरपालिकेच्या हिताचे काम करतात काय याचा आढावा घेतला पाहिजे. नियोजित कर्तव्यामध्ये कोणत्या विभागाचा कामचुकारपणा होत आहे काय ते दुरुस्त केले पाहिजे. महानगरपालिका हे शासनाचे अपत्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या वरती केंद्र शासन आहे आणि राज्य शासन आहे. महानगरपालिका ही प्रायव्हेट अर्निंग करणारी इन्स्टीटयुट नाही. संविधानात असे कुठेही कायद्यात लिहिलेले नाही की महानगरपालिका ही प्राफीट मध्ये चालावी. महानगरपालिका प्राफीट मध्ये चालणारी इन्टीटयुट नाही. राज्यात वेगवेगळया इन्टीटयुट आहेत. मुंबई महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, पुणे महानगरपालिका हजारो कोटीच्या महानगरपालिका आहेत. सी ॲन्ड सी ॲक्ट असलेली ही महानगरपालिका होती. या महानगरपालिकेत ६५वर्षात राज्य शासनाने ज्या ज्या नियोजनाच्या योजना आणायल्या पाहिजे होती. जी मदत द्यायला पाहिजे होती ती मदत झालेली आहे काय?

महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत कमी करण्याचे पाप कुणी केले याच्या विचार होणे गरजेचे आहे. गॅज्युअली १५ टक्के वाढ चुंगी करातून ६७५ कोटीपर्यंत २०१३ पर्यंत महानगरपालिकेच्या ऑक्ट्रायच्या माध्यमातून मिळत होते हे कुणी बंद केले. आज २०१९-२० पर्यंत १३०० कोटीचे उत्पन्न ऑक्ट्रायच्या माध्यमातून मिळत होते हे कुणी पाप केले तेव्हा कुणाचे सरकार होते. कुणाच्या सरकारने पाप केले. एल.बी.टी. आणि जी.एस.टी.च्या विषयात मला जायचे नाही. मा.आयुक्तांनी आर्थिक परिस्थितीचा आकडा देत असतांना हाही आकडा दिला नाही. १२ वर्षामध्ये जे काही लोन घेतले ते लोन कोणकोणत्या प्रकारे कमी केले आहे. या लोकच्या बाबतीत असे म्हटले आहे काय की महानगरपालिकेने हे लोन चुकविले आहे. एखाद्या लोनचा हप्ता चुकविला आहे काय? महानगरपालिकेचा आर्थिक बाबींशी संबंधित रिपोर्ट पाठविला आहे काय की ही महानगरपालिका आर्थिक अडचणीत आहे. या महाराष्ट्रात ३६ महानगरपालिका आहेत. ए, बी, सी, डी वर्गवारी असलेल्या ३६हजार करोडचे बजेट असलेले मुंबई महानगरपालिका आहे. आम्ही तीन महिन्यापासून वर्तमानपत्रात वाचतो की या महानगरपालिकेची रिव्हीजन प्रोसेस सुरु आहे. आमची महानगरपालिका ही राज्य सरकारचे अपत्य आहे. मुलगा लोन भरु शकत नसेल तर त्याचा बाप लोन भरतो. २५ दिवसापूर्वी आपण आलेले आयुक्त या महानगरपालिकेचा आर्थिक अहवाल सांगत आहे. आम्ही हर्डीकर सारखे आयुक्त पाहिले. भरपूर अनुभव असलेले असलेले आपल्या पेक्षा १० वर्ष जास्त अनुभव आहे. आपण आल्या बरोबर आर्थिक अहवाल मांडता त्यात या शहरातील नागरिकांची काही चुका आहे काय? याशहराचे नागरिका वेळेवर पाण्याचे बील भरतात, मालमत्ता टॅक्स भरतात. आपल्या आर्वभार्वातून या सभागृहाचा आणि नागरिकांचा असा मानस होत आहे की या वर्षी बजेटचे कारण सांगून कोणतेही विकास कामे या महानगरपालिकेत होवू देणार नाही. आपला मानस यातून सिध्द होत आहे. आपण चर्चेमध्ये अनेक पदाधिका-यांना असे म्हटले की फिक्स प्रायरिटी काय आहे हे मला माहीत नाही. जी नागपूर शहराची रुढी आणि परंपरा आहे त्या रुढी आणि परंपरेनुसार चालणारे हे शहर आहे. भोसलेकालीन ३०० वर्षाचा इतिहास लाभलेला हे शहर आहे. २०१४ मध्ये एमएससी ॲक्टमध्ये आमची महानगरपालिका गेली नाही तर आमचा स्वतंत्र कायद्या होता. आमच्या स्वतंत्र कायदयानुसार ही महानगरपालिका चालत होती. आम्ही आमचा कायद्या बदलायला सांगितला नव्हता. त्या तत्कालीन परिस्थितीमध्ये आमचा कायद्या बदलला आणि नवीन कायद्यानुसार ज्या प्रकारचे निकष आणि नियम लावत असाल तर या शहराला विकासापासून दूर करण्याचा प्रयत्न तर करीत नाही ना अशा प्रकारची या सभागृहाची भावना या ठिकाणी व्हायला लागली आहे. आम्ही आपल्याला मदत करण्यासाठी आहोत. आपण एक शिस्तप्रिय अधिकारी आहात आपण प्रशासन ठीक करावे याबदद्ल दुमत नाही. परंतु सर्व सुविधा नागरिकांना मिळाला पाहिजे याबाबतीत सभागृहाचे एकच मत आहे. परंतु या सर्व फायनॉनसियल बाबीमध्ये आपण लौकरच समाधानकारक निकषावर आलेत ही भुमिका योग्य नाही. महानगरपालिकेचे कंटीन्यू तुटीचे बजेट असते. बजेट हे तुटीसाठीच असते. ते बजेट मग केंद्र सरकारचे असो की राज्य सरकारचे असो. दुसरा एक मुददा, महानगरपालिकेमध्ये आपण आयुक्त आहात, आपल्या खाली अति आयुक्त उपायुक्त आहेत. महानगरपालिकेत किती उपायुक्त आहेत तर ७ उपायुक्त आपल्या खाली आहेत. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी कुठल्या नगरसेवकाने विरोध केला आहे काय? आपल्याकडे पत्र आहे काय महानगरपालिकेच्या पदाधिका-यांनी आपले उत्पन्न वाढवू नका असे सांगितले आहे काय? उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणा-या महानगरपालिकेत अनेक समित्या आहेत. त्या प्रयत्न करीत आहेत. माझ्याकडे एक समिती होती, स्थापत्य समिती. त्या समितीच्या माध्यमातून मोबाईल टॉवर वरती ७-८ वर्षाची जी थकबाकी होती करोडो त्या बाबतीत आम्ही गंभीर निर्णय घेतला. उत्पन्न वाढीच्या संदर्भात आमचे दूमत नाही. आम्हांला माहिती देण्यात यावी मा.आयुक्त साहेब की झोनल लेव्हलवर कोणते आयुक्त आणि उपायुक्त कर वाढीसाठी येवून बसले. कोणत्या उपायुक्तांनी ज्यांच्यावर करोडो रुपयाची थकबाकी आहे त्यांच्याकडून काढून घेण्यासाठी येवून बसले आणि वसुली केली यावर विचार करणे गरजेचे आहे. ही प्रशासकीय बाब आहे. ही प्रशासकीय बाब लोकप्रतिनिधींवर थोपवून लोकप्रतिनिधीमार्फत जी कमिटमेंट केली जाते ती थांबविण्याचा प्रयत्न जर कां आपल्या मार्फत होत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. आपण या संदर्भात एक सर्वकष भुमिका घ्यावी अशी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे. ६५ वर्षात

या शहराला जे मिळाले नाही ते मा.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असतांना मिळाले. सिमेंट रस्ते, मेट्रो, नागनदीच्या संदर्भात ती पुरातन नागनदी ही नागनदीमध्ये परावर्तीत झाली. याची कारणमीमांसा झाली पाहिजे. आपण सांगितले नागनदीच्या सिवरेज प्लॉन्टचे ३ झोनला प्रस्ताव आहे. हे जे काही नमुद आहे ते महानगरपालिकेच्या सभागृहात मंजूर केले आहे. राज्य सरकार , केंद्र सरकार या नागपूर शहरासाठी चांगल्या योजना देत असेल आणि त्यात वाटा टाकावयाचा असेल, तो वाटा टाकत असतांना आम्ही जर त्याला डिमांड समजत असू, आम्ही तो आमच्यावर भार समजत असू तर ते निश्चितच योग्य नाही. जे या ५ वर्षात या नागपूर शहराला मिळाले ते ६५ वर्षात मिळाले नाही. आणि जे काही प्रोजेक्ट या शहराला मिळाले ते एका वर्षात पुर्ण करावयाचे नाही तर ते ५ वर्षात, १० वर्षात आणि २५ वर्षात पुर्ण करावयाचे आहे. ही जी काही लायबिलीटीज सांगण्यात येत आहे. ते काही लोन घेत असतांना कोणताही हिस्सा या ठिकाणी महानगरपालिकेने चुकवलेला नाही. या सगळे होत असतांना बजेटमध्ये विकासाचा निधी ठेवावायचा असतो. कारण नगरसेवक ज्या प्रभागातून जिंकून येतो तो नागरिकांना कमिटमेंट करीत असतो. ते कमिटमेंट पुर्ण करतांना विकासासाठी नगरसेवकांना त्या ठिकाणी निधी दिला नाही तर जनतेला त्यांना उत्तर द्यावे लागते. नागपूर शहरात ३० लक्ष लोकसंख्या असलेल्या जनतेकडून आलेल्या कराच्या रुपात आलेल्या उत्पन्नावर हे शहर चालत असतांना आपण कोणत्याही विकासाच्या कामात खंड पडू देणार नाही अशी मी मा.महापौरजी आपल्या मार्फत आयुक्तांना सुचना द्याव्यात.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, यह सत्तापक्ष की तकलीफ आज सदन मे दिखाई दे रही है. यह पिछले कई सालो से हम विरोधी पक्ष को होते आ रही है. चेअरमन ३५ करोड अपने खुद के प्रभाग के लिए लेते है और विरोधी पक्ष के सदस्यो को ३५ हजार, ४० हजार के लिए दर दर भटकना पडता है.अभी जो आवाज सत्तापक्ष के नेताओ ने निकाली है वह आवाज हमारी है. हम पर कई सालो से अन्याय करते हुए आ रहे है आणि आज तुका म्हणे ऊगे रहा आणि जे जे होते ते ते पाहा ऐसी स्थिती सामने आई तो तिलमिला गये. यह हमारे साथ हो रहा है कई सालो से. बोल रहे है अन्याय मत करो. हम भी जनप्रतिनिधी है हम पर क्यो अन्याय हो रहा है. जनता ने हमको भी चुनाव मे जीत कर भेजा है उनकी बात रखने के लिए . हमारे आप लोग कंटीन्यु अन्याय कर रहे हो, यह काम कॉग्रेस पक्ष ने कभी नही किया. जी.एस.टी. कॉग्रेसने नही लाया, एलबीटी और उसके बाद .जी.एस.टी. यह आप लोगो की देन है. जनता के उपर भी भार नही पडने को होना और हमारी जो भावना है नगरसेवको की , यह जनता के ही प्रतिनिधी है, जनता की बात ही सदन मे लाते है और जनता की ही तकलीफ दूर करने के लिए ही काम करते है परंतु जब तक खुद को तकलीफ नही होती तब तक आदमी दुसरी की तकलीफ को नजरअंदाज करता है . मै कई बार मा.चेअरमन के ऑफीस मे गया मेरा आऊटर वार्ड है , मेरे वार्ड की १०० करोड की रिक्वॉयमेंट है मुझे कितना दिये ३५ लाख तो यह उंट के मुंह जिरा देने वाली बात नही हुई क्या ? मा.आयुक्त साहब आपसे भी निवेदन है और मा.महापौरजी आपसे भी निवेदन है, हम जनप्रतिनिधी है हमको भी न्याय दिया जाये, हमारे भी क्षेत्र की जनता टॅक्स भरती है, हमारे भी क्षेत्र की जनता की जिम्मेदारी नागपूर महानगरपालिका ने तय किये हुअे है, उनके साथ अन्याय नही होना चाहिए मा.महापौरजी, एक संत महाराष्ट्र मे हो चुके है संत तुकाराम और इनका भी नाम है तुकाराम, यह भी शिस्तबध्द काम करेंगें तुकाराम का नाम नही खराब करेंगें याने विपक्ष न्याय मिलेगा और सत्तापक्ष को भी न्याय मिलेगा. मा.महापौरजी, बंगाले जी बोले उनकी दिल की भावना हमारे भी भावना थी जिसे आप सुन ही नही रहे थे, हमको नारे लगाने पडते है, मुर्दाबाद मुर्दाबाद महापौर मुर्दाबाद इसलिए आपको हाथ जोड के विनंती है, ऐसी स्थिती नही होने को होना हमारे क्षेत्र के जनता ने हमे भेजा है उनके साथ कोई अन्याय नही होना चाहिए ऐसी मै विनंती करता हूॅ

श्री.कमलेश चौधरी :-मा.महापौरजी, मै प्रश्न काफी समय से लिख रहा था उसकी ऑन्सरशिट मिलती थी उसका इसबार दो रुप मे जबाब आया है मा.महापौरजी.दो प्रकार जबाब इस प्रकार आया, इस के पहले की भी ऑन्सरशिट मेरे पास मे है पर उसमे जो जबाब मिलता था उसमे हमारे सदन मे बैठे हुए जितने भी नगरसेवक है, सत्तापक्ष के हो, विपक्ष के हो, बीएसपी के हो, अपक्ष हो उन सभी को बहोत ज्यादा जरुरी है , अभी बोला गया खास कर नये लोगो को जानकारी होना बहोत जरुरी है जब भी कोई चिज इसप्रकार की आती है सत्तापक्ष के जो नये लोग

है जो नये इलेक्टेड होके आये है उनको जानकारी नही होने के कारण इन लोगो को बवाल खडे करते है यह गलत है, यह गलत है इन चीजो को समझ् ले बाद मे उसपर वक्तव्य करे ऐसा मेरा अनुरोध है मा.महापौरजी, मै वह ऑन्सर पढ के बताना चाहुंगा मा.महापौरजी, मा. स्थायी समिती अध्यक्ष, मनपा यांना ठराव क्र. २२९ दिनांक ११.०६.२०११ च्या अर्थसंकल्पात विविध विकास कामात अंतर्गत ठेवण्यात आलेल्या निधीचे विविध कामाकरिता तरतूद किंवा तदतूद मुक्त करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती अध्यक्ष यांना प्रदान करण्यात आली आहे. मग त्याच्यानंतर देण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ चा कलमाचा विचार करता ही बाब सुसंगत नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ अन्वये स्थायी समिती सभापती यांना अर्थसंकल्पात तरतूद केलेले निधीचे वितरण करण्याचे अधिकार नाही. आता मला हे सांगा मा.महापौरजी, आम्ही वारंवांर आमचे सोबती आहेत, मोठे नगरसेवक आहेत. आमचे मोठे बंधु आहेत त्यांनी मागणी केली विपक्ष सोबत अन्याय होत आहे. निधी वाटपामध्ये अन्याय हा नवीन नगरसेवक असो किंवा विपक्षातील नगरसेवक असोत. आपण पाहू शकता मा.महापौरजी, निधी वाटपाचा पुर्ण आराखडा घेवून बसा,आपल्याला कळून जाईल की नवीन निवडून आलेले नगरसेवक असोत किंवा विरोधी पक्षातील नगरसेवक असोत. त्यांनी किती रुपयाचे वाटप स्थायी समितीकडून देण्यात आलेले आहे. मी विचारले होते की जर एखाद्या प्रस्ताव आम्ही जनप्रतिनिधीने कार्यालयाला प्रपोज केला, सहा.आयुक्तांना प्रपोज केला, एक्झक्युटीव्ह इंजिनिअरला प्रपोज केला आणि त्यांनी तो निवेदन स्वरुप प्रस्ताव तयार केलाआणि तो प्रस्ताव डेप्युटी इंजिनिअरने मंजूर केला, जे.ई.ने मंजूर केला, एझ्यीकेटीव्ह इंजिनिअरने त्याला एक्झीक्युट केला आणि मग आपल्याकडे जी प्रथा जी गेल्या तीन-चार वर्षापासून चालू आहे. त्या पध्दतीनुसार तो प्रस्ताव स्थायी समिती चेअरमन कडे गेला आणि तेथे त्यांनी फाईल थांबविली आणि अनपेक्षित त्या ठिकाणी दोन-तीन जीव गेले तर त्याच्यामध्ये जबाबदारी कुणाची राहणार आहे. हे थोडे स्पष्ट करा मा.महापौरजी. हे या ठिकाणी स्पष्ट झाले पाहिजे. यामध्ये जबाबदारी कुणाची राहणार आहे. ही जबाबदारी प्रशासनाची आहे, स्थायी समिती अध्यक्षाची जबाबदारी आहे. कारण प्रस्ताव प्रशासनाने तयार केला तर यामध्ये कुणाला दोषी ठरविणार आहे. यामध्ये स्पष्टता प्रशासनाकडून देण्यात यावी.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, पाईट ऑफ आर्डर, कलम ७३ चे वाचन करावे.

महापौर:- कलम ७३ चे वाचन करावे.

(बेल)

महापौर:- या ठिकाणी दोन प्रश्न झाले. कलम ७३ कमलेश चौधरी झाला हा उत्तराशी संबंधित आहे. कलम ७३ मध्ये त्यांचे उत्तर आहे त्यामुळे कलम ७३ व्हावे आणि त्यानंतर कमलेश चौधरी यांचे प्रश्नाचे उत्तर दयावे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी मराठीत वाचण्यात यावे.

श्री.मोहिते (निगम सचिव):-मा.महापौरजी, आपल्या निर्देशानुसार मी कलम ७३ चे वाचन करीत आहे.(वाचले) नागपूर महानगरपालिकेच्या वतीने संविदा करुन देण्याचा आयुक्तांचाअधिकार- स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताहीहितसंबंधसंपादन करणेव त्याचा विनियोग करणे या संबंधीचे संविदा धरुन, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमातील कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतूदी लागू होतील त्या अशा-

अ) आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा कोणत्याही संविदा करेल,

ब) आयुक्तांना दुस-या एखाद्या महानगरपालिकेच्या प्राधिका-याची मान्यता किंवा मंजूरी मिळाल्यावाचून जे प्रयोजन या नियमाच्या कोणत्याही तरतूदीन्वयेपार पाडता येणार नाहीत अशा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रथमत: रितसर अशी मान्यता किंवा मंजूरी करण्यात येईल किंवा देण्यात आली नसेल तर, त्यास कोणतीही संविदा करता येणार नाही.

क) स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्याशी संबंधित कोणताही हक्क संपादीत करण्या संबंधिच्या संविदा खेरीज, ज्यात २५ लाख रुपयाहून अधिक परंतु ५० लाख रुपयापेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा खर्च अंतभुत असेल अशी इतर कोणतीही संविदा महापौराने पुर्वमान्यता दिल्याशिवाय

आयुक्तांना करता कामा नये. तथापि महापौराने मान्यता दिलेल्या सर्व संविदाचीएकुण रक्कम वर्षभरात एक कोटी पन्नास लाख रुपयेपेक्षा अधिक खर्च अंतर्भुत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पूर्व मान्यता आवश्यक असेल असता कामा नये (वरील तरतूद राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले करेल. परंतु अनुसुची ड च्या प्रकरण(२) मध्ये नियम ३ खंड (के) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी जेथे कोणत्याही संविदेसाठी आयुक्ताकडून स्थायी समितीची मान्यता घेतली जातेअशा बाबतीत स्थायी समिती, त्या संदर्भात आयुक्तांने केलेल्या प्रस्तावावर, तो प्रस्ताव समितीस मिळाल्या नंतरच्या लगतच् घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांका पासून१५ दिवसांच्या आंत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईलआणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेण्यात आलेली असो अथवा नसो तसे न केल्यास अशा संविदेस स्थायी समितीने मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल. आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल.

ड) ज्यात( ५ लाख रुपया पेक्षा अधिक परंतु २५ लाख रुपये किंवा खंड(क) अन्वये त्यावेळी विहीत करण्यात येईल अशी त्याहून अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भुत असेल अशा आयुक्तांने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत स्थायी समितीस कळविली पाहिजे.

ई) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना आयुक्तास प्रसंगानुरुप जी संविदा करावी लागेल अशा प्रत्येक संविदेस या कलमाच्या पूर्वगामी तरतूदी शक्यतोवर लागू होतील. आणि या कलमाच्या ज्या तरतूदी मूळ संविदेस लागू असतील त्या, अशा संविदेच्या कोणत्याही बदलास किंवा मुक्ततेस लागू होतील.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, कलम ७३ मध्ये प्रावधान देण्याचे अधिकार कुणाला ? संविदा म्हणजे काय ?

श्री.मोहिते(निगम सचिव) :-मा.महापौरजी, संविदा म्हणजे कॉन्ट्रक्ट.कॉन्ट्रक्ट म्हणजे निविदा.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, संविदा म्हणजे काय हे शांतपणे विचारुन घ्यावे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन. मा.महापौरजी, कलम ७३ का पुरा का पुरा वाचन किया I मेरा आक्षेप यह है की सभागृहमे कमलेश चौधरीने जो प्रश्न पुछा था वह प्रश्न स्वंयस्पष्ट है I प्रश्न आहे, नागपूर महानगरपालिका स्थायी समिती अध्यक्षांना अंदाजपत्रका अंतर्गत २५ लाखापेक्षा किती रक्कमेच्या प्रावधानाकरिता नस्त्या, पत्र देण्याचे अधिकार कोणत्या नियमाअंतर्गत देण्यात आले व का ? मा.महापौरजी, कमलेश चौधरी याला दिलेले उत्तर चुकीचे आहे. त्यात प्रावधान बद्दल एकही शब्दाचा उल्लेख नाही. जे निवेदन केले त्यातही प्रावधान शब्दाचा उल्लेख नाही. ते संविदा बद्दलचे आहे तर कृपया त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये प्रावधान देण्याचा कुणाला अधिकार आहे ते जेथे कुठे नमुद असेल ते वाचण्याची कृपा करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, प्रवीण दटके साहेबांनी पाईट ऑफ आर्डर घेतला आणि कलम ७३ चे वाचन करण्यासाठी सांगितले.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, कलम ७३ मध्ये प्रावधान देण्याचे अधिकार कुणाला ? संविदा म्हणजे काय ? मी एवढेच विचारले आहे. इतके सोपे दोन प्रश्न आहेत.

श्री.मोहिते(निगम सचिव):-मा.महापौरजी, संविदा म्हणजे कॉन्ट्रक्ट.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, संविदा म्हणजे कॉन्ट्रक्ट. तर संविदेमध्ये प्रावधान देण्याचा अधिकार कुणाला ? उत्तरात सुस्पष्ट लिहिले आहे तर मग प्रावधान देण्याचा अधिकार कुणाला हे कां लिहिले नाही.

श्री.मोहिते (निगम सचिव):-मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या प्रावधान देण्याचा उल्लेख कुठल्याही कलमामध्ये आढळून आलेला नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मला आणखी एका प्रश्नाचे उत्तर पाहिजे आहे. समजा महानगरपालिकेच्या ठरावाच्या अनुरुप पारित नसल्यास कायद्याच्या कोणत्या कलमानुसार विखंडीत करण्याचा अधिकार कुणाला आहे.

श्री.मोहिते (निगम सचिव) :- मा.महापौरजी, मा.आयुक्त

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, नीट वाचून घ्या मग उत्तर दया. १२ वर्षाचा अहवाल मागीतला १ वर्षाचा दिला, काम आपले चालून राहिले. म्हणून चर्चा करतांना उत्तर नीट दयावे असे माझे म्हणणे आहे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, सभागृहात मा.नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर जर अधिका-याने चुकीचे दिले तर असेल तर नियमाप्रमाणे कोणती कार्यवाही लागते ते सांगावे.

महापौर :- प्रशासनाने सांगावे, चुकीचे उत्तर दिले असेल तर काय कार्यवाही होईल.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, माझा एक शेवटचा प्रश्न आहे. मनपा सभागृहाने केलेला ठराव, ठरावात दिलेल्या अधिकाराचा ठरावाने कार्यान्वित केला असेल तर हा विनियम झाला हे खरे आहे किंवा खोटे आहे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, उत्तर प्रविण्जीचे सुरु आहे. माझ्या प्रश्नाचे उततर दयावे. सभागृहात अधिका-याने चुकीचे उत्तर दिले तर कोणती कार्यवाही करु शकतो.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, समजा चुक झाली असेल तर त्यांनी मान्य करावे आमचे उत्तर देण्यात चुक झाली आहे. आम्ही ते वापस घेतो.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब उत्तर देण्यास उभे आहेत म्हणून मी विचारु इच्छितो, हे जे उत्तर दिले याच्या खाली लिहिले आहे मा.आयुक्त यांच्या अनुमतीने. याचा अर्थ असा की हे उत्तर आयुक्तांनी दिले. तर याची कार्यवाही कुणावर झाली पाहिजे.

निगम आयुक्त:- सन्माननीय.महापौरजी, सन्माननीय सदन हा जो प्रश्न आला आहे त्या अनुषंगाने क्लॅरिटी होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या अंतर्गत ज्या पॉवर्स् आहेत. त्या वेगवेगळया सेक्शनमध्ये दिलेल्या आहेत. वेगवेगळया ॲथारिटीच्या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये कोणत्याही प्रोजेक्टला किवा कोणत्याही कामाला मान्यता देण्याचे अधिकार २५ लाखाच्या वरती राशी असेल ती महासभेस आहे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, माझा प्रश्न स्पेसिफिक आहे. हे उत्तर चुकीचे आहे किंवा नाही. जर चुकीचे असेल तर कबुल करावे आणि नसेल तर स्पष्टीकरण दयावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय.महापौरजी, सन्माननीय सदन. दिलेले उत्तर हे बरोबर आहे. ते चुकीचे नाही.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, संबंधित अधिका-याने कलम ७३ चे पुर्ण वाचन केले. वाचन मध्ये फक्त संविदा, संविदा आणि संविदा असे आले. मा.महापौरजी, संविदा अधिक स्पष्ट करावयाची असेल कारण पाच म्युसिपल कार्पोरेशनच्या ॲक्टमध्ये फक्त संविदाचे आहे. प्रकरण ५ चे कलम (२) ४७० नंबरच्या पानवर आहे ते वाचून घ्यावे.

श्री.मोहिते (निगम सचिव) :-मा.महापौरजी, (वाचले)

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पुरेसे झाले प्रथम पंक्तीचा पुर्नउच्चारण करण्यात यावे.

श्री.मोहिते (निगम सचिव) :- मा.महापौरजी,यात

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, तरतूद करण्यात आली असेल. तरतूद म्हणजे काय? आयुक्त तरतूद झाल्यावर निर्णय करते. हे प्रकरण काय सांगते मा.महापौरजी. आणखी पुढे स्पष्ट करतो , कम ज्यादा करने की स्थिती मे स्थायी समिती को अधिकार है पेज नंबर ४७३ को खोलिए

श्री.मोहिते (निगम सचिव) :-मा.महापौरजी, (वाचले)

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, यांनी जे वाचले ते अर्थसंकल्पामध्ये काय काय घ्यावयाचे आहे ते वाचले. त्यातच नमूद आहे की कलम १०१ प्रमाणे वागले पाहिजे. कलम १०१ काय आहे तेही सांगून दया.

श्री.मोहिते (निगम सचिव) :- मा.महापौरजी, (वाचले) १०१

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, अगदी स्पष्ट आहे. बजेटमध्ये किरकोळ हेड मध्ये पैसे ठेवण्याचा अधिकार स्थायी समिती सभापतीला आहे. दुसरा उल्लेख आहे त्यात अदल बदल करावयाचा असेल तर तो अधिकार स्थायी समितीला दिलेला आहे. मा.महापौरजी, कमिश्नरने दिलेल्या बजेटवर परावर्तित करण्याचा अधिकार मा. चेअरमन ला आहे. सर्व अधिकार चेअरमनला आहे. मा. महापौरजी, वह व्यक्ति निश्चित करेगा की

किस चिज को कितने पैसे देना है मा.महापौरजी, जब बांटने का उल्लेख इसमे दिया है तो...

श्री.कमलेश चौधरी:- मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर. स्थायी समिती म्हणजे अध्यक्ष की समिती

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, स्थायी समिती पुर्ण रुप से निर्णय लेके चेअरमन को अधिकार देती है और वह अधिकार दिया गया की नही वह नमुद करे

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या सचिवालयाचे हे डाक्युमेंट आहे. या सचिवालयाच्या डाक्युमेंटमध्ये पान नंबर १, २, ३, ४ त्यामध्ये कलम ३ मध्ये असे लिहिलेआहे कीअर्थसंकल्पीय विविध विकास कामाकरिता प्रावधान देण्याचे किंवा तरतूद मुक्त करण्याचे अधिकार स्थायी समिती अध्यक्ष यांना देण्यात येतात. क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत विविध विकास कामे ठेवण्याच्या प्रशासकीय करण्याकरिता तरतूद वगळून या सभागृहाने मंजूरी दिली.

श्री.कमलेश चौधरी:- मा.महापौरजी, मी आधीही विचारलेले आहे. अशा प्रकरणामध्ये एखादी फाईल स्थायी समिती चेअरमन कडे थांबली आणि अनायसे त्या ठिकाणी एखादी घटना झाली तर त्याची जबाबदारी निश्चित करुन दयावी.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, ये सारे प्रश्न तब खडे होगे जब सन्माननीय महोदयने दिया गया उत्तर नियम अंतर्गत है नियमबाहय है

श्री.कमलेश चौधरी:- मा.महापौरजी, आमचेही म्हणणे एकच आहे. यामध्ये स्पष्टीकरण करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, दयाभैय्याचे म्हणणे असे आहे की प्रशासनाने दिलेले उत्तर योग्य नाही. त्यासाठी त्यांनी काही कलमाचे वाचन करायला लावले.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईट ऑफ आर्डर. सुधार करु इच्छितो, उत्तर योग्य नाही, उत्तर योग्य करु शकतो परंतु दिलेले उत्तर चुकीचे आहे असे माझे म्हणणे आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, मा.सदस्यांचे म्हणणे आहे उत्तर चुकीचे दिलेले आहे. यावर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यांचे या कलमाच्या संदर्भात काय निवेदन आहे ते स्पष्ट करु दयावे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईट ऑफ आर्डर.ॲक्ट काय म्हणते याच्यावर बोलायचे आहे. आयुक्तांना काय वाटते यावर बोलावयाचे नाही मा.महापौरजी. कारण माणसावर प्रशासन चालत नसते. लिहिलेल्या बाबींवर प्रशासन चालू शकते. म्हणून यांना काय वाटते यापेक्षा कानून काय म्हणते याच्यावर स्पष्टीकरण दयावे.

महापौर:-ॲक्ट काय सांगते ते मा.आयुक्तांनी या ठिकाणी सांगावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मागच्या सभागृहात १२ वर्षाच्या काळातील प्रत्येक वर्षीचे किती जुणे देणे बाकी आहे या संदर्भात जे निर्देश देण्यात आले होते त्या अनुषंगाने नियोजन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मध्ये जे अधिकार आहे ते वेगवेगळया सेक्शन मध्ये व वेगवेगळया अथॉरिटीमध्ये दिलेले आहेत. यामध्ये कोणत्याही प्रोजेक्टला मान्यता देण्याचे अधिकार २५ लक्षाच्या वरची राशी असेल तर ते महासभेचे आहे. महानगरपालिकेचे जे बजेट आहे ते बजेट प्रेझेंट करतांना आयुक्त स्थायी समितीला करतात, स्थायी समिती त्यांच्या सदसदविवेक बुध्दीला अनुसरुन ते चेंज करुन मॉडीफाय करतात, त्यानंतर जी.बी. समोर येते त्यानंतर जी.बी. मॉडीफिकेशन करुन ते फायनलाईज करते. ही बजेटरी प्रोव्हीजन झाल्यानंतर त्यामध्ये २५ लक्षाच्या वरचे जे काम असतील त्याला मान्यता देण्याचे अधिकार जी.बी. करते. त्यामध्ये स्थायी समितीला २५ लक्षाच्या वरचे जे काम आहे त्याचे टेन्डर फ्लोट करण्याचे अधिकार आहे. २५ लक्षाच्या खालचे अधिकार आयुक्तांना आहे. रिलीज करण्याचे कोणतेही प्रोव्हीजन नसते एकदा मान्यता झाली की प्रशासकीय कार्यवाही त्या त्या विभागाने करायची असते त्यामुळे रिलीज करण्यासंदर्भात जो शब्द प्रयोग आहे तो स्थायी समिती आहे सभापतीचा कुठेही उल्लेख नाही. या सर्व बाबी ॲक्ट मध्ये क्लीअर झालेल्या आहे. मी परत रिपीट करतो की २५ लक्षाच्या वरचे अधिकार मा.सभागृहाला आहे. २५ लक्षाच्या आतले अधिकार आयुक्तांना आहे. २५ लक्षाच्या वरचे टेन्डर ॲक्सेप्ट करण्याचे किंवा रिजेक्ट करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. आणि २५ लक्षाच्या आतले जे

अधिकार आहे ते आयुक्तांना आहे. रिलीज करण्याचे वेगळे प्रोव्हीजन नाही. सध्या एक वर्षाची आकडेवारी उपलब्ध आहे. १२ वर्षाची समग्र आकडेवारी देण्याच्या संदर्भात सर्वसाधारणपणे १ महिन्याचा वेळ लागेल, करीता समग्र आकडेवारी गोळा करण्याकरीता एक महिन्याचा कालावधी देण्यात यावा.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, नागपूर म्युनसिपल कार्पोरेशन मे बगैर कोई प्रोव्हीजन मिले आज तक कोई फाईल हुई है क्या ?

श्री.कमलेश चौधरी:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोर्मेशन. मी सांगू इच्छितो की, बगैर प्रोव्हीजन मिले फाईले बन चुकी है और वह बनने के बाद मे स्थायी कमेटी चेअरमन के पास रुकी हुई है, कहना का तात्पर्य यह है की ऐसी जगह कोई घटना होती तो उसकी जबाबदारी किसकी होगी यह सभागृह के माध्यम से तय होनी चाहिए

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. ते दिलेल्या उत्तरावर चर्चा करीत आहे. माझा आक्षेप आहे की दिलेले उत्तर चुकीचे आहे. ते निश्चित होवू दया त्यानंतर चर्चा करावी.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, नक्की मान्य आहे परंतु याच्या अगोदर मी हाच प्रश्न चारदा याच सभागृहात विचारलेला आहे आणि मला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. मला पहिल्यांदा वाटले उत्तर वाचून की कुठे ना कुठे हलकेफुलके समाधान दिसून राहिले. कारण की विरोधी पक्षाचे जे नगरसेवक आहेत मी मघाशीच सांगितले पुर्ण बजेटच्या निधीचे जे वाटप केलेले आहे. त्या बजेटचे पुर्ण आराखडा बोलावून त्याचे पुर्ण वाचन करुन घ्यावे आपल्याला पुर्ण समजायला येईल.मा.महापौरजी, शहराच्या मधातले जे भाग आहेत. इतवारी, गांधीबाग, मोमीनपुरा असो की धरमपेठ असो या भागामध्ये निधीचे वाटप जास्त झाले आहे. जे आऊटर भाग आहेत मग दाभा असो, नारानारी असो, सुरेंद्र गढ असो, गिट्टीखदान असो. या भागात कोणत्याही प्रकारचे निधी चे वाटप झालेले नाही. या भागाचे संतुलन बिघडले आहे याची दक्षता घ्यावी लागेल. यासाठी या प्रश्नाची विचारणा जी.बी.मध्ये करण्यात येत आहे. आमचे इतकेच म्हणणे आहे त्याचे क्लिरिफिकेशन करुन देण्यात यावे. जे प्रस्ताव स्टॅन्डिंग चेअरमन केडे प्रलंबित आहेत. त्या ठिकाणी अनायसे कुठली घटना घडली तर व त्या ठिकाणी गुन्हा दाखल करण्याची वेळ आली तर कुणावर करणार आहे याची स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. प्रशासनाने कमीत कमी याची स्पष्टीकरण करुन दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, दोन विषयाच्या अंतर्गत आजची सभा ही सुरु आहे. पहिला विषय, महानगरपालिकेची आर्थिक स्थितीसाठी मा. आयुक्तांनी मागच्या सभेमध्ये केलेले निवेदन आणि त्या निवेदनावर मा. महापौरजी यांनी दिलेले रुलिंग आणि त्या रुलिंगवर मा. आयुक्तांनी आर्थिक स्थितीच्या संदर्भात आजचे हे निवेदन. ही जी स्थिती मा.आयुक्तांनी पहिल्यांदा सभागृहापुढे ठेवली ती भाषणाच्या स्वरुपात ठेवली. महानगरपालिकेची लायबिलीटी किती आहे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. या विषयावर १२ वर्षाचा अहवाल मा.आयुक्त सभागृहापुढे ठेवत नाही तोपर्यंत चर्चा करावयाची नाही. आर्थिक स्थितीचा १२ वर्षाचा अहवाल आयुक्त जोपर्यंत सभागृहात ठेवत नाही कारण चर्चेला सुरुवात माझ्या प्रश्नामुळे झालेली आहे. आयुक्तांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे ते समाधानकारक नाही. म्हणून १२ वर्षाचा अहवाल जोपर्यंत येत नाही तोपर्यंत कमीत कमी हा सदनाचा विषय आहे, नागपूर शहराचा विषय आहे. हा माझा प्रश्न नाही. जोपर्यंत अहवाल येत नाही तोपर्यंत चर्चा नाही करायला पाहिजे मा.महापौरजी. आयुक्तांना जेवढा वेळ लागतो तेवढा वेळ दयावा मा.महापौरजी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, अगदी बरोबर आहे. दयाभैय्यांना या विषयावर चर्चा करावयाची आहे तर निश्चितपणाने आपण सविस्तर चर्चा करु.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. या विषयावर पुन्हा चर्चा करावयाची आहे असा माझा मानस नाही. चुकीच्या दिलेल्या निवेदनावर किंवा चुकीच्या दिलेल्या उत्तरा याबद्दल मला चर्चा करावयाची आहे. माझा चर्चा करण्याचा धंदा नाही. दुस-यांदा, तिस-यांदा. चौथ्यांदा. हे सभागृह नियम, निकषाप्रमाणे चालले पाहिजे. नियम, निकष ठरवून जे नियम आहे त्यावर बोट ठेवून चालले पाहिजे हा मानस आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या संदर्भात दोन विषयातल एक विषय मी स्पष्ट केला. दुसरा विषय प्रश्नोत्तरात ज्यामध्ये कमलेश चौधरी यांनी अधिकाराच्या संदर्भात माहिती मागितली. त्यावर चर्चा झाली. यावर विरोधी पक्षाच्या वतीने आमचे म्हणणे मांडण्याची परवानगी दयावी. आपली परवानगी असेल तर आमचे म्हणणे मांडतो नाही तर दयाभैय्या यांनी म्हटल्याप्रमाणे सविस्तर माहिती आल्यावर चर्चा करु.

महापौर:-मागच्या सभागृहामध्ये निर्देश होते ते अगदी स्पष्ट होते. ते निर्देश मी मुद्दाम मागवून घेतले. १२ वर्षाच्या काळातील प्रत्येक वर्षी चे किती जुणे देणे प्रशासनाला द्यावयाचे आहेत. त्याची समग्र आकडेवारी येणा-या दिनांक २०.०२.२०२० च्या सर्वसाधारण सभेत मा.आयुक्तांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी यावर चर्चा करण्यात येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, हे अगदी बरोबर आहे. त्याच्या व्यतिरिक्त काही प्रश्न आहेत ते फायनॉनसिएलच्या संदर्भात आहेत त्यावर आमचे म्हणणे ऐकुन घेतले तर त्यावर प्रशासनाला तसे निर्देश देवू शकता. आणि ती माहिती आणत असतांना मा.सदस्यांना जी माहिती मागितली ती माहिती त्या ठिकाणी उपलब्ध करुन दयावी असे आमचे म्हणणे आहे. आपण परवानगी देत असाल तर आम्ही आमचे म्हणणे मांडू इच्छितो.

महापौर:-बेसिक विषय दिला आहे त्या विषयावरती चर्चा म्हटले आहे. प्रशासनाने सांगावे की किती दिवसात हा विषय ठेवता येईल. वेळ पडली तर विशेष सभागृह घेवू.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, मी एक वर्षाची माहिती दिलेली आहे. १२ वर्षाची माहिती देण्याकरिता मला कमीतकमी एक महिन्याची वेळ दयावी.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर. अगदी स्पेसिफिक प्रश्न आहे. मा.आयुक्तांचे सभागृहात असे म्हणणे होते की ४०० कोटीचे जुने देणे शिल्लक आहेत.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर यासाठी आहे. मा.आयुक्तांनी सभागृहाला विनंती केली. ती विनंती मान्य करता की नाही या संदर्भात निर्णय दयावा त्यानंतर सविस्तर चर्चा होईल.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर. माझी स्पेसिफिक माहिती आहे. १२ वर्षापूर्वी जी काही जुनी देणी आहेत. ११ वर्ष पूर्वी किती जुनी देणी आहेत आणि या वर्षी किती जुनी देणी आहेत. याकरिता एक महिन्याचा वेळ लागत नाही. कर्तव्यदक्ष,आयुक्त असल्यामुळे इतका वेळ लागत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, एक महिना, १५ दिवस, ८ दिवस की २४ तास आपण यावर निर्णय घ्यावा त्यासाठी मा.आयुक्तांशी चर्चा करावी.

श्री.प्रवीण दटके :-मा.महापौरजी, तोपर्यंत विकास कामे थांबले आहेत ते तात्काळ सुरु करण्याचे निर्देश दयावेत.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, १२ वर्षाचा आर्थिक अहवाल आल्यानंतर चर्चेसाठी परवानगी मागितली आहे ती यासाठी की आर्थिक स्थितीच्य संबंधीत माहिती ही कायद्याच्या कुठल्या नियमाअंतर्गत करुन घेणे गरजेचे आहे आणि त्याप्रमाणे आम्हांला सदस्य म्हणून अधिकार आहेत. आर्थिक अहवाल या सभागृहात आला पाहिजे ती मागणी ही आम्ही करणार होतो. परवानगी नाकारली आमची काही हरकत नाही. या संदर्भात आपण आयुक्तांना दिशानिर्देश दयावेत. आपण कालावधी निश्चित करुन घ्या. माहिती मागवून सादर करावी त्यानंतर चर्चा करु

श्रीमती नंदा जिचकार:-मा.महापौरजी, मला असे वाटते आर्थिक स्थितीमध्ये देणे येते तसे घेणे सुध्दा येते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पिठासीन अधिकारी म्हणून आम्ही मान्य केले आणि आम्ही या ठिकाणी थांबलेलो आहे.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, ज्या मा.सदस्यांची विकास कामे त्यांच्या प्रभागात थांबलेली असतील ती ताबडतोब सुरु करण्याचे निर्देश आपण आयुक्त महोदयांना दयावेत.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, चर्चा पुर्ण झाली नाही तर रुलिंग चर्चा झाल्यानंतर दयावे मा.महापौरजी.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर. आयुक्तांचे वक्तव्य अगदी स्पष्ट आहे. त्यांच्या वक्तव्याचे जे मत आपल्याला घ्यावयाचे आहे ते एवढेच आहे. मी अध्ययन करण्यासाठी ३० दिवसाची वेळ मागतो.

याचा अर्थ त्यांनी जो निर्णय घेतला तो अध्ययन न करता घेतलेला निर्णय आहे. तो अध्ययन न करता घेतलेला निर्णय आहे तो रद्द करावा. आणि जे वर्कआर्डर आहे ते करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, आपण चर्चेला परवानगी दिली तर आजच विषय संपवून टाकू.

श्री.तानाजी वनने:- मा.महापौरजी, आपण या विषयाला निकाली काढावे. सर्व नगरसेवक आहेत त्यांच्या विकास कामाचा प्रश्न आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, हा प्रश्न कां निर्माण झाला. याचे म्हणणे मांडण्याची आम्हांला परवानगी दिली.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, आज तक कितने स्थायी समिती के अध्यक्ष हुए उन्होने जो बजेट बनाया उसमे से कितने जमीन पर उतरे इसकी भी माहिती मा.आयुक्त साहेब के सामने रखी जाये

श्री.सुनिल अग्रवाल:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोंमेशन. अभी जो सदस्य बोले श्री.हरीश ग्वालबंशी वह भी स्थायी समिती के सदस्य थे, उन्होने बजेट प्रक्रिया मे भाग लिया है तो वह ऐसा कैसे बोल सकते है.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. मा.सदस्य श्री. सुनील अग्रवाल यांनी जे म्हटले की ते स्थायी समितीचे सदस्य होते. हे सभागृहामध्ये बजेट मंजूरीसाठी येते त्या वेळेस प्रश्न हा चर्चेला आणतो स्थायी समिती अध्यक्षांना प्रावधानन वाटप करण्याचा अधिकार आहे काय? स्थायी समिती बजेटच्या अनुषंगाने हा मी प्रश्न उपस्थित केला आणि माझा विरोध प्रकर्षाने या ठिकाणी नमूद केलेला आहे. अनेक स्थायी समितीच्या सदस्यांनी सुध्दा विरोध नमुद केलेला आहे.

श्री.सुनिल अग्रवाल:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोंमेशन. मैने सिर्फ यह कहा की स्थायी समितीने जो बजेट प्रस्तुत किया उस स्थायी समिती मे यह सदस्य थे.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, मै स्थायी समिती सदस्य था परंतु जो स्थायी समिती थी उन्होने लिये हुए निर्णय से जनता की भावना को ठेस पोहची तो मैने जनता से माफी मांगी , ऐसे कितने मा.सदस्य है जिन्होने जनता से माफी मंगी है.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर.या अनुषंगाने मला प्रश्न विचारावयाचा आहे की असे कुठले आदेश मा.आयुक्तांनी काम थांबविण्याचे आदेश अधिका-यांना दिलेले आहे काय ? त्याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. आम्हांला चर्चेची परवानगी देत असाल तर विस्तृत चर्चा झाली पाहिजे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांचा स्थगन प्रस्ताव आहे त्याची यामध्ये चर्चा करावयाची आहे.

महापौर :- आपण बोलतांना असे म्हटले होते की या विषयामध्ये मा.सदस्य श्री.कमलेश चौधरी आणि मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांचे विषय आपण या विषयामध्ये घेवू. या विषयावर आपण आता चर्चा करु नये. हा विषय समाप्त करु. (बेल)

निगम सचिव (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, ॲडधर्मपाल मेश्राम चा स्थगन प्रस्तावाचे मी वाचन करीत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४७ (२) अन्वये नगरपालिका व मुख्य लेखा परीक्षक हा आपले पद धारण करण्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी पद धारण करण्यास पात्र असणार नाही असे नमूद व स्पष्ट आदेशित असतांना लेखा व वित्त अधिकारी श्रीमती मोना ठाकूर हयांना पदस्थापित करणेबाबत स्थगन प्रस्ताव.

श्री.धर्मपाल मेश्राम :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये कलम ४७ (२) नुसार नगरपालिका व मुख्य लेखापरिक्षक हा पद धारण करण्याचे बंधनकारक आहे.

श्री.सुनिल अग्रवाल :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, अभी जो अधिकारी के उपर चर्चा हो रही है अपने नियमानुसार उन्होने सदन के बाहर जाना चाहिये.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, कलम ४७ (2) नुसार नगरपालिका व मुख्यलेखापरिक्षक हा आपले पद धारण करण्याचं बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी धारणे करणे करता येणार नाही असे असतांना माझी जी काही माहिती आहे ती श्रीमती मोना ठाकुर यांना पुन:श्च लेखा व वित्त अधिकारी म्हणुन नागपूर महानगरपालिकेमध्ये आल्या आहे. यावर माझा आक्षेप आहे. आणि या चर्चेला मी पुढे नेण्यापुर्वी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो प्रशासनाने आधी या बाबीचा खुलासा करावा.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम सचिव (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, महानगरपालिका अधिनियम कलम ४७ महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षक त्यांचे अधिकार व कर्तव्य या अंतर्गत सब सेक्शन २ मध्ये नगरपालिका व मुख्य लेखापरिक्षक हा आपले पद धारण करण्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी पद धारण करण्यास पात्र होणार नाही.

धर्मपाल मेश्राम :- यावर प्रशासनानी भुमिका स्पष्ट करावी.

महापौर :- त्यांचे म्हणणे असे आहे की, एकदा मुख्यलेखापरिक्षक म्हणुन राहुन गेल्यानंतर कायद्यानुसार नगरपालिका व मुख्य लेखा परीक्षक हे पद धारण केल्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी पद धारण करण्यास पात्र असणार नाही. पुन्हा हया लेखा वित्त अधिकारी म्हणून राहता येत नाही.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह, मा.सदस्यांनी जे प्रोव्हीजन वाचले आहे ते स्वयंस्पष्ट आहे. परंतु सध्या श्रीमती मोना ठाकुर, लेखापरिक्षक यांच्याकडे शासनाने ॲडीशनल चार्ज दिला आहे. आपल्याकडे सध्या पोस्टेड कॅफो दिर्घ रजेवर आहे. त्यामुळे शासनाने कॅफो दर्जाचा अधिका-यांचा त्यांच्याकडे ॲडीशनल चार्ज दिला आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- या ठिकाणी मा.आयुक्तांनी निवेदन दिले त्यामध्ये कलम ४७ (२) मध्ये नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक हे पद धारण करण्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली कुठलेच पद हे पद धारण करण्यास पात्र असणार नाही. म्हणजे नियम शासनाने बनविले आणि शासनच या नियमांचे उल्लंघन करीत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, कलम ४७ (२) मध्ये स्वयंस्पष्ट आहे शासनाने जरी आदेश करुन कॅफो हे पद ॲडीशनल चार्जमध्ये जरी भरले असेल तरी कोणत्याही स्थितीत ते पद धारण करणास पात्र असणार नाही या संदर्भात महासभेमध्ये निर्णय घेणे अपेक्षित आहे त्यांची सेवा ही राज्य शासनाला परत करावी. त्या अनुषंगाने सभागृहाने निर्णय घ्यावा.

महापौर :- सभागृहाचे जे मत आहे त्यात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७(२) मध्ये ते स्वयंस्पष्ट आहे व कायद्याला अनुसरुन आहे. आयुक्त, म.न.पा. यांनी राज्य शासनाकडे जी सुश्री मोना ठाकुर यांचे नावाचे केलेली शिफारस अधिनियमाशी विसंगत व चुकीची आहे. त्यामुळे प्रमुख लेखा व वित्त अधिकारी हे पदधारण करण्यास पात्र नाही असे अधिनियमात स्पष्ट आहे. त्यामुळे त्यांना पून्हा शासनाला परत पाठविण्यास महासभेने एकमताने मंजूरी प्रदान केली. आयुक्ताकडे सध्या एक वर्षाची आकडेवारी उपलब्ध असल्यामुळे त्यांनी १२ वर्षाची समग्र आकडेवारी देण्याच्या संदर्भात ३० दिवसाचा कालावधी मागितलेला आहे. त्याप्रमाणे येणा-या ३० दिवसाच्या आंत मागील १२ वर्षाच्या काळातील समग्र आकडेवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी त्यावर सभागृहात चर्चा करण्यात येईल. या ३० दिवसात शहरातील विकास कामे थांबविणे योग्य होणार नाही. ज्या कामाचे कार्यदेश झालेले आहे ते काम कार्यान्वित करुन ३० दिवसांनंतर आयुक्तांनी आपला अहवाल सभागृहाच्या पटलावर सादर करावा.

**ठराव क्र. ६०** :- नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. विशेष सभा दिनांक 07.12.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 07.12.2019 सकाळी 11.15 वाजता चे कार्यवृत्त

3. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 07.12.2019 दुपारी 03.30 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 07.12.2019 सायंकाळी 06.20 वाजता चे कार्यवृत्त
5. म.न.पा.सर्व साधारण सभा दिनांक 20.12.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
6. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 20.12.2019 सकाळी 11.35 वाजता चे कार्यवृत्त

**ठराव क्र.६१/ वि.क्र.४२ :-** म.न.पा. चे सदर मंगळवारी बाजार येथे ठोक व चिल्लर मासोळी
**{स्थावर विभाग}** मार्केट येथील नवनिर्मीत ओटयांची दुरूस्ती करून भोईपुरा येथील ठोक व चिल्लर मासोळी बाजार नवनिर्मीत इमारतीमध्ये स्थानांतरीत करण्याबाबत.

नागपूरमहानगरपालिकेच्या मंगळवारी झोन येथील मंगळवारी सदर बाजार येथे राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड हैद्राबाद (एन.एफ.बी.डी.) यांचे ९० टक्केअनुदानवम.न.पा.चे १० टक्केअनुदानघेवुनम.न.पा. सभागृहठरावक्र. २८४ अन्वये ठोक व घावुक विपणन केंद्र अत्याधुनिक आरोग्य् वर्धक मासोळी मार्केट बांधण्यात आले. सदरहु मार्के ट मध्ये किरकोळ मासोळी विक्रेत्यांकरीता एकुण १०८ ओटे व ४ दुकाने ठोक मासोळी विक्रेत्यांकरीता बांधण्यात आले. सदर इमारतीचे बांधकाम प्रकल्प् विभाग, म.न.पा. व्दारे करण्यातआले असुन, सदर इमारत पुढील कार्यवाही करीता सन २०१५ मध्ये बाजार विभागास उपलब्ध् करून देण्यात आली. बाजार विभागाने किरकोळ मासोळी विक्रेत्यांना ईश्वर चिठ्ठीव्दारे ओटयांचे आवंटन करण्यात आले.ओटयांचे आवंटन केल्यानंतर काही दिवस इमारतीमध्ये व्यवसाय करण्यात आला. व्यवसायाकरीता ओटयांची उंची तांत्रीक व व्यवसायीक दृष्टीने सोयीस्कर नसल्याचे मत व्यक्त् करून, पूनश्च्: इमारतीचे बाहेर खुल्या परिसरात मासोळी विक्रेत्यांनी जमीनीवर बसुन व्यवसाय सुरू केलेलाआहे. सदर व्यवसायीकांना झोनकार्यालयातर्फे अनेकदा प्रयत्न् करून नविन इमारतीमधील आवंटीत झालेल्या ओटयांवर व्यवसाय करणेकरीता अतिक्रमण कार्यवाही सुध्दा करण्यात आली तथापी आज रोजी सुध्दा सर्व किरकोळ मासोळी विक्रेते सन २०१५ पासुन आजमितीस इमारतीच्या बाहेर बसुन व्यवसाय करीत आहे.

कार्यालयातर्फे असेही सादर करण्यात येते कि, मा.उच्च् न्यायालयाचे जनहित याचीका क्र. १३१/२०१७ अन्वये भोईपुरा येथील किरकोळ व ठोक विक्रेतायांचे व्यवसायामुळे स्थानिक अधिवासीत लोकांना उदभवणा-या त्रासाबद्दल मा.उच्च् न्यायालययांनी अंतरीम आदेश देवुन सदर अतिक्रमण काढण्यास आदेशीत केले आहे. या अनुषंगाने कार्यालयाने वेळोवेळी अतिक्रमण तथा पोलीस विभागाची मदत घेवुन भोईपुरा येथील अतिक्रमण काढण्यात आले. विशेषत: थोकव्यवसायीकयांचे अर्धपक्के असलेले बांधकाम व टिनाचे शेडसुध्दा काढण्यात आले. सदरअतिक्रमण काढल्यामुळे मछली विक्रेतासंघ, नागपूर (Reg No. F/४५२०/NGP) यांच्यातर्फे २८ लोकांची ठोक विक्रेता म्हणुन यादी देवुन मंगळवारी येथे नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या, इमारतीचे ठोक व्यापा-यांकरीता आवश्य्क असलेल्या बाबी गृहीत धरून इमारतीत फेरबदलकरून २८ खोल्या उपलब्ध् करून देण्याची विनंती केलेली आहे. सदर इमारतीमध्ये २८ खोल्या उपलब्ध् होत नसतील तर इमारतीलगतच्या भागामध्ये नव्याने इमारत उभारून सर्व २८ ठोक व्यापा-यांचा समावेश करावा.

त्याचप्रमाणे दिफ्रेश फिशडिलर्स असोसिएशन, नागपूर यांच्या तर्फेसुध्दा निवेदन प्राप्त् होवुन मासोळी विक्रीकरीता (होलसेल) भुखंड उपलब्ध् करून देण्याबाबत दि. १७/०६/२०१९ रोजी विनंती करण्यात आली. या अनुषंगाने मा. आयुक्त्, म.न.पा. यांच्या कक्षेत झालेल्या चर्चेनुसार, उक्त् असोसिएशनला भांडेवाडी येथे होल सेल मासोळी विक्रीकरीता ५ एकर जागा प्रत्यक्ष मौक्यावर जावुन विभागाव्दारे दाखविण्यात आली. प्रत्यक्ष मौका चौकशीच्या वेळेस बाजार विभाग, स्थावर विभागाचे अधिकारी असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थीत होते. त्याचप्रमाणे असोसिएशनच्या पदाधिका-यांनी खसरा क्र. १३१,१३२ जागेबाबत मौखीक संमती दिली. या अनुषंगाने कार्यालयाने प्रस्तावित बाबी पुर्ण करण्याच्या अनुषंगाने संबंधीत विभाग (आरोग्य् विभाग, कोंडवाडा विभाग, स्मार्टसिटी, पेंचप्रकल्प् इत्यादी) विभागाचे ना-हरकत सुध्दा प्राप्त् केलेले आहे.

सदरजागेबद्दलचीमाहितीखालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मौजा | जुनेखसराक्र. | नविनखसराक्र. | एकर | हेक्टर | प्रस्तावितकेलेलीजागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडेवाडी | १३१ | - | ९.८३ | ३.९८ | २.५० एकर |
| २ | भांडेवाडी | १३२ | - | ९.९० | ४.०१ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बिडगांव | ४५/१ | ९३ | २.९३ | १.१८५ | २.५० एकर |
| ४ | बिडगांव | ४५/२ | ९४ | ०.३० | ०.१२१ | |

कार्यालयास असेही नमुद करावयाचे वाटते की, एकुण प्रस्तावित ५.०० एकर जागे पैकी ५० % (२.५० एकर) जागा मौजा भांडेवाडी खसरा क्र. १३१ व १३२ पैकी आहे.व सदर भाग हा महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ आहे. त्याचप्रमाणे मौजा बिडगाव तालुका कामठी नविन खसरा क्र. ९३ व ९४ जागे पैकी ५० % (२.५० एकर) या जागेचे प्रत्यक्ष नियंत्रण नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) यांच्यानियंत्रणाखालीआहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ड) अन्वये जो मोबदला घेवून, महानरगपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये, अशी तरतुद आहे या अनुषंगाने विभागातर्फे खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे,

दिफ्रेशफिशडिलर्सअसोसिएशन, नागपूरयांना ३० वर्षा करीता भाडे पट्टयाने द्यावयाचे झाल्यास खालील शुल्क आकारून भाडेपट्टयाने देता येईल.

| मौजा | खसराक्र. | आराजी | बाजारभावमुल्यदर (रू) प्रतिचौ.मी. | जागेचेमुल्य/ प्रिमीयम (रू) | ग्राउंडरेन्ट २.५ % प्रतिवार्षिकप्रमाणे (रू) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ (३ x४) | ६ | ७ |
| भांडेवाडी | १३१ व १३२ पैकी | (२.५० एकर) १०११७.१४ चौ.मी. | १३५०.०० | १,३६,५८,१३९/- | ३,४१,४५३/- | |
| बिडगांव | ९३ व ९४ पैकी | (२.५० एकर) १०११७.१४ चौ.मी. | १७३०.०० | १,७५,०२,४१०/- | ४,३७,५६०/- | |
| एकुण | | (५.०० एकर) २०२३४.२८ चौ.मी. | - | ३,११,६०,५४९/- | ७,७९,०१३/- | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ड) मधील तरतुदीच्या अनुषंगाने जागेचे मुल्य रू.३,११,६०,५४९/- रूपये आहे. व त्यावर येणारे ग्राउंड रेन्ट रू.७,७९,०१३/- प्रति वार्षीक आहे. याप्रमाणे ३० वर्षा करीता भाडेपट्टयावर दिफ्रेशफिशडिलर्सअसोसिएशन, नागपूरयांना द्यावयाची झाल्यास विभागाने प्रस्तावित केलेल्या प्रस्तावास मा. आयुक्त यांची मंजुरी प्रदान झालेली आहे. तरी विभागातील प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहुन वरील प्रस्ताव महानगरपालिका सभागृहाने मंजूर प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

उपायुक्त (श्री.मोरोणे) :- मा.महापौरजी विषय क्र ४२ हा कार्यालयास परत करण्यास विनंती करण्यात आलेली आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, विषय परत घेण्याचे कारण काय आहे ?

सहा.आयुक्त(श्री.हुमणे) :- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्तांशी चर्चा झाली. त्या चर्चेच्या अनुषंगाने तो प्रस्ताव सभागृहामध्ये आणला.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, यावर मंजूर झाल्यानंतरही चर्चा करता येते, यामध्ये बदल सुचविता येतील, पण हा विषय वापस घेण्याचे कारण काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सभागृह जे नवनिर्मित ओटे तयार केले आहे

त्यांना अडचणीचे होत आहे त्यामुळे ते पाडुन सपाट करण्याची मागणी आली आहे.

प्रविण दटके :- मंगळवारी मार्केटचा विषय असतील तर त्यामध्ये आमचे म्हणणे नाही. त्याची नस्ती पण तयार झाली होती आणि त्यामध्ये प्रोव्हीजन पण झाले होते परंतु हा बाजार भांडेवाडी येथे जाण्याचा प्रस्ताव आहे. हे दोन्ही प्रस्ताव एकत्र आहे. याचे दोन भाग आहे. मी होलसेल मार्केटच्या संदर्भात बोलत आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, ज्या ऐरियामध्ये हा मासोळी बाजार आहे त्या ऐरियाचा नगरसेवक म्हणुन मी येथे प्रतिनिधीत्व करीत आहे. मा.महापौरजी, कृपया संबंधित संस्थेचे नाव सांगा ज्याच्यामुळे हे थांबविण्यात येत आहे. आणि नियमाप्रमाणे निवेदन आले तर आपण विषय परत घेतो काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सभागृह जे असोसिएशन आले होत ते माझ्याकडे आले होते. त्यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. त्यामध्ये खर्च ऑलरेडी झालेला आहे शासनामार्फत त्या दृष्टीने प्रपोजल असेल तर माझ्याकडे आणावे. संस्थेचे नाव आता मला आठवत नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मला माहिती आहे कोण आले होते तर, मी अध्यक्षांचे नाव सांगतो गौर आहे जो आपल्याकडे डेप्युटेशन घेऊन आला होता. त्याची कॉपी मा.विरोधी पक्ष नेत्यांकडे आहे. मा.महापौरजी, माझे निवेदन आहे की मा.आयुक्त अभिजित बांगर असतांना जेव्हा कोर्टाचा आदेश आला आणि कोर्टाने निश्चित केले की हा मासोळी बाजार ७ दिवसाच्या आत ऊचलुन टाका असा काही आदेश कोर्टाने दिला होता काय ?

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :- मा.महापौरजी, नेमके आदेश नस्ती बघुन सांगता येईल.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, हुमणे साहेबांनी कारवाई केली आहे आणि मी त्याचा साक्षीदार आहे. मा.महापौरजी, कोर्टने आदेश दिया की वहा की मछली बाजार को तुरंत हटाना चाहिये। उस विषय को लेकर के सारे दुकान दारोंको मै साथ मे लेकर मा.आयुक्त महोदय के पास गया प्रविणजी भी थे साथ मे, जो मछली का बाजार करते थे वह भी साथ मे थे, तब वह अध्यक्ष भी था। उसी समय बांगर साहब के सामने असोसिएशन की उपस्थितीमे यह निश्चित हुआ इस मछली बाजार मे लगने वाली जगह का नियोजन नागपूर महानगरपालिका करे और उसको मछली बाजार घोषित करे, इसपर चर्चा हुयी तो तात्पुरता इस बाजार को भांडेवाडी मे महानगरपालिका की जगह पर शिफ्ट करते है तो असोसिएशन के लोगों के साथ हुमणे साहब ने व्हीजीट की वहा, व्हीजीट करने के बाद जगह फायनल हुयी, जगह फायनल होने के बाद नस्ती बनी, और नस्ती बनने के बाद पी.आय.एल. हो गयी, पहले पीआयएल पर कारवाई नही हुयी। मै मा.आयुक्त महोदय को कृपापुर्ण निवेदन करुंगा की, वह कल सुबह मछली बाजार मे आ जाये, वहा पैदल भी चल सके तो मै आपकों प्रणाम कर दुंगा, गाडी तो बहोत दुर की बात है। वहा १० से १२ ट्रक रोज की मछली बिकती है और सेंट्रल पॉइंटवाला व्यक्ती वहापर मछली बेच रहा है। आप कल्पना किजीये की उसके कितने ट्रक रोज आते होंगे, और हम मंगलवारी की बात कर रहे है, वहापर मै चेअरमन था, प्रफुल्लजी मेरे साथ स्टॅंडींग कमेटी मे थे। हमने निर्णय लिया वहापर चिल्लर मछली बाजार बनाने का, मछली बाजार बनके तयार है। डिझाईन गलत है इसलिये चिल्लर वालों के ओटे तोडकर वहा उसको रिडीझाईन करना चाहियें, चिल्लर व्यापार करने वाले लोगों को वहा बैठाना चाहियें। संबंधित व्यक्की की मांग है की मछली बाजार मे होलसेल वहापर शिंफ्ट होना चाहिये। अंदर बैठने की वहज हम बाहर ट्रक खडे करके मछली बेचेंगे, महानगरपालिका का सभागृह नये बाजार को बनाते समय रस्तेपर खडे होकर मछली बेचने को अनुमती देंगा क्या ? इसपर विचार करना चाहिये, और आयुक्तने मेरी बात का अन्यथा न ले, बिलकुल अन्यथा न ले, स्कुल का निर्णय सभागृह ने लिया, आपकी इच्छा हुयी स्कुल सी.बी.एस.सी. होना चाहिये, इसलिये उस फाईल को रोक दिया। मा.महापौरजी, प्रशासन और शासन दोनों एकसाथ मिलकर चलते है, आप निर्णय ना ले ऐंसा कही भी कहना नही है। हम आपस मे चर्चा तो कर लिजीयें। इस मछली बाजार के लिये ६ महिने का प्रोसेस किया, कोर्ट ने अगर नागरिक वापस चले गये तो महानगरपालिका मे कंटेप्ट हो जायेंगा। हमने कोर्ट मे अंडरटेकींग दे दिया, जब तक पर्यायी व्यवस्था नही होती तब तक उन्हे वहापर व्यवसाय करने की व्यवस्था की जाये, ऐंसे निर्देश दिये थें। उसमे अनावश्यक तौर पर एक आदमी जो ३-३ बार आयुक्तसे मिल चुका वह बार बार आयुक्त के सामने

अपना विषय रख चुका, जिसको आयुक्तने पुरा समय देकर के सुना, जिसकी बात वहा रखने के लिये हम साथ में गये, इसलिये मै आपसे निवेदन करना चॉहता हु की वह मेरे पास आया, मै आपके पास लेकर के आया था, एक सभागृह हमने चलने दिया, अभी आयुक्त के पास गया। फिर और किसी तिसरे के पास जायेंगा, हर बार वह बदलते जायेंगा। यह उस व्यक्ती के मानसिकता का दोष है, विक्षीप्त मानसिकता वाले आदमे के लिये हमने नही रोकना चाहियें।

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा जो मंगळवारी बाजार जो आहे तो चिल्लर बाजार आहे की ठोक बाजार आहे त्या संदर्भामध्ये आपण काय निर्णय घेतलेला आहे.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :- मा.महापौरजी, सदर येथील जो मंगळवारी जो बाजार आहे तेथे एकुण १०८ ओटे जे आहे ते चिल्लर व्यापारासाठी आहे आणि ४ ओटे जे आहे ते होलसेल बाजारासाठी आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ते पर्याप्त आहे काय ?

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :- मा.महापौरजी, चिल्लर जे ओटे १०८ आहे ते पर्याप्त आहे. होलसेलसाठी पर्याप्त नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, यामध्ये दुसरा जो पार्ट आहे त्यामध्ये भांडेवाडी आणि बिडगाव ही जी जागा आहे अडीच एकर ती जागा आपण देणार आहोत. बिडगावमध्ये एन.एम.आर.डी.ए. प्राधीकरण आहे त्याचा डी.पी. प्लॅनचा वापर काय आहे.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :- मा.महापौरजी, सदर प्रस्तावामध्ये जी जागा प्रस्तावित केली आहे ती अडीच एकर आहे. आणि डी.पी. प्लॅनप्रमाणे स्लॉटर हाऊस करीता आरक्षित आहे. आणि बिडगाव येथील जागा आहे तेथे एन.एम.आर.डी.ए. प्राधीकरण आहे.

महापौर :- एन.एम.आर.डी.ए. मध्ये असलेल्या जमिनीचा वापर काय आहे ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, स्लॉटर हाऊसमध्ये आपल्याला मासोळी बाजार नेता येतो काय ?

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, सदर बाजाराची जी हद्य होती ती आपल्या महानगरपालिका हद्यी लगत असतांना त्याची दोन भागात विभागणी केलेली आहे. अर्ध्या भागामध्ये आपला डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर आहे. त्यामध्ये स्लॉटर हाऊसचे आरक्षण आहे. आणि उर्वरीत जागा ही एन.एम.आर.डी.ए. च्या कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे येथे मासोळी बाजार करायचे असेल तर ३७ ची प्रक्रीया राबविल्याशिवाय करता येत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, स्लॉटर हाऊसमध्ये मछली बाजार अनुज्ञेय आहे काय ?

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, स्लॉटर हाऊसचा वापर वेगळा आहे परंतु एन.एम.आर.डी.ए. ला कलम ३७ ची प्रक्रीया त्यांच्या स्तरावर करावी लागेल आणि आपल्या हद्यीमध्ये आपल्याला ती प्रक्रीया करावी लागेल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दोन्ही याच्यामध्ये ३७ ची प्रक्रीया करणे आपल्याला अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने मा.महापौरजी आपण निर्णय घ्यावा. मी वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणुन देत आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, स्लॉटर हाऊसच्या जागेवर माझ्यामाहिती प्रमाणे मच्छीबाजार त्या ठिकाणी नेता येत नाही. मोमीनपुरा येथील स्लॉटर हाऊस आहे त्या ठिकाणी आपण स्लॉटर हाऊसचे आरक्षण केले होते आणि एन.एम.आर.डी.ए. च्या जागेवर आपल्याला करता येत नाही. कारण तेथे ३७ ची कारवाई करावी लागते, निर्णय घेतांना कार्यालयाने त्याची सविस्तर माहिती दयावी, मग आपण त्यावर निर्णय घ्यावा.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, नियमबाहय कोई भी काम नही होना चाहियें। इस बात का मै पुर्नरुप से समर्थन करता हु। अनायस सभागृह मे विषय आया ही है, मछली बेचना यह ए.पी.एम.सी. के अंतर्गत आता है क्यौकी यह कृषी उत्पादन है। बकरी यह कृषी उत्पादन है, मा.महापौरजी मेरा आपसे निवेदन है की जब मछली बाजार के लिये दुसरी जगह रिझर्वेशन करना है और यह कृषी उत्पादन है तो मा.महापौरजी, महानगरपालिका के पास एक फाईल पेंडींग पडी हुयी है, मा.महापौरजी, कळमना मार्केटमे ए.पी.एम.सी. की जगह

को आरक्षित किया गया था। कितनी जगह आरक्षित की गयी है, ईसके अलावा जो प्रस्तावित आरक्षित जगह थी उस जगह मे ८ एकड जगह मे बकरी बकरा मार्केट और मछली बाजार के दृष्टीसे एन.आय.टी. के बोर्ड मिटींग मे प्रस्ताव पारीत किया गया है। एन.आय.टी. के बोर्ड मिटींग मे प्रस्ताव पारीत करने के बाद महानगरपालिका वह मछली बाजार बनायेंगी, इसके लिये महानगरपालिका को एन.ओ.सी. भी दी गयी है, मा.महापौरजी, गडबड इतनी हो गयी की अभी वह जगह चली गयी है स्मार्ट सिटी में और इस स्मार्ट सिटी मे जाने के बाद संबंधित व्यक्ती महानगरपालिका इस जगह मे निर्णय नही ले सकते, हम सोनवणेजी के पास गये, वह लफडा ऐंसा है की जिस किसान की जगह मे हमने अधिग्रहीत किया था वह किसान ने २ एकर की जगह पर लेआऊट डालकर के बेच दिये थे, और किसी बोगस आदमी ने बची हुयी ८ एकड की जगह पर प्लॉट डालकर बेच दिये, अब किसी आदमी ने क्राईम किया है तो उसकी सजा उसको मिलनी चाहिये, उसने वह जमिन बेच दि है इसलिये हम वहापर बाजार नही बना सकते वहा स्मार्ट सिटी बनायेंगे इसप्रकार का निर्णय तत्कालीन सोनवणेजी ने लिया। मा.महापौरजी मेरा आपसे कृपापूर्न निवेदन है वह नस्ती को आप अपने पास बुलायें, मा.आयुक्तजी को अध्ययन करने के लिये वह नस्ती दे, तो बाजार मछली बाजार ए.पी.एम.सी. मे चला जायेंगा। बकरी बाजार ए.पी.एम.सी. मे चला जायेंगा, महानगरपालिका के पास प्राईम लॅन्ड है मोमीनपुरा मे, वहा बकरा बाजार लगता है, बकरे इतने आते है की दो से तीन स्टोरेज बकरा लगना पडे इतने बकरे आते है, मा.महापौरजी, इसलिये ए.पी.एम.सी की लगी हुयी जगह पर मछली बाजार अगर बनेंगा और उसके लिये, एन.आय.टी. ने स्वयंम बोर्ड मिटींग मे प्रस्ताव पारीत करके निर्देशित किया है की उस जगह पर हमने तत्काल निर्णय लेना चाहियें। आप स्वयम इस फाईल का अध्ययन किजीयें, मा.आयुक्तजी को स्वयंम अध्ययन करायीये और इन व्यापायोंकी एक ही मांग है की मछली बाजार ऐंसी जगह होनी चाहियें जहापर रेल्वेस्टेशन पास मे हो, कलमना रेल्वे स्टेशन बिलकुल पास मे लगा हुआ है। सारी चिजों का निराकरण एक दीन मे हो जायेंगा, तुरंत इस दृष्टीसे हम कारवाई करे, और एक निवेदन करना चॉहुगा, मा.महापौरजी, विधायक सुधाकरराव देशमुख मे ३५ लाख रुपये सिमेंट रोड बनाने के लिये दिये थे। उसका आधा काम हो गया है और आधा काम इसलिये नही हो रहा है की मछली बाजार वहापर बैठा हुआ है, उसके कारन बस्तीकी गडरलाईन चोकेज होती है, गडर लाईनपर अतिक्रमण करके बैठे हुये है, उस कार्य को पुर्ण कारने का निर्देश भी प्रशासन को दे और बाजार विभाग उस काम को पुर्ण करने के लिये पुर्ण रुपसे सहयोग प्रदान करे ऐंसा मेरा निवेदन है।

वरील चर्चेनंतर मेयो हॉस्पिटल चौक, मासोळी मार्केट या ठिकाणी सिमेंट रोडचे अर्धे काम झाले आहे व अर्धे काम थांबले आहे त्या ठिकाणी गडरलाईनवर मोठया प्रमाणात अतिक्रमण असल्यामुळे त्या ठिकाणचे अतिक्रमण काढुन सिमेंट रोडचे काम पुर्ण करण्यात यावे.तसेच कळमना मार्केट येथील ८ एकर जागेवर बकरा मार्केट, मासोळी मार्केट निर्माण करण्याबाबत या विषयाच्या अनुषंगाने १५ दिवसाच्या आंत ए.पी.एम.सी. ला बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन त्याच्या संपुर्ण अहवालासह हा विषय पुढच्या सभागृहात ठेवण्यात यावा त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल. या. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.६२ / वि.क्र.४६ :-** महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी
**{लोककर्म झोन ०३}** सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत महानगरपालिकाव्दारा सादर करण्यातआलेला मौजा-हुडकेश्वर येथील श्री. कॉलनी, दुबेनगर, रेणुकामातानगर, राजापेठ, सावरबांधे सभागृहजवळ, दुबेनगर, महालक्ष्मीनगर व इत्यादी आ जुबाजुचे नगर येथे विविध ठिकाणी खडीकरण, सिमेंटीकरण व पावसाळी नाली करण्यास्तव रु. 25.00 कोटी रकमेचा प्रस्तावास महानगरपालिकेची 20 टक्के हिस्याची रक्कम रु.5 कोटी भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजुर करणे आवश्यक असल्यामुळे धोरनात्मकनिर्णय असल्यामुळे रु.5.00 कोटी रक्कमेचा मनपाचा सहभाग देण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न स्थायी समिती ठराव क्र. 849 विषय क्र. 478 अन्वये मंजुरी प्राप्त असून उक्त प्रस्ताव महासभेच्या मंजुरीकरिता सादर प्रस्तुत प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.६३ / वि.क्र.४८ :-** प्रारूप नगर रचना परियोजना पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी
**{नगररचना विभाग}** टिपीएस-1 नागपूर

प्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme), महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72 (5) अन्वये मंजूरी करीता लवादामार्फत शासनास सादर करण्यापुर्वी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे लवादाने सुचविलेल्या बाबींवर अभिमत.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी येथे नगर रचना परियोजना (Town Planning Scheme) राबविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप नगर रचना परियोजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 68 (2) अन्वये राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याबाबची अधिसुचना दि. 24/10/2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेतील तरतूदीनुसार विकास आराखडयातील जमिन वापरात बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली असून त्याबाबतची अधिसुचना भाग 1-अ (असा.) (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. 159 दि. 22/11/2018. च्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम चे कलम 72 अन्वये राज्य शासनाने सहाय्यक संचलाक, नगर रचना, नागपूर शाखा यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती केली आहे व त्याबातची अधिसचना क्र. भाग 1-अ (असा.) (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. 218 दि. 16/11/2018. च्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केली आहे.

लवाद यांनी महाराष्ट्र नगर रचना योजना नियम 1974 चे नियम क्र. 13 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. 28/12/2012 रोजी आणि स्थानीक वृत्तपत्र दै. लोकमत व इंग्रजी दै. द हितवाद मध्ये दि. 29/12/2018 रोजी सुचना प्रसिद्ध करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 102 अन्वये सदरहू नगर रचना परियोजना तयार करण्यात आल्यामुळे त्यामध्ये अपायकारकरित्या बाधित झालेल्या व या परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या जागांमध्ये हित संबंध असलेल्या व्यक्तींकडून विहित 60 दिवसाचे मुदतीत/आक्षेप/हरकती मागविण्यात आल्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(4) आणि महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम 13(3) नुसार, फार्म- 1 मध्ये नमुद संबंधित जमीन मालक यांना विशेष नोटीस बजावुन प्रारुप नगर रचना परियोजनेचे त्यांचे जागेतील प्रस्तावाबाबत स्थळपाहणी करुन माहिती देण्याची व त्यांची तसेच आक्षेप धारकांची सुनावणी घेण्याची कार्यवाही दि. 30.09.2019 पावेतो पुर्ण करण्यात आलेली आहे.

उक्त प्रारुप नगर रचना परियोजनेतील अहवालातील Form- 1 मधील नोंदीनुसार एकुण 6568 भुखंडधारकांचे नावाची नोंद असुन, उक्त धारकांना उपरोक्त नमुद प्रमाणे कलम 72(4) अंतर्गत विशेष नोटीस बजावली असता, सुनावणीस्तव एकुण 543 जमीनधारक /भुखंडधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित झालेले असुन त्यापैकी काही जमीनधारकांचे/भुखंडधारकांचे एकापेक्षा अधिक सि.स.क्र. चे जागेमध्ये मालकीहक्क आहेत. तसेच कलम 102 अंतर्गत एकुण 717 आक्षेप प्राप्त झालेले असुन त्यापैकी सुनावणीस्तव 641 आक्षेपधारक उपस्थित राहिलेले असुन त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. आणि संबंधित जमीन मालक तसेच आक्षेप धारक यांचे कडुन सुनावणीमध्ये मांडण्यात आलेले मुद्दे, करण्यात आलेल्या मागण्या आणि त्याअनुषंगाने प्रारुप नगर रचना परियोजनेमधील नियोजन विचारात घेवुन कलम 72(4) मधील तरतुदीनुसार प्राथमिक परियोजनेचा (Preliminary Scheme ) प्रकरणनिहाय अहवाल लवादाने तयार केला आहे.

प्रस्तावित प्रारुप नगर रचना परियोजनेतील 1730 एकर जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९- सि .आर १५४-२०१९ नवि-९ दि. २७-०८-२०१९ अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपुर महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९- सि . आर १५४-२०१९ नवि-९ दि. २७-०८-२०१९ अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपुर

महानगरपालिका यांची नियुक्ती झालेली आहे. उक्त प्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(5) अन्वये मंजूरीकरीता शासनास सादर करणेपुर्वी,या परियोजनेचा प्रकरणनिहाय अहवाल तयार करतांना काही खालील प्रमाणे नमुद ठळक बाबींवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(7) (बी) मधील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणास सुनावणी देण्याकरीता लवाद यांनी पत्र क्र. नरयो क्र. 1/नाग/ कलम 72 (7) (बी)/लवाद 988, दि 07.12.2019 अन्वये नोटीस बजावून नागपूर महानगरपालिकेच्या वतीने माआयुक्त किंवा . .त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने दि18/12/2019 रोजी उपस्थित राहावे अशी विनंती केली आहेसदर पत्र नस्तीत टाचण . ,आयुक्त यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी .मा .करण्यात आले आहे कृपया अवलोकन व्हावेNSSCDCL, Nagpur यांना सदर सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश दिले होते .मुख्य कार्यकारी अधिकारी हे कार्यालयीन कामाकरीता दिल्ली येथे उपस्थित असल्याकारणाने सदर सुनावणी दि .21/12/2019 रोजी पार पडली. या सुनावणी दरम्यान लवादाने प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर चर्चा करण्यात आली. तसेच मा,मुख्य कार्यकारी अधिकारी .NSSCDCL,Nagpur यांनी सदर प्रकरणी नियोनज प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे अभिमत घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले . सार लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर मुख्य कार्यकारसदर सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुी अधिकारी यांचे अभिप्राय पत्र क्र .2113/A/NSSCDCL/2019 दि .21/12/2019 नुसार लवाद यांना कळविण्यात आले .

सुनावणीमध्ये नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात येत असलेल्या अहवालातील प्रकरण निहाय नमुद बाबींवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत प्राप्त होणे आवश्यक आहे. शिवाय कलम 72(4) अन्वये पार पाडलेल्या सुनावणीमधील संबंधित जमीन मालक/आक्षेप धारकांकडुन उपस्थित करण्यात आलेल्या सर्वसाधारण बाबींवर आणि लवादांचे निदर्शनास आलेल्या बाबींवर सुध्दा नियोजन प्राधिकरण असलेल्या नागपुर महानगरपालिकेचे स्पष्ट मत/निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवरच्या अभिप्रायावर नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचा अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूर करणेचा विषय विचारात घेणे, आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूरीस्तव व पुढील आदेशार्थ सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.दिपक वाडीभस्मे :- मा.महापौरजी, एक सुचना आहे. यामध्ये जो प्रकल्प स्मार्ट सिटीचा आहे त्यामध्ये खुप काही चुका आहे. त्या चुका दुरुस्त करण्याची गरज आहे. कारण की टी.पी.एस. करण्यासाठी त्यांनी ड्रोननी सर्व्हे केला. ड्रोन ने सर्व्हे करतांना जे शेतीमधुन जे रस्ते होते त्याचे समावेश न करता अनेक रस्ते शेतीमधुन जात आहे. तरी सुध्दा ज्या शेतक-यांच्या शेतीमधुन जो रोड जातो त्याच्यामध्ये जी जागा प्रकल्पामध्ये घेत आहे त्याच्या ४० टक्के जागा मुवायजाची यामध्ये मध्ये नोंद नव्हती पण आपल्याला विनंती आहे. या विषयासंदर्भात माझ्या काही सुचना आहे त्या सुचनांच्या माध्यमातून आपण विचार करण्यात यावा ही विनंती.

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदय, या प्रकल्पामध्ये गोरगरीबांच्या जमिनी गेल्या त्यांना त्याचा मोबदल्याचे पत्र सुध्दा प्राप्त झाले नाही. आपण त्या जमिनी घेत आहे काय व त्यांना त्याचा काही मोबदला देणार आहे काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, या टी.पी.एस. स्कीममध्ये ज्या नागरिकांच्या जमिनी आपण घेत आहे ४० आणि ६० टक्क्यांचा जो उल्लेख आहे त्यामध्ये ४० टक्के जमिन आपण घेत आहे. त्यांचे त्यांना आपण मोबदला देणार काही नाही देणार ? त्याचे काय नियम आणि निकष आहे.

उपायुक्त (श्री.मारोणे) :.- सन्माननिय महापौरजी, स्मार्टसिटी ऐरियासाठी १७३० एकर जागेमध्ये ड्राफट टाऊन प्लॅनिंग स्कीम मंजूर झालेली आहे ती लॅन्ड कुलिंग तत्वावर झालेली आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर सन्माननिय अधिकारी हे कुठल्या अधिकारात उत्तर देत आहे याची माहिती दयावी.

उपायुक्त (श्री.मारोणे) :- सन्माननिय महापौरजी, माझ्याकडे नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, उत्तर जर उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन देत असतील तर मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभागृहात येण्याचा अधिकार आहे काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, याच संदर्भात एक नोटीस क्र ६३ आहे

महापौर :- नोटीस ६३ वर यामध्ये चर्चा करण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, स्मार्ट सिटी हे प्राधीकरण जे आहे. ते इंडीपेंडन्ट बॉडी आहे. एस.पी.व्ही आहे. त्याचे अधिकारी या सभागृहात उपस्थित राहु शकतात काय ? असा माझा प्रश्न आहे.

महापौर :- स्मार्ट सिटीचे अधिकारी या सभागृहात उपस्थित राहु शकतात काय या प्रश्नाचे उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.मारोणे) :- सन्माननिय महापौरजी, स्मार्ट सिटीचे वेगळे बोर्ड असल्यामुळे या सभागृहामध्ये उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. परंतु माझ्याकडे नुकताच उपायुक्त म्हणुन कार्यभार देण्यात आला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, याचाच अर्थ की तुम्ही उपमुख्य कार्यकारी म्हणुन या सभागृहामध्ये उत्तर देऊ शकत नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, या विषयाच्या खाली नगररचना विभाग लिहीले आहे. आता नगररचना विभागाचा अधिकारी यामध्ये उत्तर देईल. यामध्ये उपायुक्तांनी उत्तर दयावे.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, मी विभाग प्रमुख म्हणुन यामध्ये उत्तर देत आहे. सदर प्रारुप नगररचना पार्डी, पुनापुर, भरतवाडा, भांडेवाडी, हा विषय स्मार्ट सिटी अंतर्गत प्रारुप नगररचना परियोजना अंतर्गत येत आहे. परंतु याच्यामध्ये लॅन्ड कुलिंग सिस्टीम अंतर्गत ६०/४० या प्रमाणात आपण सार्वजनिक सुविधेसाठी आरक्षणामध्ये रस्ते, जी जागा आपण प्रोव्हाईड करतो आणि ६० टक्के जागा आपण त्यांना देतो परंतु हा प्रस्ताव असा आहे की ज्या जागेवर एन.आय.टी. ने गुंठेवारी मंजूर केली आहे. त्या भाषणामध्ये या जागा आपल्याला हस्तांतरीत करीत असतांना त्यासाठी लागत असलेला निधी आहे तो स्मार्ट सिटीमध्ये तरतुद करण्याविषयी आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ज्या जागा आपण ६० आणि ४० टक्क्यामध्ये ॲक्वॉयर करीत आहे. त्याचा मोबदला देणार की नाही देणार

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, मोबदला देण्यासंदर्भातच प्रश्न आहे. आपल्या येथे लवाद म्हणुन नेमलेले आहे. त्या लवादाने त्यामध्ये स्मार्ट सिटीला स्पष्टपने विचारणा केलेली आहे. की या अंतर्गत आपल्याला भुसंपादनासाठी लागणार जो खर्च आहे अशा प्रकरणी ज्या प्रकरणामध्ये आरक्षणाच्या जागा आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जेथे आरक्षण नाही त्या संदर्भात ? मा.महापौरजी, समजा एका शेतक-यांच्या जमिनीमधुन तुम्ही रस्ता घेऊन चालले आहे. तेथे आरक्षण नाही. ती जी रस्त्यांची जागा जाणार आहे त्याच्या जागेचा मोबदला कोण देणार ?

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, त्याचा मोबदला टाऊन प्लॅनिंग स्कीममध्ये अनुज्ञेय होत नाही. ओरजीनल प्लॉट २० एकर जा असेल, त्यामधुन रस्ता जरी गेला इतर प्रयोजनासाठी ....

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, तेथे शेतक-यांच्या जमिनीमधुन रस्ता चालला आहे. अशी टी.पी. स्कीम आपण मंजूर करु नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, ज्या जागेवर रिझर्वेशन आहे त्याकरीता एन.आय.टी. चे नियम लागू आहे. पार्डी घाटाकरीता महानगरपालिकेची रिझर्वेशनची जागा होती स्माटीमध्ये गेली आहे त्याचे काय झाले.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, याच क्षेत्रासाठी एन.आय.टी हे २७/०८/२०१९ पुर्वी एन.आय.टी. हे नियोजन प्राधीकरण होते. हे संपुर्ण क्षेत्र एन.आय.टी. अखत्यारीत असल्यामुळे आणि शासनाने त्या भागातील रिझर्वेशन किंवा फेरबदल करण्याचे संपूर्ण अधिकार नियोजन प्राधीकरण म्हणुन त्यांना असल्यामुळे हा फेरबदलाचा प्रस्ताव एन.आय.टी. मार्फेत ...

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी आपण एन.आय.टी मार्फेत या सभागृहात दिला होता नियोजन प्राधीकरण बदलीच्या वर्षभराच्या आधीपासून कुठले कुठले आरक्षण यांनी व्यपगत केले याच्यामाहितीसह आपण ठरावा आणावा , असे आपण निर्देश दिले होते. त्याचे काय झाले.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, आपल्या सभागृहाने निर्देश दिले होते त्यामध्ये शासनाने ३७/ २ अंतर्गत फेरबदल मंजूर केला होता.

श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, स्मार्ट सिटीची घोषणा केव्हा करण्यात आली.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, स्मार्ट सिटीची घोषणा महाराष्ट्र प्रादेशिक व अधिनियम १९६६ चे कलम ६८ (२) अन्वये २४/१०/२०१८ ला शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे. शासन अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासूनच अधिसूचित करण्यात येते आणि एम.आर.टी.पी. ॲक्ट अंतर्गत होते.

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, त्या जागेवर ४ वर्षापासून महानगरपालिकेचे आरक्षण आहे. ती जागा अर्धा एकर पेक्षा कमी आहे. ती जागा २० एकर जागेवर आपले रिझर्वेशन आहे. त्या जागेकरीता ४ वर्षापासून आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत. आणि या संदर्भात आपण आदेश सुध्दा दिले होते की ते आरक्षण आपण रोखावे, तेथे जे तलमले लेआऊट यांचे आरक्षण आहे त्यासंदर्भात मी बोलत आहे. त्यामध्ये २५ एकर जे क्षेत्र आहे ती जमिन महानगरपालिकेची २७ ची नोटीस देऊन महानरगपालिका त्यामध्ये महानगरपालिकेने टी.डी.आर देऊन त्यामध्ये एन.आय.टी. ने ३७ केले, आणि ती जागा परस्पर तलमले पार्टीने विकली त्या जागेची रजिस्ट्री झाली. त्यामध्ये एन.एम.सी. आणि एन.आय.टी. ने कशी एन.ओ.सी. दिली.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा विषय टाऊन प्लॅनिंग स्कीमचा आहे. आणि स्मार्ट सिटी अंतर्गत नागपूर शहराची विकास योजना २००१ मध्ये मंजूर झाली आणि क्षेत्रासाठीचे नियोजन प्राधीकरण हे नागपूर सुधार प्रन्यास होते. आणि त्यांनी त्या संपुर्ण भागासाठी विविध आरक्षणे त्या भागामध्ये अंतर्भुत केले होते. अविकसीत भाग केंद्र सरकारने ज्या योजना घोषित केल्या त्यामध्ये स्मार्ट सिटी ही अत्यंत महत्वाची योजना घोषित केली. आता स्मार्ट सिटी योजना कायदयाच्या कुठल्या नियमाअंतर्गत राबवायची हा जेव्हा राज्य शासनाने विचार केला त्यावेळस त्यानी टी.पी. स्कीम अंतर्गत ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. आता टी.पी. स्कीममध्ये लॅन्ड ॲक्वीझीशनचा मोबदला अनुज्ञेन नाही ही वास्तविकता आहे. टी.पी. स्कीम मध्ये लॅन्ड कुलिंग स्कीममध्ये ६०, ४०च्या रेशोमध्ये तेथे आपल्याला जमिनी दयायच्या आहे आणि त्या जमिनी विना मोबदला दयायच्या आहे. कायदयाचे म्हणणे मी सांगत आहे. आता त्या संपुर्ण परिसरातील शेतक-यांना स्मार्ट सिटी येणार आहे म्हणुन खुप आनंद झाला १७३० एकर जागेचे प्रारुप तयार करण्यात आले. हे प्रारुप कोणी तयार केले. हे प्रारुप एन.आय.टी. ने तयार केल्यानंतर त्यावर आक्षेप घेणे आवश्यक होते. मग त्या भागातील लोकप्रतिनिधींनी किंवा त्या भागातील नागरिकांना जागृती नसल्यामुळे त्यांचा गैरसमज झाला आणि आपल्याच पक्षाच्या नेत्यांच्या विरुध्द बोलण्याची हिंमत नसल्यामुळे विरोध त्या टी.पी. स्कीमच्या ड्राफ्ट वर केलेला नाही. मा.महापौरजी, टी.पी. स्कीम मंजूर झाली. कधी झाली २४/१०/२०१८ ला झाली. राज्य शासनाने लॅन्ड कुलिंग स्कीमला मंजूरी दिली. ज्या वेळी स्मार्ट सिटीचे जे अधिकारी आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आपण जे बोलत आहात ते टी.पी.स्कीम संदर्भात बोलत आहे मी स्मार्ट सिटीच्या संदर्भात बोलत आहे. जो घाट होता ती महानगरपालिकेची जागा होती.

श्री.नितीन साठवणे :- मा.महापौरजी, तेथे आरक्षण खूप दिवसापासून आहे. आरक्षण कॅन्सल करण्यासंदर्भात ते वारंवार प्रयत्न करीत आहे. मा.सदस्य श्री.पुरुषोत्तम हजारे यांनी वारंवार या संदर्भात निवेदन दिले आहे. तेथे घाटाची आवश्यकता आहे.लोकसंख्या वाढत आहे. या घाटावर जाण्यासाठी लोकांना जागा मिळणार नाही म्हणुन येथील घाटाचे आरक्षण वगळू नये.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, लॅन्ड ॲक्वीझीशन कॉस्ट ज्यावेळी अग्रीम ताबा घेण्यासाठी गेले त्यावेळी काही लोकांनी विरोध केला. हा विरोध पर्टीकुलर कुठल्या लोकांनी केला. शेतकरी अजुनही त्या भागामध्ये वास्तविक शेती करुन राहिले आहे. एखादयाची दोन एकर शेती आहे त्यापैकी पावने दोन एकर शेती

त्याची टी.पी. रोडमध्ये चालली गेली. त्याची ६० टक्के जागा त्याला वेगळा भुखड कुठल्यातरी ठिकाणी मिळणार आहे. दुस-या कुठल्या ठिकाणी मिळणार आहे याबद्यल त्यामध्ये कुठलिही निश्चित नाही त्यामुळे अग्रीम ताबा घेण्यासाठी नागरिकांनी विरोध केला आणि अधिकारी आणि नागरिकांचे संघर्ष मोठया प्रमाणात झाला. त्या अनुषंगाने त्या कायदयामध्ये लवाद नेमण्याची प्रोव्हीजन आहे. लवाद आहे त्याकडे सर्व हेअरींग झाले त्यामध्ये त्यांनी मांडणी केले की शेतक-यांचे काय काय म्हणणे ते अंतर्भत केले. आता सभागृहाला निर्णय काय घ्यायचा आहे. सभागृहाला निर्णय घ्यायचा आहे की सुनावणी मध्ये नियोजन प्राधीकरण आता यामध्ये दुसरा बदल असा झाला २७/०८/२०१९ ला शासनाने अत्यंत क्रांतीकारी असा निर्णय घेतला आणि नागपूर सुधार प्रन्यासचे नियोजन प्राधीकरण काढुन नागपूर महानगरपालिकेकडे नियोजन प्राधीकरण दिले. त्यामुळे नियोजन प्राधीकरण आता महानगरपालिका असल्यामुळे आता आपला अभिप्राय घ्यायचा आहे. हा प्रस्ताव राज्य शासनाकडे जाईल, लवादाने काय निर्णय दिला ते नमुद नाही त्यावर आम्ही अभिप्राय काय देणार आहोत.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, लवादाने अभिमत घेण्यासाठी प्रस्तावित केलेले मुद्दे सुध्दा नमुद आहे त्याच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, याच्यामध्ये काय काय मुद्दे लवादाने म्हटले आहे ते वाचुन दाखवावे.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, क्र १ . नगररचना परीयोजना क्षेत्रामध्ये बहुतांश गृहनिर्माण सहकारी संस्थेव्दारा अभिन्यास तयार करुन अनधिकृतपणे विक्री करण्यात आलेली आहे. सदरहु बहुतांश भुखंड धारकांकडे कब्जापत्र आहे. त्यांच्या जागेवर गैरव्यवहार सुरु आहे. अशा अनधिकृत भुखंडधारकांच्या नावाची नोंद विभागाकडे झालेली नसल्यामुळे त्यांची नावे नगररचना परियोजनेच्या फॉर्म नं. १ मध्ये नमुद झालेली नाही. फॉर्म नं. १ नमुद सुमारे २० ते ३० वर्षापुर्वीचे भुखंडाची विक्री केलेली असल्यामुळे सध्यस्थितीत याचे अस्तित्व नाही. मुळ जमिन मालकांनी त्यांच्या जमिनीची तुकडया तुकडया मध्ये विक्री केलेली असून त्यामुळे मुळ जमिन मालकांचा त्या जमिनीवरील हक्क संपुष्टात आलेले आहे. आणि तुकडे वजा जमिन नोंद सिटी सर्व्हे विभागाकडे झालेली आहे. जे गुंठेवारीमध्ये अशा तुकडया तुकडयांमध्ये विक्री केलेली आहे. मुळ मालकांचे अस्तित्व संपुष्टात आल्यामुळे परंतु याची आखीप पत्रिकेवर नोंदी न झाल्यामुळे अशा प्रकरणी काय करावे असा हा प्रश्न होता. लवादाने निश्चित केले आहे की कोण्यात्या प्रकारे आपण मोबदला देणे आवश्यक आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मला असे वाटते की हा विषय पुढच्या सभपर्यत स्थगित करावा. या विषयावर विस्तुत अभ्यास करुन हा विषय समजून घेतला पाहिजे.

श्री.दिपक वाडीभस्मे :- मा.महापौरजी, या प्रकरणामध्ये जे लवादाने यांना सुचविले आहे तर त्यांच्याकडुन असे अभिमत आले आहे काय की त्यांना या प्रकल्पामध्ये मोबदला देता येते काय ? याची माहती देण्यात यावी. किंवा असा अभिप्राय लवादाने सुचविला आहे काय ? या प्रकल्पामध्ये ६०-४० मध्ये त्यांना मोबदला देता येते काय ? याची माहिती दयावी.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, आर्थिक स्वरुपात मोबदला अनुज्ञेय करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेने नियोजन प्राधीकरण म्हणुन निर्णय घेणे आवश्यक आहे याबाबत अभिमत लवादाने मागितले आहे आणि त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेने अशा परिस्थितीत त्या जमिनीची खरेदी किवा परत प्रकरणे आार्थिक मोबदला देणे आवश्यक आहे.

वरील चर्चेनंतरअधिकारी वर्गाने पुन्हा या विषयाचाअभ्यास करुन हा विषय पुढच्या सभागृहात ठेवावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६४ / विषय क्र.५७</u>:-** {**सचिवालय**} महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) अन्वये स्थायी समितीचे ८ खालील मा. सदस्य दि. ०१-०३-२०२० रोजी दुपारनंतर निवृत्त करण्याचा प्रश्न विचारात घेऊन कलम २० (५) अन्वये महासभेसमक्ष सादर करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन श्री. जगदीश ग्वालबंशी यांचे निधन झाल्यामुळे ही एक जागा रिक्त आहे. करीता कलम २३ प्रमाणे व कलम २०(५) च्या जागावर नवीन सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे अशा एकूण रिक्त जागा ९ आहे.

करीता संपूर्ण ९ पदाचा नामनिर्देशनाचा संयुक्त प्रस्ताव मनपा सभागृहास पाठविण्यास स्थायी समितीने ठराव क्रमांक ९१७ दिनांक १४-०१-२०२० अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्य | पक्ष |
|---|---|---|
| १. | मा. श्री. लखन सुमेरा येरवार | भारतीय जनता पक्ष |
| २. | मा. श्री. विजय गोपालराव चुटेले | भारतीय जनता पक्ष |
| ३. | मा. सौ. श्रध्दा विजय पाठक | भारतीय जनता पक्ष |
| ४. | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | भारतीय जनता पक्ष |
| ५. | मा. सौ. वर्षा जयंत ठाकरे | भारतीय जनता पक्ष |
| ६. | मा. सौ. स्नेहल सतीश बिहारे | भारतीय जनता पक्ष |
| ७. | मा. सौ. निरंजना महेश पाटील | भारतीय जनता पक्ष |
| ८. | मा. सौ. जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका कलम २०(५) अन्वये दिनांक ०१-०३-२०२० रोजी दुपारी निवृत्त होत असलेले वरील (१) **भारतीय जनात पक्षाचे ७ सदस्य** व (२) **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा १ सदस्य**असे एकूण **८**स्थायी समितीच्या सदस्यांचे जागी त्याच पक्ष/गट/आघाडीचे नवीन **८** सदस्यांची नेमणूक **वर्ष २०२०-२०२१ व वर्ष २०२१-२०२२ करीता**तसेच श्री. जगदीश ग्वालबंशी यांचे निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका कलम २३ अन्वये **भारतीय जनता पक्षातर्फे१ सदस्य**नामनिर्देशन**वर्ष २०२०-२०२१ करीता**करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

महापौर:- निगम सचिवांनी प्रक्रिया सुरु करावी. सर्व गटनेत्यांनी त्यांच्या गटातील सदस्यांचे नाव दयावे.

(उपरोक्त गटनेत्यांनी बंद लखोटे मा.महापौरजी यांना सादर केलीत)

मा.महापौरजी यांना सादर करण्यात आलेले उपरोक्त लखोटे मा.महापौरजी यांनी सभागृहामध्ये उघडून त्यातील नावे वाचून दाखविण्याचे निगम सचिवांना निर्देश दिले.

निगम सचिव:-मा.महापौरजी , दिनांक २०.०२.२०२० च्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवरील विषय क्र. ५७ च्या अनुषंगाने **भारतीय जनात पक्षाचे ७ सदस्य** व (२) **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा १ सदस्य**असे एकूण **८**स्थायी समितीच्या सदस्यांचे जागी त्याच पक्ष/गट/आघाडीचे नवीन **८** सदस्यांची नेमणूक **वर्ष २०२०-२०२१ व वर्ष २०२१-२०२२ करीता**तसेच श्री. जगदीश ग्वालबंशी यांचे निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका कलम २३ अन्वये **भारतीय जनता पक्षातर्फे१ सदस्य**नामनिर्देशन**वर्ष २०२०-२०२१ करीता** करावयाचा आहे. त्याप्रमाणे भारतीय जनता पार्टी तर्फे स्थायी समितीच्या ७(सात)सदस्यांसाठीखालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते वाचून दाखवितो.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.विजय झलके |
| २. | श्री. प्रमोद कौरती |
| ३. | खान नसिम बानो मौ.इब्राहीम |
| ४. | श्रीमती प्रमिला मंथराणी |
| ५. | श्री.अनिल गेंडरे |
| ६. | श्री.राजेश घोडपागे |
| ७. | श्रीमती विशाखा बांते |

निगम सचिव:- मा.महापौरजी,तसेच श्री. जगदीश ग्वालबंशी यांचे निधनामुळेरिक्त झालेल्या जागेवर १(एक) जागेसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते वाचून दाखवितो

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. विक्रम ग्वालबंशी |

निगम सचिव:- मा.महापौरजी, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षातर्फे१(एक) जागेसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते वाचून दाखवितो

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती आयशा नेहरु उईके प्रभाग क्र.८ |

महापौर:-स्थायी समिती सदस्यांची जी नावे घोषित करावयाची आहे ती वाचुन दाखवितो. भारतीय जनता पार्टी तर्फे स्थायी समितीकरिता खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.विजय झलके |
| २. | श्री. प्रमोद कौरती |
| ३. | खान नसिम बानो मौ.इब्राहीम |
| ४. | श्रीमती प्रमिला मंथराणी |
| ५. | श्री.अनिल गेंडरे |
| ६. | श्री.राजेश घोडपागे |
| ७. | श्रीमती विशाखा बांते |

तसेच रिक्त झालेल्या जागेवर १(एक) जागेसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. विक्रम ग्वालबंशी |

तसेच भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षातर्फे स्थायी समितीच्या १(एक) जागेसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती आयशा नेहरु उईके प्रभाग क्र.८ |

या सर्वांना स्थायी समिती सदस्य म्हणून नेमणुक झाल्याचे घोषित करण्यात येते.

अशा रितीने महाराष्ट्र महानगरपालिका कलम २०(५) अन्वये दिनांक ०१-०३-२०२० रोजी दुपारी निवृत्त होत असलेले वरील (१) **भारतीय जनात पक्षाचे ७ सदस्य** व (२) **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा १ सदस्य**असे एकूण **८**स्थायी समितीच्या सदस्यांचे जागी त्याच पक्ष/गट/आघाडीचे नवीन **८** सदस्यांची नेमणूक **वर्ष २०२०-२०२१ व वर्ष २०२१-२०२२ करीता**तसेच श्री. जगदीश ग्वालबंशी यांचे निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका कलम २३ अन्वये **भारतीय जनता पक्षातर्फे१ सदस्य**नामनिर्देशन**वर्ष २०२०-२०२१ करीता**करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.विजय झलके |
| २. | श्री. प्रमोद कौरती |
| ३. | खान नसिम बानो मौ.इब्राहीम |
| ४. | श्रीमती प्रमिला मंथराणी |

| | |
|---|---|
| ५. | श्री.अनिल गेंडरे |
| ६. | श्री.राजेश घोडपागे |
| ७. | श्रीमती विशाखा बांते |
| ८. | श्री. विक्रम ग्वालबंशी |
| ९. | श्रीमती आयशा नेहरु उईके |

**ठराव क्र.६५ / वि.क्र.५८** :- प्रभाग क्र. २ मधील श्रावस्तीनगर येथील नागपूर
**{लोककर्म झोन ०९}** महानगरपालिकेचे उपयोगात नसलेले जुने शिकस्त असलेले सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम तोडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, विषय क्र. ५९ विभागाला परत करण्यात यावा.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, हा प्रशासनाकडून विषय आलेला आहे. प्रशासनाला काय गरज आहे की हा विषय वापस घ्यायचा. याचे कारण प्रशासनाने सांगावे.

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, यामध्ये रिपेअरींगचे काम आहे ते आमच्या विभागाकडून होत नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, हा विषय सभागृहातून मंजूर करुन स्थावर विभागाकडे पाठवावा. त्यांच्याकडून इस्टीमेट घ्या, नियमाने काम करावे,

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन इसमे २२.३० लाख रुपयों का जो खर्चा निकाला था वह खर्चा किसने निकाला इस संदर्भ मे जानकारी प्रशासन ने देना चाहियें

आरोग्य अधिकारी (श्री.दासरवार) :- मा.महापौरजी, संस्थाकडून आपल्याकडे खर्च आलेला होता.

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, यह विषय आरोग्य विशेष समितीमे आकर के गया है, खर्चा और मेनेटेनन्स संस्था को करना चाहियें

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, संस्था हे डेव्हलप करीत आहे पैसे देत आहे. तेथे माईक साऊंड लावणार आहे आणि साफसफाईची व्यवस्था करणार आहे.

श्रीमती आभा पांडे :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, वर्तमानपत्रामध्ये याची काही माहीती आली होती काय ? की फक्त उन्नती फाऊंडेशनला पत्र दिले आणि आपण त्यांचे पत्र मंजूर केले असे होते काय ? अनेक संस्था असतील जे कार्य करण्याकरीता तयार असतील त्यांना पहिले बोलाविण्याची संधी आपण दिली काय ? मा.महापौरजी, महानगरपालिकेत हे काय सुरु आहे.

**ठरावक्र.६६/वि.क्र.५९** :- नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत गंगाबाई घाट येथील शोक सभागृह
**{आरोग्य विभाग}** उन्नती फाऊन्डेशन यांना चालविण्याकरीता पालकतत्वावर घेण्याची विनंती केलेली असुन खालील अटी व शर्ती नुसार पालकतत्वावर देण्याचे प्रस्तावित आहे.

१) गंगाबाई घाट शोक सभागृह ५ वर्षाकरीता पालकतत्वावर देण्यात येईल. त्याकरीता सदर संस्थेला मनपा तर्फे कोणताही मोबदला देण्यात येणार नाही.
२) सदर संस्थे तर्फे शोकसभागृह चा वापर बाबत कोणतेही शुल्क घेण्यात येणार नाही.
३) सदर संस्थे तर्फे शोक सभागृह व्यतीरिक्त परिसरातिल कोणत्याही जागेचा वापर करता येणार नाही.
४) शोक सभागृह चा गैर वापर संबंधीत संस्थेस करता येणार नाही.
५) सदर संस्था ने शोकसभागृहा च्या नविनिकरण बाबत येणारा खर्च रु. २२,५३,१०१ (बावीस लक्ष त्रेपन्न हजार एकशे एक रुपये फक्त) चा प्रस्ताव सादर केलेला असुन यावर होणारा खर्च संबंधीत संस्था स्व:त वहन करेल व या बाबत मनपातर्फे कोणत्याही प्रकारचे देयकचा भुगतान मनपा तर्फे करता येणार नाही.
६) विना परवानगी संस्थेला शोक सभागृहाचे नविनीकरण किंवा नुतनीकरण करता येणार नाही. परवागी घेतल्या नंतर संस्थेला स्व: खर्चाने सदर कार्य करता येईल.

७) शोक सभागृह पालकातत्वावर दिल्यास म.न.पा. आयुक्त यांना कारण न सांगता केव्हाही व कधीही करारनामा रद्द करण्याचे अधिकार राहणार.

करीता वरिल अटी व शर्ती नुसार गंगाबाई घाट येथिल शोक सभागृह पालकतत्वावर ५ वर्षा करीता विना मोबदला देऊन चालविण्यास्तव् देण्याच्या प्रश्न सभागृहाने विचारात घेवून स्थावर विभागाने माहिती व्यवस्थित करुन हा विषय पुन्हा सभागृहापुढे पाठवावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६७ / वि.क्र.६०</u> :-**
**{आरोग्य विभाग}**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग (ब) नगर विकास विभाग दि. ०१ जुलै २०१९ प्रकाशित केलेली अधिसुचना प्राप्त झाली असुन महाराष्ट्र शासन राज्यातील महानगरपालिके मध्ये सदर उपविधीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत आहे. करीता म.न.पा. ठराव क्र. ४४१, दिनांक २२.०८. २०१६ अन्वये पुनश्च सदरचा विषय सभागृहाच्या माहितीस्तव सादर **प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयावर मा.सदस्य प्रफुल्ल गुडधे यांनी मागच्या सभेत नोटीस लावलेली होती आणि या विषयावर सविस्तर चर्चा होवून वैदयकीय व आरोग्य विशेष समितीकडे नोटीस वर्ग करण्यात आला होता. वैदयकीय व आरोग्य विशेष समितीच्या अहवालावर मा.आयुक्त यांचे अभिमत घ्यावे असे मा.महापौरजी यांनी निर्देश दिले होते. त्यामुळे हा विषय विषयपत्रिकेतून वगळण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जाधव यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय वगळण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

**<u>ठराव क्र.६८ / वि.क्र.६१</u> :-**
**{परिवहन विभाग}**

क्रेंद्र शासनाच्या पर्यावरणपुरक धोरणाप्रमाणे व प्राप्त प्रस्तावा अन्वयेFaster Adoption and Manufacturing of Hybrid and Electric Vehicle (FAME–II) या योजने अंतर्गत स्टॅन्डर्ड बस १२ मिटर करीता रू. ५५ लक्ष, मिडी बस ०९ मिटर करीता रू. ४५ लक्ष व मिनी बस करीता रू. ३५ लक्ष इतके अनुदान देणार असून उर्वरीत रक्कम या बसेस जी.सी.सी. तत्वावर चालवुन निर्माता ज्यांचे कडून ही सेवा दिली जाईल, त्यांचे वतीने वहन करण्यात येईल. नागपूर महानगरपालिके करिता १०० नविन इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याकरिता मान्यता दिलेली आहे. या १०० बसेस चालविण्या करीता वार्षिक रू. ५९ कोटी २७ लक्ष अतिरिक्त खर्च अपेक्षित होता, तसेच या बसेस पासुनचे उत्पन्न रू. १८ कोटी ९५ लक्ष अपेक्षित धरून हया बसेस चालविण्या पासुन होणाऱ्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ लक्षात घेता नागपूर महानगरपालिकेला दरवर्षीसुमारे ४० कोटी ३२ लक्ष चा भार वहन करावा लागणार होता. उपरोक्त बसेस करीता मनपाला वहन करावयाचा खर्च व्यवहार्यता बाबत पडताळणी करून मा. आयुक्त यांच्या प्राप्त आदेशान्वये १०० नविन इलेक्ट्रिक बसेस पैकी ४० इलेक्ट्रिक बसेस या खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे, तसेच सध्या सुरू असलेल्या मनपाच्या ३० स्टॅन्डर्ड बसेस बंद केल्यास रू. ११ कोटी ७१ लक्ष बचत होईल व कमीकेलेल्या ३० स्टॅन्डर्ड बसेसचा खर्च वजा केल्यास रू. ११ कोटी ९९ लक्ष दरवर्षी अतिरिक्त खर्च येईल. मनपावर उक्त अतिरिक्त बोझा पडणार असून व हा धोरणात्मक निर्णय असल्याने या खरेदी प्रक्रियेला महासभेची मान्यता आवश्यक आहे.

(FAME–II) या योजने अंतर्गत व प्राप्त सुचना तसेच प्रस्तावाच्या आधारे ४० इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याकरीता विहीत करण्यात आलेल्या मुदतीमध्ये RFP (Request for Proposal) प्रसिध्द करण्यात आली आहे. यास मा. परिवहन समितीने कार्योत्तर मंजुरी प्रदान केलेली असून हा धोरणात्मक विषय असल्यामुळे महानगरपालिकेच्या महासभे पुढे सादर करण्यात यावा या मा. सभापती, परिवहन समिती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने ठराव क्र. ०३, दि. ०९/०१/२०२० मान्यता प्रदान केली. क्रेंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन मा. आयुक्त, मनपा यांच्या प्राप्त आदेशान्वये ४० इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आले असून या आधारे ४० इलेक्ट्रिक बसेस क्रेंद्र शासनाने विहीत केलेल्या मुदतीच्या आंत RFP (Request for Proposal) प्रसिध्द करण्यात आली असून त्यास मा. परिवहन समितीने कार्योत्तर मंजुरी प्रदान आलेली आहे व सदर RFP (Request for Proposal) प्रसिध्द करण्याचा

तसेच ४० इलेक्ट्रिक बस खरेदी करण्याच्या प्रस्ताव महासभे समक्ष सादर करण्यात येत असून या विषयास कार्योत्तर मंजुरीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.६९ / विषय क्र.६२ (नोटीस) :-** नागपूर महानगरपालिकेच्यामालमत्ता कर व पाणी कर
**(कर व कर विभाग)** देयकामध्ये नागरीकांना दिलेल्या चुकीच्या बिलाचे
**(मा.श्री. प्रवीण दटके)** रिव्हीजन करणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या तरतूदीनुसार शास्ती माफ करण्याच्या संदर्भात."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिममंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रमाणे नोटीस " (जे) "१"सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, टॅक्सच्या संदर्भात विषय असतील किंवा शास्ती असेल, या संबंधी लोकप्रतिनिधी यांनी विनंती करायची यामध्ये मा.आयुक्ताला किंवा विभाग प्रमुखांना प्रत्येक इंडीव्हीजीअल प्रकरणे पाहुन निर्णय व्हायचा पण सध्या जी काही चर्चा आहे. पाण्याचे देयक असतील किंवा टॅक्सचे देयके असतील तर दुरुस्त होणार नाही आणि तो सर्व अधिकार मा.आयुक्तांकडे आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती अशी आहे की या विभागाच्या पाणी आणि कर या विभागाचे जे उपायुक्त असतील, त्यांनी येथे निवेदन करावे की हे इंडीव्हीज्युअल बंद आहे काय ? कायदयाच्या तरतुदी प्रमाणे लोकप्रतिनिधींनी जर विनंती केली शास्ती माफ करण्यासंदर्भात, ते संबंधित विभागाने सांगावी.

महापौर :- जलप्रदाय विभागाचे विभाग प्रमुख आणि टॅक्स विभागाच्या प्रमुखांनी या ठिकाणी सांगावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी) :- मा.महापौरजी, आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह, रिव्हीजन नही होंगा ऐंसा कहीपर भी नही बोला गया, ऐसा कोई लेखी आदेश नही है।

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जो गलत बिल गये है उसका रिव्हीजन कैसे होंगा

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी) :- मा.महापौरजी, रिव्हीजन बंद हुआ ऐंसा बोला नही गया, मैने डेलीगेट को रिव्हीजन क्यौ होता है यह आकर बतायें,

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जो गलत बिल जाते है उसका रिव्हीजन शुरु है, जिस घर मे काई व्यक्ती नही रहता उसके घर का ५००० का बिल आया वह

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी) :- मा.महापौरजी, अगर गलत बिल आता है तो मेरेपास लेकर आये मै उसे करेक्ट करके देती हुँ।

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, नेहरुनगर झोन अंतर्गत जेवढे लोक आता नंदनवन आणि हसनबाग वस्त्यासारख्या गरीब लोक येतात त्यांचा नळ बंद आहेपण त्यांना २ लाखाचे बिल आले कोणाला १ लाखाचे बिल आले म्हणजे जसे काही त्या ठिकाणी आईस फॅक्ट्री टाकली आहे या प्रकारचे वातावरण असेल तर कार्यालयाला आपण आदेश दयावे की रिव्हीजन बंद झालेले आहे. आणि त्या ठिकाणी आयुक्तांचे नाव घेतले जात आहे आणि आयुक्तांच्या नावाखाली दहशतीचे वातावरण कर्मचा-यांनी पसरवलेली आह. आणि त्यांनी सांगितले की आता काहीच रिव्हीजन करता येत नाही. जर चुकीचे बिल असतील तर त्याचे निश्चित रुपाने रिव्हीजन झाले पाहिजे असे आदेश आपण या ठिकाणी दिले पाहिजे.

श्री.जमाल :- मा.महापौरजी, ओसीडब्डलु व्दारा कई ऐरिया का पानी बंद है उनको पुछा गया की पानी क्यौ बंद है, साफ तौर पर कहा की मा.आयुक्त साहब का आदेश है की जब तक बिल नही भरेंगे तब तक पानी नही दिया जायेंगा। मा.महापौरजी, यह जरुरत की चिज है इसकी पुरी जिम्मेदारी नागपूर महानगपालिका की और सरकार की जिम्मेदारी होती है। बिल अगर नही भरा गया तो उसको किस तरीके से वसुल किया जायें इसकी अलग से प्लॅनिंग होना चाहियें। लेकीन पुरे ऐरिया का पानी बंद करना कहा का नियम है। आज पुरे दही बस्ती

परिसर मे ४ दिन कंटीन्युव पानी बंद रहा, वहापर ओसीडब्लु के ऑफीस मे गये तो वहापर बोला गया की पहले बिल भरों, मिटर लगवायों  फिर पानी मिलेगा। मिटर लगाने की प्रोसेस एक दीन मे होती है क्या मा.महापौरजी ? मिटर लगाने की प्रोसेस कैसे होती है लोगोकों बताया है क्या की मिटर लागाना क्यौ जरुरी है, डायरेक्ट पानी बंद कर दिया गया है, मा.आयुक्त साहब ने जो भी आदेश  वह आदेश है क्या यहापर, मा.आयुक्त साहब के नामपर कई आदेश जारी होते है।

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, या ठिकाणी आयुक्त साहेबांनी सांगावे की चुकीच्या बिलाचे रिव्हीजन सुरु आहे.

महापौर :- मला लिखीत दिले आहे. कर विभागाने स्पष्टीकरण दयावे.

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, मालमत्ता विषयामध्ये जे जे ऑब्जेक्शन प्राप्त झाले असतील त्या त्या क्रायटेरियामध्ये जे क्लासिफाई केलेले अधिकारी आहे त्यांच्याकडे ते प्रकरणे दाखल करण्यात येते.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आपला मुळ  मुद्या असा आहे की एखादया जुन्या घरामध्ये काहीच बदल झाला नाही एक टक्कपन बदल झाला नाही. त्यांना चुकीचे देयके गेले असेल तर त्याचे रिव्हीजन करीत आहे काय ?

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, रिव्हीजन चालु आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, यामध्ये दुसरा मुद्या शास्तीचा आहे. लोकप्रतिनिधींकडे अनेक लोक येतात मी काल पेपरला वाचले की आपल्या समितीने पण मा.आयुक्तांना विनंती केली आहे की त्यांच्या अधिकारात  आपण ही शास्ती वन टाईम माफ करायची ती काय टक्केवारी असावी हा प्रशासनाचा मुद्या आहे. परंतु माझ्या प्रभागातील एका व्यक्तीला मी पत्र दिले की याची ही परिस्थिती आहे ती तपासून याला काहीतरी टक्केवारीनी आयुक्तांच्या अधिकारात शास्ती माफ करावी. असे प्रकरणांमध्ये वयक्तीक प्रकरणाकडे लक्ष देऊन शास्ती माफ करण्याचे प्रकरणे बंद आहे की सुरु आहे. किंवा याच्या आधी सुरु होती आणि आता बंद आहे. मा.बांगर साहेब असतांना ती सुरु होती आणि मुंढे साहेबांना त्या प्रकरणाकडे बघायला वेळ नसेल किंवा वेळ लागणार असेल तर ती सुरु आहे काय ?  असे प्रकरणे मा.आयुक्तांकडे चालले आहे काय ?

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, यामध्ये आयुक्तांचा विवेकाअधिकार आहे.

आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सभागृह हा जो विषय आहे शास्ती आणि इंटरेस्ट माफ करण्याबाबत त्यामध्ये इंडीव्हीज्युअल केसेसमध्ये कधीही निर्णय होत नसतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर याच्या आधी मा.मेश्राम साहेब समजा येथे असतील किंवा अनेक सहा.आयुक्त येथे बसले आहे. असे अनेक इंडीव्हीजुअल केसेस गेल्या आणि शास्ती माफ झाली काय ?

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, या पुर्वी झालेले आहे.

आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सभागृह अगोदर काय झाले असेल ते तपासून घेईल, विषय असा आहे की आपल्याकडे लावल्या जाते. त्यामध्ये १ वर्षाचा असेल किंवा ६ वर्षाचा असेल तर त्याला आपण पेनॉल्टी चार्ज लावतो. ६ वर्षाच्या पाठीमागे जाता येत नाही. ६ वर्षाचे असेसमेंट करु शकतो. आपली रेव्हेन्युची जी स्थिती आहे आणि रिकव्हरी आहे ते बघता माझी मनस्थिती जी आहे ओ.टी.एस. देण्याच्या मी मनस्थितीत नाही किंवा कोणतीही पेनॉल्टी माफ करण्याच्या मनस्थितीमध्ये नाही. परंतु पाठीमागे काय झाले आहे याचा मी अभ्यास करेल, प्रॉपर्टी टॅक्सचे इनकम कमी आहे. असेसमेंट झाले आहे त्यामध्ये जे रुल्स् आहे असेसमेंट होत आहे आणि जी पेनॉल्टी आहे आणि इंटरेस्ट आहे. तो पेमेंटसाठी आहे त्याच्यावरती वेगळा विचार करण्याच्या मी मनस्थितीमध्ये आहे.

श्री.महेंद्र धनविजय :- मा.महापौरजी वर्ष २०१० पासून आपण शास्तीचा नियम लागू केला आहे. २ टक्के प्रतिमहिना प्रमाणे आपण शास्ती लावली आहे. मा.आयुक्तांना मी माहिती देतो की सन २०१३-२०१४ पासून ही बकाया वसुली जी आहे ती ७५ टक्के होती आणि २०१८-२०१९ मध्ये २२ टक्क्यावर आली. ही वसुली वर्षानुवर्ष

घटत चालली आहे. आणि जानेवारी २०२० मध्ये ती १८ टक्क्यावर आली आहे. बकाया रक्कम वाढत चालली आहे म्हणुन याच्यावर शास्ती माफ करणे गरजेचे आहे जेणेकरुन वसुलीचे जे प्रमाण आहे ते वाढेल ही सर्व लक्षात घेतल्यानंतरच समितीने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मा.महापौरजी आपण नागरिकांची भावना लक्षात घेता वन टाईम सेटलमेंट स्कीम राबवावी जेणेकरुन कर वसुली जास्तीत जास्त प्रमाणात वाढेल, आणि म्हणुन आपणास विनंती करतो की वन टाईम सेटलमेंट स्कीम लागू करावे.

श्री.जमाल :- मा.महापौरजी, इसके पहले २ बार शास्ती माफ करने का निर्णय लिया गया था, हमारे शहर के अंदर काफी गरीब लोग है हमारे यहा स्लम ऐरिया की शास्ती १०० टक्के माफ करना चाहियें उसी प्रथा को चालु किया जाये तो शहर वासियोंको राहत मिलेगी ।

श्री.राजेंद्र सोनकुसरे :- मा.महापौरजी, मालमत्ता कराची डिमांड पोहचत नाही. मागील कित्येक दिवसांपासून लोकांना आऊटर भागामध्ये डिमांड मिळाली नाही. त्यामुळे मालमत्ता कर वेळेवर भरल्या जात नाही हे बरोबर नाही आणि त्यांच्यावर शास्ती ही लादली जाते. या कर विभागामध्ये जे कर्मचारी आहे ते कर्मचारी इतर विभागामध्ये असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या करामध्ये जी तफावत आहे त्यामध्ये इतर विभागामध्ये ११ राजस्व निरीक्षक आणि एकुण १९ कर्मचारी आहे. कर विभागाने लेखा व वित्त विभागाकडे पाठविले तर निश्चितच नागपूर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल, आऊटर भागामध्ये उत्पन्न वाढीमध्ये मदत होईल. मा.महापौरजी आपणास माहिती आहे की नागपूर शहरामध्ये उत्पन्न वाढीमध्ये मा.आयुक्त साहेबांनी निधी अभावी थांबविण्यात आले असल्याचे सांगितले आहे. एकीकडे मालमत्ता कर या विभागाकडे दुर्लक्ष असल्याचे दिसुन येत आहे. इतर विभागामध्ये जे राजस्व निरीक्षक जे कर संकलन करण्यासाठी जे जातात त्या संदर्भामध्ये ती संख्या वाढविण्यात यावी आणि तेथे त्यांना पाठविण्यात यावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, शास्ती माफ करण्यासंदर्भात मा.आयुक्तांनी निवेदन दिले त्यांनी त्यांचे अभिमत सांगितले. मा.महापौरजी टॅक्स बायलॉज जुन्या कायदयामध्ये होते पण शास्ती कधीपासून लावत आहे. नविन कायदा आला तेव्हापासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आला तेव्हापासून आता हे लावत असतांना शास्ती केव्हा लावणे गरजेचे आहे. त्याला डिमांड दिल्यानंतर तर आपण त्याला शास्ती लावली पाहिजे. या मताशी मी अशंत: सहमत आहे. मा.महापौरजी कार्यालयीन प्रक्रीया समजून घ्यावी, वेळेवर डिमांड देत आहे काय ? शहरामध्ये सर्वात मोठा थकबाकीदार मी आहे. पटलावर बोलत आहे. माझ्या नावे सर्वात मोठी थकबाकी कराची रक्कम आहे. का आहे. याचे ज्यावेळेस रिअसेसमेंट झाले त्यावेळी कुठलिही नोटीस दिलेली नाही. आणि माझ्या नावाने कधीही डिमांड आलेली नाही. २-२ वर्ष डिमांड आली नाही म्हणुन शहरामध्ये दोन गोष्टी आहे. एक आहे ओपन प्लॉटच्या संदर्भात आणि एक आहे बांधीव क्षेत्राच्या संदर्भात. ओपन प्लॉटच्या संदर्भातले भुखंड घेऊन ठेवले अनधिकृत भुखंड असतील काही मंजूर लेआऊट मधील भुखंड असतील, आपण असेसमंट कधी पासून करतो. कुठल्या भुखंडाचे असेसमेंट करण्याची कार्यपध्दती घेतली. मागच्या वेळेस ठाकरे साहेबांनी विषय केला की १/०४/१९७० पर्यत् सर्व कर जे ३४ खेडे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अंतर्भुत झाले होते. आणि १/०४/१९७० पासून राज्य शासनाचे कुठलेही डायरेक्टीव्ह आलेले नाही. म्हणुन आपल्या अधिका-यांनी सरसकट शेतीच्या जमिनीला सुध्दा प्रॉपर्टी टॅक्स लावला. आता शेतीच्या जमिनीला प्रॉपर्टी टॅक्स कशाच्या आधारावर लावला, रेन्ट चार्टच्या आधारावर, समजा रेन्टचार्ट मध्ये ५ एकर जमिनी असेल तर लाखोच्या घरामध्ये तो प्रॉपर्टी टॅक्स डिमांड आहे त्यामुळे मोठया प्रमाणामध्ये थकबाकीदार वाढले, आणि त्याच्यावर त्यांनी टॅक्स भरला नाही म्हणुन त्याच्यावर शास्ती लावली . आपल्या बायलॉजमध्ये कुठलिही प्रॉपर्टी आयडेंटीफाय झाल्यानंतर प्रॉसपेक्टीव्ह इफेक्टनी पुढच्या क्वॉर्टर पासुन आपल्याला कराधान करणे गरजेचे आहे. आता गफलत कुठे झाली. कायदयाप्रमाणे प्रॉसपेक्टीव्ह इफेक्ट आहे. मात्र नविन कायदयामध्ये त्याला ६ वर्ष बॅक जाता येते. मा.महापौरजी, आता ६ वर्ष बॅक जातांना २०१५ मध्ये ज्यावेळी आपण त्याचे पुर्नमुल्यांकन करीत आहेत. की आता नविन प्रॉपर्टी आयडेंटीफाय झाली आपण ६ वर्ष बॅक गेलो म्हणजे काय आपण २००९ पासून टॅक्स लावत आहे. आता २००९ पासून टॅक्स कुठल्या कायदयाअंतर्गत लावत आहे. शहरामध्ये २०१४ पासून कायदा अस्तीत्वात आला. त्याचा

कर आपण २००९ पासून लावत आहे. मा.महापौरजी मी या ठिकाणी चुका सांगत आहे. २०१५ पासून लोक आक्षेपमध्ये गेले. आपल्या आक्षेप अधिका-यांनी अनेक उदाहरण मी आता माहितीच्या अधिकारात मागितले की मागील ५ वर्षामध्ये आक्षेप अधिका-यांनी किती किती आक्षेप अर्जावर निर्णय दिला. आणि मी तुम्हाला दाखवितो की परस्पर विरोधी निकाल या ठिकाणी झाले आहे. एका निकालपत्रामध्ये आक्षेप अधिकारी म्हणतात की प्रॉसपेक्टीव्ह इफेक्टनी कराधान झाले पाहिजे. एका निकालपत्रामध्ये आक्षेप अधिकारी म्हणतात की ६ वर्ष जुन्याप्रमाणे जाता येते. कायदा येऊन ६ वर्ष झाले आज तुम्हाला ६ वर्ष मागे जाता येते परंतु २००९ मध्ये जाता येते काय अशा प्रकारच्या अनेक डिमांड या संदर्भात मोठया प्रमाणात न्यायालयामध्ये आहे. मा.महापौरजी, दुसरे टॅक्स बायलॉज आज अस्तित्वात आहे की नाही हा प्रश्न मी अनेकदा उपस्थित केला. पण त्याचे उत्तर अजिबात आलेले नाही. टॅक्स बायलॉज रद्य करण्याचा ठराव सभागृहात सर्व संम्मतीने केला मात्र राज्य शासनाने तो मंजूर केलेला नाही. जो पर्यत राज्य शासन अंतिम मंजूरी प्रदान करीत नाही तो पर्यत या नविन कायदयामध्ये सेव्हींग क्लॉज् आहे या सेव्हींग क्लॉजमध्ये सर्व बायलॉज आज अस्तित्वात आहे. आता बांधीव क्षेत्राचे क्षेत्रफळ हे जे प्रकरण ८ मध्ये लिहीले आहे बांधीव क्षेत्र जोत्याचे क्षेत्र ही जुन्या टॅक्स बायलॉज मधील बांधीव क्षेत्र यातील आहे. सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांना त्यामधील विस्तृत माहिती आहे. कुठले कुठले क्षेत्र वगळले पाहिजे. त्यामध्ये पॅसेजेस वगळले पाहिजे, टॉयलेट असेल, पोर्च असेल तरे वगळला पाहिजे. आता आपण जोत्याचे क्षेत्र काढत असतांना सरसकट त्याच्यातुन १५ टक्के क्षेत्र वजा करीत आहे. मा.महापौरजी, ज्या जुन्या टॅक्स बायलॉजमध्ये बांधीव क्षेत्र म्हणजे कारपेट ऐरिया म्हटले आहे. हे सर्व प्रकरणे आहे त्यामुळे अनेक मालमत्ता धारकांना विलंब होत आहे. पण ज्या खाजगी ऐजन्सीला बिल वाटण्याचे जे काम दिले. पेपरमध्ये अनेकदा बातम्या आल्या की पोस्ट ऑफीस समोर बिले पडले आहे. नाल्यामध्ये बिल पडले आहे आणि त्याच्यावर आपण शास्ती लावत आहे. या प्रकरणाचा निपटारा करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या प्रकरणामध्ये झोन स्तरावर वेगवेगळया झोनमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आहे. वेगवेगळे निर्णय घेत आहे. कायदा एक आहे. प्रॉपर्टीच्या विश्लेशन एक मात्र त्या संदर्भातील अहवाल वेगवेगळा आहे. आता ओपन प्लॉटच्या संदर्भात रेन्ट चार्ट आपण कशाच्या आधारावर निर्धारीत केला. विभागाकडून एखादया ओपन प्लॉटच्या किराया पत्र नाही. पुरावा नाही आणि आपण रेन्ट चार्ट हा रेडी रेकनरच्या आधारावर केला आहे. आपण रेडी रेकनर बेस व्हॅल्यु ही रद्य केली. परंतु रेन्ट चार्ट निर्धारीत करीत असतांना त्यामध्ये अनेक चुका झालेल्या आहेत. आता रेडी रेकनर मध्ये सुध्दा अनेक भागामध्ये चुका आहे. रामदास पेठचा रेडीरेकनर बाजार भावापेक्षा कमी राहील, आणि अत्यंत कमी आ हे. मात्र सिताबर्डी भागातील अनेक वस्त्यामधील रेडीरेकनर बाजार भावापेक्षा कितीतरी अधिक आहे. आता त्यांना अधिक कशाला लागत आहे. ज्यांना अधिक लागायला पाहिजे धरमपेठ, रामदास पेठ मधील लोकांना त्यांना कमी लागत आहे. मा.महापौरजी या सर्व चुका आपण प्रशासनाच्या माध्यमातून न सोडविता सरसकट शास्ती लावण्याचा जो निर्णय घेत आहे आणि ती शास्ती रद्य करण्यासंदर्भात आम्ही तत्कालीन आयुक्तांना विनंती केली त्या विषयाच्या अनुषंगाने आपण निर्णय घेतला पाहिजे. मग आयुक्तांनी निर्णय घेणे सुरु केले. निर्णय घेत असतांना कुणाला ५० टक्क्यांची माफी, कोणाला ८० टक्क्यांची माफी, कोणाला ७० टक्क्यांची माफी , मी निवेदन केले की असे डिसक्रीमीनेशन आपण शास्तीच्या संदर्भात देता काम नये, सरसकट ज्यांनी आक्षेप घेतला १५(२) मध्ये नोटीस न देता असेसमेंट निश्चीत केले, डिमांड दिली नाही. तो आक्षेप घेत आहे की मला डिमांड नोटच मिळाली नाही. त्याची रिसीव्हीडमध्ये कुठलिही स्वाक्षरी नाही. ती डिमांड प्रलंबित आहे. अपिल अधिका-यांना त्यामध्ये निर्णय घेणे अभिप्रेत आहे.आपले अधिकारी निर्णय घेत नाही आणि यामध्ये शास्तीची रक्कम वाढत आहे. मा.महापौरजी अनेक प्रकरणामध्ये ४-४, ५-५ वर्षामध्ये निर्णय झाले. आपले सुनावणी अधिका-यांनी निर्णय घेतले त्यानंतर संबंधित भुखंडधारकांना कमुनिकेट झाले नाही. कमुनिकेट ४-४ वर्ष झाले नाही. माझ्याकडे उदाहरणे आहे. ४-४ वर्ष तो निर्णय संबंधितांना कमुनिकेट झाला नाही. आणि म्हणुन ते थकबाकीदार झाले. अनेक केसेसमध्ये असे निर्णय झाले ते रिवर्ड केले. की फेर असेसमेंट करा, मा.महापौरजी तो आदेश आल्यानंतर ४ वर्षापर्यत जर त्यानी फेरअसेसमेंट केले नाही आणि त्या अनुषंगाने सुधारीत डिमांड दिली नाही तर आपण नविन डिमांडवर शास्ती कशी लावत

आहे. हे प्रश्न आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण सरसकट निर्णय म्हणजे याचा असा अर्थ नाही की कोणी मुद्यामपणे टॅक्स भरत नाही. मात्र आपण या दोष दुरुस्ती जर आपण पुर्ण केल्यात तर आपण शास्तीच्या संदर्भात निर्णय घेण्यास मोकळे आहेत. या दोष दुरुस्त्या तशाच ठेवुन शास्ती आपण काढणार नाही ही जर प्रशासनाची भुमिका असेल तर त्या भुमिकेशी आमची असहमती आहे. त्यामुळे शास्ती रद्य करण्याच्या संदर्भात एक निर्णय आणि फक्त शास्ती रद्य करुनही चालणार नाही. ही शास्ती का लागते, लावण्याची गरज का भासते, याच्या संदर्भात किती केसेस प्रलंबित आहे याची सुध्दा तपशीलवार माहिती घेऊन त्या अनुषंगाने आपण निर्णय घ्यावा, प्रशासनाला ॲमिनीटी स्कीम घोशीत करण्यासंदर्भामध्ये आदेश दयावे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, कर संकलन आणि कर आकारणीची डिमांड काढत असतांना अनेक विलंबाने कर त्रुटया आहेत. ४२००७ रुपयांची शास्ती लागली आहे. आणि त्याच्या मोबाईल वर मॅसेज येत आहे. की ३१/०३/२००८ च्या आतमध्ये १६९२५ रुपये भरुन संपुर्ण रक्कम आपण अदा करावी. अशा पध्दतीने चुकीची डिमांड जर येत असतील तर त्या टॅक्स धारकांनी कशा पध्दतीने महानगरपाकिलीकेमध्ये जाऊन शास्ती घर टॅक्सचे भुगतान करण्याकरीता त्यांनी तत्परता दाखवावी. म्हणजे अशा पध्दतीने चुकीचे शास्तीची आकारणी केली जात असेल तर निश्चित रुपाने नागपूर शहरामध्ये अशा अनेक त्यामुळे डिमांड मिळत नाही त्यामुळे अनेक लोक ती भरत नाही. आणि ते जर अधिकार मा.आयुक्तांना आहेत तर निश्चित रुपाने या पुर्वीचे आयुक्त ते करीत होते. जे गरजु व्यक्ती असेल किंवा स्लममध्ये जी घरकुल योजना, रमाई योजनेला राज्य शासनाकडून जे लोन मिळत आहे. त्यांना अनुदान मिळत आहे. त्या अनुदानाच्या भरवश्यावर घरकुल बांधत आहे. स्लम विभागामध्ये प्रयत्न करीत आहे. परंतु त्यांना करंटची टॅक्स रिसीप्ट मागण्यात येते परंतु त्यांना शास्ती माफ करण्यासंदर्भात् अनेक लोक नगरसेवकांकडे येत असतात याच्या पुर्वीचे आयुक्त ते करीत होते.शास्ती माफ करण्यासंदर्भात तेवढे रुपये त्यांच्याकडे नाही आहे. टॅक्सची रिसिप्ट मागत आहे त्यामुळे मा.आयुक्तांकडे जाऊन आम्ही प्रयत्न करतो परंतु सरसकट असे ऐकायला मिळाले दटके साहेबांनी तो प्रश्न टाकला निश्चित सर्व नागपूर शहराच्या दृष्टीकोणातून योग्य आहे. यावर निश्चितरुपाने आयुक्तांनी आपल्या सदसदविवेकबुध्दीचा विचार करुन नागरिकांना न्याय दयावा. (बेल)

वरील चर्चेनंतर महानगरपालिकेच्या प्रशासनाची यामध्ये दिरंगाई नजरेस येत आहे. हा शहरातील गोरगरीब जनतेचा प्रश्न आहे. सभागृहाचा मानस लक्षात घेता २९ तारखेच्या आंत सभागृहाचे सर्व गटनेते उपमहापौर, स्थायी समिती सभापती, प्रमुख पक्षाचे जेष्ठ नगरसेवक यांच्या सोबत बसून या विषयावर चर्चा करण्याकरिता आयुक्तांनी बैठक बोलवावी, त्यानंतर निगम आयुक्तांना शास्ती माफ करण्याबाबत किंवा कमी करण्याबाबत विनंती करण्यात येईल. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७० / विषय क्र. ६३ (नोटीस)</u> :-** स्मार्ट सिटी प्रकल्प हा नागपूर महानगरपालिका अंतर्गत येतो का? व येत असेल तर मनपाच्या आर्थिक सहभाग किती व तसेच स्माटी सिटी प्रकल्पा अंतर्गत चालणाऱ्या प्रकल्पा संदर्भात"

**(स्मार्ट सिटी विभाग)**

**(मा.श्री. प्रवीण दटके)**

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील (जे) "१"प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून प्रशासनाने या अनुषंगाने पुढच्या सभागृहात अहवाल सादर करावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७१ / विषय क्र.६४ (नोटीस)</u>** :-महानगरपालिकेच्या स्लम विभागाच्या मार्फत स्लम भागामधील घराच्या मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम नसलेल्या ईमारतींवर दिलेल्या नोटीसवर उप किंवा अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेल्या आजपर्यंतच्या अपिलांवर काय निर्णय झाले व झालेल्या निर्णयाव काय कार्यवाही झालीसंदर्भात"

**(नगर रचना विभाग)**

**(मा.श्री. प्रवीण दटके)**

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील (जे) "१" प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून प्रशासनाने या अनुषंगाने पुढच्या सभागृहात अहवाल सादर करावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७२/ विषय क्र.६५ (नोटीस) :-**
**(नगर रचना विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

"१) विनापरवानगी हस्तांतरण तसेच यापुढील करण्यास परवानगी देणे. २) विनापरवानगी वापरात बदल हस्तांतरणतसेच यापुढील वापरात बदल करण्यास परवानगी देणे. ३) विनापरवानगी बांधकाम तसेच यापुढील बांधकामास पुर्व परवानगी देणे. ४) विनापरवानगी तारण केल्यास तसचे यापुढे तारण करण्यास पुर्व परवानगी देणे. ५) भुखंडाचे विभाजन करण्यास परवानगी, वार्षीक भुभाडे व नुतनीकरणास विलंब झाल्यास कारण्यात येणारे शुल्क निश्चित करणे. ६) भुखंडाचे मालकी हक्क देण्याचा पर्याय खुला करणेसंदर्भात

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील णे नोटीसप्रमा " (जे) "१"सभागृहाने विचारात घेऊन स्थापत्य व विद्युत प्रकल्प विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७३ / विषय क्र.६६ (नोटीस) :-**
**(साप्रवि)**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत मनपा मध्ये भाडे तत्वावर चालू असणाऱ्या टॅक्सीवर (गाडीवर) संदर्भात

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रमाणे नोटीस " (जे) "१"सभागृहाने विचारात घेऊन विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७४ / विषय क्र.६७ (नोटीस) :-**
**(नगर रचना विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामाची समस्या लक्षात घेता नागपूरमहानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२,५३,५४ अंतर्गत कारवाई करण्यात येते. महानगरपालिकेच्या या कारवाई विरुद्ध नागरिक दाद मागण्यास शासनाच्या नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई येथे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४७ अंतर्गत अपिल दाखल करण्यास जात असतात. तसेच याबाबत पाठपुरावा करण्यास मुंबई येथे वारंवार जावे लागते तसेच या कारवाईच्या अनुषंगाने अपिल प्रकरणा संदर्भात कारवाई करण्यास प्रशासनाला अनेकवेळा संभ्रम निर्माण होतो. अपील प्रकरण निकाली काढण्याची प्रक्रिया किचकट स्वरुपाची आहे. मुंबई येथे वारंवार जाण्यामुळे नागरीकांना मोठा आर्थिक भार सोसावा लागतो. तसेच वेळ सुद्धा यामध्ये जातो. या विषयी नागपूर शहर स्थरावर कोणतीही शासकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याने प्रशासनाला तसेच नागरीकांना याचा त्रास होतो. प्रकरणे निकाली काढण्यास अडचण निर्माण होते. या सर्व बाबीचा विचार करता नागपूर महानगरपालिका सभागृहात याबाबत चर्चा करण्यात आली होती. या अनुषंगाने प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये (कलम २६०, २६७) कारवाई करण्याबाबत प्रशासनाला निर्देश दिले होते.

तेव्हा प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलमानुसार कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली. तसेच यावर अपील, रिव्हीजन संबंधित यंत्रणा उभारण्यास प्रशासनाने कोणती कार्यवाही केली या संदर्भात''

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ) "१"जेप्रमाणे नोटीस " सभागृहाने विचारात घेतला

श्री. प्रविण दटके :- नोटीस क्र ६७ वर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. हे का होत नाही आजपर्यंत मला कळले नाही. मा.नविन आयुक्त महोदय रुजु झाले आहे. मी नाशिक महानगरपालिकेवरुन दोन नोटीस मागितला आहे. हा पहिला आणि दुसरा हा विषय या सभागृहाने ठराव क्र ७४ दिनांक २०/७/२०१७ रोजी मंजूर केला. यावर काय कारवाई झाली संबंधित विभाग प्रमुखांनी किंवा उपायुक्तांनी सांगावे.

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, या विषयासंदर्भात ज्या अनधिकृत बांधकामावर एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ५३ व ५४ अन्वये नोटीस दयावी किंवा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे २६० आणि २६७ अन्वये कारवाई करावी हा विषय आहे. महासभेने ठराव क्र ७४ दिनांक २०/०७/२०१७ रोजी हा विषय मंजूर केला होता. त्यानंतर या ठरावाची अंमलबजावणीसाठी नगररचना विभागाने ३/०८/२०१७ रोजी तत्कालीन मा.आयुक्तांकडे सादर केला होता. परंतु या ठरावांना अंमलबजावणीसाठी पुन्हा लिगल ओपीनियन त्यांनी ७/०८/२०१७ ला मागितले होते. नंतर २० /०८/२०१७ रोजी लिगल ओपिनियन आले असता २०/०८/२०१८ ला तत्कालीन मा.आयुक्तांकडे हा विषय पुन्हा अंमलबजावणीसाठी सादर केला होता. परंतु तत्कालीन आयुक्तांनी फेर सादर करण्याकरीता २०/०७/२०१८असे होतांना बांगर साहेबांच्या कालावधीपर्यंत ला अंमलबजावणी आणि अंतिम निर्णय झालेला नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, सभागृहाने ठराव पारीत केला आहे आणि हा ठराव चुकीचा आहे काय ? किंवा एम.एम.सी ॲक्टला धरुन नाही काय ? याचे कारण मी सांगतो. मा.महापौरजी आपण जो नोटीस देतो ५३ आणि ५४ चा त्याच्यावर स्टे घेण्याकरीता अनेक प्रकरण आहे. आणि वर्षो नी वर्ष स्टे नसतांना फक्त अपील फाईल असतांना कुठलिही कारवाई महानगरपालिका करीत नाही. आणि असे इल्लीगल बांधकाम विशेषत: कंजेस्टेड वस्त्यांमध्ये होत आहे. अनेक बाजार पेठामध्ये एका दुकानात २०० कर्मचारी काम करीत आहे. एकाही कर्मचा-याला सायकल ठेवण्याच्या मालकीची पण जागा नाही. ५०० मिटरचा मेट्रो रिजनचा एक विषय आला. दोन्ही साईडला ५०० मिटरच्या आत कसे बांधकाम करायचे याचे निकष तयार झाले. हे सर्व तयार होत असतांना असे बांधकाम रोज शहरात होत आहे. आणि असे जर निर्णय नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर झाले तर या नागपूर शहर इल्लीगल बांधकामपासून मुक्त राहील, आपल्याकडे फान सज्जन आयुक्त आाले आहे. ते नाशिकला पण होते. त्यामुळे त्यांच्यामार्फत उचित कारवाई या विषयामध्ये होईल असा मला विश्वास आहे. म्हणुन हा विषय नोटीसव्दारे येथे आणला आहे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह हा जो एम.आर.टी. ॲक्ट आणि एम.एम.सी. ॲक्टचा जो इशु आहे. तो यानीच घ्यायचा की त्यांनीच घ्यायचा असे यामध्ये कंम्पलशन नाही. परंतु इंडीव्हीज्युअल केस असतील ते केस नुसार विषय घेऊन पुढे जाऊ.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ५३ आणि ५३ च्या नोटीस कुठल्या प्रकरणात देतात हे समजून सांगण्यात यावे.

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, एम.आर.टी.पी ॲक्ट १९६६ कलम ५३ च्या नोटीस देतो त्याला ३० दिवसाचा कालावधी असतो. त्यामध्ये २४ तासाचा सुध्दा आहे पण १५ दिवसात त्याने स्पष्टीकरण सादर करण्याबाबत सुध्दा नोटीस आपल्याला एम.एम.सी. ॲक्ट नुसार देता येतो. परंतु कलम ५३ अन्वये ३० दिवसाचा नोटीस देतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, प्रकरणे कसे ठरेल ५२ आणि ५३ चे माझा मुळ मुद्या असा आहे की प्रकरण टु प्रकरण कॅरी कसे होईल, याच्या आधी जो नोटीस होता त्या संदर्भात म्हटले होते की याच्या आधीचा नोटीस पटलावर ठेवावा तो विषय असा आहे की स्लम वस्त्यामध्ये थ्री झेडचा नोटीस देतो. आपल्या स्लम अधिका-यांकडे अपील होते. त्या निर्णयावर आपल्याला जिल्हाधिका-यांकडे जावे लागते. असे अनेक प्रकरणे प्रलंबित पडले आहे. एक तर ते स्लम राहिले नाही. महानगरपालिका ते प्रकरण डि नोटीफाईड करीत नाही. आणि

स्लमला श्री झेडचा नोटीस देऊनही बांधकाम होते. त्यामुळे या प्रकरणात प्रकरण टु प्रकरण नोटीस कसा देतो याची माहिती दयावी.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, या प्रकरणामध्ये ५३ ची नोटीस देऊन ३० दिवसात जर कार्यवाही होत नसेल तर अधिका-यांवर कोणती कार्यवाही होईल.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, हा तर वेगळा विषय आहे. असे अनेक प्रकरणे आहे की ज्यामध्ये अनेक अधिकारी घरी जाईल, साहेबांना जर २ ते ३ सभागृहाच्या अगोदरचा जर अहवाल दिला तर मा.महापौरजी ही नोटीस ५२ आणि ५३ ची कुठल्या प्रकरणामध्ये देऊ शकतो. आणि एम.एम.सी. ॲक्ट प्रमाणे कुठल्या प्रकरणात देऊ शकतो.

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, बांधकाम परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये दाखल होते. ४५ अन्वये आपण मंजूर करतो किंवा नामंजूर करतो परंतु ४७ चा अपिल हे मंजूर वा नामंजूर ही शासनाकडे करु शकतात. नामंजूर केलेल्या प्रकरणावर ४७ चा अपिल ग्राहय होत नाही. एखादयाने प्रस्तावित केलेला नकाशा आपल्या स्तरावर जरी ठरविला तरी त्याला तो मान्य नसेल तरी त्याला ४७ अन्वये शासनाकडे जाऊ शकतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०७,२६१,२६४,४४८, अन्वये या नोटीस दिला ही कुठले कलम आहे याच्यावर सही आहे उपअभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी, नगररचना विभाग हा मी नाशिक वरुन मागितला. आणि याच्यामध्ये दुसरा नोटीस कलम २६०,६१,६४,६७, ४७८ याच्यावर सही करणारा अधिकारी आहे कार्यकारी अभियंता किंवा पदनिर्देशित अधिकारी नगररचना विभाग, नाशिक महानगरपालिका, येथे एम.एम.सी. ॲक्ट आहे म्हणुन

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, एम.आर.टी.पी. ॲक्ट अंतर्गत सेक्शन ५३ ची नोटीस दिल्यानंतर कलम ४३ मध्ये अपिल होऊ शकत नाही. तो सिव्हील कोर्टामध्ये जाउु शकत नाही जो पर्यत ४४ अंतर्गत बांधकाम परवानगीसाठी अर्ज करणे ४५ अन्वये अपिल करु शकतो. आपल्या येथे ५३ च्या नोटीसच्या विरुध्द सुध्दा बरेच जन अपिलमध्ये जातात ते ग्राहय होत नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, माझा हाच मुद्या होता. जर ते ग्राहय होत नाही. तर अशा इल्लीगल बांधकामावर कारवाई का होत नाही. यामध्ये काय कारवाई अपेक्षित आहे. आणि ज्या अधिका-याने कारवाई केली नाही त्यांच्यावर काय कारवाई अर्पेक्षित आहे. आणि दुसरे मा.महापौरजी, मुंबईच्या अर्बन मिनीस्ट्रीमध्ये मी अपिल मध्ये गेलो . अपिल म्हणजे स्टे होते काय ? याचे स्पष्टीकरण दयावे. कारण प्र फुल्लजींने सांगितले की टॅक्सच्या संदर्भात झोन टु झोन निर्णय कॅरी होतात. तसे या प्रकरण झोन टु झोन निर्णय ग्राहय होत आहे.

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, कलम ४७ चा अपिल शासनाकडे सादर होतात सुनावणी देऊन निर्णय देण्यासंदर्भात

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, कलम ४७ मध्ये अपिल करुन पत्र येते की या संबंधातील अहवाल पाठवावा, तर अहवाला पाठवावा हा स्टे असतो काय ?

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, अहवाल पाठविणे म्हणजे स्टे नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ३० दिवसानंतर नोटीसची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर जर त्या प्रकरणात स्टे नसेल तर आपण कारवाई करु शकतो काय ?

सहा.संचालक,नगररचना (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, करु शकतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, कारवाई करु शकतो तर अशा सर्व प्रकरणाची एकतर आयुक्तांनी आपल्या स्तरावर या संबंधी सर्व माहिती घ्यावी. हे प्रकरण यासाठी आहे की आमच्या भागामध्ये प्रचंड त्रास आहे. फोर व्हीलर ठेवायला जागा नाही आणि ५-५ मजली बिल्डींग बांधत आहे. एका दुकानात ५०० कर्मचारी काम करीत आहे आणि सायकल ठेवायला जागा नाही. आणि श्री झेडचा नोटीस देऊन स्लमचा गैरवापर करीत आहे. एम.एम.सी. कायदा आपल्याकडे आहे. तर या एम.एम.सी. कायदयाअंतर्गत आपण कारवाई का करीत नाही.

महापौर :- याच्यामध्ये जर स्पेसिफीक तक्रारी असेल तर दयाव्यात.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, स्पेसीफीक हा मुद्याच नाही. ज्या सदसदविवेक बुध्दीने आपण सांगितले की माझ्या मनात कोणाचीही शास्ती रद्य करण्याचा विचार नाही. सरसकट निर्णय आहे. त्यांनी म्हटले आम्ही खाली बसलो. कारण तो त्यांचा अधिकार आहे. याच्यामध्ये कुठलेही स्पेसीफीक प्रकरण मला सांगायचे नाही. कर्तव्यदक्ष प्रशासन आहे त्यांनी सर्व प्रकरणे मा.आयुक्तांसमोर ठेवले पाहिजे. स्पसेफीक काय सांगायचे, जेव्हा माझे काम आहे तेव्हा मी सदसदविवेकबुध्दीने सांगेल, जेव्हा नागरिकांचे काम आहे. लोकांना त्रास होत आहे तर ही प्रकरणे का सांगायचे आम्ही. त्यामुळे आपल्याला माझी विनंती आहे आपण आदेश दयावे की असे संपुर्ण प्रकरण याचा सर्व अहवाल आयुक्तांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, प्रविणजीने जो प्रश्न किया इसमे स्लम बस्तीयो का उल्लेख प्रविणजी के प्रश्न मे है, मा.महापौरजी, इसी सभागृह मे मैने प्रश्न किया था की स्लम बस्ती मे अगर कोई अनधिकृत बांधकाम हो रहा है तो उसपर कारवाई करने का अधिकार किसको है। मा.महापौरजी, प्रशासन ने खडे होकर के कहा था की इसपर कारवाई करने का अधिकार हमे है। मा.महापौरजी मैने एक प्रकरण बताया था और उसमे मैने निवेदन किया था प्रशासन ने उसपर कारवाई क्यौ नही की, मैने स्पेसीफिक प्रश्न किया था उस समय ऐसा उल्लेख किया गया की संबंधित प्रकरण मे नागपूर म्युनिसीपल कार्पोरेशन को उन्होने कोर्ट मे स्टे दिया है, स्लम यह म्हाडा ने घोषित कया हुआ स्लम है। इसपर हम निर्णय ले सकते है दुसरी जगह हम निर्णय नही ले सकते। उस दिन मैने सभागृह मे प्रश्न किया था की घोषित स्लम मे हम किस नियम के अंतर्गत कारवाई करेंगे, और मैने पुछा था की स्लम घोषित करते समय उसकी परिभाषा क्या है। मै बार बार उल्लेख नही करना चॉहता। मै जिस प्रभाग मे रहता हु वहापर चंद्रलोक बिल्डींग है वह स्लम मे आती है। सेवासदन बिल्डींग ५ मंज्जील की है वह स्लम मे है। पुरा गांधीबाग का सेंट्रल ऐव्हेन्यु रोड स्लम मे है। ९९ प्रतिशत इतवारी स्लम मे है। महल स्लम मे है अगर यह स्लम मे है। हम जहा बैठे है यह भी स्लम मे है। मा.महापौरजी यह सारा का सारा स्लम है तो अस्लम कौन है। मा.महापौरजी, मेरा यही निवेदन है की अगर ऐसी बस्तीयों मे कानुन की त्रुटीयों का फायदा लेकर के अगर अनधिकृत बांधकाम कोई करता है, बहोत दुख के साथा कहना पडता है, मेरे प्रभागा मे २५० स्केअर फुट की जगह पर एक पॉच मंजील बिल्डींग खडी हो गयी थी। उसने सोनपापडी का कारखाना चालु किया, सोनपापडी का कारखाना चालु हुआ। सोनपापडी महानगरपालिका के पानी से अच्छी बनती है तो कुवें का पानी अच्छा नही रहता। इसलिये उसने अपने ग्राउंड प्लोअर मे बेसमेंट मे टाका बनाया और पानी जमा किया। मा.महापौरजी, बेसमेंट मे नही ग्राउंड फलोअर मे बनाया और उसको बसेमेंट जैसा ट्रीट किया उसके सारे फाउंडेशन ओपन हो गये। वह बिल्डींग धिरे धिरे ३ घरोंपर गिर गयी सौभाग्य था कोई मरा नही। और हम इसलिये कारवाई नही कर सके वह तो स्लम है वह तो म्हाडा ने घोषित किया है। महानगरपालिका ने नही किया है। अगर कोई मर जाता था तो उसके प्राण वापस ला सकते थे क्या ? और मैने सभागृह मे निवेदन किया था की और मा.श्रावणजी हर्डीकर ने कहा था की जो म्हाडाव्दारा घोषित स्लम है वहापर हम कारवाई नही कर सकते तो ५३ और ५४ के एम.आर.टी. पी. के अंतर्गत कारवाई अभी तक शुरु क्यो नही हुई। मा.महापौरजी, मेरी सहयोगी नगरसेविकाने पिछले सभागृह में इस विषय के संदर्भ मे कहां था लेकिन इस विषय पवर आज तक कारवाई नही हुई। मा.महापौरजी, उस बिल्डींग को पहले हमने थ्री झेड का नोटीस दिया, लेकिन उस बिल्डींग पर किसी प्रकार की ठोस कारवाई नही की गयी, उस व्यक्ति ने बाद मे महाराष्ट्र स्टेट स्टे ला लिया महाराष्ट्र स्टेट को ऐसी सूरत मे स्टे देने का अधिकार है क्या ? अगर इस तरीके से लोग कानुनी त्रुटीयो का फायदा उठायेगे तो यह शहर की जनता किसपर विश्वास करेंगी। किस कानुन पर विश्वास करेंगी। मैने यह भी कहा था, स्लम डीनोटीफाईड किया जायें। मै आजसे नही कह रहा हुँ, १९९७ मे पहले बार नगरसेवक बना था। और बडी खुशी थी की मेरा स्लम डी नोटीफाईड होना चाहियें। इसलिये १ ही स्लम मे मैने काम किया था की ज्योतीनगर को डिनोटीफाईड करदों। १८ -१८ फुट लोगों के घर तोडे मा.महापौरजी मैने इसलिये कहां की स्लम अच्छा होना चाहियें ताकि मैं मरे स्लम को इतना सुंदर बनाऊंगा की डिनोटीफाईड हो जायेंगा। मा.महापौरजी, १९९७ से लेकर के २०२० हो

गया स्लम डिनोटीफाईड करने के लिये हमारे पास कानुन नही है क्या ? अगर नही है तो बनाना नही चाहियें क्या ? इस दृष्टीसे महानगरपालिका ने सखोल अभ्यास करके डिनोटीफीकेशन के लिये कारवाई करनी चाहियें। इसलिये करनी चाहियें मा.महापौरजी की स्लम के नाम से दलित बस्ती की नाम से उन बिकसीत बस्तीयों मे पैसा लेकर के काम किये जाते है। और जिन बस्तायों को आवश्यकता है उनके साथ अन्याय हो रहा है। मै निवेदन करना चॉहता हु, मै यह नही कहता हु की मध्य नागपूर के सारे के सारे स्लम डिनोटीफाईड कर दो। लेकीन इतवारी तो डि नोटीफाईड हो सकता है। सेंट्रल ऐव्हेन्यु तो डि नोटीफाईड हो सकता है। महल तो डिनोटीफाईड हो सकता है, मै भानखेडा बस्ती को डिनोटीफाईड करने की बात इसलिये नही कह रहा हु वहापर स्लम की आज भी आवश्यकता है। जो जो बस्तीया डिनोटीफाईड हो सकती है वह करना चाहियें अन्यथा वहा इस प्रकार का फायदा लेकर के अनधिकृत बांधकाम करके महानगरपालिका कों नुकसान पहोंचाया जायेगा और लोगों की जान से खिलवाड किया जायेगा. मा.महापौरजी, आयुक्त महोदय इस विषय को लेकर के स्लम डिनोटीफीकेशन की जो कार्यवाही है उस प्रकार का प्रस्ताव सदन के पटल पर रखे और अगर महाराष्ट्र सरकार मे इस प्रकार का कोई प्रस्ताव नही है। हमने सभागृह मे प्रस्ताव पारीत करके शासन के पास भेजना चाहिये, और शासन से निवेदन करे की इस प्रकार का प्रस्ताव बनाकर के खाजगी निधीयों का भी दुरुपयोग हो रहा है वह भी प्रतिबंधीत हो और लागोंकी जान के साथ जो खिलवाड हो रहा है वह भी प्रतिबंधीत हो इस प्रकार का निर्देश दे यही निवेदन है।

वरील चर्चेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम च्या कलम १९६६ च्या कलम ५२,५३,५४ च्या जेवढया नोटीसेस देण्यात आलेले आहे त्यांच्यावर कुठल्या झोनमध्ये कुठल्या स्वरुपाची कारवाई करण्यात आलेली आहे त्याचा संपुर्ण अहवाल त्या त्या झोनच्या सहा.आयुक्तांनी निगम आयुक्तांकडे १५ दिवसांच्या आत पाठवावा. व त्यानंतर तो अहवाल पुढच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. तसेच संबंधित स्लम डिनोटीफाईड करण्याकरिता प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७५ / विषय क्र. ६८ (नोटीस)</u> :-**
**(समाजकल्याण विभाग)**
**(मा.सौ. आभा पांडे)**

नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागातर्फे समुपदेशन केंद्र जे प्रत्येक झोनमध्ये सुरुआहेत त्यांना म.न.पा. नी दिलेल्या कामा संदर्भात तसेच करारा संदर्भात''

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रमाणे नोटीस ""१" (जे) सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, नागपूर शहर मे महिला और बच्चों पर होनेवाले अत्याचार पर प्रतिबंध लगने के लिये नागपूर महानगरपालिकाने एक बहोत अच्छा कदम ऊठाया था I जिसमे हर झोन मे समुपदेश केंद्र की नियुक्ती की गयी, समुपदेशन केंद्र चलाने के लिये काम दिया गया था I मा.महापौरजी, या कामामध्ये ज्या अटी आणि शर्तीवर कामे दिली त्या अटी आणि शर्तीची पुर्तता त्या संस्थेने केलेली आहे काय ? याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, प्रथमत: दिनांक ३१/१०/२०१२ मध्ये मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार समुपदेशन केंद्र स्थापन झाले ते जवळपास २०१४-२०१५ पर्यत कार्यरत होते. त्यामध्ये नव्याने निविदा काढल्यानंतर २९/११/२०१७ च्या ठरावानुसार पुन:श्च समुपदेशन कार्यरत झाले आणि प्रथमत: १ वर्षापर्यत होते त्यानंतर सहा.आयुक्त व समाजकल्याण अधिकारी, यांच्यामार्फत स्थायी समिती सभागृहासमोर हा विषय ठेऊन त्यांना मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित होते. या त्रैमासिक अहवालामध्ये समुपदेशन केंद्राचे कार्य योग्य रितीने असल्याचे माझ्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन दिसुन येते.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, त्रैमासिक अहवाल जी संस्था समाजकल्याण विभागात जे जमा करते त्याच्यामध्ये खुप तफावत आहे. त्या डिपार्टमेंटला मी माहिती मागत असतांना मी ही माहिती मागितली की मला ज्या ज्या महिलावर किंवा कुटुंबावर झालेल्या अत्याचामध्ये तुम्ही ज्यांचे समुपदेशन केले असेल त्यांचा मोबाईल

नंबर देण्यात यावे, मा.महापौरजी, मला प्रशासनाने मोबाईल नंबर नाही दिले. मी त्या कर्मचारी महिलेला विचारले, मला का बरं मोबाईल नंबर नाही दिले. त्यावर त्या महिलेने मला सांगितले ती तीच्या घरची बाब आहे आणि तिच्यावर झालेल्या अत्याचार आहे ते कोणाच्याही निर्देशनास येऊ नये म्हणुन, मा.महापौरजी आम्ही जनप्रतिनिधी आहोत, मी सुध्दा एक महिला आहे. जर मोबाईल नंबर दिला असता तर प्रशासनाचे काही गेले असते, तो आमचा हक्क आहे. प्रत्येक जनप्रतिनिधीला कोणत्याही प्रकारची माहिती पुरविणे हे प्रशासनाचे नैतिक कर्तव्य आहे. परंतु ते त्यांनी दिले नाही. तरी सुध्दा माझ्याजवळ काही प्रुफ आहे. एक वर्षाकरीता आपण त्यांना समुपदेशन केंद्र चालविण्याकरीता दिले होते. परंतु वेळोवेळी प्रत्येक वर्षी आपण त्यांना मुदतवाढ देत गेलो, त्रैमासिक सांख्यिकी अहवाल समाजकल्याण अधिकारी यांनी मा.आयुक्तां मार्फत स्थायी समितीस रितसर सादर करणे बंधनकारक आहे. त्यांनी केलेही असतील परंतु जे त्यांनी त्रैमासिक अहवाल दिलेले आहे. मा.महापौरजी, त्यांच्यामध्ये फक्त संख्या नमुद आहे. अहवालाचा कालावधी, दाखल प्रकरणे, तडजोड निकालात निघालेले प्रकरणे, न्यायालयात पाठविलेले प्रकरणे, प्रलंबित पाठपुराव्यातील प्रकरणे, सल्ला व मार्गदर्शन केलेल्या व्यक्तीची संख्या मा.महापौरजी, एकाही अधिकारी कर्मचा-यांनी शहनिशा केलेली नाही मी एक जबाबदार जनप्रतिनिधी म्हणुन येथे सांगत आहे. ज्याप्रमाणे अटी आणि शर्तीवर आपण त्यांना काम दिले त्या पुर्ण झालेल्या नाहीत. माहिती खरी दिली की खोटी दिली याची पडताळणी कोण करणार आहेत. प्रशासन करणार आहे. प्रशासनाने त्यांना काम दिले परंतु खरी माहिती आहे की, खोटी माहिती आहे या विषयाची त्यांनी पडताळणी केलेली नाही. मा.महापौरजी अजुन एक गोष्ट ऐकाल तर आश्चर्यचकीत व्हाल, की अटी आणि शर्तीमध्ये मुद्दा क्र ६ जो आहे त्याच्यामध्ये दुरध्वनी खर्च, विज बिल ज्या संस्थेव्दारे केंद्र चालविण्यात येईल, त्या संस्थेला करावे लागेल. तुम्ही आश्चर्यचकीत व्हाल मा.महापौरजी, २०१२ पासून नागपूर महानगरपालिकेत समुपदेशन केंद्र प्रत्येक झोनमध्ये चालत आहे. परंतु एकाही संस्थेने दुरध्वनी खर्च, विज बिल दिलेले आहे काय ? हे मला प्रशासनाने येथे सांगावे.

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी याबाबत माझ्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामध्ये उल्लेख नाही.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, माझ्याकडे माहिती आहे. ज्या संस्थांना आपण काम दिले त्या संस्थेने अटी आणि शर्तीचे पालन केले नाही. पालन न करता त्यांना आपण मुदतवाढ दिली त्यास कोणकोणते अधिकारी जबाबदार आहे. मा.महापौरजी मी आपणांस सांगू इच्छिते की, एका समुपदेशन केंद्रासाठी लागणारा वार्षीक खर्च जो आहे तो ३ लाख ३६ हजार आहे. आणि १० झोनकरीता अपेक्षित खर्च ३३ लाख ६० हजार आहे. समुपदेशन केंद्राचे जे संस्थाचालक आहे त्यांनी वेळोवेळी आपल्याकडुन वर्षाचे ३ लाख ३६ हजार रुपये घेतले आहे परंतु आपल्याकडे एकही व्यक्ती असा नव्हता ज्यानी याची पडताळणी केली की, त्या संस्थेने आपल्याला काय दयायचे होते आणि विजेचा खर्च, पाण्याचा खर्च देऊ शकले काय ? किंवा त्या अटी आणि शर्तीवर आपण खरे आहे काय ? मा.महापौरजी, और तो और नागपूर महानगरपालिका मे सतरंजीपुरा झोन मे एक नयी बिल्डींग तयार की गयी, वहापर फायलेरीया डिपार्टमेंट नही है, फायलेरिया डिपार्टमेंट बैठता टी.बी. दवाखाने मे और यह संस्था बैठती है बढिया अत्याधुनिक बनाये गये सतरंजीपुरा झोन के पहिले मजले मे, बढीया कुलर की हवा है, कितने लोग आ रहे, कितने लोग नही आ रहे, कितने लोगों का समुपदेशन कर रहे, कितने लोगो का नही कर रहे है, यह किसी को मालुम नही है, मा.महापौरजी, कोई लेखाजोखा नही पुरा भोंगळ कारोबार चालु है, अभी यह नोटीस लगाने के १ रात पहले मेरे प्रभाग मे एक पानतावने करके महिला है जिसको उसके सासु ने मारा, उसपर हात ऊठाया वह झोनमे बचत गट के काम के लिये गयी थी, और इस अटी और शर्ती मे नमुद है की ८ तास त्यांना काम करावे लागेल, मग २४ तास ते समुपदेशन फोनवर करतील. त्या महिलेने रात्री ११.३० वाजता समुपदेशन केंद्राला फोन लावला तिचा फोन उचलला गेला नाही. फिर काय के लिये हमने महिलाओं की अत्याचारो के उपर बात करना, और यह सब करना, जब हम कुछ कर ही नही सकते, मा.महापौरजी, हमने सोच ही लिया है संस्थाये आयेगी काम नही करेंगी, उन्नती फाऊंडेशन का भी ऐसाही है, ठीक है वह संस्था पैसे देने के लिये तैयार हुयी, उसमे हमने कोई जाहिरात नही निकाली, क्या कर रही है नागपूर महानगरपालिका, मा.महापौरजी मै आपके मार्फत निवेदन करना चॉहती हुॅ की जितने महिलाओ पर अत्याचार होते है, जितने बच्चों पर अत्याचार होते हे अगर सही उपदेश से

अगर हमने समुपदेशन केंद्रकी स्थापना की होंगी तो मा.महापौरजी उन महिलाको कोई इनाम मिलना चाहियें, लेकीन वह कैसा मिलेगा, अभी तक बेजबाबदारी से जिन अधिकारीयोंने इन समुपदेशन संस्थाओ के कामो की अनुमती देते गये उसके लिये मा.महापौरजी कौन जबाबदार रहेंगा, इसलिये मै आपके मार्फत यह कहना चॉहती हु की आपके रुलिंग मे यह निवेदन करे और आप यह कहे की मा.आयुक्त के अधिनस्त इस बात की चौकशी होनी चाहियें, क्योकी यह गंभीर मुद्या है और महिलाओ पर होनेवाली अत्याचार का मुद्या है इसलिये मा.आयुक्तांच्या अधिनस्तच ती चौकशी व्हायला पाहिजे. एक महिला मी सुध्दा आहे. तुम्हाला आग्रहाची विनंती करीत आहे आणि ती चौकशी झाल्यानंतर आयुक्त मोकळे राहतील ज्यांचे चांगले काम आहे त्यांची चांगले करावे परंतु पैसे ज्यांनी दिले नाही त्यांच्याकडून पैसे वसुल करावे, व्याजासकट करावे का याची सर्व शहानिशा व्हायला पाहिजे याची चौकशी व्हायलाच पाहिजे.

वरील चर्चेनंतर अति.आयुक्तांनी या संपुर्ण प्रकरणाची शहानिशा करुन त्याचा अहवाल आयुक्तांना सादर करुन सभागृहाला सादर करावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, विषय क्र ६९ नागपूर शहरामध्ये खासदार निधी, आमदार निधी, आणि महानगरपालिका याच्या माध्यमातून अनेक समाजभवन तयार केलेली आहे परंतु काही समाजभवनामध्ये चांगली व्यवस्था आहे काही समाजभवन ओसाड पडली आहे. काही समाजभवनामध्ये जनावरे बसताता काही ठिकाणी म्हणुन त्या समाजभवनाला काही स्वयंसेवी संस्था नाममत्र दरावर जर दुरुस्ती करणार असतील, तर या संबंधी एक पॉलिसी तयार करावी आणि या समाजभवनामध्ये जे ओसाड पडले आहे. ज्याचे रिपेअर सुध्दा होऊ शकत नाही अशा ठिकाणी या सबंधात आपण निर्णय घ्यावा अशी मी आपल्या वतीने विनंती करतो.

**<u>ठराव क्र.७६ / विषय क्र.६९ (नोटीस)</u> :-**
**(कार्यकारी अभियंता झोन क्र. ०५)**
**(मा.श्री. तानाजी सुकलाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिका सिमा क्षेत्रा अंतर्गत सामाजिक कार्याकरीता शासकिय निधीतून अनेक समाज भवनाची निर्मीती करण्यात आलेली आहे. म.न.पा. च्या नेहरूनगर झोन अंतर्गत अनेक समाज भवनाची निर्मीती करण्यात आलेली आहे. परंतू या समाज भवनांची लोकोपयोगी कार्याकरीता वापर होत नसुन या समाज भवनाची अवस्था अत्यंत बिकट परिस्थिती असून तसेच समाज भवनांच्या निर्मीतीनंतर यांची देखभालीकरीता व वास्तू सुशोभित राहण्याकरीता यावर महानगरपालिकेचे लक्ष नसल्याने होत असलेल्या अनियमीततेवर उपाय योजना करून ही समाज भवन अबाधित राहण्याकरीता स्वयंसेवी संस्थांना लोकोपयोगी वापराकरीता अटी–शर्तीने देण्याच्या संदर्भाने.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रमाणे " (जे) "१" नोटीससभागृहाने विचारात घेऊन सन्माननीय जेष्ठ नगरसेवक श्री.दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची एक समिती तयार करुन त्यांनी याबाबत पॉलिसी ड्राफ्ट तयार करावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७७ / विषय क्र.७० (नोटीस)</u> :-**
**(सा.प्र.वि)**
**(मा.ॲड श्री. धर्मपाल मेश्राम)**

“नागपूर महानगरपालिकेच्या आजवरच्या ईतिहासात एवढ्या आर्थिक वर्षात कार्यादेश निर्गमित केल्यानंतर ती कामे थांबविण्यात आली काय ? सन २०१९–२० ह्या आर्थिक वर्षातील कार्यादेश निर्गमित करण्यात आलेली कामे थांबविण्यात आली काय ? थांबविली असल्यास ते कोणाच्या आदेशाने थांबविलेली आहेत ? असे आदेश देण्याचे अधिकार आदेश निर्गमित करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला आहेत काय ? ” ह्या संबंधी चर्चा करणे.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१प्रमाणे नोटीस " (जे) " सभागृहाने पुकारले

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी,विषय क्र ७१, महानगरपालिकेमध्ये डेप्युटेशनवर राज्य शासनाकडून कर्मचारी येतात आणि महानगरपालिकेचे कर्मचारी यामध्ये पगारा संदर्भात काही तफावत आहे काय ? दुसरा प्रश्न या दोन्ही अधिका-यांच्या संदर्भात शैक्षणिक पात्रतेमध्ये जे वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी आहे त्या संदर्भात हा प्रश्न आहे. सहाव्या वेतनाचा ऐरिअर्स दिलेला आहे काय ? आणि डेप्युटेशन वर आलेल्या कर्मचा-यांना सातव्या वेतनाचा लाभ पुर्णत: मिळतो आहे काय ?

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, राज्य शासनाच्या आस्थापनेवरील अधिकारी आणि महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी यामध्ये वेतन संरचनेमध्ये फरक आहे आणि सध्यस्थितीत राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला आहे आणि महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना लागू झालेला नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, सहाव्या वेतन आयोगाचा ऐरिअर्स दिला गेला आहे काय ?

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, यांच्या कार्यशैलीमध्ये काही तफावत आहे काय ? डेप्युटेशनवर आलेले अधिकारी महानगरपालिकेचे कर्मचा-यापेक्षा जास्त सक्षम आहे. की स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी दोघांच्या कार्यशैलीमध्ये काही तफावत आहे काय ? वरीष्ठ श्रेणीचे जे अधिकारी डेप्युटेशनवर येतात आणि महानगरपालिकेचे जे अधिनस्त कर्मचारी आहे त्या दोन्ही कर्मचा-यांच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. ३५ टक्यांची आस्थापनेची जी अट टाकली आहे आणि या अनुषंगाने डेप्युटेशनवर आलेल्या कर्मचा-यांना बंगला, कर्मचारी, गाडी, बगीच्या, सेक्युरिटी, सर्व सोयी उपलब्ध करतो पण स्थानिक स्वराज्य संस्थेचे जे अधिकारी वर्ग आहे यांना अशा कुठल्याही गोष्टींचा लाभ मिळतो किंवा नाही. आणि तो जो आस्थापनेचा खर्च मर्यादीत ३५ टक्क्यांच्या आतमध्ये घेतला जातो आणि असे अनेक कर्मचारी आहे. १९७४ चा जो ठराव होता आणि १९६४ जो ठराव होता एल.एस.जी.डी. उत्तीर्ण केल्याच्या संदर्भात महानगरपालिकेचे जे कर्मचारी आहे जे स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी आहे ते परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरही त्यांना त्याचा फायदा मिळत नाही. या अनुषंगाने जर सातवा वेतन आयोग डेप्युटेशनवर आलेल्या कर्मचा-यांना आहे. तर केंद्र शासनाने जेव्हा सातवा वेतन लागू केला मग स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्मचा-यांना का नाही.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, सातवा वेतन लागू करण्यासंदर्भात राज्य स्तरावर निर्णय घ्यायचा आाहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, महाराष्ट्रातील कुठल्या महानगरपालिकेला सातवा वेतन आयोग लागला आहे काय ?

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, याबाबत माहिती नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पिंप्री चिंचवड महानगरपालिकेला सातवा वेतन लागला आहे. आपण माहिती घ्या, ही सर्व माहिती आपण घ्या आणि आपल्या महानगरपालिकेला लागू शकतो काय ?

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, शासनाकडुन आलेल्या अधिका-यांना सातव्या वेतनाचा लाभ मिळत आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारी आणि कर्मचा-यांना सातव्या वेतनाचा लाभ मिळाला नाही. सहाव्या वेतन आयोगाचा अरिअर्स मिळाला नाही त्यांना ३५ टक्क्यांची अट लावली जाते.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, या बाबीवर शासन स्तरावर निर्णय घ्यायचा आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, मागच्या सभागृहामध्ये सहाव्या वेतन आयोगाचा अरिअर्स देऊ आणि सातवा वेतनही लागू करु अशा पध्दतीचे स्टेटमेंट आपण पास केले होते.

महापौर :- सहाव्या वेतन आयोगाचे अरिअर्स दयायचे नाही असे स्पष्ट स्थायी समितीच्या अध्यक्षांच्या बजेट मध्ये असतांना असे चकीचे स्टेटमेंट मी कधीही देणार नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, म्हणजे या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्मचा-यांना अरिअर्स

मिळणार नाही. आणि सातवा वेतनही लागू होणार नाही. म्हणजे नागपूर शहरामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेला जी सेवा प्रदान करतात त्या कर्मचा-यांना तुम्ही या महानगरपालिकेच्या हक्क आणि अधिकारापासून वंचित करीत आहात. अशा पध्दतीचे जर स्थानिक स्वराज्य संस्थेचे बजेट वाढवायचा आहे. उत्पन्न वाढवायचे आहे तर उत्पन्नाचे डेप्युटेशनवर आलेले अधिकारी आणि स्थानिक संस्थेचे अधिकारी उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात त्यांनी कार्य करायला पाहिजे.

**ठराव क्र.७८ / विषय क्र.७१ (नोटीस) :-**
**(सा.प्र.वि)**
**(मा. श्री. जितेन्द्र भा. घोडेस्वार)**

नागपूर महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाकडून आलेल्या अधिकारी वर्गाच्या मासिक वेतनावर तसेच नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या नियमित अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन फरकाबाबत मला आगामी सभेत चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१प्रमाणे न " (जे) "ोटीस सभागृहाने पुकारले

श्रीमती वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, नाल्याच्या दुरुस्तीसाठी काय प्रोव्हीजन आहे या संदर्भात प्रशासनाकडुन माहिती दयावी.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, कमाल टॉकीज पासुन ते राणीदुर्गावती चौकापर्यत चांभार नाल्याच्या भिंतीला तडा गेलेल्या आहेत. त्या भिंती घातक आहे आणि त्यावर अतिक्रमण सुध्दा आहे. त्याची पुर्ण चौकशी करुन चालु आर्थिक वर्षात त्या कामाकरीता बजेटमध्ये प्रोव्हीजन करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

श्रीमती वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, मागे आशीनगर नगर झोनमध्ये पालकमंत्र्यांनी जनता दरबार घेतला जनतेकडुन निवेदन देण्याता आले चांभार नाल्याच्या दुरुस्तीसंदर्भात परंतु ते खोटे आश्वासन देऊन निघुन गेले.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, पालकमंत्री महोदयांनी जी जनता दरबार घेतले त्याकरीता १०० कोटी रुपये आणले होते परंतु शासनानी परत घेतले. (बेल)

महापौर :- प्रशासनानी मा.सदस्या श्रीमती वैशाली नारनवरे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दयावे.

अधिक्षक अभियंता (श्री.मनोज तालेवार) :- मा.महापौरजी, या कामाकरीता सध्या प्रावधान उपलब्ध नाही. प्रावधान उपलब्ध झाल्यानंतर काम करण्यात येईल.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, आपणही जनता दरबार लावला होता त्या संदर्भात आतापर्यत उत्तर मिळाले नाही.

श्रीमती वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी,३१६० कोटी रुपायांचे अंदाजपत्रक सादर केले त्यावर शुक्रवार दिनांक १९ ला विशेष सभा घेण्यात आाली त्या सभेमध्ये मी या विषयावर भाषण केले होते. पुर्वी जी स्थिती होती आता पण तीच स्थिती चांभार नाल्याची आहे. बर्डी मध्ये नाल्याला कॅनल म्हटले जाते आणि प्रभाग ६ समोर येतो तेव्हा चांभार नाला असे म्हटले जाते. मा.महापौरजी त्या ठिकाणी अनेक नागरिक येणेजाने करत असते. ई –रिक्षा, टु –व्हीलर, फोर-व्हीलर, असे अनेक वाहने तेथुन जात असतात त्यामुळे त्या नाल्याची क्षमता कमी झालेली आहे. खुप जुणी गोष्ट आहे. त्या नाल्यामध्ये शाळेतील मुले सुध्दा वाहुन गेले होते. प्रत्येक ठिकाणी हा नाला खचलेला आहे. ही एक गंभीर समस्या आहे. याला सत्तापक्ष आणि प्रशासन हे दोषी राहणार आहे. आम्ही या गंभीर प्रश्नासंदर्भात आपणांस सांगितले आहे. शासनाचे काम हे जनतेला सुखसोयी उपलब्ध करुन देण्याचे आहे. तेव्हा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करु नये. जेव्हा हा नाला वस्त्यामध्ये शिरतो तेव्हा या नाल्याची स्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. लोकांच्या घरामध्ये जेव्हा पावसाळयात पाणी शिरते तेव्हा त्यांच्याकडे असलेल्या चैनीच्या सुखसोयीच्या वस्तु, मुलांची वहयापस्तकांची नासाळी होते. आपण त्यांना त्याचा मोबदला देतो काय ? मी जेव्हापासुन निवडुन आली तेव्हा पासुन माझी एकच मागणी आहे की तेथे सुरक्षा भिंत बांधुन दयावे. मागे प्रदीपजी पोहाने यांनी बजेट सादर केले ३१९७.६५ करोड रुपयांचा बजेट होता ऐवढा मोठा बजेट होता परंतु त्यामध्ये

नाल्याच्या सुरक्षा भिंतीसाठी १ करोड रुपये ठेऊ शकले नाही. आणि आम्ही त्या संदर्भात त्यांना मागणी केली तर निधी संपला मी कुठून देऊ असे उत्तर देण्यात आले. ते एन.आय.टी. चे ट्रस्टी आहे. त्यांनी जास्त वेळ एन.आय.टी. मध्ये दिला. महानगरपालिकेमध्ये दिसले नाही. तेव्हा असे वाटत होते की आपण त्यांना पाहिलेत काय ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या अर्थसंकल्पामध्ये त्यांचे काम अंतर्भुत करण्यात यावे.

**ठराव क्र.७९ / विषय क्र.७२ (नोटीस) :-** नागपूर महानगरपालिका प्रभाग क्र. ७ अंतर्गत वाहत असलेल्या
**(लोककर्म विभाग)** चांभार नाला (कॅनल मार्ग) हा प्रभाग क्र. ६ व यापुढे वाहत असून
**(मा. सौ. वैशाली अ. नारनवरे)** जागो जागी नाल्याची सुरक्षा भिंत नादुरूस्त अवस्थेत असल्यामुळे यावर चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील " (जे) "१" प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेऊन या वर्षीचा अर्थसंकल्प सादर करीत असतांना आयुक्तांनी अर्थसंकल्पामध्ये प्रभाग क्र.७ अंतर्गत वाहत असलेल्या चांभार नाला(कॅनल मार्ग) येथील सुरक्षा भिंतीच्या कामाचा अंतर्भाव करण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्रीमती वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, आपण जो शब्द सभागृहात दिला त्या शब्दावर कायम रहावे. सभेचे समापन करण्यापुर्वी मला येथे एक तक्रार नोंदवायची आहे. माझी या सभागृहात पहिली रेजीम आहे. त्यामुळे मला जास्त काही बोलता येत नाही. मी नशीबवान आहे की मी आज पहिल्या रांगेत बसली आहे. या ठिकाणी २०-२०, २५-२५ वर्षाचा अनुभव असणारे सर्व नगरसेवक आहे. परंतु दुर्भाग्याची गोष्ट आहे की मला या नगरसेवकांसारखे बोलता येत नाही आणि विषय ठेवता येत नाही हे मी मान्य करते. परंतु त्या दिवशी आम्ही चर्चेमध्ये सहभागी झालो त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस नव्हती, शिवसेना आणि कॉंग्रेस ही नव्हती. परंतु शब्द आणि शब्दापासून वाक्य बनते माझ्या पत्रकार बंधुकडे बसपा या चर्चेमध्ये सहभागी झाली नाही असे लिहु शकत नव्हती काय ? जेव्हाकी आम्ही त्या दिवशी चर्चेमध्ये सहभागी झालो त्या दिवशी हे वाक्य त्यांनी लिहायला पाहिजे होते. वर्तमान पत्र असे आहे की ते जनता वाचते आणि त्यांना असे वाटते की आमचे नेते या चर्चेमध्ये सहभागी झाले नाही काय ?

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| हस्ता:- | हस्ता:- |
| **निगम सचिव / उपायुक्त** | **महापौर** |
| **महानगरपालिका,नागपूर** | **महानगरपालिका,नागपूर** |